# आत्मवृत्त

१८५८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ८९४

कै. दाजी नागेश आपटे

RI-FBK-0009493

मूल्य रु. २.५०

# आत्मवृत्त

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. मुख्यमत.
अनुक्रम २५७०७ वि: चारित्र
क्रमांक ८९५ नों: दि: २३।८।५८

लेखक

कै. दाजी नागेश आपटे

REFBK-0009493

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८४९३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मूल्य रु. २.५०

प्रकाशक
मु. श्री. आपटे
दांडिया बाजार, वडोदें

प्रथमावृत्ति : ७ डिसेंबर १९५७

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए.
आनंद मुद्रणालय,
१९६।४६ सदाशिव : पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्र
अनुक्रम 25920 दि: ...
क्रमांक ... 6808 ... नों दि: 23/11/5

# प्रकाशकाचे दोन शब्द

माझे वडिलांनीं लिहिलेलें हें शेवटचें पुस्तक आहे. पूर्वीच्या सर्व पुस्तकांच्या लेखनाची सर्व जबाबदारी त्यांनींच शेवटपर्यंत पार पाडली. अर्थातच दरेक पुस्तकाबरोबरचें प्रास्ताविकहि ते स्वतःच लिहीत असत. हें शेवटचें आत्मवृत्त मात्र त्यांच्या पश्चात् प्रसिद्ध होत असल्यानें त्याला प्रास्ताविक लिहिण्याची जबाबदारी मजवर येऊन पडली आहे. साहित्यिक आणि विद्वान वडिलांचे पुस्तकास, त्या विषयांत अनभिज्ञ असतांना प्रास्ताविक लिहिण्याचें काम अंगावर घेणें हें एक धाष्टर्यच आहे. या प्रास्ताविकाचा मजकूर कदाचित् वरील कारणांमुळें पुस्तकाला विशोभित होण्याचा संभव आहे. परंतु कांहीं लौकिक व कौटुंबिक जबाबदारीच्या दृष्टीनें हें प्रास्ताविक अवश्य असल्यानें लिहीत आहें.

आपल्या वाचनांत चरित्रें किंवा आत्मचरित्रें हीं बहुशः राजकीय, धार्मिक क्षेत्रांतील अग्रगण्य व्यक्तींचींच येतात. माझ्या वडिलांचा प्रत्यक्ष राजकारणाशीं संबंध अगदीं थोडा असे. परंतु १९१६ सालापासून ते १९३५ पर्यंतच्या कालखंडांत महाराष्ट्रांत व बडोद्यांत राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांत काम करणाऱ्या प्रमुख अशा व्यक्तींचा त्यांच्याशीं निकट संबंध आला होता. ह्या संबंधामुळें या कालांतील घडलेल्या निर-निराळ्या घटनांबद्दल कितीतरी अप्रकाशित व सामान्यतः लोकांना माहीत नसलेली अशी माहिती त्यांचेजवळ असे. जेव्हां त्यांची या कालाबद्दल मित्रांशीं चर्चा होत असे तेव्हां त्या सर्वांचा आग्रह असे कीं, ही अप्रकाशित माहिती प्रसिद्ध होणें हें अतिशय जरूरीचें व इष्ट आहे व ह्याच भूमिकेनें हें पुस्तक लिहिलें आहे. त्यांचा मानसिक पिंड हा एकाद्या शास्त्रज्ञाप्रमाणें असे. एकाद्या विषयाचा सूक्ष्म अभ्यास करून, तत्संबंधीं सर्व उपलब्ध माहिती गोळा करून ती शास्त्रशुद्ध रीतीनें लोकांपुढें ठेवण्याची

त्यांची पद्धति असे. हें शेवटचें पुस्तक आत्मचरित्रपर असलें तरी त्यांच्या वर उल्लेखिलेल्या स्वभावविशेषामुळें त्यावेळच्या परिस्थितीचें व घटनांचें वर्णन त्यांत प्रामुख्यानें असून व्यक्तिनिष्ठता अगदीं कमी आली आहे.

प्रास्ताविक लिहितांना स्वतःचे आठवणींत असलेल्या वडिलांच्या कार्याचा आढावा मनांत येणें अपरिहार्य आहे. सुमारें वीस वर्षे त्यांना वकिलीचा व्यवसाय व साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांत कार्य करतांना मी पहात होतों. इतक्या जवळून पाहिल्यानें त्यांच्या कामाची आणि कार्यपद्धतीची कल्पना मनापुढें पूर्णपणें येते. एकादा विषय त्यांनी अभ्यासाकरितां निवडला कीं, ते त्याविषयीं अगदीं प्राथमिक स्वरुपापासून अद्ययावत् सर्व माहिती वाचून ग्रथित करत असत. वाचलेल्या मजकुरांतील सर्व महत्त्वाच्या गोष्टी किंवा त्यांची नोंद ध्यानांत ठेवण्यासाठीं त्यांनीं स्वतःची एक विश्लेषणात्मक मननपद्धति बसविली होती. स्मरणशक्ति जबरदस्त असल्यानें व वरील पद्धतीमुळें एकदां वाचलेला मजकूर त्यांना केव्हांहि वादविवादासाठीं किंवा इतर कोणत्याहि कामासाठीं संपूर्णपणें वापरतां येत असे. ही अभ्यासपद्धति शेवटपर्यंत त्यांनीं कायम ठेवली होती. त्यांनीं लिहून काढलेल्या टिप्पणी सुमारें ७–८ हजार पानें होतील. कोणत्याहि विषयावर प्रसिद्ध होणारी आंकडेवार माहिती संकलित करण्याची त्यांना विशेष आवड असे. त्यामुळें खानेसुमारीचा अहवाल, राजकीय मतदानाची आंकडेवारी, राज्यांच्या क्षेत्रफळांचे, लोकसंख्येचे आंकडे हे सर्व त्यांच्या टिप्पणींत अंतर्भूत होत असत. या संग्राहक अभ्यास-पद्धतीमुळें त्यांची माहिती नेहमीं स्पष्ट व आधारासह शाबित करतां येण्यासारखी असे. खाजगी संभाषणांतील वादांत, सभांतील व्याख्यानांत किंवा लिहिलेल्या लेखांत वरील पद्धतीमुळें विषयाच्या त्यांच्या ज्ञानाची छाप पडत असे. त्यांची व्याख्यानांतील भाषा संस्कृतनिष्ठ, प्रौढ परंतु श्रोत्यांना समजण्याइतकी सुलभ असे. व्याख्यानें कंटाळवाणीं होतील इतकीं लांब होऊं नयेत व कितीहि विस्तृत विषय असला तरी तो मुद्देसूद व सुटसुटीत प्रकारानें एकाद्या तासाच्या आंत आला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. एकादा विषय फार मोठा असेल तर त्यावर दोन भागांत व्याख्यानें व्हावींत, परंतु दोन तीन तास कंटाळवाणीं भाषणें होऊं नयेत

असें त्यांचें मत होतें. हिंदी, गुजराती व इंग्लिश या तिन्ही भाषांमध्यें ते मातृभाषेइतक्या सहजतेनें बोलत असत.

या सर्व गुणांचे मानानें त्यांना मिळालेला वाव हा अगदीं मर्यादित होता. व्यावसायिक कारणांसाठीं बडोद्यास स्थायिक झाल्यानंतर श्री. सयाजी-राव महाराजांशीं आलेल्या संबंधामुळें लेखन, विद्वत्ता आणि वक्तृत्व यांना एक प्रकारचा राजाश्रय मिळत गेला व जसजसा हा संबंध वाढत गेला तसा हा राजाश्रयहि वाढत गेला. व त्यांच्या स्वतःच्या मनोवृत्तीमध्येंहि विद्वत्तेचा परिपोष राजाश्रयावरच व्हावा अशी बैठक तयार होत गेली. श्री. सयाजीरावांचे मृत्यूनंतर हा राजाश्रय तुटल्यानें व संस्थानाचें विलीनी-करण झाल्यानें हा वाव अतिशयच मर्यादित झाला. त्यांचें मराठी, गुजराती, हिंदी व इंग्लिश या भाषांवर वर उल्लेखिल्याप्रमाणें प्रभुत्व होतें. व वक्तृत्वासाठीं ते त्यांचा उपयोगहि करीत असत. लेखनक्षेत्रांत मात्र त्यांनीं फक्त मराठीचाच उपयोग केल्यानें अखिल भारतीय स्वरूपाची प्रसिद्धि त्यांना मिळूं शकली नाहीं. या गोष्टीची जाणीव त्यांना होती व ज्योतिषविषयक एक दोन ग्रंथ इंग्रजी अथवा हिंदीमध्यें लिहिण्याचा विचार ते शेवटलीं एकदोन वर्षें करीत होते. परंतु दृष्टिमांद्यामुळें व इतर कारणां-मुळें हें कांहीं शक्य झालें नाहीं.

या पुस्तक-लेखनानंतरचें प्रकाशनाचें कार्य त्यांचे स्वतःच्या ऐवजीं माझेवर एकदम पडल्यामुळें इतरांच्या मदतीची जरूर फार भासली. त्या-वेळीं वडिलांचे मित्र महामहोपाध्याय डॉ. पां. वा. काणे यांनीं पुस्तकाचें मूळ लिखाण वाचून त्याबद्दल उपयुक्त अशा सूचना केल्या व पुस्तकाला प्रस्तावना लिहून दिली. त्यांचें उतार वय, शारीरिक व्याधी, व्यावसायिक व राज्यसभेचें कार्य या सर्व गोष्टी संभाळून त्यांनीं या कामी जो वेळ खर्च केला तो केवळ त्यांचे वाडिलांवरील प्रेम व लोभ यामुळेंच होय. ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

या पुस्तकांत उल्लेखिलेले वडिलांचे दोन स्नेही श्री. बाळ गंगाधर ऊर्फ बाळासाहेब खेर ( मुंबईचे माजी मुख्य प्रधान ) व श्री. हरीभाऊ तुळपुळे

यांचा मृत्यु पुस्तक लेखन व प्रकाशन या दरम्यानचे काळांत झाला. ही नोंद पुस्तकांत येणें शक्य नसल्यानें स्वतंत्रपणें देत आहें.

हें पुस्तक छापण्यास मुद्रक म्हणून आनंद प्रेसचे मालकांनीं जें सहकार्य व मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानणें आवश्यक आहे.

पुस्तक वडिलांचे हयातींत प्रसिद्ध झालें नाहीं तरी निदान त्यांचे मृत्यू-नंतर वर्षश्राद्धदिनापर्यंत तरी प्रसिद्ध व्हावें अशी उत्कट इच्छा होती, ती सर्वांचे सहकार्यानें पूर्ण होत आहे, म्हणून समाधान वाटत आहे.

मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा १८७९
ता. ७ डिसेंबर १९५७

**मु. श्री. आपटे**

# प्रस्तावना

आत्मचरित्र लिहिण्याची प्रथा आपल्याकडे फारशी नाहीं व पाश्चात्यांतहि कमी होती. आमचे संस्कृत कवि व इतर ग्रन्थकार यांत दोन प्रकार आढळतात. कालिदासासारखे कांहीं आज प्रथितयश असलेले कवि आपल्याविषयीं अत्यल्प माहिती देऊन शिवाय शालीनतेनें आपल्याला मन्द ( मन्दः कवियशःप्रार्थी ) म्हणतात. तर विजयनगर साम्राज्याचें प्रतिष्ठापन करून संवर्धन करणारे माधवाचार्य पराशरस्मृतीवरील टीकेंत आपल्या कुलाची वगैरे बरीच माहिती देऊन इन्द्राचा मंत्री ज्याप्रमाणें बृहस्पति त्याप्रमाणें वीर बुक्क व हरिहर यांचे आपण मन्त्री असें सांगून शेवटीं ' सर्वज्ञः स हि माधवः ' असें म्हणतात. पाश्चात्यांतही सेन्ट आगस्टाइनची कन्फेशन्स् व रूसोची कन्फेशन्स् प्रसिद्ध आहेत. पाश्चात्यांत १९ व्या व २० व्या शतकांत पुष्कळच आत्मचरित्रें प्रसिद्ध झालीं व होत आहेत. लेस्ली स्टीफन यानें सुचविलें आहे कीं, प्रत्येकानें आत्मचरित्र लिहून तें आपल्या मृत्युपत्राबरोबर सीलबंद करून ठेवावें. आत्मचरित्र लिहिणाराला सत्य सांगावयाचें आहे काय किंवा त्याला स्वतःला आपल्याबद्दल खरी परीक्षा झाली आहे काय या प्रश्नांचें महत्त्व नाही असें त्यांचें म्हणणें आहे. प्रसिद्ध पाश्चात्त्यांत गिबन, फ्रँक्लीन, टॉलस्टॉय, सर वॉल्टर स्कॉट, जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर, कार्नेजी, मार्गो अॅस्क्विथ यांनीं उत्तम आत्मचरित्रें लिहिलीं आहेत. अगदीं सत्य असें आत्मचरित्र कोणत्याही मनुष्याला लिहितां येईल काय या विषयीं बेन्सननें ' फायनल एडिशन ' या पुस्तकांत संशय प्रदर्शित केला आहे. फार कार्य केलेल्या माणसांपैकीं बरेचजण शालीन असतात व त्यामुळें त्यांना आपल्या कार्याबद्दल उघडपणें स्पष्ट लिहितां येत नाहीं. तसें त्यांनीं लिहिल्यास त्यांना वाचक अहंकाराचें दूषण देतील. एखाद्या माणसानें आपले दोष किंवा पापकृत्यें अगदीं

स्पष्टपणें सांगितलीं तर लोक त्याला नाटकी म्हणतील. म्हणून आत्मचरित्र लिहिणें हें एक कठीण काम आहे. मग आत्मचरित्रें कां लिहिलीं जातात असा प्रश्न उत्पन्न होतो. त्याचें उत्तर असें आहे कीं, तीं एक किंवा अनेक हेतूंस्तव लिहिलीं जातात. कांहींचा हेतु आपल्या चित्तवृत्तींची चिकित्सा करणें हा असतो. दुसऱ्या कांहीं आत्मचरित्रांचा उद्देश असतो कीं, आपल्या कृत्यांचें समर्थन करणें. उदाहरणार्थ, कार्डिनल न्यूमन यांनीं उत्कृष्ट भाषेंत लिहिलेलें ' अपोलॉजिया ' हें पुस्तक. मन प्रसन्न करणारे व आकर्षक असे आयुष्यांत प्रसंग व अनुभव आले असतील त्यांचें वर्णन करण्यानें पुनः त्या प्रसंगांतून व अनुभवांतून जात आहों असें मनाला वाटून अनुपम आनन्द होतो, म्हणून कांहीं लोक आत्मचरित्रें लिहितात. आयुष्यांत आलेले अनुभव दुसऱ्यांना मार्गदर्शक व उत्साहवर्धक होतील असें वाटूनही आत्मचरित्रें लिहिलीं जातात. उदाहरणार्थ, हेलेन् केलरचें माझी जीवन कहाणी ( The story of my life ) हें पुस्तक. एखाद्या मनुष्याला फार मोठें पद प्राप्त झालें किंवा त्याची कीर्ति सर्वत्र पसरली तर त्याचा फायदा घेऊन आत्मचरित्र लिहिल्यास द्रव्यार्जनही होतें. आपलीं मुलें, आप्त व मित्र यांच्या आग्रहास्तव किंवा त्यांच्या माहिती-साठींही आत्मचरित्रें लिहिलीं जातात.

आपल्या देशांत गांधीजींचें ' माझे सत्यशोधनाचे प्रयोग ' हें पुस्तक फार प्रसिद्ध आहे. अलीकडे प्रसिद्ध इतिहासलेखक, ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध असे श्री. गोविंद सखाराम सरदेसाई यांनीं आपल्या आत्मचरित्राला ' माझी संसारयात्रा ' असें नांव देऊन एक अत्यंत वाचनीय, माहितीपूर्ण आणि सुबोध असें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्याचप्रमाणें विदुषी स्त्रियांनीं आपण व आपले पति या संबंधानें मराठींत लिहिलेलीं दोन हृद्य व रसाळ पुस्तकें रमाबाई रानडे व लक्ष्मीबाई टिळक यांचीं अनेक वाचकांच्या आवडीचीं असतील.

कै. दाजी नागेश आपटे यांचा व माझा परिचय सुमारें चाळीस वर्षांचा होता. आमचा दोघांचा अनेक विषयांवर पत्रव्यवहार होत असे. त्यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें आहे, त्याला प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहावे अशी त्यांच्या चिरंजीवांनीं इच्छा समक्ष दर्शविल्यावरून मी ही

छोटी प्रस्तावना लिहिली आहे. दाजीसाहेब हे कुशाग्र बुद्धीचे, उत्कृष्ट वक्ते, अनेकभाषाकोविद, संशोधक, अनेक प्रकारच्या संस्था चालवून वाढीस लावणारे असे सद्‌गृहस्थ होते. ' हिंदी सुमेरी संस्कृति ', ' साहित्यप्रकाश ' नांवाचा निबंधसंग्रह, ' सुधारणा आणि प्रगति ', ' नीतिशास्त्रप्रबोध ', ' श्री सयाजीराव महाराज यांचें तीन भागांतील चरित्र ' इत्यादि ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. संस्कृत वाङ्मय व ज्योतिष यांचा खोल व सूक्ष्म अभ्यास त्यांनीं केला होता. जगांत वावरावयाचें म्हणजे अनपेक्षित अडचणी कशा उत्पन्न होतात व त्यांतून मित्रांच्या साहाय्यानें व ईश्वरी कृपेनें मनुष्य धीरानें वागल्यास कसा सुटूं शकतो, चक्रनेमिक्रमानें व्यक्ति व घराणीं यांना भिन्नभिन्न दशा कशा प्राप्त होतात व आपल्या समाजांत गेल्या साठ वर्षांत किती विलक्षण स्थित्यंतर सर्व बाजूंनीं झालें आहे याचा या चरित्राच्या वाचनानें बोध होईल. आत्म-चरित्राची भाषा सुबोध असून अनेक व्यक्तींशीं आलेले संबंध व त्यांचीं स्वभावचित्रें मोठ्या कुशलतेनें व कोणाला फार बोचूं नयेत अशा रीतीनें यांत ग्रथित केलेलीं आहेत, हा या आत्मचरित्राचा एक विशेष आहे.

**पां. वा. काणे**



दाजी नागेश आपटे

जन्म :
दि. १ एप्रिल १८८९
चैत्र शु. १ शके १८११

मृत्यु :
दि. १८ डिसेंबर १९५६
मार्गशीर्ष वद्य १, शके १८७८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २४९०८ वि:
क्रमांक ८८४ नों: दि: २३/८
ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०९३

# आ त्म वृ त्त

## .१.

चित्पावनांच्या कुळांमध्यें आपटे घराणें हें बहुसंख्य घराण्यांपैकीं एक आहे. कोठल्याहि घराण्याचा मूळ पुरुष कोण हें सांगणें अर्थातच अशक्य आहे; कारण जेथपर्यंत मागें जावें, तेथपर्यंतच्या कोणत्याहि पुरुषाला कोणीतरी पूर्वज असणारच. यामुळें कोठल्याहि घराण्याचा अगदीं आद्यपुरुष हा मनुष्य जातीचा पहिला पुरुष ठरेल. अर्थातच इतका मागला इतिहास मिळणेंहि अशक्य व तसा प्रयत्न करणेंहि दुष्कर. म्हणून साधारणतः जितक्या पूर्वींपर्यंत सुसंगत माहिती मिळूं शकते, तितकें मागें जातांना आमच्या घराण्याचा मागोवा सरासरीं माझ्यापूर्वींच्या दहाव्या पुरुषापर्यंत मिळूं शकतो. या कामीं मला आमच्या आपटे घराण्याचा इतिहास लिहिणाऱ्या कै. रा. गोविंद विनायक आपटे यांच्या परिश्रमाचाच मुख्य आधार आहे. घराण्यांचा इतिहास महाराष्ट्रांत प्रसिद्ध करण्याची प्रथा सदर रा. गोविंदराव आपटे यांनीच ' आपटे घराण्याच्या इतिहासा 'नें सुरू केली. त्या इतिहासावरून चालू पिढीच्या पूर्वींच्या तेराव्या पिढीपर्यंतची हकीकत उपलब्ध होऊं शकते; यावरून सदर इतिहासाला प्रस्तावना लिहिणाऱ्या कै. सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे यांच्या मताप्रमाणें हा इतिहास सुमारें सतराव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत अथवा मागें जाऊं शकतो. तथापि वर म्हटल्याप्रमाणें आमच्या शाखेचा आद्यपुरुष आजगांवच्या आपट्यांपैकींचा असल्याचें

दिसून येतें. हें आजगांव रत्नागिरी जिल्ह्यांतील वेंगुर्लें या गांवापासून नऊ मैलांवर आहे. तेथें विश्वनाथभट हे आपटे घराण्याच्या आमच्या शाखेचे आद्यपुरुष राहत होते. त्यांना महादेवभट व कृष्णंभट असे दोन मुलगे होते. यांपैकींचे दुसरे पुत्र कृष्णंभट हे आजगांव सोडून त्र्यंबक या गांवीं गेले. हें गांव संस्थान बावडा या जहागिरींत मोडतें. कृष्णंभटांना महाजन पोतदार हा हुद्दा होता व तो हल्लींहि त्यांचे वंशास चालू आहे. आजगांव येथील मुख्य ग्रामदेवता श्रीवेताळ महाराज ही आहे, व कृष्णंभट हे आजगांव सोडून त्र्यंबक येथें गेले तरी ते आजगांवच्या वेताळमहाराजास अगदीं अलीकडेपर्यंत नैवेद्य घालीत असत. यावरूनहि कृष्णंभटांचें मूळ स्थान आजगांव असल्याचें दिसून येतें. कृष्णंभटास चार पुत्र होते, त्यांपैकींचे शंकरभट हे पुढें त्र्यंबक सोडून कासारवेल अथवा शिरगांव येथें आले. शंकरभटांच्या मुलांपैकीं कृष्णंभट हे एक होते व त्यांचा एक मुलगा नारायणभट हा होता. या नारायण-भटजींचे तिसरे पुत्र रघुनाथभट हे होत. हे रघुनाथभट कासारवेल अथवा शिरगांव सोडून मालवण जवळील मालदी या गांवीं गेले व तेथून पुढें आमच्या घराण्याचें सांप्रतचें कोंकणांतील स्थान मालपें या गांवीं आले. मालपें हा गांव सरदार बाळासाहेब पंत अमात्य गगनबावडा यांचा आहे. या गांवीं यापूर्वीं ब्राह्मणांची वस्ती नव्हती, ती प्रथम रघुनाथभट यांनीं केली. हल्लीं मालपें येथें आपटे घराण्याचीं बारा पंधरा घरें आहेत. या गांवीं वस्ती होऊन हल्लीं जवळजवळ दोनशें वर्षें झालीं आहेत. हा गांव अगदीं डोंगरांत असून त्या जवळून खारेपाटणकडे खाडी गेली आहे. गांव खोतीचा असून त्याच्या स्वामित्वाबद्दलचा सबंध गांवाबद्दलचा खंड आपटे घराण्याकडूनच दिला जातो. त्यामुळें या गांवचे सर्व हक्क आपटे यांचेच आहेत, व गांव वंशपरंपरेच्या अधिकारानें आपटे घराण्याकडे आहे. या गांवचें हवापाणीहि फार उत्तम आहे.

या रघुनाथ भटजींच्या सहा मुलांपैकींचे तिसरे नारायणभट होते, व त्यांना पांच मुलगे असून त्यांतील शेवटचे विष्णुपंत हे माझे पणजोबा होत. कोंकणांत भटजी हें सन्मानार्थक उपपद गणलें जात असल्यानें आपटे घराण्यांतील पुरुषांना भटजी म्हटलें जाई. तरी मालपें येथील खोती या

घराण्याला मिळाल्यानंतर लौकरच त्यांचा पेशा गृहस्थी झाला होता. त्यामुळें गेल्या दीडशें–पावणेदोनशें वर्षांपासून खोती–वृत्तीवरच सर्वांचा प्रपंच चालत असे. माझे पणजे विष्णुपंत यांचें प्रपंचाकडे फारसें लक्ष नसे, त्यामुळें त्यांच्या सिळकतीची व्यवस्था त्यांच्या हातून चांगली होत नसे व खोतीच्या वतनाचेहि पुष्कळ वाटे झाल्यामुळें त्या वतनाचें उत्पन्न त्यांचा प्रपंच चालविण्यास पुरेसें होईनासें झालें. विष्णुपंतांना चार मुलगे होते. त्यांपैकींचे दुसरे महादाजीपंत हे होते. हेच माझे आजोबा होत. चारहि भावांत सर्वांत हुषार हेच होते. त्यामुळें देशावर आपलें नशीब काढण्यासाठीं म्हणून ते सन १८२६ सालीं प्रथम पुणें प्रांतांत आले. यांचा जन्म सन १८०० सालीं झाला होता, अर्थात् ते पुण्याकडे आले, त्यावेळीं त्यांचें वय २६ वर्षांचें होतें. इकडे आल्यावर प्रथम त्यांनीं पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्याच्या अवसरीबुद्रुक या गांवीं पैमाषं खात्यांत मोजणीदाराची नोकरी केली. त्यानंतर सन १८२८ सालीं त्यांनीं राहतेकर नांवाच्या मुन्सफांकडे शिरस्तेदाराची नोकरी पत्करिली. त्या काळीं शिरस्तेदार हा मुन्सफाचा खासगी नोकर समजला जात असे, व जेथें जेथें मुन्सफाची बदली होई, तेथें तेथें त्यास जावें लागे. त्यामुळें हा त्रास चुकविण्यासाठीं म्हणून त्यांनीं वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास करून ती परीक्षा सन १८३२ सालीं दिली. अर्थात् त्या वेळची ही परीक्षा कामचलाऊ नियमांच्या माहितीवर व सर्वसाधारण न्यायाच्या तत्त्वांवरच आधारलेली असे. याप्रमाणें सन १८३२ सालीं वकिलीची सनद मिळाल्यावर ते चाकण या तालुक्याच्या गांवीं वकिली करूं लागले. सांप्रत या तालुक्याचें मुख्य ठाणें खेड येथें आहे, व मुन्सफकोर्टहि तेथेंच आहे. पण पूर्वीं तें ठाणें चाकण येथें होतें, तें सन १८२७ सालापासून सन १८४५ सालापर्यंत होतें, व त्यानंतर तें खेड येथें नेण्यांत आलें.

आमच्या आजोबांना प्रथम नोकरी लागून त्यांचा जम बसल्यावर त्यांनीं आपले वडील विष्णुपंत व आपली पत्नी उमाबाई व मुलें वगैरेंना आपल्याजवळ आणलें. माझी आजी उमाबाई या माझ्या आजोबांहून चार वर्षांनीं लहान होत्या. त्यांचा जन्म सन १८०४ सालीं झाला होता. महादाजीपंत वकिली करूं लागल्यावर थोड्याच दिवसांत त्यांचा धंदा

चांगला जमला. नंतर त्यांनीं चाकण येथें पुणें ते खेडच्या मुख्य रस्त्यावर स्वतःचें एक घर बांधलें. त्या घराच्या शेजारींच श्रीविष्णूचें मंदिर आहे. आमचें हें घर दुमजली व दोन चौकांचें असून फार सोयीचें आहे. मागील अंगणांत विहीर असून या घराच्या दक्षिणेस असलेल्या दरवाजानें शेजारच्या विष्णुमंदिरांत जातां येतें. या घराच्या ओळींत उत्तरेस दोन तीन घरें टाकून पूर्वेकडे चाकणच्या प्रसिद्ध भुईकोट किल्ल्याकडे जाणारी गल्ली आहे. शिवाजी महाराजांच्या काळीं शाइस्तेखानानें दक्षिणेंत स्वारी केली असतां शिवाजीचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळे यानें हा भुईकोट किल्ला मोठ्या शौर्यानें पुष्कळ दिवस लढविला, व शेवटीं नाइलाजानें तो शत्रूच्या हवालीं केला. पण त्याचा ताबा घेऊन शायिस्तेखान पुढें पुण्याकडे गेल्याबरोबर पुन्हां फिरंगोजीनें तो लढून आपल्या कबजांत परत घेतला, हा इतिहास प्रसिद्धच आहे. सांप्रत तो किल्ला बहुतेक पडला असून क्वचित् त्याच्या भिंतीचे थोडेसे अवशेष दिसतात व किल्ल्याभोंवतालच्या खंदकांत निवडुंग फोंफावला आहे. या किल्ल्यावरून पुढें गेलें म्हणजे चक्रेश्वर महादेवाचें एक अत्यंत रम्य मंदिर आहे. या मंदिराला लागूनच चक्रतीर्थ या नांवाची एक सुंदर बांधीव अशी पुष्करिणी आहे. हें देऊळ व पुष्करिणी फार प्राचीन असून मंदिरांतील शिवलिंग स्वयंभू असल्याची प्रसिद्धि आहे. तथापि शिवाजी महाराजांच्या नंतर या मंदिराकडे अथवा पुष्करिणीकडे कोणी लक्ष दिलेलें दिसत नाहीं. जुनीं देवळें तशींच उपेक्षित टाकून नवीन मंदिरें बांधण्याकडे लोकांच्या असलेल्या प्रवृत्तीकडेसच जुन्या देवळांच्या दुरवस्थेचें मूळ नेऊन पोचवितां येतें. या कारणानें हें देऊळ अगदी जीर्णावस्थेला आलें होतें. पण सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं पुण्यांतील शनिवार मारुती नजीक राहणाऱ्या माधवराव लिमये नांवाच्या एका गृहस्थांनीं पुष्कळ पैसे खर्च करून त्याची दुरुस्ती केल्यामुळें हें स्थान आतां फार रम्य झालें आहे. याच्या आसपास वस्ती नसल्यानें सर्वत्र शांतता नांदत असते. अशा या रम्य व शांत स्थळीं बसलें असतां मनाला एक प्रकारची असाधारण एकाग्रता येऊन मन अन्तर्मुख होतें. या गोष्टीचा अनुभव मी स्वतः सन १९०९ सालीं खेड येथें प्लेग झाल्यामुळें आम्ही चाकणेस येऊन राहिलों होतों, त्यावेळी घेतला आहे.

चाकण हा गांव लहानसा असून तेथील वस्ती हल्लीं सुमारें दीड हजार आहे. पण पूर्वी ज्या वेळेस तेथें कोर्ट असे तेव्हां जास्त होती. आजोबांच्या वेळीं गांवांत एकोपा पुष्कळ असून आमच्या आजोबांकडेसच गांवांतील सर्व सार्वजनिक कृत्यांचें पुढारीपण असे. अर्थात् त्या वेळच्या सार्वजनिक कार्यांचें स्वरूप धार्मिकच असे. विष्णुमंदिरांत गोकुळाष्टमीचा उत्सव करणें, चक्रेश्वराचा उत्सव करणें, कोणी साधुसंत आल्यास त्याची व्यवस्था करणें इत्यादि गोष्टींच सार्वजनिक खात्यांत येत. आमच्या आजोबांना बागेची व फुलांची फार हौस असल्यामुळें आमच्या घरापासून उत्तरेस थोड्या अंतरावर एक मोकळी जागा घेऊन तेथें त्यांनीं मोठी बाग केली होती, तींतून दररोज सर्व प्रकारचीं पाट्यांच्या पाट्या फुलें येत असत. अर्थात् त्यांचा उपयोग देवपूजेसाठींच होत असे, हें सांगावयास नकोच.

माझे आजोबा चणीनें ठेंगणे, शरिरानें किंचित् स्थूल, वर्णानें गोरे व चेहऱ्यानें तरतरीत होते. बाणेदारपणासाठीं त्यांची फार प्रसिद्धि असे. त्यांना तीन मुली होत्या. त्यांतील माझ्या वडिलांची एक बहीण कृष्णा ऊर्फ माई ही अभ्यंकर घराण्यांत दिली होती. तिचा नवरा तिच्या अल्पवयांतच वारल्यामुळें ती आपल्या एकुलत्या एक मुलासह आमच्या घरींच आली. तिच्या मुलाचें नांव पांडुरंग विष्णु अभ्यंकर असें होतें. हे पांडुरंगपंत ऊर्फ बाबा कॉन्ट्रॅक्टरचा धंदा करूं लागल्यावर त्यांत त्यांना फार बरकत झाली, व त्या काळांत त्यांनीं मुंबईच्या ग्रॅंटरोड स्टेशनवर स्वतःच्या चार चाळी बांधल्या होत्या. त्या चाळी अभ्यंकरांच्या चाळी म्हणून पुष्कळ काळपर्यंत प्रसिद्ध होत्या. पण पुढें एका कंत्राटांत त्यांना मोठें नुकसान आलें, त्यामुळें या सर्व चाळी त्यांना विकाव्या लागल्या. त्यांचे मोठे चिरंजीव जनार्दन पांडुरंग अभ्यंकर हे नाशिक येथें वकिली करूं लागले होते, तेथें त्यांचे वडील बाबा येऊन राहिले होते, व तेथेंच ते कांहीं वर्षांपूर्वी वारले.

माझे पणजोबा सन १८५२ सालीं पुण्यास वारले. त्यानंतर माझ्या आजोबांनीं त्याच सालीं काशीयात्रा केली. त्यावेळीं आगगाडी कोठेंहि नव्हती व सर्व प्रवास बैलगाडीनें करावा लागे. हा प्रवास अर्थातच धोक्याचा असल्यामुळें अनेक कुटुंबें मिळून भाड्याच्या पुष्कळशा बैलगाड्या ठरवीत व एकत्र प्रवास करीत. आमच्या घराण्यांत आजोबांशिवाय माझे वडील हे

एकटेच कर्ते पुरुष असत. त्यामुळें दरेक मुक्कामाला गाडींतून सर्व सामान काढणें, त्याची यथायोग्य व्यवस्था करणें व दुसरे दिवशीं पुन्हां मुक्काम हलवितांना सर्व सामान भरणें, पोतीं शिवणें, तीं गाडींत भरणें, बाजार-हाट करणें वगैरे अत्यंत दगदगीचीं व जबाबदारीचीं कामें--गड्यांच्या मदतीनें कां होईना--पण स्वतः करावी अगर करवावीं लागत. त्यामुळें झालेल्या संवयीमुळें म्हणा अगर त्यांच्या अंगस्वभावामुळें म्हणा, त्यांना अगदीं अखेरपर्यंत आपल्या उतारवयांतही सर्व कामें स्वतःच्या देखरेखी-खालीं, आपण स्वतः उभे राहून करून घेतल्याशिवाय राहवत नसे. या काशीयात्रेंत माझे एकुलते एक चुलते त्रिंबक हे सन १८५३ मध्यें खुद्द काशींतच वारले. त्यामुळें माझे वडील हे माझ्या आजोबांचे एकच चिरंजीव उरले.

माझी आजी--म्हणजे वडिलांची आई ही आपल्या काळीं फार विख्यात होऊन गेली व तिला ख्याति देणारा हा गुण म्हणजे तिचें वैद्यकीय ज्ञान होय. सर्व खेड तालुकाभर तिची या बाबतीत ख्याति होती. तिला नुसतीं औषधें माहीत होतीं, इतकेंच नव्हे, तर मात्रा, गुटिका, भस्में, रसायनें वगैरे ती स्वतः घरीं गडी माणसांच्या सहाय्यानें तयार करीत असे. घरीं भट्ट्या वगैरे घालीत असे, खल नेहमीं चालू असे व अर्क, मात्रा वगैरे औषधें ताज्या वनस्पति मागवून ती आपण करवून घेत असे. अशा रीतीनें तयार झालेलीं औषधें सर्वांना फुकट देण्यांत येत. रोगाचें निदान करण्यांत तर तिचा हातखंडा असे व त्यामुळें नुसते गरीबच नव्हेत तर श्रीमंत लोकही तिच्या-कडून रोगपरीक्षा करून घेऊन औषधयोजना करवीत असत. कोंकणच्या माणसांप्रमाणें व त्या काळच्या कष्टाळूपणाच्या युगमानाप्रमाणें ती अत्यंत निरलस असे. माझ्या तीनहि आत्यांचीं लग्नें त्या काळच्या पद्धतीप्रमाणें लौकर होऊन त्या सासरीं गेल्या असल्यानें व माझ्या आजोबांचे माझे वडील हे एकुलते अवशिष्ट पुत्र असल्यानें प्रथम प्रथम माझ्या आजीला संसारप्रपंच उरकूनहि बराच वेळ मिळत असे. त्याचा ती अशाप्रकारें परोपकाराच्या कार्यांत उपयोग करी.

माझ्या आजोबांना दोन मुलगे झाले, त्यांतील मोठे चिरंजीव माझे वडील होते. माझ्या वडिलांचा जन्म झाल्यापासून त्यांचें बालपण अर्थातच

चाकण येथेंच गेलें. त्यांचें वय ६।७ वर्षांचें होण्यापूर्वी त्यांना तेथील शाळेंत घातलें गेलें. त्यावेळीं तेथें फक्त मराठी तीन इयत्तांपर्यंतच शाळा होती व तींतहि फारशीं मुलें नसत. त्यामुळें मराठी दुसरी इयत्ता पुरी झाल्यावर चाकण येथील शाळाच उठली ! त्यामुळें शाळेंत होणारें पद्धतशीर असें माझ्या वडिलांचें शिक्षण तेथेंच पुरें झालें ! या गोष्टीस आतां सुमारें सव्वाशें वर्षें पुरीं होत आलीं आहेत. त्यामुळें त्या काळीं शिक्षणाची स्थिति अशी अनुकंपनीय होती यांत आश्चर्य नाहीं. यानंतर माझ्या वडिलांना पुढें चार वर्षें घरींच शिक्षक ठेवून मराठी शिक्षण देण्यांत आलें; पण तेंहि त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत ! त्यानंतर त्यांना शिक्षण मुळींच मिळालें नाहीं. यापुढें आपल्या वडिलांच्या जवळ ते वकिलीचें कामकाज सकाळीं घरीं करीत असतांना बसत. कोर्टाच्या कामांत फिर्यादी, अर्ज्या, कैफियती, दरखास्ती वगैरे जें लिखाण करावें लागे, तें सर्व मोडींत असल्यामुळें त्याच्या नकला वगैरे ते करूं लागले व अशा रीतीनें मोडी लिहिण्याची संवय त्यांना लावण्यांत आली. अर्थात् हें सर्व लिखाण कोर्टाच्या कामासंबंधाचेंच असल्यामुळें त्याबरोबरच कायद्याची माहिती त्यांना होऊं लागली व अशा प्रकारें त्या विषयाचें जणू काय बाळकडूच त्यांना मिळालें. ही कायद्याची आवड त्यांना जी लहानपणापासून लागली, ती त्यांच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत टिकली, व त्यांत त्यांचें मन नेहमीं आनंदानें रमत असे.

परंतु याप्रमाणें कायद्याच्या कामाचा व त्यांचा संबंध सुरू होण्यापूर्वींच त्यांच्या आयुष्यांतील एक महत्त्वाचा प्रसंग घडून आला होता, व तो प्रसंग म्हणजे त्यांचें लग्न होय ! त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षीं त्यांचें पहिलें लग्न झालें, ही गोष्ट आजच्या काळीं नुसती अशक्यच नव्हे, तर अत्यंत आश्चर्यकारक अशीहि वाटण्याजोगी आहे; पण त्याकाळी ती तशी नसे. लग्न या शब्दाचा खरा अर्थहि समजण्यासारखी त्या वयांत त्यांची स्थिति नव्हती; व यामुळें ज्यावेळी त्यांचें लग्न ठरविण्यांत आल्याच्या गोष्टी घरांत सुरू झाल्या, त्यावेळीं त्यांनी आपल्या वडिलांना असें विचारलें कीं, “ दादा, माझ्या लग्नाला मला पुण्यास न्याल कां हो ? ” इतकी निरागस अज्ञानाची त्यावेळीं त्यांची वृत्ति होती.

इकडे माझ्या वडिलांचें त्यांच्या पित्याबरोबरचें वकिलीच्या धंद्यांतील कामकाज चालूच होतें. सुमारें ५।६ वर्षे याप्रमाणें कामकाज केल्यानंतर पुढें काय करावयाचें हा प्रश्न उभा राहिला. माझ्या आजोबांचा विचार अर्थातच माझ्या वडिलांनीं कायद्याचा अभ्यास करून वकिलीची परीक्षा द्यावी व आपला धंदा पुढें चालू ठेवावा असा होता. त्या सुमारास वकिलीच्या परीक्षेलाहि कांहींसें व्यवस्थित स्वरूप आलें होतें. सिव्हिल प्रोसीजर, क्रिमिनल प्रोसीजर, पुराव्याचा कायदा वगैरे कांहीं कायदे मराठींत तयार झाले होते. त्यांचा अभ्यास करून वकिलीच्या परीक्षेच्या उमेदवारांस प्रथमतः जिल्हा जज्जापुढें एक प्राथमिक ( Preliminary ) परीक्षा द्यावी लागे. व तींत तो पास झाला तर मुंबईस मुख्य परीक्षेसाठीं बसण्याची परवानगी त्याला देण्यांत येई. आपल्या वडिलांच्या बरोबर अभ्यास करून माझे वडील या परीक्षेस पुणें डिस्ट्रिक्ट जज्जापुढें प्रथम सन १८५६ सालीं म्हणजे आपल्या वयाच्या विसाव्या वर्षी बसले. जज्ज युरोपियन असल्यानें भाषेच्या ज्ञानाची तो जरी शेखी मिरवीत होता, तरी त्याचें त्या भाषेचें वास्तविक ज्ञान अगदींच अपुरें व सदोष होतें. त्यामुळें त्यानें विचारिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें माझ्या वडिलांनीं बरोबर दिलीं होतीं, तरी तीं त्याला न समजल्यामुळें त्यानें तीं चुकीचीं ठरवून बरोबर उत्तरें देण्यास माझ्या वडिलांना सांगितलें. त्यांनीं आपलीं उत्तरें बरोबर असल्याचें आग्रहपूर्वक प्रतिपादिलें. त्यामुळें साहेबाला राग आला, तथापि आणखी एक वेळ त्यानें माझ्या वडिलांना आपलीं उत्तरें दुरुस्त करण्याची संधि दिली. तेव्हां स्वतःचीं उत्तरें बरोबर असल्याचें आपण कायद्याच्या पुस्तकांतून काढून दाखवितों, असा वडिलांनीं त्यांना जबाब दिला. तेव्हां तर साहेबाची मिजास साफ गेली व त्यानें माझ्या वडिलांना सांगून टाकलें कीं, " तुम्ही नापास झाला आहां. " अर्थात् वडिलांना त्या वर्षी मुंबईस जातां आलें नाहीं. त्यानंतर सन १८५७ सालीं उत्तर हिंदुस्थानांत बंड झाल्यामुळें वकिलीची परीक्षाच अजिबात बंद ठेवण्यांत आली होती. त्यानंतरच्या सालीं सन १८५८ मध्यें माझे वडील पुन्हां डिस्ट्रिक्ट जज्जापुढें प्राथमिक परीक्षेसाठीं हजर झाले. डिस्ट्रिक्ट जज्ज पूर्वीचाच होता. परंतु या वेळेस त्यानें माझ्या वडिलांना पाहिल्याबरोबर " तुम्हीं दोन वर्षांपूर्वी मजसमोर

हजर झाला होतां तेच गृहस्थ ना ?" असा प्रश्न केला व वडिलांनीं होय म्हणून सांगतांच "तुम्हांला पास करण्यांत आलें आहे व मुंबईच्या परीक्षेला बसण्याचीं परवानगी देण्यांत आली आहे," असें त्यांना एकहि प्रश्न न विचारतां सांगितलें ! त्याप्रमाणें वडील मुंबईस परीक्षेला बसले. त्यावेळीं मुंबई ते ठाणें इतकीच फक्त रेल्वे लाईन तयार झाली होती, व ठाण्यापर्यंत बैलगाडीनें प्रवास करावा लागे. त्याप्रमाणें प्रवास करून वडील परीक्षा देऊन तींत पास झाले. अशा प्रकारें आपला मुलगा आपल्याप्रमाणें वकीलच व्हावा, ही आमच्या आजोबांची इच्छा सफल झाली.

या सुमाराची एक मजेदार हकीगत नमूद करण्यासारखी आहे. त्याकाळीं मुन्सफ कोर्टाच्या नाझरास दरमहा रुपये दहा ते पंधराची ग्रेड असे. हा नाझर कोर्टांत जातांना व परत येतांना त्याच्याबरोबर दोन शिपाई असत. खुद्द कोर्टांत त्यांना बसण्यास गादी–तक्याची ऐटीची बैठक असून कामाचा दरेक मनुष्य त्याच्याशीं अदबीनें व आर्जवानें बोले. हें सर्व वडिलांनीं नित्य पाहिलें असल्यानें आपण नाझर व्हावें, असें त्यांच्या डोक्यानें घेतलें; व ते आपल्या वडिलांजवळ, "मला नाझरची नोकरी देवविण्याची खटपट करा" असा आग्रह धरून बसले. त्यावेळीं त्यांचें लग्न झालेलें होतें, व त्यांचें वय सुमारें १४।१५ वर्षांचें होतें. या अल्पवयांत नाझराच्या वैभवानें त्यांना मोह पाडला होता. त्यांच्या वडिलांनीं त्यांना पुष्कळ सांगून पाहिलें कीं, दरमहा दहा ते पंधरा रुपयांत तीन चार माणसांचें कुटुंब गरिबीनेंहि निभूं शकणार नाहीं. याला उत्तर म्हणून माझ्या वडलांनीं नवरा बायको व तीन मुलें अशा पांच माणसांच्या कुटुंबाला काय लागतें याचा हिशेब करून आपल्या वडिलांना असें दाखवून दिलें कीं, पांच माणसांचा प्रपंच चालून या पगारांतून कांहीं रुपये शिलकच राहूं शकतात. इतकी त्यावेळीं स्वस्ताई होती. पण अर्थातच वडिलांचा हा हट्ट कांहीं चालू शकला नाहीं व वर म्हटल्याप्रमाणें ते वकिलीच्या परीक्षेस बसून तींत आपल्या वयाच्या बाविसाव्या वर्षी पास झाले.

अर्थात् पास झाल्यावर वकिली कोठें करावयाची हा प्रश्न आला. त्याचा निकाल अखेर पुणें जिल्ह्यांतील वडगांव या गांवीं त्यांनीं धंदा

करावा असा ठरला. त्याचें कारण असें होतें कीं, माझी आजी तुळपुळे या घराण्यांतील होती. तिचे बंधु रघुनाथपंत तुळपुळे हेहि माझ्या आजोबांप्रमाणेंच वकिलीची सनद मिळवून या वडगांवीं वकिली करीत असत. त्यांनीं माझ्या आजोबांजवळ माझ्या वडिलांना वडगांवीं वकिलीसाठीं पाठविण्याचा आग्रह केला व तो आजोबांनीं मान्य करून वडिलांना तेथें पाठविलें. या रघुनाथपंत तुळपुळ्यांचे चिरंजीव विठ्ठलपंत हेहि पुढें वकील झाले. ते केवळ मराठी वकीलच होते, तरी त्यानीं पुणें येथें धंदा करून त्यांत लाखो रुपये मिळविले व मोठी इस्टेट केली. त्यांचें व माझ्या वडिलांचें अखेरपर्यंत फार प्रेम असे. या विठ्ठलपंतांचेच चिरंजीव रा. हरिभाऊ तुळपुळे हे सध्यां पुण्यांतील संपन्न गृहस्थ, सावकार व प्रसिद्ध कॉंग्रेस कार्यकर्ते होत. अशा रीतीनें माझ्या वडिलांच्या वकिलीस वडगांवीं सुरुवात झाली. त्या काळीं वकील थोडे असत. माझ्या वडिलांची बुद्धि अत्यंत कुशाग्र असे. शिवाय धंद्याची त्यांना लहानपणापासून फार हौस व आवड असे. ते आपल्या धंद्याचें काम फार मन लावून करीत, त्यामुळें त्या धंद्यांत त्यांचा जम लौकरच चांगला बसला व त्यांना चांगली द्रव्यप्राप्ति होऊं लागली.

अशा प्रकारें पांच वर्षें त्यांनीं वडगांवीं वकिली केल्यानंतर असा एक प्रसंग घडला कीं, त्यामुळें माझ्या वडिलांना तेथील धंदा सोडून चाकण येथें यावें लागलें. त्यावेळीं चाकणला पळशीकर या नांवाचे मुन्सफ होते. एके दिवशीं माझ्या आजोबांना त्या काळच्या पद्धतीमुळें, स्नानसंध्येच्या निमित्तानें कोर्टांत जाण्यास उशीर झाला. त्यावरून मुन्सफ पळशीकर त्यांना म्हणाले कीं, " दादा, कोर्टाचें काम अथवा स्नानसंध्या यांपैकीं कांहीं तरी एक साधतें. दोनहि साधत नाहींत. " त्याबरोबर माझ्या आजोबांनीं त्यांना उत्तर दिलें, " ठीक आहे, रावसाहेब, आपलें म्हणणें बरोबर आहे. व म्हणून आजपासून मी स्नानसंध्याच करण्याचें ठरविलें आहे. तेव्हां उद्यांपासून मी कचेरींत येणार नाहीं. " सहज विनोदाचा परिणाम असा होईल अशी पळशीकरांची कल्पना नव्हती व म्हणून त्यांनीं आजोबांना सांगितलें कीं, " मी कांहीं तुम्हांस लावून बोललों नाहीं. सहज विनोद केला. " पण आजोबांनीं त्यांना सांगितलें कीं, " तसें

नव्हे; मलाहि केव्हांतरी हा धंदा सोडावयाचाच होता. आपलें बोलणें हें केवळ निमित्त झालें इतकेंच." असें म्हणून त्यांनीं माझ्या वडिलांकडे वडगांवीं ताबडतोब बोलावण्यासाठीं खास मनुष्य रवाना केला. त्यावरून वडील चाकणला आल्यावर आजोबांनीं त्यांना झालेली हकीगत सांगितली. त्यावेळीं वडिलांनीं त्यांना पुष्कळ सांगून पाहिलें कीं, "पळशीकर कांहीं रागानें बोलले नाहींत; शिवाय आपला दोघांचा धंदा दोन ठिकाणीं चांगला चालला आहे, अशा स्थितींत तो सोडण्याची आवश्यकता नाहीं. अजून आपली प्रकृतीहि धंदा करण्यासारखी चांगली आहे. तर असाच आणखी कांहीं वर्षें तो चालू ठेवण्यास हरकत नाहीं." पण आजोबांनीं अर्थातच या त्यांच्या म्हणण्याकडे लक्ष दिलें नाहीं. त्यांनीं एकच उत्तर दिलें कीं, एक वेळ धंदा सोडला असें मीं म्हटलें, त्यानंतर पुन्हां मी कोर्टाची पायरी, वकील म्हणून चढणार नाही ! तेव्हां निरुपायास्तव वडील वडगांवचा स्वतःचा धंदा बंद करून चाकणेस आपल्या वडिलांचा धंदा चालविण्यास आले. ही गोष्ट सन १८६३ सालीं घडली.

याप्रमाणें वकिलीचा धंदा सोडल्यावर माझे आजोबा ९ वर्षें निवृत्तीतच राहिले. त्यांनीं आपला सर्व वेळ यानंतर स्नानसंध्या, भजनपूजन वगैरेंतच काढला, व तेथेंच ते सन १८७२ सालीं वारले.

श्री ग्रंथ संग्रा न. ठा. स्थळप्रत
अनुक्रम २४९०८ दि:
क्रमांक १०८ नों: दि: २३/८

त्यांच्या निधनानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी वडिलांच्यावरच येऊन पडली. माझे आजोबा वारल्यावर माझ्या वडिलांशीं माझ्या आईचें लग्न झालें. ही माझी आई साने घराण्यांतील होती. तिचे आजोबा बापू साने हे पेशवाईतील संपन्न गृहस्थ होते. पण पुढें पेशवाई गेल्यावर त्यांचें घराणें खालावलें. बापू साने यांचे चिरंजीव सदाशिव बापू साने हे माझे आजोबा. हे मुखत्यार वकीलाचें काम करीत. कांहीं वर्षें पुण्यास हें काम केल्यावर हे ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी या गांवीं हेंच काम करूं लागले. त्याला कारण त्यांच्या पत्नीचें निधन हें होय. ही त्यांची पत्नी व माझी आजी

पुण्यांतील बुधवार पेठेंतील प्रसिद्ध भिडे घराण्यांतील होती. बुधवार रस्त्याच्या पूर्वेकडील ओळ जवळजवळ या भिडे घराण्याच्या मालकीची होती. त्यानंतर क्रमाक्रमानें त्यांतील भाग विकले गेले व तेथेंच हल्लीं दुकानें आहेत. त्यांचा वाडा ओळीच्या मध्यें आहे. ही माझी आजी वारल्यावर माझ्या आजोबांनीं पुणें जें सोडलें तें कायमचेंच. ते त्यानतर आपल्या मृत्यूपर्यंत भिवंडीसच राहत. जरी त्यानंतर ते दरवर्षी पुण्यास आपल्या घरीं येऊन कांहीं काळ राहात, तथापि कायमचे तेथें राहण्यास ते आले नाहींत. त्यामुळें त्यांना एकटे राहण्याची संवय झाल्यानें त्यांचा स्वभाव कांहीसा एकलकोंडा झाला होता. त्यामुळें त्यांच्या मुलांना त्यांच्या सहवासाचा लाभ मिळूं शकला नाहीं. जरी ते पुण्यास आले, तरी ते आपल्या मुलांशीं तिऱ्हाइताप्रमाणेंच वागत असत. यामुळें त्यांचा मुलांना अथवा मुलांचा त्यांना ळळा कधींच लागला नाहीं.

माझे आजोबा भिवंडीस गेल्यानंतर त्यांच्या पुण्याच्या घरांत माझे मामा राहत असत. ते एका ऑफिसांत कारकून असत. ते सन १९०७ मध्यें वारले.

माझ्या आईचा जन्म सातारच्या नजीकच्या वडूज नांवाच्या गांवीं झाला होता. तिच्या वयाच्या चौथ्या पांचव्या वर्षीच तिची आई वारली व त्यामुळेंच पुढें वडीलहि भिवंडी येथें राहावयास गेले, ते पुन्हां पुण्यास राहण्यास आलेच नाहींत. तिच्या थोरल्या बहिणीचें लग्न त्यानंतर लौकरच झालें. त्यामुळें खुद्द पुण्यास माझी आई व तिचा धाकटा भाऊ हींच दोन लहान मुलें राहिलीं. त्यांचा प्रतिपाळ माझ्या आईचे एक चुलते दाजीकाका म्हणूत असत त्यांनीं व त्यांच्या दोन बहिणी लहानपणींच बालविधवा होऊन परत आल्या होत्या, त्यांनीं मिळून केला. या दाजी-काकांना मुलगा नसून फक्त दोन मुली होत्या. त्यामुळें ते स्वतः, त्यांची पत्नी, या दोन मुली, माझी आई व तिचा भाऊ आणि त्यांच्या दोन परत आलेल्या आत्या, इतक्या जणांचें कुटुंब तेथें असे. माझ्या आईला व तिच्या भावाला, त्यांचे आई व बाप या दोघांनीं लहानपणांतच सोडल्या-मुळें, एक प्रकारें पोरक्या झालेल्या या मुलांचा प्रतिपाळ त्यांचे चुलते व आत्या यांनी फार प्रेमानें केला व त्यांना आपल्या मातापितरांचा सर्वस्वीं विसर पाडला.

अशा स्थितींत हें कुटुंब कालक्रमणा करीत असतांना माझ्या आईचें लग्न झालें, व तेव्हांपासून तिचें माहेरचें सौख्य संपून तिला आपल्या सासरच्या कुटुंबांत समरस व्हावें लागलें. त्या काळीं माझ्या वडिलांच्या घरीं, माझी आजी, माझे वडील, माझे भाऊ, याशिवाय माझी एक अभ्यंकरांकडील परत आलेली आत्या व तिचा मुलगा इतकीं माणसें कुटुंबांत होतीं. याशिवाय इतर नातेवाईकांचा व पाहुण्या-रावळ्यांचा घबडगाहि आमच्या घरीं फार असे. या सर्व कुटुंबांत माझ्या आईच्या प्रेमाचें अथवा तिची कड घेणारें एकहि माणूस नव्हतें. अशा स्थितींत तिचें सासरचें राहणें तिला किती अवघड गेलें असेल, याची कल्पनाच केवळ करावी लागेल. पण अशा या जंजाळांतून आपला मार्ग तिनें इतक्या हुषारीनें व सावधपणानें काढिला, कीं अखेर तिची सासू व माझ्या आईच्या बरोबरीचे सावत्र मुलगे यांचाहि आदर व प्रेम तिनें प्राप्त करून घेतलें. यावरून तिची शहामत व हुषारी समजण्यासारखी आहे. प्रथम प्रथम जरी तिच्या नवीन परिस्थितीमुळें तिला फार त्रास झाला, तरी लौकरच तिनें आपल्या सासूचा विश्वास व सहानुभूति संपादन केली. त्याचा पहिला लाभ तिला असा झाला कीं, माझ्या आजीनें तिला आपली वैद्यकीय माहिती सांगण्याला सुरुवात केली. आपल्याकडे आलेल्या रोग्याची माहिती विचारून त्यांना ज्यावेळीं आजी औषधें सांगे, त्या वेळीं लक्षपूर्वक तीं ऐकून व ध्यानांत ठेवून माझ्या आईनें ही माहिती प्रथम मिळविली व त्यानंतर तिची उत्सुकता पाहून आजी स्वतः तिला ती समजावून सांगूं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, कांहीं वर्षांनी माझी आई स्वतः वैद्यविद्येंत उत्कृष्ट तरबेज झाली. आमची आजी स्वतंत्र असल्यानें व तिला सवडहि पुष्कळ असल्यानें ती भट्ट्या, रसायनें, खल वगैरे स्वतः करवीत असे, तसें मात्र प्रपंचाच्या जबाबदारीमुळें व स्वतःच्या संसाराच्या वाढत्या व्यापामुळें माझ्या आईला करणें शक्य नव्हतें. म्हणून आलेल्या रोग्याची हकीगत ऐकून व त्याच्या रोगाचें अचूक निदान करून ती त्यास औषधें सांगे. रोग्यानें तीं आणून सांगितल्याप्रमाणें औषध घ्यावें लागे. या कामीं माझ्या आईला अतिशय यश असे. यामुळें पुढें थोड्याच वर्षांनीं आमच्या सर्व गांवभरच नव्हे तर आजूबाजूच्या खेडेगांवांतूनहि तिचें नांव या बाबतींत

प्रसिद्ध झालें. अर्थातच हा सर्व व्याप धर्मादाय व परोपकाराच्या स्वरूपाचा असल्यानें त्यांत देण्याघेण्याचा संबंध बिलकूल नसे, व स्वतः घरीं औषधें बनविण्याची खटपटहि नसे. फक्त परीक्षा करून औषध-योजना करण्याचाच काय तो प्रश्न ! या तिच्या वैद्यकीय ज्ञानामुळें तिचा या बाबतींतला व्याप मात्र इतका वाढला कीं, आमच्या तालुक्याच्या गांवीं हॉस्पिटल असिस्टंटचा दवाखाना असूनहि त्या दवाखान्यांत नसे इतकी रोग्यांची गर्दी आमच्या घरीं होत असे, व सकाळपासून रात्रींपर्यंत सर्व वेळ त्यांची येजा चालूच असे.

या काळांत दुसरी एक गोष्ट आमच्या आईनें संपादन केली. ती ही कीं, तिला लग्नाच्या वेळीं साधारण लिहितां वाचतां येत असे तें तिनें उत्तम वाढविलें,व त्याच्या साह्यानें तिनें अतोनात वाचन केलें. मराठी पोथ्या तर तिनें सर्व व अनेकवार वाचून काढल्या होत्या व त्याशिवाय इतर शेंकडों पुस्तकेंहि तिनें वाचून काढलीं. यामुळें मराठी वाचनाच्या बाबतींत हल्लींच्या बी. ए. लाहि नसेल इतकें ज्ञान तिला झालें होतें. पौराणिक व धार्मिक माहितींत तर तिची जोड क्वचितच सांपडण्यासारखी होती. कुशाग्रबुद्धि, तरतरीत स्मरणशक्ति व विवेचक तर्कशक्ति हीं सर्व साधनें तिच्याजवळ उत्तम प्रकारें असल्यानें त्यांच्या साह्यानें तिनें चांगलीच विद्वत्ता संपादन केली व याहि बाबतींत आमच्या सबंध गांवांत तिची बरोबरी करणारी स्त्री दुसरी कोणीहि नव्हती. मात्र त्या काळीं सभा, भाषणें, संस्था, क्लब वगैरे प्रकार शहरांतहि नसत, मग खेडेगांवांत कोठून असणार ! यामुळें सार्वजनिक अशा स्त्रियांच्या कांहींहि गोष्टी गांवांत होत नसत. तथापि स्त्रियांतील विद्वानांमध्यें व्यक्तिशः पहिला मान माझ्या आईला प्राप्त झालेला होता व तो तिनें अखेरपावेतों टिकविला.

याशिवाय व्यवहारज्ञान व जगाचे रीतिरिवाज व सर्वांविषयीं सहानुभूति हे गुण माझ्या आईमध्यें प्रामुख्यानें असल्यानें सांसारिक व व्यावहारिक बाबतींतहि तिचा सल्ला घेण्यासाठीं अनेक स्त्रिया येत व त्या सर्वांना जिच्या तिच्या परिस्थितीप्रमाणें व मगदुराप्रमाणें ती सल्लामसलत देत असे व त्याचा उपयोगहि त्या सर्वांना चांगला होत असे. त्यामुळें सुद्धां तिच्या सन्मान्यतेंत व लोकप्रियतेंत पुष्कळ भर पडली होती. संसारांत आपल्या

न्यायीपणानें, सरळ वर्तनानें व बुद्धीच्या श्रेष्ठतेनें माझ्या आईनें सर्वांवर अशी छाप पाडली कीं, माझ्या आजीच्यानंतर सर्व कुटुंबाची घरधनीण म्हणून सर्व अधिकार तिच्याकडेच आले. तिचा स्वभाव जसा व्यवहारी व न्यायी होता, तसाच तो फार कडकहि होता. तिला अन्यायाची व खोटेपणाची फार चीड असे व अशा कृत्यांबद्दल इतरांची स्पष्ट कान-उघडणी करण्यास व आम्हां मुलांस प्रसंग विशेषीं कडक शिक्षा करण्यासहि ती कधीं मागेंपुढें पहात नसे, असे कांहीं प्रसंग मला आठवतात. एक वेळीं आमच्या गांवी एक नाटक आलें होतें. त्यावेळीं त्या नाटकांना "बुकीश" नाटकें म्हणत. सूत्रधार, गणपति, सरस्वती, विदूषक, राक्षस इत्यादि दैवी दानवी व मानवी, सर्व पात्रें त्यांत येत व अशा नाटकांचें जें वर्णन मराठी रंगभूमीच्या विकासाच्या इतिहासांत वाचावयास मिळतें, त्याच स्वरूपाचीं तीं नाटकें असत. सबंध गांवांत आमचें घर महत्त्वाच्या व सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें प्रमुख घरांतील एक असल्यानें अशा नाटकांना लागणारे कपडेलत्ते, लाकडी सामान वगैरे सर्व आमच्या येथून दिलें जाई. त्याशिवाय पैशाचीहि मदत चांगली होई. त्यामुळें आमच्या घरच्या मंडळींना अर्थातच नाटकांना मुक्तद्वार असे; इतकेंच नव्हे तर सन्मानानें आमंत्रिलें व वागविलें जाई. अशा एका प्रसंगीं नाटकाला न जाण्याबद्दल माझ्या आईनें मला निजण्याच्या वेळीं बजावून सांगितलें असतां खोटें निमित्त सांगून मी गेलों, म्हणून मला तिनें खरपूस मार दिला होता.

माझ्या वडिलांची त्या काळच्या पुरुषांत अत्यंत बुद्धिवान् म्हणून गणना होई. त्यांचें पद्धतशीर शिक्षण, मागें सांगितल्याप्रमाणें, फक्त मराठी दुसऱ्या इयत्तेपर्यंतच झालें होतें. पण असाधारण बुद्धिमत्ता, अत्यंत मनमिळाऊ व शांत स्वभाव, फार दीर्घकाळपर्यंत वकिलीचा धंदा केल्यामुळें हजारों लोकांशीं आलेला संबंध व त्यांच्या स्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधि मिळाल्यामुळें आलेलें व्यवहारचातुर्य, सीझरच्या स्त्रीप्रमाणें संशयाच्याहि अतीत असलेला त्यांचा प्रामाणिकपणा, धार्मिक विश्वासामुळें त्यांचें बनलेलें उत्कृष्ट शील, मोठ्या प्रवासामुळें आलेलें जगाचें ज्ञान इत्यादि गुणांमुळें सर्व पुणें जिल्ह्यांतच नव्हें, तर त्याच्याहि बाहेर त्यांचें

नांव विख्यात झालें होतें. त्यांतच त्यांच्या उदार स्वभावाची भर पडल्यामुळें त्यांचा लौकिक फारच पसरला. कुटुंबाचा विस्तार तीन स्त्रियांच्या प्रपंचामुळें व त्यांच्या बहिणींच्या संसारामुळें अफाट झाला होता. केवळ आमच्या कुटुंबांतील नात्याचीं अशीं शंभरावर माणसें तेथें होतीं. याशिवाय पाव्हणे पै आमच्या घरीं नित्य येत. तालुक्याच्या गांवीं त्या तालुक्यांतील खेड्यांतून कोर्टाच्या कामासाठीं येणारे पक्षकार वकीलाच्याच घरीं उतरण्याची पद्धति तेव्हां असे व अजूनहि आहे. त्यामुळें असे पक्षकार पुष्कळ वेळेला आमच्या घरी उतरत. याशिवाय अतिथि–अभ्यागत, पांथस्थ, हरिदास, पुराणिक, भिक्षुक वगैरेहि येत. त्यामुळें आमचें घर नेहमीं भरलेलें व गजबजलेलें असे. आमच्या घरीं नेहमीं २५।३० गुरें ढोरें असत. तीन चार म्हशी, तीन चार गायी, त्यांच्या कालवडी व गोऱ्हे, चार बैल, दोन घोडे हे नेहमींच असत व याशिवाय कुत्रीं, वानरें, शेळी, पोपट वगैरे प्राणीहि असत. माझ्या वडिलांना गाड्यांचा फारच नाद असे. यामुळें उत्तम उत्तम जातीवान बैल ठेवण्याची त्यांना फार हौस असे. त्यांच्या गाड्या करून त्या घोड्याच्या गाड्यांबरोबर शर्यतीनें दौडविण्यांत त्यांना फार आनंद होई. पुढें पुढें तर घोड्याच्याहि दोन गाड्या नेहमीं आमच्या घरीं असत.

नोकरचाकरांसंबंधानें सांगावयाचें म्हणजे चाळीस वर्षांहून अधिक काळपर्यंत आमच्या घरीं नेहमीं दोनतीन कारकून असत. त्यांपैकीं दोन कोर्टाच्या कामासाठीं व एक खाजगी प्रपंचाच्या कामासाठीं असे. स्वयंपाकाला बाई व वरकामाला मनुष्य असे. गुरांसाठीं एक स्वतंत्र गडी, इतर कामासाठीं एक गडी व गाड्या हांकण्यासाठीं एक माणूस असे असत व दोन मोलकरणी असत. इतका नोकरवर्ग तर नेहमीच असे व याशिवाय आमच्या शेतीवर देखरेख करण्यासाठीं व आमच्या वडिलांनी पुढें खेड जिल्ह्यांतील चासगांवाजवळचा कोल्हारवाडी हा इनामी गांव प्रथम गहाण घेतला व पुढें कोर्टांत दावे वगैरे करून सोळा आणे मालकीचा करून घेतला, त्या कामीं गांवावर जाऊन वसूल करणें, दावे लढणें, वगैरेंसाठीं दोन नोकर बाहेरगांवीं

असत ते निराळेच. अशा तऱ्हेनें आमचें घर एका लहानशा जहागिरदाराच्या दर्जाइतकें थाटाचें व संपन्न असे.

माझ्या वडिलांचें त्यांच्या स्वतःच्या आईवर विलक्षण प्रेम असे, त्याचप्रमाणें ते तिचे एकुलते एक चिरंजीव असून फार भाग्यशाली निघाले, व तिच्या अर्ध्या वचनांत राहत, त्यामुळें मातृधर्माप्रमाणें तिचेंहि त्यांच्यावर अत्यंत प्रेम असे, यांत नवल नाहीं. पण माझ्या वडिलांची आपल्या आईबद्दलची भक्ति असाधारण होती. ती असेपर्यंत तिच्या वचनाबाहेर ते कधींहि गेले नाहींत. तिच्या इच्छेवांचून आमच्या घरांत पानहि हलत नसे. ती स्वतः व्यवहारकुशल, धोरणी, संयमी व वत्सल स्वभावाची असल्यामुळें तिचा सर्व कुटुंबावर चालणारा अधिकार प्रेमाच्या जोरावरच चालला होता. अशा या प्रेमळ आईचें सौख्य माझ्या वडिलांना त्यांच्या वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षापर्यंत मिळालें. त्या वेळीं माझ्या आजीचें वय ८९ वर्षांचें होतें. ती सन १८९३ सालीं खेड येथें वारली. इतक्या पूर्ण वयांत तिचा अंत झाला तरी माझ्या वडिलांना तिच्या मृत्यूमुळें इतकें दुःख झालें कीं, एक वर्षभर त्यांची चित्तवृत्ति ठिकाणीं नसे.

## .३.

आमच्या कुटुंबाच्या विस्ताराचें एक गमक म्हणून असें दाखवितां येईल कीं, सन १९०२ साली झालेल्या माझ्या धाकट्या बहिणीच्या लग्नांत आमच्या कुटुंबांतील नात्याच्या मंडळींची संख्या शंभरावर गेली होती. तशींच दुसरीं एक दोन गमकें अशीं देतां येण्यासारखीं आहेत कीं, आमच्या घरांत सुमारें पाऊणशें बाळंतपणें झालीं व लग्नें व मुंजीं हीं कार्यें मोजलीं तर त्यांची संख्या पन्नासावर गेली असेल.

माझ्या वडिलांना त्यांच्या मुलांपैकीं एकाच्याहि कमाईचा एक पैसा सुद्धां आलेला दिसला नाहीं; उलट त्यांचीं कार्यें, त्यांच्या मुलांचीं व त्यांच्या नातवंडांचीं कार्येंही माझ्या वडिलांनाच आपल्या स्वतःच्या खर्चानें करावीं लागलीं. यावरून प्रपंच्याच्या पायीं किती पैसा त्यांना खर्चावा

लागला असेल याची कल्पना येईल.

माझ्या वडिलांनीं सन १८५८ सालीं वकिली सुरू केली ती ते वारले तेथपर्यंत ५२ वर्षे चालू होती. तत्पूर्वी २६ वर्षे माझ्या आजोबांनीं तोच धंदा केला होता व माझ्या वडिलांच्या मृत्यूपूर्वीपासून मीहि बडोद्यास वकिली करूं लागलों. म्हणजे आमच्या कुटुंबांत तीन पिढ्या मिळून सतत ११५ वर्षे वकिली चालत आलेली आहे.

या संबंधाची एक मजेदार गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे. सन १९१९ ते २१ पर्यंत पुण्याचे निवृत्त असिस्टंट रेव्हेन्यू कमिशनर कै. रामभाऊ जोगळेकर हे येथें कलेक्टर म्हणून नोकरी करण्यासाठीं आले होते. त्यांच्यापुढें एक मुलकी खटला मी चालवीत असतां त्यांनीं कायद्याच्या एका कलमाचा केलेला अर्थ बरोबर नाहीं असें मी प्रतिपादन केलें. तेव्हां ते म्हणाले, " मुलकी कायद्याच्या अर्थासंबंधानें तुम्ही मला काय सांगतां ? आमच्या तीन पिढ्या मुलकी अधिकाऱ्यांच्याच झाल्या ! माझे आजोबा, माझे वडील व मी असे सर्व मुलकी अधिकारीच होतों. म्हणून आमचाच अर्थ बरोबर आहे." तेव्हां मी त्यांना उत्तर दिलें कीं, " अधिकाऱ्यानें केलेला अर्थ चुकीचा आहे व तसें सांगण्याचा वकिलाचा हक्क आहे. तो हक्क आम्ही तीन पिढ्या बजावीत आलों आहोंत. माझे आजोबा, माझे वडील व मी स्वतः असे सर्व वकील असल्यानें आम्हांला तुमचा अर्थ बरोबर नाहीं असें म्हणण्याचा अधिकारच आहे." मी असें सांगितल्याबरोबर रा. ब. कलेक्टरसाहेबांनीं जोरानें टाळ्या वाजवल्या व "वाहवा ! वाहवा !" असें म्हटलें व नंतर माझ्या कामाची हकीकतही न ऐकतां " तुमचें अपील मंजूर " असें सांगितलें.

माझ्या वडिलांनीं वडगांव येथें केलेल्या वकिलींत त्यांना चांगला पैसा मिळूं लागला होता, त्यानंतर चाकणेस व पुढें तेथील कोर्ट खेड येथें गेल्यावर त्यांना अमाप पैसा मिळाला. त्याकाळीं वकील थोडे, त्यांत त्यांचा जम आधींपासून बसलेला, तसेंच सर्वसाधारण जनतेची त्यावेळची सुस्थिति या सर्वांमुळें त्यांना केवळ त्यांच्या तालुक्याच्या कोर्टांतच नव्हे तर सर्व जिल्ह्यांतही वकिलांमध्यें अग्रस्थान मिळालें होतें.

त्यांच्या वकिलीच्या कारकीर्दींत नवा मुदतीचा कायदा अमलांत आणला

गेला. त्यामुळें त्या कायद्यानें घालून दिलेल्या मुदतींत घेणेदारांना सर्व दावे करणें भाग पडलें. नाहीं तर ते दावे मुदतीबाहेर जाण्याची भीति होती. त्यामुळें त्यावेळीं दाव्यांचें नुसतें घनचक्कर उडालें. त्याकाळीं पोस्टल बँकांचीही सोय नव्हती व इतर बँकांच्या शाखा तर खेडेगांवीं नसतच. बँकनोटांवर लोकांचा फारसा विश्वास नसे. त्यामुळें वडिलांना मिळणारी फी रोकड रुपयांतच असे. असे रोकड रुपये त्या एका वर्षांत वडिलांना इतके मिळाले कीं, त्यांचीं पोतीं भरून वडिलांनीं एका सुरक्षित खोलींत ठेविलीं होतीं! यावरून त्या काळच्या त्यांच्या कमाईची कल्पना येईल. अर्थात् इतके पैसे मिळाले तरी प्रपंचहि दांडगा असल्यानें खर्चहि अतिशय होई. जर वडिलांचें कुटुंब लहान असतें व त्यांची प्राप्ति होती तशीच असती तर त्यांनीं कित्येक लाख रुपये शिल्लक टाकले असते.

संतति, संपत्ति व समाजांत योग्यता या दृष्टीनें माझे वडील भाग्यवान असल्याचा उल्लेख मी केलाच आहे.

पण इतर दृष्टीनेंहि ते भाग्यवानच होते. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या तीन वर्षांखेरीज करून त्यांच्यावर कोणतेंहि मोठें संकट, मोठी अडचण आली नाहीं अथवा क्लेश त्यांना झालेच नाहींत. माझ्या वडिलांचीं दोन तीन वर्षांखालचीं बरींच मुलें गेलीं; पण त्यानंतरचीं सर्व मुलें त्यांच्या अखेरपर्यंत हयात होतीं. त्यांच्या मागें आम्हीं आठ भाऊ व पांच बहिणी असे होतों. सर्व मुलांच्या बायकाहि हयात होत्या. आजमितीला मात्र त्यांच्या संततीपैकीं आम्ही दोनच मुलगे हयात आहोंत. अखेरच्या तीन वर्षांत मात्र त्यांना बरेच तीव्र आघात सहन करावे लागले. त्यांना सर्वांत असह्य वाटणारा घाव म्हणजे माझी सख्खी लहान बहीण—जी कल्याणास दिली होती ती—दुर्गाताई हृदयाच्या विकारानें प्रसूतीनंतर पंधराव्या दिवशीं एकाएकीं दोन मिनिटांत वारली. तो आघात त्यांना इतका तीव्र वाटला कीं, त्यानेंच त्यांची कंबर खचली. त्यांना जलोदराचा विकार जडला व त्यानंतर पांच महिन्यांतच त्यांचा स्वतःचा अंत झाला. पण हे प्रसंग त्यांच्या मृत्यूपूर्वींच्या तीन चार वर्षांत घडले. तत्पूर्वीं त्यांना फक्त एकच धक्का बसला, तो म्हणजे माझी सर्वांत मोठी सावत्र बहीण सुंदराबाई पावसकर हिचा नवरा तिच्या दहा अकरा वर्षांच्या वयांतच वारला, त्या वेळीं होय.

त्याशिवाय लहानपणापासून वयाच्या बहात्तराव्या वर्षापर्यंत एकहि अनपेक्षित व अकाली संकट न येतां, ऐश्वर्यात, संपन्नतेंत, लौकिकांत, कुटुंबसौख्यांत, सत्कर्मांत व धार्मिक आचरणांत सुखासमाधानानें काळ गेल्याचें उदाहरण अत्यंत विरळ होय असें म्हटल्यास त्यांत यत्किंचित्‌हि अतिशयोक्ति नाहीं. फक्त माझ्या वडिलांना एकच गोष्ट जन्मभर खेद उत्पन्न करी व ती ही कीं, त्यांनीं आपल्या मुलांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ हजारों रुपये खर्च केले, तरी ते मुलगे विद्वान अथवा एकटा मी सोडून पदवीधरहि होऊं शकले नाहींत. मग ते मोठ्या योग्यतेच्या स्थानावर जाण्याचें तर दूरच राहिलें.

माझ्या आईचें लग्न झाल्यानंतर प्रथमप्रथम तिला त्रास कसा झाला व त्यानंतर हलकें हलकें तिनें आपल्या व्यवहारचातुर्यानें, बुद्धिमत्तेनें व समजुतदारपणानें सर्वांचें मन आपल्याकडे कसें वळवून घेतलें, याचा उल्लेख मागें आलाच आहे. या काळांत तिचें जीवन सह्य करण्यासारखी व तिच्या मनाला खंबीर आधार वाटण्यासारखी एकच गोष्ट होती व ती म्हणजे माझ्या वडिलांचा विश्वास व त्यांचें प्रेम. त्या आधारावर तिनें इतर त्रासांची परवा केली नाहीं. तिचें वैवाहिक आयुष्य एकंदर छत्तीस वर्षें टिकलें; पण इतक्या दीर्घ अवधीत माझ्या वडिलांशीं भांडणतंटा, गैरसमजुती अथवा मानसिक विकल्प येण्याचे प्रसंग फारसे आलेच नाहींत. माझ्या वडिलांचा स्वभाव शांत, विवेकी, धोरणी व व्यवहारी असा असल्यानें त्यांना माझ्या आईच्या परवश स्थितीची चांगली कल्पना होती. त्या परिस्थितीचें वर्णन एकदां माझ्या आईनें तुकारामाच्या शब्दांत मजजवळ ‘ विंचवाचे आंथरुणीं, सुखें निद्रा कैची ॥’ असें केलें होतें. अशा स्थितींत माझ्या वडिलांच्या प्रेमानें व विश्वासामुळें तिला पुष्कळ धीर आला व तीहि त्या विश्वासाला जागून प्रपंचाची धुरा चांगल्या रीतीनें वाहूं लागली. या कारणानें पहिलें अविश्वासाचें, असमाधानाचें व विरोधाचें वातावरण बदलून त्याच्या जागीं घरांत परस्पर प्रेमाचें नसलें तरी सहकाराचें वातावरण उत्पन्न झालें.

• •

## .४.

अशा प्रकारें आमच्या घरांत प्रपंचयात्रा चालू असतां चाकण येथील कोर्ट उठून तें खेड येथें गेलें. त्यामुळें चाकणहून आपलें सर्व कुटुंब हलवून तें खेड येथें वडिलांना न्यावें लागलें. तेव्हांपासून चाकणचें महत्त्व जाऊन त्याला दिवसेंदिवस उतरती कळाच लागली व खेड हें सर्व प्रकारें तालुक्याचें गांव झालें.

खेड हें गांव पुण्यापासून जुन्नरकडे थेट उत्तरेस जाणाऱ्या रस्त्यावर २५ मैलांच्या अंतरावर आहे. त्याच्या आधीं सात मैल या भररस्त्यावरच चाकण आहे. म्हणजे पुणें ते चाकण १८ मैलांचें अंतर असून तेथून सात मैलांवर खेड आहे. पुण्याहून निघाल्यावर अर्ध्या वाटेंत इंद्रायणी नदी येते. त्या काळीं त्या नदीवर पूल नसे व अजूनहि तो नसून सध्यां बिनपावसाळी कालापुरता एक लहान बांध अथवा धरण ( Causeway ) बांधलेलें आहे. पावसाळ्यांत या नदीवर नावा चालत व सर्व गाड्या या नावांवर चढवून एका तीरावरून दुसऱ्या तीराला नेत. त्यानंतर मग दुसरी अडचण खुद्द खेड गांवीं येई. तेथें भीमा नदी असून तिचें पात्रहि रुंद आहे. पावसाळ्यांत ही नदीहि पुष्कळ फुगे व हिच्यावरूनहि नावांवरून गाड्या व माणसें न्यावीं लागत. अलीकडे २०।२२ वर्षांपूर्वी मात्र तिच्यावर पक्का मोठा पूल बांधला गेला आहे व त्यामुळें सर्व वाहतूक सरळ जाऊं लागली आहे.

खेड हें गांव नदीच्या पात्राहून फार उंचीवर वसलेलें आहे. त्यामुळें नदी संपतांच गांवाला जाण्यासाठीं फार उंच अशी दरड चढून जावी लागते. दरड संपतांच गांवाच्या शिवेवरच मारुतीचें एक देऊळ आहे. या दक्षिण टोकाला जसें हें मारुतीचें देऊळ आहे, तसेंच उत्तरेच्या टोकावर जुन्नरकडे जाणाऱ्या रस्त्यावरहि एक मारुतीचेंच देऊळ आहे. अर्थात् या देवळांच्या दरम्यान गांवाचा विस्तार आहे. या गांवाची त्या काळीं सुमारें चार हजारपर्यंत वस्ती असे व त्याशिवाय या गांवाला २४ वाड्या अथवा उपगांवें ( Suburbs ) असत. त्यामधून सुमारें एक हजार वस्ती

असे. मिळून येथील एकंदर वस्ती पांच हजारापर्यंत असे. हें गांव इतिहासांतहि प्रसिद्ध अशा एका प्रसंगामुळें उल्लेखनीय झालें आहे. तो प्रसंग म्हणजे संभाजीराजे यांच्या वधानंतर त्यांचा मुलगा शाहू याला औरंगजेबानें पकडून आपल्याबरोबर नेऊन ठेविलें होतें, तेथून औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याची सुटका झाल्यानंतर तो दक्षिणेकडे परत येत असतांना, राजाराममहाराजांची स्त्री ताराबाई इनें त्याला विरोध केला व त्यावरून त्या दोघांची लढाई झाली ती खेडगांवीं झाली. या पहिल्याच झटापटींत शाहूला जय मिळाला व तेथून पुढें त्याची चढती होत ते मराठी साम्राज्याचे अधिपति शाहूमहाराज झाले. याशिवाय या गांवाला महत्त्व आणणारी गोष्ट म्हणजे येथील प्रसिद्ध सन्त चंडीराम महाराजांचा मठ ही होय. हे साधु या रहाळांत फार प्रसिद्ध होते. नदीच्या किनाऱ्यावर एक भव्य विष्णुमंदिर आहे, त्यांत त्यांनीं आपला मठ स्थापन केला होता. त्यांनीं अखेर समाधि घेतली श्रीविष्णूच्या मूर्तीसमोरच. सभामंडपाच्या तोंडाशीं त्यांची संगमरवरी समाधि बांधलेली आहे. त्यांचे पट्टशिष्य रामभटजी आजन्म ब्रह्मचारी होते व पुढें त्यांनीं संन्यास घेतला. हे रामभटजीस्वामी माझ्या लहानपणीं असत. मंदिराला उत्पन्न असें मुळींच नसून मठाधिपति सर्व महाराष्ट्रभर भिक्षा मागून जी मदत आणीत त्यावरच सर्व भागे. तरी मंदिराचा खर्च फार असे. चंडीराम महाराजांची पुण्यतिथि पौष शु॥ १४ ला असे, त्या दिवशीं गांवप्रयोजन होई, व केवळ गांवचेच नव्हे तर दूरदूरहूनहि अनेक लोक त्या प्रसंगीं येत. त्यामुळें आठदहा हजार पान त्या दिवशीं सहज होई. याशिवाय कोणीहि अतिथि अभ्यागत आला, तरी तीन दिवस त्याला मठांत पाहुणे म्हणून राहण्याची व्यवस्था असे व याशिवाय तो संन्यासी, शास्त्री, पंडित वगैरे असला तर अनियमित मुदतीपर्यंतहि त्याला मठाचा पाहुणचार घेतां येत असे. या देवळाच्या दक्षिणेस त्याला लागूनच मठाचा भाग आहे. तेथून नदीचा देखावा फारच सुंदर दिसतो. या संस्थेचा लौकिक सबंध पुणें जिल्ह्यांत फार मोठा होता.

या गांवांत त्या काळीं ब्राह्मणवस्ती हजारावर होती व ती खेडकर आळी, दीक्षित आळी व वैशंपायन आळी यांत वाटलेली होती. गांवाचा

मुख्य बाजार गांवाच्या दोन टोंकांना असलेल्या दोन मारुतींमधील मुख्य रस्त्यावरच दोन बाजूला होता. गांवाच्या पूर्वेस, गांवापासून सुमारें अर्ध्या पाऊण मैलावर सिद्धेश्वर म्हणून शंकराचें स्थान आहे. तें अत्यंत निवांत स्थान असून देवळाजवळ फार मोठी व अत्यंत सुंदर अशी चारहि बाजूनें बांधून काढलेली पुष्करिणी आहे. तिची दगडी बांधणी अजूनहि उत्कृष्ट स्थितींत असून तींत वरपासून खालीं पाण्यापर्यंत सारख्या दगडी पायऱ्या बांधून काढलेल्या आहेत. पाणी जिवंत असून खोल आहे. त्यामुळें पोहण्याची व स्नानाची तींत उत्तम सोय आहे. उड्या मारण्यासाठीं चारहि बाजूनें उंच असे मिनार बांधलेले आहेत. एकंदरींत हें स्थान फार रम्य आहे.

भीमा नदी ही गांवाला अगदीं लागून वाहते व तिचें पात्र रुंद आहे. पण पाण्याची धार त्यामानानें आठ महिने लहान असते. उन्हाळ्यांत तर मध्यें बऱ्याच ठिकाणीं ती तुटते व मग सांचलेलें पाणी पिण्याला लायक राहात नाहीं, म्हणून वाळवंटांत झरे खणून त्यांतून पाणी न्यावें लागतें. पण गांवाच्या पश्चिम भागाला नेहमीं पाणी स्वच्छ व वाहतें असतें. नदी उगमाकडून पश्चिमेच्या बाजूनें वाहत येऊन पूर्वेकडे जाते व सिद्धेश्वराजवळ ती दक्षिणवाहिनी होते.

या गांवांतील ऐतिहासिक घराणें म्हणजे राजगुरूंचें. तें मराठी स्वराज्याच्या काळापासून चालत आलेलें आहे व त्यांचा वाडा अगदीं नदीला लागून पुणें–जुन्नर रस्त्यावरच आहे. वाडा चार मजली भव्य असून नदीवरून वाड्याकडे पाहिलें म्हणजे तळापासून चार मजल्यांपर्यंत एकसारखी उंच गेलेली भिंत किल्ल्याच्या तटासारखी भक्कम व प्रचंड आहे. या वाड्यावरून तर नदीचा व त्यापलीकडील कितीतरी दूरचा देखावा दिसतो, तो अत्यंत प्रेक्षणीय आहे. हें घराणें हलकें हलकें खालावत जाऊन हल्लीं अगदीं नामशेष झाल्याप्रमाणेंच आहे.

याशिवाय गांवाच्या पूर्वेस एक फार मोठा वाडा उल्लेख करण्यासारखा आहे. त्यास माळावरील दीक्षितांचा वाडा म्हणतात. या वाड्यांत दोन-तीनशें माणसें सहज राहूं शकतील, एवढा तो मोठा आहे. अर्थात् एवढें मोठें एक घराणें असणें त्या काळीं अशक्य असल्यानें तेथें अनेक बिऱ्हाडें राहत.

गांव तालुक्याचें असल्यानें मुन्सफ कोर्ट, मामलेदार कचेरी, सरकारी दवाखाना, पोलिस, फौजदार कचेरी, जंगलखात्याचा रेंजर, सब ओव्हरसिअर वगैरे सर्व सरकारी तालुका ऑफिसर असत.

या तालुक्याची जमीन सुपीक असून तींत बाजरी, बटाटे व भुईमूग हीं पिकें फार मोठीं होतात. किंबहुना पुणें जिल्ह्यांतील $\frac{3}{4}$ बटाटा या गांवांत पिकतो. त्यामुळें त्याकाळीं बटाट्याचीं पोतीं भरलेल्या शेंकडों गाड्या हा माल पुण्याच्या बाजारांत नेण्यासाठीं रोज तिसरे प्रहरीं खेडाहून निघून दुसऱ्या दिवशीं पहाटें पुण्यास पोंचत व माल विकल्यावर या दिवशीं दुपारीं पुण्याहून परत निघून त्याच्या पुढील पहांटे खेडास पोंचत. या गाड्या त्या काळचें प्रवासाचें सर्वसाधारण लोकांचें मुख्य साधन होतें. त्या गाड्यांना विनोदानें बटाटा ट्रेन्स असें म्हणत व तीन ते चार आणे भाड्यानें एक वेळचा हा प्रवास करतां येत असे.

गांवांत मोठे शेठ सावकार नव्हतेच. मुख्य नागरिक म्हणजे सरकारी मोठे अधिकारी व वकील. या वकिलांत माझे वडील व पुण्याच्या इनामदार गोळे घराण्यापैकींचे गणेश कृष्ण ऊर्फ काकासाहेब गोळे व दीक्षित घराण्यांतील दोघे तिघे वकील हे असत. अशा प्रकारें खेड गांवाचें एकंदरींत वर्णन आहे. माझ्या आयुष्याचे आतांपर्यंत जे तीन मुख्य भाग पडले आहेत, त्यांतील पहिला २३ वर्षांचा भाग मुख्यतः या गांवींच व्यतीत झाला असल्यामुळें त्याचें वर्णन मी जरा विस्तारानें केलें आहे. दुसरा भाग अनेक ठिकाणीं मिळून गेला असून तिसरा बडोद्यास आल्यापासूनचा होय. त्याचें वर्णन यथाकाल येईलच.

अशा या खेड गांवीं चाकणहून मुन्सफकोर्ट आल्यामुळें माझे वडील आले तेव्हां त्यांनीं पांडुरंगराव जोशी नांवाच्या गृहस्थांच्या घरीं बिऱ्हाडानें जागा घेतली. खेडकरआळीच्या मागील भागीं हें घर होतें. होतें म्हणण्याचें कारण हल्लीं तें बहुतेक पडून गेलें आहे. येथें कांहीं वर्षें वडील राहिले होते. याच घरांत माझा जन्म झाला.

## .५.

माझ्यापूर्वीं माझ्या आईला लागोपाठ तीन मुली झाल्या होत्या. त्यांतील दोन अगदीं लहानपणींच वारल्या व तिसरी अडीच वर्षांची होऊन वारली. त्यानंतर चौथें मूल व पहिला मुलगा मी होय. माझा जन्म शके १८११ चैत्र शुद्ध प्रतिपदेला दुपारीं झाला. आमच्या घरीं गुढी उभारली होती व वर्षारंभाचा तो दिवस असल्यानें एक प्रकारें आनंदाचाहि होता. अशा वेळीं माझा जन्म झाल्यानें अर्थातच घरांत आनंद पसरला. माझा जन्म झाल्याबरोबर पांच तासांच्या आंत आमच्या कोल्हारवाडी इनाम गांवच्या उत्पन्नाची रक्कम घेऊन गांवचा महार आला. या रकमेला ‘ पोतें ’ म्हणण्याचा रिवाज आहे. त्यामुळें हें ‘पोतें’ माझ्या जन्माबरोबरच आल्यानें तोहि एक प्रकारें शुभशकुनच समजला गेला. इतक्यांत नवीन वर्षफळ सांगण्यास ब्राह्मण आले. त्यांना दोन दोन आणे देण्याचा नेहमींचा रिवाज असे. त्याऐवजीं त्या दिवशीं वडिलांनीं दोन दोन रुपये दिले.

माझ्या जन्मानंतर सुमारें एक महिनापर्यंत माझी प्रकृति चांगली होती, पण त्यानंतर एकाएकीं मला अपस्माराचे झटके येऊं लागले. हा विकार मी दहा अकरा महिन्यांचा होईपर्यंत टिकला. या विकारामुळें माझें शरीर ताठ होऊन मला आंकडीप्रमाणें झटके येत व कांहीं वेळानें ते गेल्यावर दोन दोन चार चार दिवस मी एकसारखा अहर्निश रडत असे. त्यामुळें सर्व घर कंटाळलें. माझ्या आईला तर घर नकोसें झालें ! एकदां आमच्या घरीं कोणीं मोठे पाहुणे आले असतां, माझ्या एकसारख्या रडण्यानें त्यांना कटकट होऊं लागल्यानें मला घेऊन माझ्या आईनें एक दिवस शेजारच्या घरीं काढल्याचें सांगतात. त्यासाठीं पुण्याला नेऊनहि अनेक डॉक्टरवैद्यांचे इलाज केले. पण त्यावेळीं कांहींहि गुण आला नाहीं. दहाव्या अकराव्या महिन्याच्या सुमारास हा विकार थांबला व त्यापुढें जरी पुन्हां उद्भवला नाहीं, तरी तीव्र डोकेंदुखीच्या रूपानें तो मला पुष्कळ वर्षें त्रास देत असे. माझ्या या व्याधींत मी फार रडत असें, म्हणून माझ्या आईनें त्यावर एक तोडगा केला. माझें जन्मनांव श्रीकृष्ण असें ठेविलें आहे. असें

असतांहि माझ्या आईचे चुलते जे दाजीकाका म्हणून असत व ज्यांचें माझ्या आईवर फार प्रेम असे, तेच माझ्या आईच्या उदरीं जन्मास आले असतील असें समजून तिनें त्यांच्या नांवानें मला हांक मारण्यास सुरुवात केली. योगायोगानें असो वा वैद्यकीय इलाजामुळें असो, माझा विकार व रडणें त्यानंतर लवकरच थांबलें; यामुळें नवस सफल झाला असें मानून तेव्हांपासून मला सर्वांनीं दाजी या नांवानें हांक मारण्यास सुरुवात केली. व तेंच नांव शाळेंत व त्यानंतरहि मी कायम ठेविलें. माझ्या वयाला दीड पावणेदोन वर्षें झाल्यावर माझ्या वडिलांनीं आपल्या आयुष्यांतील मोठ्यांत मोठ्या प्रवासाची सफर केली. तींत त्यांनीं सर्व उत्तर हिंदुस्थानच्या यात्रा केल्या. मथुरा, गोकुळ वृंदावन, काशी, प्रयाग, गया, अयोध्या वगैरे सर्व यात्रा त्यांनीं यावेळीं केल्या. हरिद्वार वगैरेला मात्र ते गेले नाहींत. या पूर्वी त्यांनीं कोकणांत आमच्या मालपें गांवीं जाऊन तेथील ग्रामदेवतांच्या पायावर मला घातलें. त्याचप्रमाणें कोल्हापुरास जाऊन कुलस्वामिनी अंबाबाई हिचें दर्शनहि मला करविलें. त्यानंतर केलेल्या उत्तर हिंदुस्थानच्या यात्रेंत इतर सर्व ठिकाणीं जाऊन आल्यानंतर अखेरीस ते काशीस आले, तेथें माझ्या आईची प्रकृति अत्यंत बिघडली; ती इतकी कीं, अनेक वेळां तिची आशाहि सुटली होती. तिच्या अस्वास्थ्यामुळें काशीस वडिलांचा मुक्काम दोन महिने झाला व मग तिला थोडा आराम वाटल्यावर ते यात्रा संपवून खेडास परत आले. अयोध्येस असतांना वडिलांनीं रामजयो-दशाक्षरी मंत्र घेऊन श्रीरामाची उपासना घेतली. ती त्यांनीं आमरण चालविली होती. काशीसच माझ्या वयाला दोन वर्षें पुरीं होऊन माझा वाढदिवस तेथें करण्यांत आला.

खेडास परत आल्यावरहि माझ्या आईची तब्येत चांगली सुधारण्यास तीन चार महिने लागले. या अवधींत मला संभाळण्याचा त्रास तिला सहन होऊं शकत नसे. यामुळें जी योजना त्या सुमारास वडिलांनीं केली तिचा माझ्या आयुष्याच्या बऱ्याच काळाशीं संबंध जडला गेला. कोकणांतील मालपें गांवीं आमच्याच घराण्यांत माझ्या वडिलांचे एक सख्खे चुलतबंधु भास्कर म्हणून होते, ते लग्न झाल्यावर ताबडतोब अल्पवयांत वारले. त्यांची बालविधवा यशोदा म्हणून होती, ती पुढें तिच्या सासरीं

तिची राहण्याची सोय नसल्यानें आपल्या माहेरीं गोखले यांच्या घरीं राहात असे. या घराण्यांतहि गरीबीच होती. त्यांची थोडीशी घरची शेती होती, ती घरांतील पुरुष बायका मिळून करीत; त्यामुळें या यशोदाबाईनें शेतीचीं कामें स्वतः केलेलीं होतीं. अशा प्रकारें तिचा कार्यक्रम चालू असतांना माझे वडील कोकणांत गेले, त्यावेळीं त्यांनीं तिला कायमचें खेड येथें राहण्यास येण्यासाठीं बोलावलें. तें तिला पसंत पडून यात्रा संपवून वडील खेडास परत आल्यावर ती आमच्या घरीं आली. त्या वेळेस तिचें वय चाळीस वर्षांचें होतें. ती आल्यापासून माझ्या स्वतःच्या व त्यानंतर मला जीं भावंडें झालीं त्या सर्वांच्या, संगोपनाची जबाबदारी तिनें आपल्या अंगावर घेतली व ती उत्तम तऱ्हेनें पार पाडली. कोकणांत असतांनाच ती लिहिण्यावाचण्यास शिकली होती. आमच्या घरीं आल्यापासून दुपारचा स्वयंपाक करण्याची कौटुंबिक जबाबदारी तिनें आपल्या अंगावर घेतली होती, ती यथासांग पार पाडूनहि, उरलेला सकाळचा वेळ देवपूजेंत, दुपारचा पोथीवाचनांत व बाकीचा आम्हां भावंडांच्या संगोपनांत असा ती खर्च करी. याशिवाय घरांतील कामाकडे ती पहातहि नसे व इतर कुटुंबां-तील गोष्टींकडे लक्ष देत नसे. आपलें काम बरें व आपण बरें, असा तिचा एकमार्गी स्वभाव होता. यामुळें आमच्या कुटुंबांतील कोठलाहि पक्ष तिनें घेतला नाहीं. माझा व तिचा संबंध तर इतका निकटचा झाला कीं, आई म्हणून तिच्याशिवाय मला दुसरी फारशी जाणीव नव्हती. तिला श्लोकांचें पाठांतर फार होतें व हे सर्व श्लोक लहानपणापासून तिनें शिकविल्यामुळें माझेंहि पाठांतर पुष्कळ झालें होतें. कोकणच्या राहणीमुळें टापटीप व स्वच्छपणा हा तिच्या अंगीं पूर्णपणें मुरला होता. हे गुणहि तिनें आमच्या अंगांत आणण्याचा प्रयत्न केला. आमच्या गांवीं इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतच शाळा असे. त्यामुळें माझा तितका अभ्यास झाल्यानंतर पुढील शिक्षणा-साठीं जेव्हां मला पुण्यास ठेवण्याची वेळ आली, त्यावेळीं मजबरोबर स्वाभाविक रीतीनें तीच राहिली.

मी मॅट्रिक पास होईपर्यंत तिच्याबरोबरच पुण्यास राहिलों. त्यानंतर बी. ए. होईपर्यंत मी कॉलेजच्या वसतिगृहांत राहिलों. पण बी. ए झाल्या-नंतर मी नागपुरास ज्या वेळीं एल्एल्. बी. च्या अभ्यासासाठीं सपत्नीक

अडीच वर्षें राहिलों, त्यावेळीं पुन्हां या काकूस मी तेथें मजबरोबर नेलें होतें. त्यानंतर बडोद्यास वकिली करण्यासाठीं मी सर्व कुटुंबासह आलों त्यावेळीं आमच्या बरोबर अर्थातच ती आली; ती अखेरपर्यंत राहिली व सन १९२० सालींच्या एप्रिल महिन्यांत वयाच्या ७५ व्या वर्षी ती आमच्या घरीं वारली. तिच्या मृत्यूनें मला फार दुःख झालें; कारण तिचा व माझा सहवास तसाच दृढ होता.

माझ्यानंतर माझ्या आईला झालेलें मूल म्हणजे माझी बहीण दुर्गा होय. त्यानंतर कांहीं मुलें झाल्यावर मला एक भाऊ झाला, तो हल्लींचा माझा एकच असा सख्खा भाऊ माधव हा होय. तो एम्. बी. बी. एस्. होऊन हल्लीं सुरत येथें खाजगी डॉक्टरीचा धंदा करीत आहे व त्यांत त्याला प्राप्तीहि उत्तम होत आहे. तूर्त मी व माझा धाकटा भाऊ माधव अशीं दोघेंच सख्खीं भावंडें राहिलों आहोंत. या आम्हां भावंडांपैकीं तीनच अर्भकावस्थेच्या पलीकडे गेल्यानें तेवढींच आमच्या काकूच्या देखरेखीखालीं आलीं व त्या सर्वांचें संगोपन तिनें उत्तम रीतीनें केलें. माझ्या लहान वयापर्यंत वडिलांनीं चाकणेस बरीच शेती खरेदी केली होती. त्याचप्रमाणें कोल्हारवाडी हा इनाम गांव खरेदी केला होता. हल्लीं हा गांव आमच्या घराण्यांतच चालत आहे. खेडास आल्यावर प्रथम, वर दिल्याप्रमाणें जोशांच्या घरांत आमचें बिऱ्हाड होतें. मी चार वर्षांच्या वयाचा होऊन मला पांचवें वर्ष लागलें, त्या सुमारास माझ्या आईनें मला घरींच अक्षरज्ञान करविलें. आमच्या वेळीं स्लेट पाट्या व पेन्सिली रूढ झाल्या होत्या, त्यामुळें आम्हांला धूळपाट्यांची माहिती नाहीं. अक्षरें व बाराखड्या घरीं शिकल्यावर माझ्या पांचव्या वर्षी मला म्युनिसिपालिटीच्या मराठी शाळेंत दाखल करण्यांत आलें.

## ६.

म्युनिसिपल शाळेची इमारत आमच्या घरापासून सुमारें ५।६ मिनिटांच्या रस्त्यावर हल्लीं आहे तेथेंच होती. तिच्यांत सहा मराठी इयत्तां-

पर्यंत अभ्यासाची सोय असे. एक आडवा मोठा सोपा असे, त्यांत तीनचार वर्ग बसत. दरेक वर्ग पक्की भिंत घालून निराळे केलेले होते. या सोप्याच्या दोन्ही बाजूंनी काटकोनाला आडवे सोपे काढलेले असत, त्यांत इतर वर्ग बसत. शाळेच्या इमारतीसमोर खुला चौक असून त्याच्याभोंवतीं पक्कें कंपाउंड असे. इमारत पक्की असून शाळेसाठीं मुद्दाम बांधलेली होती.

या शाळेवर त्याकाळीं मोरो भिकाजी बोकील या नांवाचे हेडमास्तर असत. त्यांचें मोडी अक्षर अत्यंत सुंदर असून त्यांच्यापासून शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांना कित्ते घालून तर देण्यांत येतच; पण त्यांच्या अक्षरांचे छापील कित्ते इतरत्रहि वापरण्यांत येत. ते त्यावेळीं पोक्त वयाचे म्हणजे सुमारें ५२।५४ वर्षांच्या वयाचे होते. ते शिस्तीचे फार कडक भोक्ते असून सर्व-साधारणतः शांत असले, तरी रागावले म्हणजे कडक शिक्षा करीत, अशी त्यांची ख्याति असे. शाळेंत इतर अभ्यासाचे विषय शिकविण्यापेक्षां त्यांची विशेष ख्याति त्यांच्या मोडी अक्षरशिक्षणासाठीं होती. त्यांच्या मदतीला दुसरे ४।५ मास्तर असत. आमची शाळा सकाळ दुपार अशी असे. सकाळीं ७ ते १०॥ व दुपारीं २ ते ५ असें शाळेंत जावें लागे. सकाळीं शाळा सुटून घरीं आल्यावर जेवल्यानंतर मला शिकविण्यास मास्तर येत.

शाळेंत गेल्यावर पहिली व दुसरी इयत्ता मी एकाच वर्षात पुऱ्या केल्या; व दुसऱ्या वर्षी तिसरींत गेलों. अशा रीतीनें तीन वर्षेपर्यंत या मराठी शाळेंत मीं काढलीं. या अवधींत चौथ्या इयत्तेंत असतांनाच शाळेची वार्षिक परीक्षा घेण्यास दिपोटी आले, त्या वेळीं एक गमतीचा प्रकार घडला होता. त्याची आठवण खेळगडी मासिकाच्या सन १९३९ च्या दिवाळीच्या अंकासाठीं त्या मासिकाचे संपादक रा. पालवणकर यांनीं मागितल्यावरून मी पाठविली होती, ती त्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. ती मजेदार असल्यानें येथें देत आहे.

“ शाळेच्या वार्षिक परीक्षेसाठी दिपोटी आले होते. आपल्या वर्गाचा निकाल चांगला लागावा असें दरेक मास्तरास वाटतें, त्याप्रमाणें आमच्या चौथ्या इयत्तेच्या मास्तरांनाहि वाटे. आमच्या वर्गाचें गणित कच्चें होतें, त्यामुळें आमच्या मास्तरांनीं गणिताचा निकाल चांगला येण्यासाठीं एक युक्ति योजून ती आम्हांस सांगितली होती. वर्गात मास्तर नेहमी ज्या

खुर्चीवर बसत, तेथेंच दिपोटी बसणार होते. त्या खुर्चीच्या मागें एक भिंत होती व त्या भिंतीला वरच्या बाजूला एक मोठें वाटोळें भोंक ठेवलेलें होतें. दिपोटींनीं मुलांना गणित सांगितलें कीं त्याचें उत्तर आमच्या मास्तरांनीं एका पाटीवर लिहून, ती पाटी, त्या भिंतीच्या मागील बाजूस उभें राहून त्यांतील भोंकांतून पुढें धरावी, म्हणजे दिपोटींची तिकडे पाठ असल्यानें त्यांना ती दिसून न येतां विद्यार्थ्यांना मात्र दिसावी अशी ती युक्ति होती. ठरल्याप्रमाणें गणिताच्या परीक्षेच्या वेळीं दिपोटींनीं एक गणित मुलांना सांगितलें; त्याबरोबर मास्तरांनीं त्याचें उत्तर पाटीवर लिहून भिंतीच्या मागील बाजूस एका खुर्चीवर उभें राहून ती पाटी त्या भिंतीच्या भोंकांतून पुढें धरिली. पण योगायोग असा कीं, ती पाटी एकदम मास्तरांच्या हातून निसटली व दिपोटींच्याच अंगावर येऊन आदळली व मास्तरांचें सर्व बेंड बाहेर पडलें! मग दिपोटी, मास्तर व विद्यार्थी या सर्वांना काय वाटलें असेल याची कल्पनाच करावी.”

अशा रीतीनें माझ्या चार इयत्ता पुऱ्या झाल्यावर मला इंग्रजीकडे घालण्याचें वडिलांनीं ठरविलें. त्या काळीं काय व आतांहि काय ज्या विद्यार्थ्यांना पुढें इंग्रजी शिक्षणाची ऐपत व इच्छा नसेल तेच मराठी सहा इयत्ता पुऱ्या करितात व मग मराठी ट्रेनिंग कॉलेजांत जाऊन व त्याशिवाय शाळांतून शिक्षकाची नोकरी करितात वा अन्य व्यवसाय पत्करितात, असाच अनुभव आहे. याच्या उलट ज्यांना इंग्रजीकडे जावयाचें असेल ते मराठी चौथी इयत्ता पुरी झाल्यावर तिकडेच वळतात. त्याप्रमाणें मलाहि या मराठी शाळेंतील तीन वर्षांचा व चार इयत्तांचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर त्या शाळेंतून काढून मिशनरी लोकांनीं चालविलेल्या इंग्रजी शाळेंत घालण्यांत आल्यानें या मराठी शाळेचा माझा संबंध तुटला. तरीहि त्यानंतर तीन वर्षे मी खेडास इंग्रजीचा अभ्यास करीत असतांहि माझ्या वडिलांनीं मला मोडी अक्षरासाठीं बोकील मास्तरांच्या घरीं दररोज जाण्यास सांगितलें, त्याप्रमाणें मी जात असें. माझें बाळबोध, इंग्रजी व गुजराथी अक्षर कांहीं चांगलें नाहीं; पण माझें मोडी अक्षर मात्र उत्तम नसलें तरी त्यामानानें बरेंच चांगलें आहे व त्याचें श्रेय त्या काळच्या बोकील मास्तरांच्या शिकवणीलाच दिलें पाहिजे. मलाहि त्या अक्षराची

आवड सर्वांत अधिक असल्यानें माझा बराचसा पत्रव्यवहार—अर्थात् मोडी समजणाऱ्या लोकांशींच—मी मोडींतच करतों. तें लिहितांनाहि मला आनंद होतो, अक्षरहि चांगलें येतें, व इतर कोणत्याहि लिपीपेक्षां कितीतरी पट अधिक जलद तें लिहितां येतें.

पण माझा हा मराठी शाळेंतील अभ्यासक्रम चालू असतांनाच ज्या कांहीं कौटुंबिक घटना घडल्या त्यांचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. त्यांपैकींची पहिली गोष्ट म्हणजे माझ्या आजीचा मृत्यु. माझ्या लहानपणच्या आठवणींतील एक अगदीं स्पष्ट आठवण माझ्या आजी-संबंधाची होय. नगरकरांच्या वाड्यांतील आमच्या घरांत तळमजल्यावरील माजघराला लागून असलेल्या पूर्वेकडील खोलींत तिचें वास्तव्य असे. माझी आठवण तिच्या मृत्यूपूर्वीची कांहीं महिन्यांची आहे. माझ्या वडिलांची आपल्या आईवर अत्यंत—निष्ठा असल्यानें तिच्या इच्छेसाठीं म्हणून माझी मुंज लौकर करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें व ही गोष्ट घरांत सर्वजण बोलत असल्यानें मलाहि ती कळली होती. सन १८९३ च्या मे महिन्यांत एके दिवशीं मी आईजवळ—तिला आम्हीं सर्वजण आईच म्हणत असूं—बसलों असतांना तिला म्हटलें, “ आई, आतां लौकरच माझी मुंज होणार, तेव्हां तूं येशील न ग ? ” त्यावेळीं तिची प्रकृति चांगली होती. जरी तिचें वय ८९ वर्षांचें झालें होतें, तथापि तिला वार्धक्याशिवाय व्याधि कसलीहि नव्हती व ती सर्व घरांत हिंडत असे. माझ्या प्रश्नाला तिनें उत्तर दिलें, “ हो येईन तर; जर मी जगलें तर पुण्याला येईन; नाहींतर मग मी तुझी मुंज आभाळांतून पाहीन. ” त्यावेळीं माझें वय सहा वर्षांचें होतें; पण ‘ जगलें नाहीं तर ’ असें आई म्हणाली याचा अर्थ काय व मग ती आभाळांत कशी जाणार व तेथून माझी मुंज कशी पाहणार हें मला समजलें नाहीं. म्हणून मी हट्ट धरून तिला म्हणालों कीं, “ तूं आभाळांत नको जाऊंस. मुंजीला पुण्यास आमच्याबरोबर ये. ” तेव्हां आपल्या म्हणण्याचा अर्थ मला समजणार नाहीं असें जाणून ती म्हणाली, “ बरं, नाहीं जाणार आभाळांत अं. तुमच्याबरोबर पुण्यासच येईन. ” या उत्तरानें माझें समाधान झालें. पण पुढें तीन महिन्यांनींच लहानशा आजारानंतर तिला मृत्यु आला. तेव्हां

घरांतील सर्व म्हणूं लागले कीं, आई आभाळांत गेली. तरी मला याचा अर्थ समजला नाहीं. मात्र आई आतां घरांत कोठेंहि दिसत नाहीं, इतकी खात्री झाली. माझ्या आजीचें उत्तरकार्य वडिलांनीं फार खर्चानें व यथासांग खेड येथें केलें.

त्यानंतरच्या नोव्हेंबरांत माझी आई व तिच्या माहेरची मंडळी—माझे मामा मामी वगैरे—यांच्याबरोबर मी प्रतापगडास गेलों ही यापुढील महत्त्वाची गोष्ट होय. माझ्या आजोळच्या घराण्याची कुलस्वामिनी प्रतापगडची भवानी ही होय. म्हणून तिच्या दर्शनासाठीं जाण्याचें त्या सर्वांनीं ठरविलें. प्रतागडास आम्ही गेलों व तेथील सर्व स्थळें पाहिलीं. त्यांतील भवानीचें देऊळ व मूर्ति आणि अफझलखानाचें थडगें हीं माझ्या विशेष स्मरणांत राहिलीं आहेत. त्या प्रसंगीं त्या गडाचा सर्व इतिहास माझ्या आईनें मला अनेकवार सांगितला. शिवाजी महाराजांचा पराक्रम, त्यांनीं स्वराज्य स्थापल्याची हकीकत, अफझुलखानाची स्वारी व त्याला शिवाजीमहाराजांनीं ठार मारल्याचा वृत्तांत आणि त्याचें मुंडकें देवीसमोर पुरल्याचें वृत्त हें सर्व तिनें मला सांगितलें. मला वाटतें, माझ्या अंतःकरणांत शिवाजी-महाराजांबद्दलची भक्ति व मराठ्यांच्या इतिहासाबद्दलचें प्रेम यांचें बीज या प्रसंगींच पेरलें गेलें. कारण त्यानंतर शिवाजीमहाराज, मराठे, हिंदुधर्म, श्रीरामदास यांची नांवें घेतल्याबरोबर विचारालाहि अवसर न देतां माझ्या अन्तर्मनांतून जो या सर्व नांवांविषयींच्या प्रेमाचा व आदराचा उमाळा बाहेर पडतो, त्याचें मूळ कारण ही प्रतापगडची यात्रा होय यांत शंका नाहीं. मनुष्याच्या हातून पुढें देशभक्तीचें कांहीं कार्य होवो वा न होवो; पण त्याच्या मनांत देशभक्तीचें बीज पेरण्याला ऐतिहासिक स्थलांचें दर्शन अगदीं लहानपणीं करविणें हें एक महत्त्वाचें साधन आहे अशी माझी खात्री झाली आहे. या प्रवासाच्या अनुषंगानें दुसरी एक बारीक पण आठवण राहण्यासारखी हकीकत घडली, ती अशी कीं, ही यात्रा करून आल्यानंतर थट्टेनें मला कोणी विचारलें कीं, "यात्रा करून आल्यानंतर खाण्याचा कांहीं तरी पदार्थ सोडून द्यावा लागतो तसा तूं कोणता सोडणार ?" त्यावरून आपण कांहीं तरी सोडावें असें माझ्या मनांत आलें; व तेव्हांपासून मी वांगीं व कांदे खाण्याचें सोडलें. तो माझा नेम अजूनपर्यंतहि चालू आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम २४१०८ दि: ३३
क्रमांक ८०८ ग्रं. दि. ७३

याप्रमाणें प्रतापगडला जाऊन आल्यानंतर माझी मुंज पुणें येथें पूर्वीच्या कसबा पेठेंतील कडुसकरांच्या वाड्यांत फार थाटानें करण्यांत आली. हा वाडा त्यावेळीं कसबा पेठेंत गणला जाई. हल्ली तो बुधवार पेठेंत समाविष्ट केला गेला आहे. त्यावेळीं आमच्या कुटुंबाची पुष्कळ मंडळी गोळा झाली होती. त्यावेळीं एक रुपयास पुण्याचे दोन पक्के शेर तूप विकत मिळत असे ही आठवण मला आहे. ५।६ दिवस मुंजीचा समारंभ चालला होता. आमचे कुलउपाध्याय खेडचे वैशंपायन हे होते. त्यांच्या घराण्यांतील वासुदेव भटजी यांनीं त्या प्रसंगीं उपाध्येपण केलें. या वासुदेव भटजींना मुलगा नसल्यानें त्यांनीं आपला पुतण्या बाळंभट यास पुढें याज्ञिककर्मांत तयार केलें व पुढें अनेक वर्षेंपर्यंत या बाळंभटांनींच आमच्या येथें उपाध्येपण केलें. या बाळंभटजींचें वय माझ्याहून दोन तीन वर्षांनींच मोठें असल्यानें, ते माझे लहानपणचे मित्र व सवंगडी असत. मुंज मोठ्या थाटानें झाली; पण माझ्या आजीनें ती अखेर आभाळांतूनच पाहिली !

मुंजीनंतरच्या ऑक्टोबरमध्यें माझी मराठी चौथ्या इयत्तेची परीक्षा मी पास झालों व मग सन १८९६ च्या जानेवारी महिन्यांत मला तेथील मिशनरी इंग्रजी शाळेंत घातलें. खेड येथें त्यावेळीं सरकारी इंग्रजी शाळा नसे. मात्र तेथें मिशनरी लोकांनीं एक इंग्रजी शाळा काढलेली होती व तीत इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतचें शिक्षण होई. इंग्रजी पहिली व मराठी पांचवी, इंग्रजी दुसरी व मराठी सहावी आणि इंग्रजी तिसरी आणि मराठी सातवी असे जोड अभ्यास या वर्गांतून चालत. या मिशनच्या विभागाचा प्रमुख हेवर्ड या नांवाचा एक साहेब असे व खेड येथील शाळेंत रा. बेहरे या नांवाचे ख्रिस्ती झालेले गृहस्थ हेडमास्तर असत; हे फक्त इंग्रजी विषय शिकवीत व इतर सर्व विषयांचे शिक्षक दत्तात्रय अनंत आपटे हे असत. हेच गृहस्थ पुढें ‘ अनंततनय ’ या नांवानें कवि म्हणून प्रसिद्ध झाले. या सद्गृहस्थांचा माझा संबंध प्रथम तीन वर्षें शिक्षक व विद्यार्थी या नात्यानें आला व तेथें आमच्यांत जो लोभ उत्पन्न झाला, तो अखेर त्यांच्या मृत्यूपर्यंत तसाच टिकला. मी सन १८९८ च्या सुरुवातीस इंग्रजी तीन इयत्ता पुऱ्या केल्यावर खेड सोडलें व त्यानंतर कांहीं काळानें दत्तोपंतांनींहि तेथील मिशनरी शाळा सोडून पब्लिक वर्क्स खात्यांत नोकरी

धरिली. या कारणानें मध्यंतरीं त्यांची व माझी कांहीं वर्षें भेट झाली नाहीं. पण पुढें ते पुण्यास नोकरीच्या निमित्तानें आल्यापासून तों ते दिवंगत होईपर्यंत जेव्हां जेव्हां मी पुण्यास जाई तेव्हां तेव्हां त्यांना अवश्य भेटत असें व तेहि अत्यंत प्रेमानें मला वागवीत असत. विशेषतः त्यांनीं वाङ्मयीन क्षेत्रांत आणि त्यांतहि काव्यक्षेत्रांत चांगलेंच नांव कमाविलें. यामुळें मीहि वाङ्मयाच्या क्षेत्रांत पदार्पण करून थोडाबहुत लौकिक संपादन केला, तेव्हां तर त्यांना प्रेमाचें भरतें येई. त्यांच्या अगदीं अखेरच्या दुखण्यांत मी पुण्याला त्यांच्या घरीं त्यांना भेटलों, तेव्हां त्यांच्या डोळ्यांत अश्रु आले व ही माझी व तुमची अखेरचीच भेट असें त्यांनीं मला सांगितलें; तेव्हांचा करुणास्पद प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर आहे.

दत्तोपंत ऊर्फ अनंततनय यांचा स्वभाव फार संकोची व मितभाषी असे. शिवाय बोलतांना ते थोडेबहुत अडखळत, म्हणूनहि ते साधारणतः कमी बोलत. पण परिचयाच्या माणसांशीं ते अगदीं मोकळेपणानें बोलत. मी या शाळेंत गेल्यावर इंग्रजी शिकविण्याकरितां घरचे मास्तर म्हणूनहि त्यांचीच योजना केली होती. यामुळें माझा दिवसाचा पुष्कळसा वेळ त्यांच्या सहवासांतच जाई. ते आपलें शिकविण्याचें काम मन लावून करीत. पण तेव्हांपासूनहि त्यांचा कल लेखनाकडे अधिक असल्यामुळें शिक्षकाचें काम चांगलें करितां येण्यासाठीं लागणारे परिश्रम ते घरीं करीत नसत.

आमच्या शाळेंत वार्षिक गॅदरिंग करण्याची पद्धति सुरू झाली होती. इंग्रजी तिसरींत असतांना शेक्सपिअरच्या किंग जॉन नाटकांतील ‘ प्रिन्स ऑर्थर आणि ह्यूबर्ट ’ या प्रसिद्ध प्रवेशांतील प्रिन्स ऑर्थरची भूमिका मी गॅदरिंगमध्यें करून दाखविली होती ती सर्वांना पसंत पडली होती.

## .७.

त्या काळीं खेडेगांवीं सार्वजनिक करमणुकीचे प्रकार फारच थोडे असत. सिनेमा तर त्यावेळीं नव्हतेच. नाटकें क्वचित् होत, तीं अललल

डुर्रर्च्या पद्धतीचीं होत. त्यांत सूत्रधारानें हातांत टाळ वाजवून नांदी करून सर्व नाटकांतील पदें म्हणावयाचीं असत. मुखवटा घातलेला गणपति 'नाकीं गमन करितों' म्हणतांच विदूषकानें प्रथम गणपतीचें व नंतर आपलें नाक दाबून धरणें, सरस्वतीनें मोरावर नाच करीत येणें, राक्षसांनीं कमरेला बायकांचीं लुगडीं बांधून राळेच्या उजेडांत ओरडत येणें, इत्यादि सर्व प्रकार त्या नाटकांत होते. या नाटकांना पौराणिक नाटकें म्हणत. पुढें 'बुकिश' नाटकें सुरू झालीं. त्यांत लिहिलेला मजकूर पाठ करून पात्रांनीं म्हणावयाचा असे. त्यांतहि पात्रांच्या अडाणीपणामुळें क्वचित् कसा अभावित विनोद होत असे याची एक आठवण मला आहे. एकदां भौमासुराचें म्हणजे नरकासुराचें नाटक केलेलें होतें. त्यांत भौमासुराला मारण्यासाठीं श्रीकृष्ण निघाले, तेव्हां सत्यभामेला बरोबर नेण्यासाठीं तिच्या महालापाशीं ते आल्याचा सीन होता. तेथें येतांच दाराशीं एक गुरवाचा मुलगा पहारेकरी म्हणून उभा होता. त्याला श्रीकृष्णांनीं सांगितलें कीं, 'जा, सत्यभामेला सांग कीं, तुझ्या भेटीसाठीं मी आलों आहें.' त्याबरोबर तो आंत गेला व त्यानें सत्यभामेला सांगितलें, 'बाईसाहेब, मी तुझ्या भेटीसाठीं आलों आहें.' त्याबरोबर जो हंशा पिकला त्याचें कारण त्या द्वारपालाला केव्हांच समजलें नाहीं! हीं नाटकें आमच्या गांवीं प्रथम प्रथम आमच्या घराजवळील गणपतीच्या देवळांत होत व नंतर तेथील मोठा चौक असलेल्या हवालदाराच्या वाड्यांत होत.

सर्कशी कधीं कधीं या गांवीं येत. एकदां एक डुबेरकरांची सर्कस आलेली मला आठवते. पण त्यांत वाघ, सिंह वगैरे जनावरें मुळींच नसून घोडे, माकडें, कुत्रीं वगैरेंचाच खेळ होत असे. कोल्हाट्याचे खेळ वगैरे ते लोक फिरत गांवीं येत तेव्हां होत. दरवर्षी कुस्त्यांचे दंगल मात्र नेमानें होत व त्याविषयींची आवड असणारे लोक मोठ्या उत्साहानें त्यांची वाट पाहत.

दरवर्षी नवरात्रांत गांवाबाहेर दीडदोन मैलांवर असलेल्या एका देवीच्या दर्शनाला जाणें व दुसऱ्या टोंकाला असलेल्या 'भोंपळबुवा' नांवाच्या एका साधूच्या उरुसाला जाणें हीं वर्षातील नैमित्तिक

करमणुकीचीं साधनें असत. गोकुळाष्टमीचा कृष्णजन्म चंडीरामबुवांच्या मठांत थाटानें होई व नंतर गोपाळकाला होई. त्याप्रमाणें तेथें त्रिपुरी पौर्णिमेला देवळासमोरील दीपमाळेवर आवळ्यांचे दिवे लावीत ते पाहण्यासारखे असत. माझे वडील हे धार्मिक वृत्तीचे असल्यानें व त्यांचा गळा मधुर असून गाण्याची माहिती त्यांना बरी असल्यानें दर आषाढी कार्तिकी शुद्ध व वद्य एकादश्यांना ते चंडीराम महाराजांच्या मठांत स्वतः कीर्तन करीत. त्याचप्रमाणें त्यांनीं रामोपासना घेतली असल्यानें चाकण येथील रामाच्या मूर्तीपुढें ते रामजन्माची कथा स्वतः करीत व रामसेवक हनुमान याच्या जन्मदिवशींची कथाहि ते स्वतःच्या गांवाच्या दक्षिणेस असलेल्या ‘ बाजार मारुती ’ च्या देवळांत करीत. हा त्यांचा क्रम अविरत असा अनेक वर्षेंपर्यंत चालला होता व त्यांत कधींहि खंड पडला नाहीं. वडीलच हरिदास असल्यानें या कथांच्या आधींपासून आम्हां मुलांची उत्सुकता वाढत असे. झालें; साधारणतः आमच्या गांवांतील करमणुकींच्या प्रकारांची ही यादी पूर्ण झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं !

करमणुकीच्या प्रकारांत सांप्रत राजकीय चळवळींचाहि अन्तर्भाव होतो. गणपत्युत्सव हा जरी लो. टिळकांनीं राष्ट्रीय भावनेच्या परिपोषा-साठीं काढलेला असला, तरी त्याचें पर्यवसान हल्लीं करमणुकीच्याच प्रकारांत—व कांहीं ठिकाणीं तर अश्लाघ्य करमणुकीच्या प्रकारांत—झालें आहे हें सर्वांना माहीत आहेच. तीच स्थिति बऱ्याचशा इतर चळवळींची आहे. पण या चळवळींची सुरुवात तालुक्यांच्या गांवांतून त्या काळीं झालेली नसल्यानें हे करमणुकीचे प्रकार तेव्हां आम्हांस अपरिचितच असत.

राजकीय चळवळ फार मोठ्या अर्थानें म्हणजे सार्वदेशिक अथवा भारतीय अर्थानें तर नाहींच, पण महाराष्ट्रीय अर्थानेंहि त्यावेळीं तालुक्यांतून बिलकुल नव्हती. सर्व लोक आपआपल्या पोटाच्या उद्योगांत गर्क असत व त्याशिवाय इतर विचार त्यांच्या डोक्यांतहि येत नसत. नाहीं म्हणावयास स्थानिक अधिकाऱ्यांच्या म्हणजे मामलेदार वगैरेंच्या कांहीं कृत्यांविरुद्ध दाद मागणें, अथवा जंगलखातें, इंजिनिअर खातें वगैरे खात्यांच्या लोकांना त्रासदायक वाटणाऱ्या धोरणाविरुद्ध तक्रार करण्याचा उपक्रम

आमच्या गांवीं नुकता कोठें सुरू करण्यांत आला होता. तो करणारे एकच उद्योगी व मेहेनती गृहस्थ असत व त्यांचें नांव नारायणराव देशपांडे हें होतें. ते या कामीं फार मेहनत करीत, पण गांवांतील इतर वजनदार लोकांची या कामीं त्यांना मदत तर होत नसेच, पण उलट त्यांची उपेक्षा मात्र होई. अशा कृत्यानें काय दाद लागणार आहे, उगीच अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार केल्यानें नुकसान मात्र होईल, अशाच या मोठ्या लोकांच्या समजुती असत. त्यामुळें मामलेदार–मुन्सफ, विशेषतः मामलेदार, यांच्या तंत्रानें वागून, जुळल्यास त्यांचें प्रेम संपादन करून व न जुळल्यास तटस्थ राहून आपलें काम करीत राहण्याचाच मार्ग सर्वांचा होता. बाहेरील सार्वजनिक पुढारी कधीं तेथें येतहि नसत व तेथें येण्याचें अशा पुढाऱ्यांच्या डोक्यांतहि त्यावेळीं येत नसे.

अशा परिस्थितींत एका गोष्टीनें जरा लहानशी खळबळ–पण तीहि फार लहान अशा वर्गांत–उत्पन्न झाली. ही गोष्ट म्हणजे सन १८९५ च्या डिसेंबरांत पुण्यांत भरणारी कॉंग्रेसची बैठक होय. या बातमीनें एरव्हींच्या लोकरहाणीच्या सरोवराच्या निश्चळ पृष्ठभागावर एक लहानशी लाट उमटल्याप्रमाणें झालें. अर्थात् तालुक्यांतून त्या बैठकीच्या मुळाशीं असलेल्या अखिल भारतीय चळवळीची कल्पनाहि नव्हती, पण खुद्द पुण्यांतहि त्या कल्पनेपेक्षां राष्ट्रीयसभा व सामाजिक परिषद् यांच्या वादाचें, टिळक व रानडे यांच्या विरोधाचें, श्रीधर विठ्ठल दाते व सुधारक यांच्या भांडणाचें वादळच अधिक गाजलें होतें. इतरेजन हे तर वरील भांडणापासून अलिप्त असत, त्यांना फक्त आपल्या गांवीं एक मोठा उत्सव समारंभ होणार व त्या प्रसंगीं सर्व भारतवर्षांत वक्तृत्वामुळें प्रसिद्धीस आलेल्या सुरेंद्रनाथ बानर्जींचें अध्यक्षीय भाषण होणार याचाच आनंद झाला होता. या प्रसंगीं प्रतिनिधीची फी रु. दहा होती; माझ्या वडिलांना तर पुणें जिल्ह्याच्या एका तालुक्यांतील प्रमुख वकील म्हणून एक तिकीट घ्यावें लागलेंच; पण त्याबरोबर मी त्यावेळीं ७ वर्षांचाच असूनहि माझी हौस पाहून माझ्यासाठीं दुसरें स्वतंत्र दहा रुपयांचें प्रतिनिधीचें तिकीट घेतलें, ही गोष्ट खासच उल्लेख करण्यासारखी आहे. अर्थात् मला इंग्रजीहि समजत नसे व त्या बैठकीच्या राजकारणाचा तर गंधहि नव्हता. तरीहि

माझ्या वडिलांबरोबर मी तीनहि दिवशीं या बैठकीला हजर राहिलों होतों. त्या वेळची ती सुरेंद्रनाथांची ठेंगणी, बोडकी, काळ्याभोर दाढीची मूर्ति मला अजून चांगली स्मरते व त्यांचें तें मैदानी आवाजांत झालेलें दणदणीत भाषणहि माझ्या डोळ्यासमोर आहे. हो! डोळ्यांसमोरच म्हणावयाचें! कारण तें मला मुळींच समजण्यासारखें नसल्यानें आवाज ऐकण्यापलीकडे कानांचें त्या बाबतींत कांहीं काम नव्हतें. मात्र इतकी गोष्ट नमूद केली पाहिजे कीं, त्यापूर्वीं थोडे दिवस आगाऊच मी प्रिन्स ऑर्थरचें इंग्रजी भाषण सफाईनें म्हणून दाखविल्यानें जी माझी प्रशंसा झाली होती, तीमुळें माझ्या मनांत भाषणांच्या बाबतींत थोडा उत्साह व हुरूप उत्पन्न झाला होता, त्याला या सुरेंद्रनाथांच्या भाषणांच्या प्रसंगानें अधिक जोर आला व आपणहि पुढें चांगले वक्ते व्हावें व आपल्या भाषणाला लोकांनीं अशाच पसंतिदर्शक टाळ्या द्याव्या, अशी इच्छा मात्र या प्रसंगीं माझ्या मनांत तीव्रतेनें उत्पन्न झाली, असें मला स्मरतें.

हा कॉंग्रेसच्या बैठकीचा सोहळा संपून खेडास परत आल्यावर सन १८९७ मध्यें मी इंग्रजी तिसऱ्या इयत्तेंत गेलों. तेथें वर्षभर अभ्यास केल्यावर वर्षअखेर मी त्या इयत्तेंत पास झालों, व खेड येथील अभ्यास-क्रमच पुरा झाल्यानें मला पुण्यास पाठविण्याचें वडिलांनीं ठरविलें. माझ्या वडिलांनीं मला ठेवावयाचें तें स्वतंत्र बिऱ्हाड करून ठेवावयाचें असें ठरविलें. अर्थात् माझी काकू मजबरोबर राहण्यास असल्यानें व तिचा मला अत्यंत लळा असल्यानें मला पुण्यास ठेवण्यासंबंधानें काळजी वाटण्यासारखें कांहींच नव्हतें. शिवाय आमचें गांव हें खेडेगांवासारखेंच असल्यानें आमच्या घरचे जिन्नस, कापडचोपड व इतर सर्व सामान पुण्यासच खरेदी केलें जाई. आमच्या घरीं बैलांची व घोड्यांची अशा दोन गाड्या असल्यानें आठवड्यांतून निदान एक व कांहीं वेळां दोनहि खेपा पुण्याच्या सहज होत. त्यामुळें सणावाराला घरीं जाणें व त्याशिवाय माझ्या वडील-मातुःश्रींनीं पुण्यास येऊन मला भेटणें हेंहि अगदीं सुलभ होतें. तरीहि माझ्या जन्मापासून या नऊ वर्षांच्या वयापर्यंत मी माझ्या आईला सोडून कधींहि दूर राहिलेलों नसल्यानें तिला सोडून जाणें मला जड वाटलें. अखेर सन १८९८ सालीं मी व काकू असे दोघे सर्व

सामानासुमानासह खेडाहून पुण्यास आलों. शनिवार पेठेंत गद्रे यांच्या वाड्यांत न्यू इंग्लिश स्कूल होतें. त्याच्याजवळ अंतुअण्णा बापटांचा म्हणून एक वाडा—हल्लीचे प्रसिद्ध कॉंग्रेसकार्यकर्ते न. वि. ऊर्फ काकासाहेब गाडगीळ यांच्या वाड्याशेजारीं आहे—त्यांत आम्ही बिऱ्हाड निश्चित केलें. अशा प्रकारें काकू व मी यांचें बिऱ्हाड या ठिकाणीं थाटून व नंतर गद्रे वाड्यांतील न्यू इंग्लिश स्कूलांत इंग्रजी चौथ्या इयत्तेंत मी आपलें नांव दाखल केलें. या बापटांच्या घरच्या राहण्याचें व शाळेंतील नवीन वातावरणाचें वर्णन यापुढें देईन.

## .८.

बाह्य जगाच्या दृष्टीनें माझ्या परिस्थितींत फार मोठा फरक पडला. मी एका आकुंचित परिस्थितींतून मोठ्या जगांत आलों. कोठें माझें लहानसें तालुक्याचें गांव खेड व कोठें संबंध महाराष्ट्राची राजधानी समजलें गेलेलें पुणें शहर ! तें शहर महाराष्ट्राची बौद्धिक राजधानी तर होतेंच पण थोड्याच दिवसांत अखिल भारताचें तें निकषकेंद्र होणार होतें. पुणें हें सर्व प्रकारच्या राजकीय चळवळींचें आदिस्थान. तेथें मवाळ, जहाल, क्रांतिकारी वगैरे पक्षांचे पुढारी रहात. सुधारक व सनातनी लोक तेथें असत. कथाकीर्तनाप्रमाणेंच पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, बालविवाहनिषेध वगैरे सर्व प्रकारच्या चळवळी तेथें चालत. कथा, कीर्तनें, पुराणें वगैरे जशीं नित्य तेथें होत असत, त्याचप्रमाणें प्रार्थनासमाज, एकेश्वरवादी व अनीश्वरवादी यांचेहि प्रयत्न तेथें चालूच असत. क्रीडांगणावर क्रिकेट, फुटबॉल हे इंग्रजी खेळ जसे मोठ्या प्रमाणावर चालत, तसेच, हुतुतू, आट्यापाट्या वगैरे जुने खेळहि खेळले जात. स्वदेशी वक्त्यांप्रमाणेंच परदेशी अथवा परप्रांतीय वक्ते तेथें येत. वाचनालयेंहि नवीन स्थापन होत होतीं. जरी मोफत वाचनालयांची प्रथा त्यावेळीं फारशी प्रचारांत आली नव्हती, तरी अगदीं अल्पशा वर्गणीनें जगांतील प्रमुख गोष्टींची माहिती उपलब्ध होण्याचीं साधनें प्रचारांत आलीं होतीं.

त्यावेळीं जहाल समजल्या गेलेल्या पक्षाचें मुखपत्र केसरी असे. पण त्याचीं चारच पानें असत. ज्ञानप्रकाश हें नेमस्तपक्षाचें मुखपत्र असे, पण तें साताहिकच असे. पुढें सन १९०५ सालाच्या सुमारास तें दैनिक करण्यांत आलें. तरी प्रथमप्रथम त्यांत आकर्षकपणा कमी असे. त्या पत्रानें गुणाचा उच्चांक श्री. काकासाहेब लिमये यांच्या संपादनाच्या वेळीं पुढें गांठला. केसरी हा अधिक लोकप्रिय असल्यानें त्यांतील लिखाण जरी कमी असे, तरी त्याची मार्गप्रतीक्षा लोक उत्सुकतेनें करीत असत. व तो पुरवून पुरवून आठवडाभर मिळून वाचणारे वाचकहि माझ्या पुष्कळ पाहण्यांत असत. स्त्रियांचें उच्च शिक्षण त्याकाळीं महाराष्ट्रांत फार अल्प असे. फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थीदशेंत पहिल्या वर्षांत दोनतीनच मुली होत्या व पुढील वर्गांत मिळून एखाद दुसरी मुलगी असेल. सायकलवर मुलींनीं बसणें ही गोष्ट तर असंभाव्यच वाटे. वर्गांतहि मुली अगदीं अलग बसत व मुलांशीं त्यांचा संभाषणव्यवहार जवळजवळ होतच नसे. क्रिकेटचा खेळ प्रथम मॅचेसच्या रूपानें युरोपिअन जिमखाना व पारशी लोक यांच्यांतच खेळला जाई व त्याला प्रेसिडेन्सी मॅचेस असें म्हणत. त्यानंतर हिंदु त्यांत सामील झाले, तेव्हां त्यांना तिरंगी ( Triangular ) मॅचेस असें म्हणूं लागले; त्यानंतर मुसलमान आल्यावर त्या मॅचेस् Quadrangular अथवा चौरंगी झाल्या व इतर सर्व धर्मांची मिळून एक पांचवी टीम त्यांत नंतर सामील झाल्यावर त्या मॅचेसना Pentangular अथवा पंचरंगी म्हणूं लागले. याशिवाय मुंबई इलाख्यांतील सर्व कॉलेजांमधून ज्या क्रिकेटच्या स्पर्धेच्या मॅचेस् होत त्यांना Northcote challenge shield matches म्हणत व त्यांत सुशिक्षित वर्ग पुष्कळ लक्ष घालीत असे. त्या वेळेपूर्वीं लो. टिळकांनीं गणेशोत्सव सुरू केला होता. त्यांत रात्रींच्या वेळीं दहा दिवस मेळ्यांचें प्राधान्य असे. त्यांना अफाट गर्दी जमे. हसबनिसांची बखळ, गायकवाड वाडा वगैरे ठिकाणीं या मेळ्यांचे फड जमत. त्यामुळें ते दिवस लोकांना फार मजेचे वाटत.

त्याकाळीं शहरांत सफाई कमी असे. विशेषतः प्रत्येक घराला रस्त्यावरच समोरच्या बाजूस शौचकूप ठेवण्याची पद्धति असल्यानें घरांत

शिरतांनाच घाण येई. शहरांतील रस्ते अरुंद असत व त्यावर धूळ फार असल्यानें पावसाळ्यांत तर फार त्रास होई. पुण्यास पाऊस कमीच असल्यानें पावसाळ्यांत त्या रस्त्यावर चिखल अतिशय होई व पायानें चालणाऱ्या लोकांच्या कपड्यांवर मागून येणाऱ्या गाड्यांमुळें चिखलाच्या पिचकाऱ्या मारल्या जाऊन कपडे खराब होत. डांबरी रस्त्यांची प्रथा तेथें रूढ झालेली नव्हती.

त्याकाळीं पुण्यांत दोनच आर्ट्स कॉलेजें होतीं. एक डेक्कन कॉलेज व दुसरें फर्ग्युसन कॉलेज. याशिवाय सायन्स कॉलेज म्हणून असे, पण त्यांत इंजीनिअरिंगचें शिक्षण मिळे. डेक्कन कॉलेजांत, संस्थानिक वर्ग, जहागीर-दार–इनामदार वर्ग, मोठाले सरकारी अधिकारी व श्रीमंत लोक यांचींच मुलें पाठविलीं जात. कारण तेथील जीवन फार खर्चाचें असे. तेथील प्रिन्सिपॉल सेल्बी हे फार वर्षें प्रिन्सिपॉलच्या जागेवर होते. त्यांच्याशिवाय प्रो. बेन म्हणून तेथें एक इतिहासाचे प्रोफेसर असत. ते फार स्वतंत्र बाण्याचे असत. युरोपिअन वा इंग्लिश लोकांत आणि वर्गांतहि ते शिवाजी महाराजांची मुक्तकंठानें स्तुति करत. त्या कॉलेजांतच पहिल्या एल्एल्. बी. चे वर्ग आठवड्यांतून कांहीं दिवस भरत असत व त्या वर्गाचें शिक्षण व्यंकटराव या नांवाच्या गृहस्थांच्याकडे असे. हे गृहस्थ फार मजेदार असत. ते वर्गांत आल्यावर हजिरीसाठीं भरलेला वर्ग थोड्याच वेळांत अगदीं रिकामा होई, तरी ते कोणासहि बोलत नसत. प्रथम प्रथम ते आपल्या वर्गांतील सर्व मुलें प्रिलिमिनरी परीक्षेंत पास झालीं आहेत असें सूचना फलकावर जाहीर सूचनेंत लिहीत. तेव्हां एकदां प्रि. सेल्बी यांनीं त्यांना विचारलें कीं, 'तुमच्या वर्गांतील सर्वच विद्यार्थी पास होतात, हें कसें काय?' तेव्हां त्यांनीं आपल्या जाहिरातीची पद्धति बदलली व वर्गांतील सर्व विद्यार्थ्यांचीं नांवें देऊन 'खालील विद्यार्थी परीक्षेंत पास झाले आहेत' असें ते लिहूं लागले !

त्याकाळीं डेक्कन कॉलेज व फर्ग्युसन कॉलेज यांच्यांत अभिमानाची स्पर्धा असे. रँग्लर परांजपे, प्रो. भानु, कै. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांच्या-सारखे विद्वान प्रोफेसर असलेल्या कॉलेजांतील विद्यार्थी आपण आहोंत असा फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांना अभिमान वाटे, तर उलट डेक्कन

कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आपल्या श्रीमंतीचा व मोठेपणाचा गर्व असे.

त्या काळच्या करमणुकीच्या साधनांत नाटकें हीं प्रमुखत्वानें असत. अगदीं आरंभी बुधवारांतील आनंदोद्भव नाटकगृहांत नाटकें होत. पुढें हें नाटकगृह जीर्ण झाल्यानें तें बंद झालें व विजयानंद नाटकगृहांतच तीं होऊं लागलीं. किर्लोस्कर नाटक मंडळी, नाट्यकला प्रवर्तक मंडळी, स्वदेश-हितचिंतक मंडळी, शाहुनगरवासी ह्या गद्य नाटकें करणाऱ्या मंडळ्या व त्यानंतर महाराष्ट्र नाट्यमंडळी, या मंडळ्या प्रमुखत्वानें आपले खेळ करीत. रेडिओ त्याकाळीं मुळींच नसल्यानें चांगल्या गायकांच्या मैफली होत; त्यांतूनच चांगलें गायन ऐकावयास मिळे.

पुण्यास त्याकाळीं सार्वजनिक सभा भरविण्याच्या जागेची तर फारच गैरसोय असे. दाणे आळीतील सार्वजनिक सभागृह, ही एकच जागा होती व ती फारच अपुरी असे. मोठाल्या सभा ‘ रे ’ मार्केटांत भरत. अशी एक सभा सन १९०६ सालीं भरली होती व तींत ना. गोखल्यांचें अभि-नंदन करण्यांत आलें होतें. या सभेंत प्रथमच डॉ. भांडारकर, गोखले वगैरे नेमस्त पुढारी, तसेंच लो. टिळक, तात्यासाहेब केळकर वगैरे राष्ट्रीय पुढारी हे एकाच व्यासपीठावर बसलेले लोकांना दिसले. त्या सभेस स्वयंसेवक म्हणून मी हजर होतों. प्रथमच हे उभय पक्षाचे पुढारी एकत्र आल्याबद्दल मीं म्हटलें, याचें कारण हेंच की त्याकाळीं नेमस्त पुढारी हे फक्त सुशिक्षित व त्यांच्या चहात्या लोकांच्या व त्याहि नियमित श्रोतृवर्गाच्या सभेपुढें बोलत. उलट लो. टिळक हे बहुजन समाजापुढें बोलत असल्यानें त्यांना नेमस्त पक्ष कुचेष्टेनें तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणत असे. तरी एकंदरींत तो काळ शांततेचाच समजला जाईल. सन १९०५ च्या अखेरीस बंगालची फाळणी होऊन स्वदेशी चळवळीस सुरुवात झाली, तेव्हांपासूनच खऱ्या राजकीय आंदोलनाची सुरुवात झाली. असो. अशा या पुण्यांत माझ्या विकारक्षम अवस्थेंत मी प्रवेश केला.

• •

## .९.

त्यावेळीं न्यू इंग्लिश स्कूलची प्रसिद्धि अधिक होती. शिवाय लो. टिळक, आगरकर, आपटे वगैरेंच्या पूर्वसहवासानें व संबंधानेंहि त्या शाळेच्या नांवाभोवतीं एक प्रकारचें तेजोवलय निर्माण झालेलें होतें, यामुळें माझ्याहि मनाचा ओढा न्यू इंग्लिश स्कूलकडेच अधिक झाला व मीं या शाळेंत इंग्रजी चौथ्या इयत्तेंत नांव घातलें. त्यावेळीं या शाळेचे सर्व वर्ग गद्रे वाडा व होळकर वाडा या दोन वाड्यांत मिळून बसत, त्यांत इंग्रजी चार इयत्ता होळकरवाड्यांत असत व पुढील तीन इयत्ता गद्रे वाड्यांत बसत. त्यावेळीं या शाळेच्या सुपरिंटेंडेंटच्या जागीं रा. चिंतामण गंगाधर भानु या बुद्धिवान, तडफदार व हुषार गृहस्थांची नेमणूक झालेली होती. शाळेंत दाखल होण्यासाठीं गद्रे वाड्याच्या चौकाला लागून असलेल्या पुढील आडव्या दिवाणखान्यांत सुपरिंटेंडेंट साहेबांचें ऑफिस असे. तेथें मला रुजू करण्यांत आलें. माझें लहान वय व ठेंगणी चण पाहून रा. भानु यांना कदाचित् माझ्या अभ्यासांतील प्रगतीबद्दल शंका आली असावी; कारण इतर विद्यार्थ्यांना त्यांचें लीव्हिंग सर्टिफिकेट पाहूनच त्यांनीं दाखल करण्याचा हुकूम केला, व मला शेवटीं ठेवून त्यांनीं दहाबारा मिनिटांपर्यंत अभ्यासासंबंधाचे व इतर सर्वसाधारण प्रश्न इंग्रजींत विचारले. त्यांचीं उत्तरें समाधानकारक मिळाल्यानें त्यांना आनंद झाल्याचें दिसलें. मग त्यांनीं मला दाखल करण्याचा हुकूम केला व त्याबरोबरच मला शाळेच्या क्रीडास्थानावर–कबुतरखान्यावर–दररोज नेमानें जाऊन व्यायाम घेऊन शरीर सुदृढ करण्याचा उपदेश केला. व मग मला होळकरवाड्यांतील चवथ्या इयत्तेच्या अ तुकडींत बसण्यास सांगितलें.

त्याकाळीं शाळेच्या शिक्षकवर्गांत प्रो. भानूंशिवाय प्रो. गंगाधर वामन ऊर्फ भाऊसाहेब लेले, रा. नारायण सखाराम उर्फ नानासाहेब पानसे, रा. मोतीसा बुलासा, रा. वासुदेव बळवंत पटवर्धन, रा. सीताराम गणेश देवधर व रा. गोविंद चिमणाजी भाटे हे प्रमुख असत. कायमच्या शिक्षकांत रा. नंदरगीकर व ओकशास्त्री हे संस्कृतचे नाणावलेले शिक्षक

असत व रा. नागेश जिवाजी बापट हे गणिताचे शिक्षक असत. खालच्या इयत्तांवर रा. पटवर्धन, रा. देव हे असत. मी पुढें सहाव्या इयत्तेंत गेल्यावर रा. हरिभाऊ लिमये हे शाळेंत शिक्षक म्हणून आले व त्यांनीं अल्पकाळांतच प्रसिद्धि मिळविली. याशिवाय आम्हांला रा. धोंडो केशव ऊर्फ अण्णासाहेब कर्वे यांनीं मॅट्रिक्युलेशन वर्गात गणित व प्रि. महादेव शिवराम गोळे यांनीं सायन्स शिकविलें होतें. त्याचप्रमाणें पुढें बडोदा कॉलेजांत जीवशास्त्राचे प्रोफेसर असलेले प्रो. शेवडे यांनीं आम्हांस रसायनशास्त्र शिकविलें व रा. केशवराव कानिटकर यांनीं Statics हा विषय शिकविला.

त्यांपैकी रा. भानु हे सर्वांत अधिक उल्लेखनीय होते. त्यांची ती उंच व सडपातळ मूर्ति, गोरा वर्ण, निळे डोळे, सरळ नाक, उंच कपाळ व तरतरीत मुद्रा हीं सर्व त्यांचा कोंकणस्थी जन्म व स्वाभाविक हुषारी दर्शवीत. ते स्वभावतः फार चौकस असत व अनेक प्रश्न विचारून कोणाहि व्यक्तीकडून सर्व प्रकारची माहिती मिळवून घेण्याच्या कामीं तरबेज असत. त्यांच्या डोळ्यांत फार तेज असे व त्यांनीं आपली नजर एकदां कोणाकडे रोखली कीं, त्याच्या अंतःकरणांतील गूढ ते समजूं शकत. त्यांची सुपरिंटेंडेंटची कारकीर्द शाळेला फार यशोदायक झाली. पण पुढें वर्षादोन वर्षांत पुण्यांत माजलेल्या धुमाकुळामुळें त्यांच्यावर जें किटाळ आलें, त्यामुळें त्यांच्या कीर्तीला ग्रहण लागल्यासारखें झालें. शाळेच्या बाबतींत ते शिस्तीचे भोक्ते होते, तरी सर्वांशीं ते मनमोकळेपणानें बोलत.

रा. भाऊसाहेब लेले हे रा. भानु यांच्या अगदीं उलट स्वभावाचे असत. ते स्वभावानें अत्यंत शांत, थंड, धिमे, मितभाषी, दयाळू व शिस्तींत ढिले असत. रा. भानूंच्या नंतर तेच सुपरिंटेंडेंट झाले, त्यावेळीं कोणी कांहीं केलें तरी ते त्याकडे लक्ष द्यावयाचे नाहींत किंवा रागवावयाचे नाहींत. यामुळें त्यावेळीं सुपरिंटेंडेंटचें खरें काम रा. नानासाहेब पानसे करीत. नानासाहेबांचा स्वभाव फार गमती व विनोदी असे, व त्यामुळें ते नेहमीं सर्वांस कोट्या करून हंसवीत. तथापि हा स्वभाव विद्यार्थ्यांसमोर प्रथमदर्शनीं लपवून ते उसना गंभीरपणा व भारदस्तपणा आणीत. या भारदस्तपणामुळें त्यांचें चालणें, कपडे वगैरे सर्व ऐटदार असे. पण

विद्यार्थ्यांच्यांत ते थोडेसे थट्टेच्या विषयासारखे झाले होते. पण शिकविण्याच्या बाबतींत ते फार यशस्वी असत. बुद्धि फारशी चलाख नसतांहि त्यांनीं तिची उणीव परिश्रमानें पुष्कळच भरून काढली. समानार्थक शब्द व वाक्यें देण्याची त्यांना फार हौस असे; व एकंदरींत त्यांचा तास हा अतिशय मनोरंजक व आनंदाचा जाई.

रा. मोतीसा बुलासा हे मारवाडी जातीचे होते. त्यांची विद्वत्ता काय असेल ती असो, पण शिक्षक या नात्यानें ती विद्यार्थ्यांना फारशी दिसून आली नाहीं. तथापि ते स्वभावानें सज्जन होते. हे गृहस्थ पुढें विलायतेस जाण्याकरितां म्हणून निघाले; पण वाटेंतच वारले.

रा. वासुदेवराव पटवर्धन हे एक यशस्वी शिक्षकांपैकींच होते. त्यांची बोलण्याची शक्ति पहिल्यापहिल्यानें फार मर्यादित स्वरूपाची होती व शिवाय ते बोलतांना मध्यें थोडेसें अडखळत; पण ही सर्व उणीव ते हस्तविक्षेपानें भरून काढीत व शिक्षणीय विषयाचा बोध विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारें करवीत. त्यांच्याइतका उत्साही व विषयाशीं एकतान होऊन जाणारा शिक्षक क्वचितच मिळेल. त्यांचा स्वभाव संकोची असल्यानें ते सर्वांशी फारसें मिळून मिसळून नसत, व शाळेंतहि रिकाम्या वेळी ते आपल्या शिकविण्याच्या पुस्तकांत चूर असत. हे त्यावेळीं प्रसिद्ध सुधारक म्हणून गणले जात.

रा. सीताराम गणेश देवधर हेहि त्या काळच्या सुधारकांत अग्रणी होते. शिक्षक या नात्यानें ते फारसे परिणामकारक वाटत नसत. आपल्या सावकाश धिम्या पद्धतीनें ते विषय समजावून देण्याचा प्रयत्न करीत.

प्रि. गोविंदराव भाटे हे माझ्या त्या वेळच्या शिक्षकांतील एक गृहस्थ सुदैवानें अजून कार्यक्षम आहेत. यांची वागणी त्यावेळींहि थोडीशी तत्त्वज्ञाप्रमाणें असे. वर्गाकडे अथवा त्यांतील विद्यार्थ्यांकडे त्यांचें फारसें लक्ष नसे. शास्त्रीय पद्धतीनें ते विषयाचें प्रतिपादन करून मोकळे होत, पण विद्यार्थ्यांना तो विषय कितपत समजला, याची फारशी चौकशी ते करीत नसत. तात्पर्य, त्यांचें शाळेंतील शिकविणें कॉलेजमधील प्रोफेसराच्या शिकविण्याच्या धर्तीवर असे. स्वभावानें ते शांत, सज्जन व मनमिळाऊ असत.

कायमच्या शिक्षकांपैकीं रा. नंदर्गीकर हे सर्वांत उल्लेखनीय असत. त्यांची ती काळी ठेंगणी व जाडजूड मूर्ति तर ध्यानांत राहण्यासारखी होतीच, पण त्यांचे ते नेहमीं लाल असलेले व पुढें आलेले बटबटीत डोळे हें त्यांचें वैशिष्ट्य असे. ते वर्गांत फार रागावत, यामुळें त्यांच्याशीं सलगी करण्याची विद्यार्थ्यांची हिंमत नसे. त्यांचें शिक्षण परीक्षेच्या दृष्टीनें चांगलें असे; कारण ते परीक्षेच्या प्रश्नपत्रांत साधारणतः येण्याजोगे भाग विद्यार्थ्यांकडून चांगले घोटून घेत. ते छडीचाहि वर्गांत मोकळ्या हातानें उपयोग करीत. त्यांच्या विद्वत्तेसंबंधानें त्या काळींहि फार मतभेद असे. त्यांनीं रघुवंशाचें सटीक भाषांतर एका मोठ्या विद्वत्तायुक्त प्रस्तावनेसह प्रसिद्ध केलें होतें. पण त्यांनीं हें सर्व दुसऱ्याकडून लिहवून घेतलेलें आहे, असा त्यावेळीं प्रवाद असे. त्यांच्या शिकविण्यामुळें विद्यार्थ्यांत पुष्कळ वेळां विनोद उत्पन्न होई. पांचव्या गणाचे धातु चालवितांना "Take for instance any root चि" असें म्हणून "चिनोमि, चिनुवः चिन्वः, चिनुमः चिन्मः" अशीं त्याचीं रूपें ते भराभर म्हणून दाखवीत. पण त्या संबंधानें परंपरेनें आलेली अशी एक आख्यायिका होती कीं, त्यांच्या तीस वर्षांच्या जीवनक्रमांत दरवेळीं ते "Take for instance any root चि" असेंच म्हणत, व 'चि' धातूशिवाय दुसरा धातु चालवून कधींहि देत नसत. इतर धातूंसंबंधानें ते सांगत "And the rest follow suit." आपल्या शिकविण्याच्या उत्कृष्टपणाबद्दल ते वर्गांत नेहमीं अभिमानानें सांगत कीं, माझ्या हातून जितके जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलर झाले, तितके दुसऱ्या कोणत्याहि शिक्षकाच्या हातून गेले नाहींत. उदाहरणार्थ प्रो. वैजनाथ काशिनाथ राजवाडे व प्रो. भास्कर रामचंद्र आर्ते हे जेव्हां युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसले त्यावेळीं तोंडी परीक्षा असे. तींत या विद्यार्थीद्वयाला परीक्षकांनीं प्रश्न विचारतांच त्यांनीं त्यांचीं अशीं फाडफाड उत्तरें दिलीं कीं, परीक्षकांनीं त्यांना एकदम विचारलें, "Boys, you are flashing out replies, what school do you come from ? Who taught you Sanskrit ?" वर्गांत ते अगदीं रंगून जात.

याच्या उलट रा. कृष्णाजी पांडुरंग ओकशास्त्री यांचा स्वभाव असे. ते एकलकोंडे, किंचित् तुसडे व त्रासलेले असे दिसत व शिकविण्यांतहि

त्यांचें फारसें लक्ष नसे. ते विद्वान अधिक होते असें त्या काळींहि सर्वांचें मत असे; पण सर्वसाधारण विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाचा लाभ न होतां, विशेष हुषार विद्यार्थ्यांच्या शंका ते चांगल्या रीतीनें दूर करीत असें समजलें जाई. 'Oka's Companion to Sanskrit Grammar' म्हणून संस्कृत व्याकरणावरचें जें पुस्तक बरेंच वर्षेपर्यंत प्रसिद्ध होतें तें त्यांचेंच. पुढें कांहीं वर्षांनंतर अमरकोशावरील क्षीरस्वामीची टीका त्यांनीं छापून प्रसिद्ध केली होती.

रा. हरिभाऊ लिमये प्रथम १९०० सालीं शाळेंत आले. ते इतिहास विषय शिकवीत. ते प्रयत्नपूर्वक शिकवीत, पण पुढें पुढें त्यांच्या शिकविण्यासाठीं जी त्यांची प्रसिद्धि झाली, तिला त्यांच्या या पहिल्या वर्षी आरंभ झाला नव्हता.

रा. अण्णासाहेब कर्वे यांनीं आम्हांला गणित एकच वर्ष शिकविलें. माझा गणिताचा विषय फार कच्चा असून मला त्याची फारशी आवडहि नसल्यानें मी त्याच्याकडे फारसें लक्षहि दिलें नाहीं, त्यामुळें त्यांच्या शिकविण्यासंबंधानें मला फारसें मतहि देतां येणार नाहीं. मात्र त्यांची सज्जनता, शांत स्वभाव व धिम्मेपणा हा कोणाच्याहि प्रत्ययाला आल्यावाचून राहत नसे.

प्रिं. गोळे यांचा आम्हाला फारच थोडा काळ परिचय झाला. व त्यांत त्यांच्या शिक्षणाचा विशेषसा परिणाम झाला नाहीं. ते आम्हांस रसायनशास्त्र शिकवीत.

अशा प्रकारें त्या काळच्या आमच्या शिक्षक वर्गासंबंधाचें आमचें झालेलें मत येथें वर्णन केलें आहे. यांपैकीं फक्त महर्षि अण्णासाहेब कर्वे हे आज हयात आहेत.

## .१०.

शाळेच्या शिक्षणक्रमासंबंधानें सांगावयाचें म्हणजे विद्यार्थ्यांना नेमलेल्या अभ्यासांत तयार करून परीक्षेंत यशस्वी करण्याचा प्रयत्न करणें हेंच शाळेचें

ध्येय समजलें जाई. त्यांत राष्ट्रीयतेचा, स्वाभिमानाचा व स्वतंत्रबुद्धीचा परिपोष होण्यासारखा भाग नसे. स्वावलंबनावरहि फारशी भिस्त ठेविली जात नसे. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचें वळण कोणीकडे आहे हें अजमावण्याचाहि प्रयत्न केला जात नसे. शारीरिक शिक्षणाबद्दल शाळेमार्फत शिक्षण देण्यांत येत नसे, पण कबुतरखान्यासारखें सुंदर, मध्यवर्ति व विस्तृत क्रीडांगण शाळेला असल्यानें क्रीडाप्रिय विद्यार्थ्यांची सोय उत्कृष्ट असे. क्रिकेट व फुटबॉल हे खेळ फार लोकप्रिय असत. मी शाळेंत गेल्यानंतर दोन वर्षें ड्रिल मात्र फार जोरांत असे व तिचें शिक्षण पद्धतशीर रीतीनें दिलें जाई. त्यानंतरच्या धामधुमीमुळें सरकारी हुकुमानें ड्रिलचें शिक्षण बंद करण्यांत आलें.

शाळेंत दरवर्षी गॅदरिंग अथवा संमेलन होई. त्यांत Indoor games, फराळ, जेवण, एखाद्या प्रसिद्ध पुरुषाचें व्याख्यान, Out door games व रात्रीं नाटक याप्रमाणें कार्यक्रम असे. तो दिवस सर्वांना फार आनंदाचा वाटे. एका वर्षी मी इंग्रजी सहावींत असतांना कै. नामदार गोखले यांना संमेलनांतील मुख्य भाषण करण्यासाठीं सन्मान्य पाहुणे म्हणून बोलाविलें होतें; त्या वेळीं प्रथमच मी त्यांना पाहिलें; त्यामुळें तो प्रसंग मला चांगला स्मरतो. ना. गोखल्यांनीं विद्यार्थ्यांच्या इंग्रजीच्या ज्ञानाकडे पाहून प्रथम मराठींत आपल्या भाषणाला सुरुवात केली; पण एक दोन वाक्यें उच्चारल्या-बरोबर त्यांना पुढें भाषण चालविणें अडचणीचें वाटूं लागलें व ही आपली अडचण त्यांनीं सर्वांसमक्ष मोकळेपणानें सांगून पुढील सर्व भाषण इंग्रजींत केलें. त्यावेळी त्यांच्या सुंदर, भव्य, तेजःपुंज मूर्तीचा परिणाम माझ्या मनावर जो झाला तो कायमचा झाला. त्यावेळींहि त्यांची कीर्ति सर्वत्र पसरली असल्यानें त्यांना पाहणें म्हणजे आम्हां विद्यार्थ्यांना एका पर्वणी-सारखें वाटे. व पुढें सन १९०४ सालीं मी कॉलेजांत असतांना त्यांच्याशीं संबंध येण्याची प्रत्यक्ष संधि मला लाभली, त्यावेळीं मला धन्यता वाटली, यांत आश्चर्य नाहीं.

माझ्या शाळेच्या आयुःक्रमांत एकदां कै. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी आमच्या शाळेला भेट दिली होती. त्यांचाहि लौकिक त्यावेळीं सुद्धां नुसते राजे म्हणून नव्हे, तर एक उज्ज्वल देशभक्त राजे म्हणून पसरलेला

असल्यानें त्यांच्या येण्याचें आम्हांस फार सादर कौतुक वाटलें. त्यावेळीं माझ्या स्वप्नांतहि ही कल्पना येणें शक्य नव्हतें कीं, या महाराजांचा व माझा पुढें अत्यंत निकट व विश्वासपूर्ण परिचय होणार आहे ! पण पुढें तो होण्याचा जेव्हां प्रत्यक्ष योग आला, त्यावेळीं मी शाळेंत असतांना त्यांच्या झालेल्या दर्शनाचें चित्र माझ्या मनःचक्षूंपुढें उभें राहिल्यावांचून मात्र राहिलें नाहीं.

माझ्या विद्यार्थी–जीवनाच्या अवधींत मला कांहीं प्रसिद्ध वक्त्यांचीं भाषणें ऐकण्याचा योग आला. त्यांतील एक डॉक्टर नायर या नांवाचे मद्रासी गृहस्थ होते. त्यांचीं तीन भाषणें शाळेमार्फत कबुतरखान्यांत करविण्यांत आलीं. त्यावेळीं खानबहाद्दुर खंडाळावाला, डिस्ट्रिक्ट जज्ज, हे अध्यक्ष होते. रा. नायर यांचीं भाषणें मैदानी थाटाचीं असत. मोठमोठे शब्द घातलेलीं वाक्यें, आपल्या विचित्र मद्रासी उच्चारांत, हातवाऱ्यांच्या संगतीनें जेव्हां ते बोलत व त्यांत " I shall die for my country " असे उत्तान देशाभिमानाचे प्रवाह सोडीत, त्यावेळीं सर्व श्रोत्यांवर त्यांचा फार मोठा परिणाम होई ! पण व्याख्यान संपल्यावर आमच्या शिक्षकांनीं मात्र त्यांच्याबद्दल प्रतिकूल मत दिलें. नुसता आरडाओरड करणारा व देशभक्तीच्या गप्पा मारणारा तो एक Demagogue आहे असें ते नायरांविषयीं म्हणाले. आम्हांला त्यावेळीं तें म्हणणें पटलें नव्हतें. पण कांहीं वर्षांनीं त्या व्याख्यानांचें स्मरण झाल्यावर जेव्हां मी पुन्हां त्याचा विचार केला, तेव्हां मला तो अभिप्राय खरा वाटला. तथापि नायर यांच्या भाषणानें वक्तृत्वाबद्दलची माझी नैसर्गिक आकांक्षा अधिक प्रज्वलित झाली एवढें मात्र खरें.

त्यानंतर वक्तृत्वाचा प्रसंग म्हणजे मिसेस ॲनी बेझंट यांच्या भाषणाचा होय. त्यांचीं त्या वेळीं सहा सात भाषणें लागोपाठ झालीं. तीं मीं सर्व ऐकलीं. मिसेस बेझंट यांचें वक्तृत्व जगप्रसिद्धच होतें, तेव्हां त्या संबंधानें अधिक लिहिण्याचें कारणच नाहीं. त्यांतील एक प्रसंग मला चांगला आठवतो. धर्माचारांतील कित्येक विधि कसे निरर्थक असतात, इतकेंच नव्हे तर अनावश्यक असतात, याचें वर्णन करितांना त्यांनीं एक गमतीदार उदाहरण दिलें. त्यांनीं सांगितलें कीं, प्राचीन काळीं एका यजमानानें एक

यज्ञ केला. त्या यजमान ब्राह्मणाच्या घरीं एक मांजर होतें. तें यज्ञाजवळ गडबड करूं लागलें म्हणून त्यानें त्याला तेथेंच यज्ञयूपाला बांधून ठेविलें. हा त्या मांजराचा यज्ञाशीं असलेला संबंध (?) ध्यानांत न आल्यामुळें कालांतरानें तशा यज्ञाच्या वेळीं एखादें मांजर आणून यज्ञयूपाला बांधून ठेवणें हा आवश्यक विधि मानला जाऊं लागला ! व ती प्रथा तेव्हांपासून चालू झाली. मिसेस बेझंटच्या भाषणांच्या वेळीं मी मॅट्रिक्युलेशनच्या वर्गात असल्यानें मला तीं बरींच चांगलीं समजलीं असें म्हणतां येईल.

या सुमारासच पुण्यास 'Friends' Liberal Association' नांवाची संस्था स्थापन झालेली होती व तिच्यामार्फत पुण्यांत बुधवारांतील आनंदोद्भव नाटकगृहांत व्याख्यानमाला करविण्यांत आली होती. तिचे चिटणीस आमच्या शाळेचे शिक्षक रा. मोतीबुलासा हे असत. या मालेंत प्रसिद्ध विद्वान वक्त्यांचीं भाषणें होत. अशा भाषणांत कै. नामदार न्यायमूर्ति रानडे यांचें एक व्याख्यान मी ऐकिलें. त्यावेळीं मी रानड्यांना जें प्रथम पाहिलें तेंच शेवटचें. रानडे हे त्या काळीं मुंबईस राहत असल्यानें पुण्यास त्यांचीं सार्वजनिक भाषणें फार क्वचित् होत. ते सन १९०१ सालीं वारलेच. यामुळें या भाषण. प्रसंगानंतर त्यांना पुन्हां पाहण्याचा योग मला आला नाहीं.

असे प्रसंग माझ्या या शाळेंतील आयुष्यक्रमांत चार वर्षांत आले, पण ते जरी ओघानें येथेंच सांगितले, तरी अनुक्रमानें मला हें वृत्त सांगावयाचें असल्यानें मला सन १८९८ च्या सुरुवातीस परत गेलें पाहिजे.

## .११.

मागें सांगितल्याप्रमाणें मी व माझी चुलती अशा दोघांचें मिळून बिऱ्हाड गद्रेवाड्याजवळील बापटांच्या वाड्यांत आम्हीं केलें. त्या वाड्याचे मालक रा. विष्णुपंत म्हणून होते. हे आपल्या चार भावांतील सर्वांत वडील होते. त्यांचे दोन बंधु बाहेरगांवीं आपआपल्या उद्योगांत असून एक धाकटे बंधु तेथेंच डॉक्टरीचा धंदा करीत. त्यांचा धंदा कांहीं विशेष

चालत नसे; पण त्यांचा दवाखाना घरांतच असल्यानें ते दिवसभर घरीं असत व ते मोठ्या गंमती स्वभावाचे असल्यानें मला वेळीं अवेळीं करमणुकीचें साधन असत. तथापि माझ्या पुण्यांतील राहण्याच्या सुरुवातीस जर मजवर कोणाचा विशेष परिणाम झाला असेल, तर तो विष्णुपंत बापटांचा होय. त्यांना तात्या म्हणत. त्यांचा स्वभाव गंभीर पण शांत असे. त्यांना स्वतःला मूलबाळ मुळींच नसल्यानें त्याबद्दलची त्यांना खंत वाटे व म्हणून सर्वसाधारणतः त्यांना मुलांबद्दल मोठें प्रेम वाटे. पण त्यांचा स्वभाव गंभीर व विचारी असल्यानें अगदीं लहान मुलांना ते जवळ न घेतां समजुतीच्या वयाच्या मुलांचा सहवास त्यांना आवडे. ते मिलिटरी अकौंटस् ऑफिसांत नोकर असत, त्यामुळें ते घरून जेवून दहा वाजतां जे निघत, ते संध्याकाळीं ७ वाजतां परत येत. त्यांची शरीरयष्टि उंच व पुष्ट असे व त्यांचा चेहरा भव्य व उदार दिसे. कपड्यालत्त्यांतहि ते फार टापटिपीचे असून त्यांचे कपडे नेहमीं स्वच्छ व इस्तरीचे असत. त्यांच्याकडे इतर फारसे लोक येत नसत. जे क्वचित येत ते त्यांच्या फार थोड्या निकटच्या मित्रांपैकींचे असत व त्यांच्याकडे हेहि फक्त रविवारीं एखादवेळीं जात. सायंकाळीं घरीं आल्यावर हातपाय धुवून, संध्या वगैरे करून फराळ केल्यावर ते ओटीवर येत व मग कलाक दीड कलाकपर्यंत ते गप्पागोष्टी करीत. मी त्यांच्या घरांत बिऱ्हाड केल्यापासून त्यांची व माझी ओळख झाली, त्यानंतर मी त्यांच्या घरीं असेपर्यंत बहुशः रोज त्यांच्याजवळ गप्पा मारण्यास जात असे. नीटनेटकेपणा, व्यवस्था, टापटीप, प्रामाणिकपणा या त्यांच्या अंगच्या गुणांचा प्रभाव या त्यांच्या भेटीच्या वेळीं माझ्या मनावर झाल्यावांचून राहिला नाहीं. पण त्यांचा सर्वांतला मुख्य विशेष म्हणजे त्यांची देशभक्ति व टिळकप्रेम हें होय. ते नेहमीं देशी कपडेच वापरीत. या माझ्या तीन वर्षांच्या अवधींत त्यांनीं मला जवळजवळ प्रतिदिवशीं जे देशभक्तीचे घोट पाजले, ते थेट माझ्या हृदयांत उतरले. टिळक हे तर त्यांची देवताच होती म्हटलें तरी चालेल. टिळकांचें सर्व पूर्वचरित्र, त्यांचे स्वभावविशेष, त्यांचीं मतें, त्यांची धडाडी, त्यांचा स्वार्थत्याग या सर्वांची प्रथम ओळख मला या तात्यांनीं करून दिली. खेड येथील माझ्या घरच्या वातावरणांत या गोष्टींना स्थान नसे.

व यामुळें त्यांचा प्रथमपरिचय मला जो झाला तो तात्यांच्याच मुळें. दर आठवड्याचा केसरी मी त्यांना नेमानें वाचून दाखवी. त्यामुळें मला फार लौकर प्रचलित राजकारणाची माहिती होऊं लागली व अधिक करून घेण्याची जिज्ञासा झाली. हा माझा व तात्यांचा संबंध तीन वर्षें टिकला. त्यानंतर आमचें बिऱ्हाड तेथून बदललें, तें शनिवारांतील पावसकरांच्या हौदासमोरील कर्वे यांच्या वाड्यांत गेलें. तेथें गेल्यावर थोडे दिवस मी तात्यांच्याकडे जात असें; पण पुढें लौकरच ते प्लेगला बळी पडले व अशा रीतीनें या माझ्या अप्रत्यक्ष गुरूच्या जीवनाची समाप्ति झाली. जुन्या जमान्यांतील एक अत्यंत नमुनेदार व्यक्ति म्हणून त्यांचें स्मरण मला नेहमीं होत असतें.

मी पुण्यास सन १८९८ च्या सुरुवातीस राहिल्यावर त्याच वर्षी कांहीं महिन्यांनीं पुण्यांत प्रथम प्लेगची सुरुवात झाली. त्यापूर्वीं सन १८९६ च्या हिवाळ्यांत प्रथम मुंबईस त्याचा प्रादुर्भाव झाला होता. पुण्यास सुरुवात पावसाळ्याच्या अखेर झाली. त्यामुळें पहिल्या दहशतीनें शाळा बंद झाल्या. हा संसर्गजन्य रोग आहे व याला उपाय म्हणजे स्थलांतर करणें हाच होय अशी त्याची माहिती झाल्यानें, शाळा बंद झाल्याबरोबर आम्हीं खेडास गेलों. त्यासालची वार्षिक परीक्षा घेण्यांत आली त्या वेळीं, मी वडगांवास आमच्या एका आप्तांच्या येथें उतरून आगगाडीनें रोज पुण्यास येऊन परीक्षा संपल्यावर सायंकाळीं वडगांवास परत जात असें.

सन १८९९ सालीं प्लेग संपल्यावर शाळा उघडली व मी परत आलों. यापुढें दरवर्षी प्लेग येत असल्यानें, तो असेल त्यावेळीं खेडास व एरव्हीं पुण्यास असा क्रम चालू असे. पांचवी व सहावी माझी अनुक्रमें पुरी झाल्यावर आम्ही कर्वे यांचे वाड्यांत गेलों, ते दोन–तीन वर्षें होतों. या काळांत प्लेगच्या धामधुमीमुळें आमच्या अभ्यासाची अगदींच आबाळ झाली होती. प्लेगचा रोग नवा, त्यानें लागलेल्यांतील लोकांत असलेलें मृत्यूचें भयंकर प्रमाण, प्लेगमुळें क्वारंटाईन सेग्रीगेशन, घरें धुणें इत्यादींचा असह्य उपसर्ग वगैरे अनेक गोष्टींमुळें लोकांचा जीव अगदीं रोजच्या कार्यांवरून उडून गेला होता. त्यामुळें होतील त्या अभ्यासांतच परीक्षा घेत व एकंदरींत या काळांतील सर्व विद्यार्थ्यांचें शिक्षण कच्चेंच राहिलें होतें.

पुढें पुढें ही प्लेगची सांथ खेडेगांवांतूनहि पसरली व सन १८९९ सालीं आमच्या खेड गांवांतहि ती आली. त्यावेळीं आम्हीं गांवाबाहेरील दीक्षितांच्या शेतांत खूप मोठी झोंपडी बांधून राहिलों होतों. त्या झोंपडीच्या आजूबाजूला इतर अनेक झोंपड्या असल्यामुळें ती एक वसाहतच झाली होती. आमच्या झोंपडीपासून थोड्याच अंतरावर भीमा नदीचा प्रवाह असल्यानें व तेथील सृष्टिसौंदर्य व शांतता फार मनोवेधक असल्यानें मी रोज तेथें जाऊन बसत असें. अजूनहि मला त्या स्थलांचें स्पष्ट स्मरण होऊन एक प्रकारची हुरहूर वाटते.

या प्लेगच्या सांथीच्या पुण्यांतील कहराचें वर्णन अनेक ठिकाणीं केलेलें असल्यानें या माझ्या आत्मवृत्तांत तें खास देण्याची जरूरी नाहीं. तथापि त्या वेळचा या संबंधाचा एक पोवाडा मला अजून आठवत आहे. तो कदाचित् आज उपलब्ध नसेल, म्हणून त्यांतील मला मुखोद्गत असलेला कांहीं भाग त्या वेळचें यथाभूत वर्णन म्हणून मी येथें देत आहें.

कृतपापाचा प्लेग भोग हा । रोग पुण्यामध्यें जें आला ।
अनर्थ झाला कहर उडाला । कोणी न कोणाचा उरला ॥
माता ममता सांडी सोडी । पुत्र जाई परदेशा ।
बहिण बंधुला बंधु भगिनिला । सोडून जाई वनवासा ॥
प्रेत कळा आली नगरीला । शुक्क जाहलें चहूंकडे ।
भर बुधवारामध्यें जावया । दिवसा ढवळ्या भीति पडे ॥
रंग तांबडा लाल कांकडा । हातीं आकडा विलायती ।
तपासणीची जना फांसणी । वरात जाई घराप्रती ॥ इत्यादि.

हें वर्णन अगदीं यथातथ्य असून यांत अतिशयोक्ति बिलकूल नाहीं.

पुण्यांत आल्यावर माझ्यापुढें एक नवीन सृष्टि दिसूं लागली. माझ्या पूर्वीच्या खेड येथील लहानग्या सृष्टीच्या मानानें मला ती केवढी मोठी वाटे ! व्यापकपणाची कल्पना मला प्रथम तेथेंच आली. १८९८ पासून १९०२ पर्यंतच्या त्या काळच्या घडलेल्या प्रसंगांचें क्रमवार वर्णन देण्याचें येथें कारण नाहीं. म्हणून विषयाचे विभाग करून त्यांतील ठळक गोष्टींचा उल्लेख येथें करतों.

# .१२.

प्रथमतः या कालांतील माझ्या शालेय जीवनाची हकीकत दिली पाहिजे; कारण मला त्यासाठींच मुख्यतः पुण्यास ठेविलें होतें. मला न्यू इंग्लिश स्कूलमध्यें इंग्रजी चौथ्या इयत्तेंत दाखल केलें त्यावेळीं या शाळेचा लौकिक फार असे. हिला प्रतिस्पर्धी म्हणून नूतन मराठी विद्यालय त्याकाळींहि भरभराटींत होतें, तरी पण आमच्या शाळेचा नंबर पहिलाच असे. त्या काळीं सरकारी पूना हायस्कूलहि असे, पण त्यांतील विद्यार्थ्यांची संख्याहि कमी असून तेथील वातावरण पूर्ण सरकारी असे व त्यांत सरकारी नोकर, इनामदार, जहागिरदार, श्रीमंत लोक व सरकारचे मिंधे लोक यांचाच भरणा अधिक असे. त्यामुळें खासगी शाळांच्या बरोबरीनें त्यांचा उल्लेख केव्हांहि होत नसे. न्यू इंग्लिश स्कूलमध्येंच माझा मॅट्रिकपर्यंतचा सर्व शिक्षणक्रम पुरा झाला व सन १९०२ च्या अखेरीस मी ती परीक्षा पास झालों. त्या अवधींतच १८९८ सालच्या शिवाजी उत्सवांतील भाषणें, केसरींत अफझुलखानाच्या वधावर प्रसिद्ध झालेली कविता, त्यामुळें लो. टिळकांवर १८९८ सालीं झालेला खटला, त्यांत त्यांना झालेली शिक्षा व ती भोगून त्यांचें परत येणें हे सर्व प्रसंग घडले. या प्रसंगांचाच फांगोडा म्हणून आमच्या शाळेचे सुपरिंटेंडेंट रा. भानु यांना बरींच वर्षें शाळा सोडावी लागली.

त्या अवधींत त्यांनीं 'भगवद्गीता' नामक मासिक काढलें व त्यांतून गीतेचें मूळ व त्यावरील निरनिराळ्या टीकांचें प्रसिद्धीकरण केलें. त्यांच्या-नंतर रा. भाऊसाहेब लेले हे सुपरिंटेंडेंट झाले व ते वर्ष दोन वर्षेंच राहिल्यावर त्यांच्याच्यानें हें काम झेपेना म्हणून रा. नारायण सखाराम ऊर्फ नानासाहेब पानसे यांची त्या जागेवर नेमणूक झाली. मी मॅट्रिक पास होईपर्यंत तेच सुपरिंटेंडेंटच्या जागेवर होते. या माझ्या सर्व शालेय अवधींत रा. पानसे, नंदर्गीकर व भानु यांचेंच शिक्षण उल्लेखनीय होतें.

या अवधींत पुण्यास गणपति उत्सव फार धामधुमीनें होई. सदर गणपति उत्सवांत मुख्य भाग म्हणजे मेळ्यांचा असे व त्यांत 'सन्मित्र–

समाज ' हा मेळा सर्वांच्या आघाडीस असे. त्याचें चालकत्व कै. शंकर पांडुरंग महाजन या नांवाच्या गृहस्थांच्याकडे असे. या मेळ्याचीं सर्व पद्यें प्रचलित राजकारणावर असून तीं फार चुरचुरीत असत. त्यांत त्या वेळच्या नेमस्त पक्षाची खूप टीका व चेष्टा केलेली असे. लो. टिळकांच्या राजकारणाचा प्रचार करण्यास या मेळ्यांनीं पुष्कळच हातभार लावला होता.

सदरहू अवधींतील दोन प्रसंग माझ्या विशेष स्मरणांत राहिले आहेत. त्यांतील पहिला म्हणजे लो. टिळकांचें मला झालेलें पहिलें दर्शन हा होय. सन १८९८ सालीं राजद्रोहाच्या खटल्यांत झालेली शिक्षा भोगून ते त्याच दिवशीं पहांटे परत आले होते. तेव्हां ते विंचुरकरांच्या वाड्यांत राहात असत. ते परत आल्याची बातमी फैलावतांच हजारों लोक त्यांच्या दर्शना-साठीं गेले. त्यांतच मीहि गेलों होतों. तुरुंगांत त्यांना कराव्या लागलेल्या अनंत कष्टांमुळें त्यांचें शरीर अगदीं वाळून गेलेलें होतें व त्यांच्या शरिराचा मूळचा सांवळा वर्ण काळा दिसूं लागला होता. त्यांचें अभिनंदन करण्या-साठीं आलेल्या लोकांपैकीं कांहींच्याशीं ते थोडेसे शब्द बोलत व इतरांना नुसता नमस्कार करीत. त्यांच्यासंबंधानें वर लिहिल्याप्रमाणें रा. विष्णुपंत बापट यांनीं माझ्या मनांत उत्पन्न केलेला आदरभाव त्यांच्या दर्शनानें अधिकच दुणावला.

दुसरा उल्लेखनीय प्रसंग म्हणजे शनिवार पेठेंतील आनंदाश्रमांत झालेलें चाफेकर या हरिदास बुवांचें कीर्तन ऐकण्यास मी गेलों होतों, तो होय. बुवांचें कीर्तन सुंदर झालें. त्यावेळीं पुढें प्रसिद्धीस आलेले बुवांचे तीनहि चिरंजीव–चाफेकर बंधु–हे आपल्या वडिलांची साथ करीत असत. त्यांना मी पाहिलें. या चाफेकर बंधूंनीं पुढें केलेल्या पराक्रमामुळें त्यांचें नांव अजरामर झालें आहे. म्हणून त्यावेळीं त्यांना पहाण्याचा सुयोग मला आला, ही माझ्या आयुष्यांतील गोष्ट मला अभिमानास्पद अशी वाटते.

याप्रमाणें परिस्थिति असल्यामुळें शिक्षणाच्या शाळाहि ओस पडत असत. प्लेगचे कँप शहराबाहेर उघडले गेले जाऊन रोग्यांना तेथें नेऊन ठेवण्यांत येई. त्यावेळीं प्लेगनिवारक लसीचा शोध लागला नसल्यामुळें शेंकडा ८० रोगी मरतच असत. त्यामुळें जिवंतपणीं प्लेगाच्या कँपांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम २५७०८ दि: ...

रोग्याला नेतांनाच तो मेल्याचें दुःख त्याचे नातेवाईक अनुभवीत असत. अशाप्रकारें त्यावेळीं शहरांत हलकल्लोळ माजला होता.

सरकारच्या सक्त उपायांनीं लोक गांजून गेले होते. याचा परिणाम म्हणून त्यावेळीं चाफेकर बंधूंच्या मनांत असलेली देशप्रेमाची व परसत्तेच्या उच्चाटनाची ज्वाळा उफाळून आली व त्यांनीं व्हिक्टोरिया राणीच्या ज्युबिलीच्या प्रसंगीं, गणेशखिंडींतील गव्हर्नराच्या बंगल्यावरून सरकारी पाहुणे मध्यरात्रीं परत येत असतांना, त्यांतील प्लेगच्या व्यवस्थेचा मुख्य अधिकारी मि. रँड व बरोबरच्या दुसऱ्या गाडींत बसलेला ले. आयर्स्ट या दोन युरोपियनांवर गोळ्या झाडल्या होत्या. आयर्स्ट ताबडतोब ठार झाला व मि. रँड आठपंधरा दिवस अत्यंत हाल होऊन पुढें मेला. त्यामुळें पोलिसांनीं धरपकडीचें मोठेंच सत्र सुरू केलें होतें. कांहीं दिवसांनीं चाफेकरांच्या कटांतील दोघा द्रविड नांवाच्या बंधूंनीं द्रव्याच्या आशेनें कटाची खबर पोलिसांत दिली. त्यावरून चाफेकरांतील धाकटा बंधु वासुदेव यानें, आपल्या एका मित्राच्या सहाय्यानें रात्रीं नऊ वाजतां द्रविड बंधूंच्या घरीं जाऊन, त्यांना पोलिस अधिकारी मि. ब्रुईन बोलावीत आहेत असें सांगून बाहेर नेलें व थोड्या अंतरावर येतांच, त्यांना गोळ्या घालून ठार केलें. त्यावेळीं पुण्यास रात्रीं नऊ वाजतां तोफ होत असे. त्यामुळें चाफेकरांच्या पिस्तुलांचा आवाज ऐकून नवाची तोफच झाली असें तो आवाज ऐकणाऱ्या कित्येक जणांना वाटलें. ही चाफेकर बंधूंची हकीकत इतर अनेक ठिकाणीं आलेली आहे यामुळें व तिची प्रत्यक्ष माहिती मला नसल्यामुळें मी तिचा अधिक उल्लेख येथें करीत नाहीं. अर्थात् या घडलेल्या हकीकतीचा परिणाम मजवरहि झाला, एवढें मात्र सांगण्यापुरता उल्लेख मी येथें करीत आहें.

या माझ्या मॅट्रिक्युलेशनच्या वर्षींच माझा एक प्रवास कर्नाटकांत झाला, त्याचा ओझरता उल्लेख येथें केला पाहिजे. हुबळीच्या पलीकडे हावेरी नांवाचें स्टेशन आहे. तेथून २०।२१ मैलांवर हावनूर नांवाचें लहान गांव आहे. तेथें माझी मोठी सावत्र बहीण दिलेली होती. तिच्या मुलाची मुंज असल्यानें त्यासाठीं माझ्या वडिलांसह मी तेथें गेलों होतों. तो माझा भाचा श्रीनिवास जोग हल्लीं धारवाडास राहत असून तो कांहीं

काळापूर्वी कॉंग्रेसचा एक प्रमुख कार्यकर्ता होता. त्याचें जोग घराणें त्या भागांत प्रसिद्ध असून त्यांना फार मोठें इनाम होतें. त्यांना पांच बंदुकींचा परवाना असल्यानें आम्हीं त्या गांवीं जातांच बंदुकांचे आवाज करून आमचें स्वागत करण्यांत आलें. जोग कुटुंब मोठें असून त्यांतील अनेक माणसें त्या घरांत असत. मुंजीच्या निमित्तानें पाहुणेहि पुष्कळ आले होते. मुंज फार थाटानें झाली. त्या गांवीं माझा मुक्काम तीन आठवडे होता. मुंजीचा समारंभ उरकल्यावर भोंवतालचीं कांहीं प्रसिद्ध स्थळें पाहण्यासहि मी गेलों होतों. त्यांत हरिहर हें म्हैसूर राज्याच्या सरहद्दीवरील तुंगभद्रा नदीच्या काठचें स्थान आहे. तेथें हेमाडपंती शिल्प पद्धतीचें मंदिर प्रसिद्ध असून तेथील एकंदर देखावा फार रम्य आहे. त्याशिवाय अनंतशयन, गळगनाथ व देवरगुड्ड हें डोंगरावरील देवस्थान हींहि मी पाहिलीं व एकंदरींत ही माझी सफर मजेची झाली.

याच सुमारास आणखी एक घटना घडली. तिचा परिणाम माझ्या जीवनावर दूरगामी व महत्त्वाचा झाला. मी मॅट्रिकच्या वर्गांत असतांना लो. टिळकांचा मोठा मुलगा विश्वनाथ माझ्या वर्गांत होता त्याची व माझी विशेष मैत्री जडली. तो बुद्धीनें अगदींच सरासरी असून गणितांत फार कच्चा होता. त्यानें एक दिवशीं मला सांगितलें कीं, "दादा ( लो. टिळक ) मला गणित शिकविणार आहेत पण मला त्यांच्याजवळ एकट्यानें शिकण्याची भीति वाटते म्हणून तूं मजबरोबर येशील कां?" मला स्वतःला गणित शिकण्याची मुळींच हौस नव्हती. तथापि या निमित्तानें कां होईना पण लो. टिळकांसारख्या मोठ्या व्यक्तीच्या परिचयाचा लाभ आपल्यास मिळेल या आशेनें मी हो म्हटलें. अशा रीतीनें माझा लो. टिळकांशीं प्रथम परिचय झाला. तो अन्य कारणानें पुढें पुष्कळ वाढला. अन्य कारणानें असें म्हणण्याचें कारण, त्यांचा गणित शिकविण्याचा फार्स थोडे दिवसच टिकला. ते स्वतः ८।१५ दिवसांनीं एखादवेळीं आम्हां दोघांस बोलावीत. त्यांची स्वतःची अलौकिक बुद्धि असल्यामुळें तें कोणतेंहि गणित दोन तीन पायऱ्या ओलांडून सांगण्याचा प्रयत्न करीत. पण आम्हां विद्यार्थ्यांच्या डोक्यांत तें ज्ञान न उतरल्यामुळें ते लौकरच रागावत व संतापून उठून जात. या रीतीनें पांच सहा खेपांतच आमचें गणिताचें शिक्षण संपलें. पण

मी जो त्यावेळीं तेथें चिकटलों तो तसाच चिकटून राहिलों.

मला वृत्तपत्रें वाचण्याचा फार नाद होता. त्यामुळें मी त्यांच्याकडे येणारीं अनेक वृत्तपत्रें वाचीत असें. एके दिवशीं लो. टिळकांनीं मला हांक मारली व " तुम्ही येथें वृत्तपत्रें वाचतां ना ? " म्हणून विचारलें. त्या प्रश्नानें माझी तर घाबरगुंडी उडाली कारण गणित शिकण्याच्या निमित्तानें येथें येऊन दुसरेच धंदे करतो असें पाहून ते रागावले असतील असें मला वाटलें. पण खरा प्रकार अगदीं निराळा होता. " मी कधीं कधीं येथील वृत्तपत्रें वाचतों " असा जबाब मी त्यांना दिल्यावर ते म्हणाले, " तुम्ही नेहमीं वाचतां तें मी पाहतों; तर तुम्ही असें करा कीं, तुम्ही जें वाचतां त्यांतील महत्त्वाच्या भागावर खुणा करीत जा. मला सर्व वृत्तपत्रें वाचण्यास वेळ मिळत नाहीं म्हणून खुणा केलेला भाग तेवढा तुम्ही मला वाचून दाखवीत जा. " या त्यांच्या आश्वासनानें मला फार धीर आला व मी त्यांच्या सांगण्याप्रमाणें करूं लागलों. आठ पंधरा दिवसांनीं ते मला बोलावीत व खुणा केलेला मजकूर मजकडून वाचून घेत. अर्थात् हा मजकूर महत्त्वाचा मला कां वाटला हें ते विचारीत व त्यांतील कांहीं मला माहीत नसल्यास सांगत कीं, " आपल्या येथें केसरीचीं सालवार फाइलें आहेत. तीं तुम्ही वाचा व मला समजावून सांगा. " मी अर्थात् त्याप्रमाणें आनंदानें करून त्यांना सांगूं लागलों. त्यानंतर एक दिवशीं ते म्हणाले कीं, " आजपर्यंत कॉंग्रेसचीं अनेक अधिवेशनें भरलीं आहेत व त्यांत अनेक प्रश्न चर्चिले गेले आहेत, पण त्यांची क्रमवार हकीकत कोठेंहि प्रसिद्ध झालेली नाहीं. तरी त्या अधिवेशनांचे अहवाल वाचून त्यांतील एकेका प्रश्नाची सुसंगत हकीकत तुम्ही लिहून काढा. " मी अर्थातच हें काम हर्षानें अंगिकारिलें व तें पुरें केलें. यामुळें पुढें लो. टिळकांनीं मला केसरींत देण्याचें वर्तमानसार निवडून काढण्याचें काम दिलें. तें मी नियमानें केलें. यानंतर कांहीं लहानलहान स्फुटें अथवा हकीकतहि मजकडून लिहवून घेऊन त्यांनीं केसरीत प्रसिद्ध केली. पुढें मी कॉलेजांत गेल्यावरहि माझें त्यांच्याकडील जाणें कायम असल्यानें त्यांनीं केसरींतील लेखांचें लेखन मजकडून करवून घेतलें. त्यांच्या संबंधानें एक विशेष गोष्ट सांगावयाची ती अशी कीं, जे लो. टिळक कोणतीहि राजकीय गोष्ट

उघडपणानें व मोठ्यानें लोकांशीं बोलत ते स्वतः केसरींतील अग्रलेख लिहिण्याच्या वेळीं एकाग्र होण्यासाठीं लिहिण्याच्या जागीं कोणालाहि येऊं देत नसत. ते लेखांचा मजकूर तोंडानें सांगत व मी तो लिहीत असें. त्यावेळीं ते मला असेंहि समजावून सांगत कीं, हा मुद्दा अन्य भाषेनेंहि लिहितां येईल, पण तो तसा लिहिण्यानें कायद्याच्या कचाटींत येण्याची भीति आहे, म्हणून ती टाळण्यासाठीं तो अन्य रीतीनें लिहिला पाहिजे. अशा प्रकारें मला स्पष्ट दिसून आलें कीं, लेखन व्यवसायांत ते मला तयार करीत आहेत. त्यांच्या उद्देशाचा स्पष्ट उल्लेख पुढें एका प्रसंगीं त्यांनीं मजजवळ केला, तो भाग यथाक्रम योग्य ठिकाणीं नमूद करीन.

मॅट्रिकच्या वर्षीं मला अभ्यासाला निवांतता मिळावी म्हणून मुंबईस तीन महिने पाठविण्यांत आलें. येथें ग्रँटरोड स्टेशनाजवळच माझे सख्खे आते बंधू रा. अभ्यंकर यांच्या चार चाळी मालकीच्या होत्या असें मी मागें उल्लेखिलेंच आहे. त्यांत ते राहत. तेथें मी राहिलों. मुंबईच्या जीवनाचा हा माझा पहिलाच अनुभव होता व माझें वयहि लहान होतें. यामुळें मला ह्या जीवनाची मोठी मौज वाटली. आगगाडींत बसण्याची मुलांना स्वाभाविकच हौस असते व मला तर ग्रँटरोड ते कुलाबा येथ-पर्यंतचा पास माझ्या आतेबंधूंनीं काढून दिला होता. त्यामुळें पुष्कळ वेळां मी या पासानें कारणावांचून रेल्वेंतून इकडून तिकडे जात असें. माझ्या तेथील वास्तव्याच्या वेळीं माझा काळ फार आनंदांत गेला यांत शंका नाहीं.

## .१३.

वर म्हटल्याप्रमाणें मी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्यावर फर्ग्युसन कॉलेजांत पहिल्या वर्षांत दाखल झालों त्यावेळीं मी तेथील वसतिगृहांतच राहूं लागलों. त्या वेळचें कॉलेज म्हणजे शिक्षणाची मुख्य इमारत व एकच वसतिगृह एवढीच होती. वसतिगृह चौकोनी असून मध्यें फार मोठें पटांगण होतें व त्याच्या चारी बाजूंस दुमजली इमारत असून तींत

विद्यार्थ्यांच्या खोल्या होत्या. मुख्य शिक्षणाच्या इमारतींत पुढील बाजूस जो मोठा हॉल असे त्यांत पहिल्या वर्षाचा वर्ग बसत असे. वसतिगृहाच्या पूर्वेस चार जेवणाचे क्लब असत. त्याच्या शेजारीं स्नानासाठीं मोठी जागा होती. भोजनगृहापासून वसतिगृहाकडे जातांना डाव्या बाजूस एक लहानशी बंगली होती. तींत विद्यार्थ्यांना प्रथमोपचार करण्यासाठीं एक हॉस्पिटल असिस्टंट राहत असे व हल्लीं जेथें वनस्पतींचा बगीचा आहे तेथें त्यावेळीं क्रिकेट खेळण्याचें मैदान होतें. वसतिगृहाच्या पूर्वेस टेनिस खेळण्याचीं कोर्टें होतीं. एवढाच व्याप त्यावेळीं कॉलेजचा होता.

हल्लींच्या मानानें त्यावेळचें कॉलेज पुष्कळ लहान असल्यानें त्यांत आठ–दहाच प्रोफेसर असत. कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून सीनियर रँगलर श्री. रघुनाथराव परांजपे यांची नेमणूक तत्पूर्वीं झालेली होती. वस्तुतः कै. महादेव शिवराम गोळे या कायमच्या प्रिन्सिपॉलांनंतर कै. वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांची कायमचे प्रिंसिपॉल म्हणून नेमणूक झाली होती व त्यांनीं तें काम कांहीं दिवस केलेंहि होतें. परंतु श्री. परांजपे यांच्या अपूर्व शैक्षणिक विजयामुळें त्यांच्या अधिपत्याखालीं संस्थेचा दर्जा सरकारांत वाढेल व संस्थेचा उत्कर्ष होईल या हेतूनें श्री. राजवाडे यांनीं आपलें स्थान सोडून तें श्री. परांजपे यांना दिलें. तरीहि श्री. परांजपे हे श्री. राजवाडे यांच्या सल्ल्यानें पुष्कळ अंशीं कॉलेजचा कारभार चालवीत. त्यावेळच्या अध्यापकांत कै. राजवाडे व कै. वासुदेव बळवंत पटवर्धन हे इंग्रजी विषय शिकवीत. राजवाडे फार विद्वान असले तरी स्वभावानें रुक्ष असल्यामुळें ते आपला विषय तशाच रुक्ष रीतीनें शिकवीत. रा. वासुदेवराव पटवर्धन हे शिकवितांना आपल्या विषयांत अगदीं रंगून जात; पण त्यांना उच्चार-सुलभता कमी असल्यानें त्याची उणीव ते हावभावानें पुरी भरून काढीत. त्या योगानें त्यांचें शिकविणें मनोरंजक होई. कै. वासुदेवशास्त्री अभ्यंकर व प्रो. नानासाहेब पानसे हे आम्हांस संस्कृत शिकवीत. रा. पानसे यांची नेमणूक प्रोफेसर म्हणून नवीनच झाली असल्यामुळें ते आपल्या ज्ञानाची उणीव अभ्यंकरशास्त्री यांना विचारून भरून काढीत व मग शिकवीत. त्यांची शिक्षणपद्धति मला तरी उत्तम वाटली. प्रो. भानु यांनीं आम्हांस रोमचा इतिहास शिकविला. प्रो. भानु हे विद्वान असले तरी त्यांच्यांत

नाटकी अथवा हरिदासी पद्धत फार असे व त्यांचें शिकविणें अगदीं वरवर असे.

गणित विषय आम्हांस डॉ. परांजपे शिकवीत. ते इंग्रजी पोषाखांत असून केंब्रिज येथील ग्रॅज्युएटांची चौकोनी पुठ्याची व उजव्या बाजूस काळा गोंडा असलेली टोपी वापरीत. ती पाहून सर्वांना मजा वाटे. ते आरंभापासून मनापासून शिकवीत, पण माझा गणित विषय फारसा चांगला नसल्यानें व्हावा तसा लाभ त्यांच्या शिक्षणापासून मला झाला नाहीं.

माझ्या मतें त्या वेळच्या सर्व शिक्षकांत उत्कृष्ट शिक्षक म्हणजे कै. जनार्दन विनायक ओक हे होते. हे हंगामी प्रोफेसर म्हणून थोडे दिवसच होते. त्यांची शिकविण्याची पद्धति अगदीं मूलग्राही होती. आम्हांस इंटरच्या वर्गात बर्कचीं भाषणें व निबंध नेमिले होते. ते शिकवितांना कॉलेजच्या वर्षातील शेवटच्या एक महिन्यापर्यंत त्यांनीं पाठ्य पुस्तकाला स्पर्शहि न करतां युरोपची राजकीय विचारप्रणाली तोंडीच समजावून दिली. ती इतकी उत्तम होती कीं, शेवटच्या एका महिन्यांत त्यांनीं फक्त पाठ्यपुस्तकांतील कठीण शब्दांचा अर्थ समजावून दिला. या त्यांच्या पद्धतीमुळें वर्गातील विद्यार्थ्यांपैकीं थोडेच जण त्यांचें व्याख्यान लक्षपूर्वक ऐकत, पण जे ऐकत त्यांना मात्र कायमचा लाभ होई. त्या वर्षीच्या मुंबई विद्यापीठाच्या इंटरच्या परीक्षेंत इंग्रजी विषयांत सर्व विद्यार्थ्यांत माझा पहिला नंबर आला होता. याचें श्रेय मी श्री. ओक यांनाच देतों. असो.

याच सुमारास झालेल्या एका दुर्घटनेचा उल्लेख येथें करणें अवश्य आहे. त्यावेळीं प्रतिवर्षी पुण्यास प्लेगचा कहर होत असे व गांवांतील लोक फर्ग्युसन कॉलेजच्या बाजूस कँप करून त्यावेळीं राहत असत. अशा प्रकारें लोक राहत असतां लो. टिळकांचा मोठा मुलगा विश्वनाथ, कीं ज्याच्यामुळें मी लो. टिळकांकडे जाऊं लागलों होतों त्याला प्लेग झाला व त्यांतच त्याचा दुःखद अंत झाला. अखेरच्या वेळीं, मुलाचे हाल पहावयास नकोत म्हणून लो. टिळक तेथें राहिले नव्हते. मी टिळकांच्याकडे जाऊं लागल्यापासून बडोद्याच्या प्रसिद्ध बापट कमिशनमधील श्री. बापट ही मुख्य व्यक्ति बडोद्याच्या नोकरींतून निवृत्त होऊन पुण्यास येऊन

राहिली होती. ते लो. टिळकांचे परमस्नेही असल्यानें त्यांच्याकडे नेहमीं येत व त्यामुळें श्री. बापटांचा व माझाहि पुष्कळ परिचय झाला होता. विश्वनाथाचा अंत झाल्यावर त्याला अंत्यविधीसाठीं नेण्यांत आलें त्यावेळीं लो. टिळक त्या लोकांबरोबर गेले नव्हते. परंतु नंतर त्यांना दुःखाची ऊर्मि येऊन आपल्या मृत मुलास पाहण्याची तीव्र इच्छा झाल्यानें ते रा. बापट यांच्यासह स्मशानांत गेले; ते तेथें एकदां मुलास पाहून 'This is the last of the man' असे उद्गार काढून पुढील विधि होण्यापूर्वीच परतले, असें मला त्यानंतर रा. बापट यांनीं सांगितलें. अशा रीतीनें लो. टिळकांकडे जाण्याचा माझा आधार तुटला तरी वाङ्मयीन व राजकीय संबंधानें मी त्यानंतरहि तेथें जातच राहिलों. त्यापूर्वीं लो. टिळकांचे अध्यापक व ज्येष्ठ स्नेही कै. प्रो. जिनसीवाले यांनीं आपला सर्व प्राचीन संस्कृत पुस्तकांचा संग्रह–दोन कपाटें भरून–आपल्यामागें लो. टिळकांना देऊन टाकला होता तो त्यांच्याकडेसच होता. तो मी पाहूं लागलों तेव्हां त्यांतील विषयांची समजूत हलके हलके मला घालून देऊन लो. टिळकांनीं त्या विषयांत माझा चांगला प्रवेश करून दिला. त्यामुळेंच त्या विषयांचा मी पुढें आजन्म विद्यार्थी बनलों.

याच सालीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंग्रजींतून एक वक्तृत्व स्पर्धा झाली. तींत अनेक जणांनीं भाग घेतला होता. व त्यांत मीहि होतों. त्या स्पर्धेंत माझा पहिला नंबर येऊन मला शेक्सपिअरच्या समग्र कृतींचें पुस्तक प्रिन्सिपॉल राजवाडे यांच्या हस्तें बक्षिस देण्यांत आलें. तें अजून मजजवळ असून तो मी मोठा ठेवा समजतों. त्यावर कै. राजवाडे यांनीं स्वहस्तें शेरा करून तें पुस्तक मला 'For excellence in elocution' म्हणून बक्षीस दिलें व स्वतः सही केली. या प्रसंगामुळें इंग्रजींतून अस्खलित बोलण्याचा पाठ मला मिळून त्या संबंधींचा माझा आत्मविश्वास दृढावला.

## .१४.

१९०५ सालीं माझा विवाह झाला. ओंकारेश्वराजवळ राहणाऱ्या ओक घराण्यांतील मुलीशीं तो झाला. आमचा उतारा त्यावेळीं वर्तकांच्या बोळांतील पुरंदरे यांच्या वाड्यांत होता. त्याकाळी लग्नाच्या वेळीं वधूवरांचें वय पुष्कळ कमी असे. त्या मानानें हा विवाह झाला होता.

याच सालीं पुढें माझ्या आयुष्यांत क्रांति घडवून आणणारी एक घटना घडली. ती म्हणजे दे. भ. सावरकर यांच्याशीं माझा परिचय झाला ही होय. सावरकरहि वसतिगृहांतच राहत असत. कांहीं दिवसांनीं त्यांच्या ' अभिनव भारत ' या क्रांतिकारी संस्थेचा मी सभासद झालों. या त्या वेळच्या लहानशा संस्थेचे आम्हीं सभासद कॉलेजच्या पश्चिमेस असलेल्या ' पांडव लेणें ' नांवाच्या टेकडीवर जमून व्याख्यानें देत असूं व संस्थेचा प्रसार करण्याचा प्रयत्न करीत असूं. तेव्हांपासूनच व्याख्यानें देण्याचा माझा परिपाठ सुरू झाला, तो आजतागायत चालू आहे. अंदाजें हिशोबानें आजपर्यंत निरनिराळ्या गांवीं व निरनिराळ्या विषयांवर मिळून ५०० वर माझीं व्याख्यानें झालीं आहेत. इंग्रजी व मराठी या दोन भाषांतून तर मी बोलतच असें पण पुढें बडोद्यास गेल्यावर त्या भाषांत गुजराथीचीहि भर पडली व कै. श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या प्रोत्साहनानें सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीं मी हिंदीचा नीट अभ्यास केला, तेव्हांपासून हिंदींतहि मी भाषणें करूं लागलों. भाषणें करतां येणें ही एक मोठी शक्ति आहे व तिचा उपयोग मला चांगला करतां येऊं लागला याबद्दल मला आनंद वाटतो.

या भाषणशक्तीचा उपयोग करण्याची संधि मला अनपेक्षित रीतीनें लवकरच आली. सन १९०४ सालीं नाताळांत मुंबईस इंडियन नॅशनल कॉंग्रेसचें अधिवेशन सर हेन्री कॉटन यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार होतें. त्यासाठीं स्वयंसेवक होण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं ना. गोखले यांना जाऊन भेटावें अशी सूचना कॉलेजच्या फलकावर लावण्यांत आली. ती वाचून मी ना. गोखले यांच्याकडे गेलों. त्यावेळीं ते वर्तकांच्या बोळांत

गांधींच्या घरांत राहत असत. या गांधींना लोक हिरव्या नाकाचे गांधी म्हणून ओळखत. कारण खरोखरीच त्यांचें नाक तेवढें अगदीं हिरव्यागार रंगाचें होतें. मी ना. गोखल्यांना भेटलों, त्यावेळीं माझें वय लहान असल्यामुळें मी स्वयंसेवकाचें काम कसें करूं शकणार याबद्दल त्यांना शंका आली. व त्यांनीं मला सांगितलें कीं, कॉंग्रेसच्या कार्याचा प्रचार करून तुम्ही थोडे तरी पैसे आणून द्याल तर मी तुम्हांस स्वयंसेवक नेमीन. त्यावरून खेड व जुन्नर या पुणें जिल्ह्यांतील तालुक्यांतून मी व्याख्यानांच्या द्वारें कॉंग्रेसचा प्रचार करून सुमारें साडेपांचशें रुपये गोळा करून ते ना. गोखल्यांना दिले तेव्हां खूष होऊन त्यांनीं मला ताबडतोब स्वयंसेवक केलें. या प्रचाराच्या वेळीं मी जुन्नरास गेलों तेव्हां तेथील लेण्याद्रि या सुप्रसिद्ध गणपतीचें दर्शन घेतलें; तसेंच शिवनेरी किल्ल्या-वरील शिवरायाच्या जन्मस्थानाचेंहि दर्शन भक्तीनें घेतलें. त्यावेळीं सुरक्षित इमारत म्हणून त्या जागेचा उद्धार झाला नसल्यानें तेथें फक्त शिवाई देवीचें देऊळ व शिवाजीच्या वाड्याच्या भिंती मात्र अवशिष्ट होत्या. पुढें स्वयंसेवकांसाठीं कॉंग्रेसनें जो गणवेश ठरविला होता तो विलायती कापडाचा असल्यामुळें तो घेण्याचें नाकारून मी माझ्या स्वयंसेवकत्वाचा राजीनामा दिला. ही गोष्ट ना. गोखल्यांना माहीत नव्हती. पुढें कॉंग्रेस अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीं अधिवेशन सुरू होण्यापूर्वी थोडा वेळ अगोदर मी प्रेक्षकाचें तिकीट प्रवेशद्वारापाशीं विकत घेत होतों. एवढ्यांत ना. गोखले मंडपांत जाण्यासाठीं आले. त्यांनीं मला पाहिल्याबरोबर 'तुम्ही इथें कसे ? स्वयंसेवकाच्या जागीं कां नाहीं ? ' असें विचारल्यावरून मी त्यांना माझ्या राजीनाम्याची हकीकत सांगितली. तेव्हां ते म्हणाले, 'कांहीं हरकत नाहीं, तुम्ही मजबरोबर आंत या व मी सांगेन तें काम करा.' असें म्हणून त्यांनीं मला आंत नेले व मुख्य व्यासपीठावर तुम्ही स्वयं-सेवकाचें काम करा असें सांगितलें. त्यामुळें मला फार आनंद झाला. कारण त्या व्यासपीठावर कॉंग्रेसच्या सर्व प्रमुख व्यक्ति बसलेल्या होत्या. त्यामुळें त्यांची माहिती करून घेण्याची उत्तम संधि मला मिळाली. कॉंग्रेसचें हें अधिवेशन पुरें होईपर्यंत मी तेंच काम केलें, त्यामुळें सभेंत झालेलीं सर्व भाषणें मला उत्तम ऐकूं येऊन तत्कालीन राजकारणाची

मला बरीच माहिती झाली.

याच सुमारास एक विचित्र प्रसंग घडला—तो असा कीं, हिंदू शुद्धि कार्याचे आद्य प्रवर्तक कै. गजानन भास्कर वैद्य यांचें व्याख्यान आम्ही विद्यार्थ्यांनीं फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहांत गणेशोत्सवाच्या निमित्तानें करविलें. रा. वैद्य हे राष्ट्रीय वृत्तीचे म्हणून प्रसिद्ध असल्यानें त्यांच्या व्याख्यानाची ही योजना कॉलेजच्या अधिकाऱ्यांना पसंत पडली नाहीं. व त्यांनीं आम्हां चालकांना त्याबद्दल मोठा ठपका दिला आणि यापुढें कॉलेजच्या प्रिन्सिपॉलच्या परवानगीशिवाय बाहेरच्या कोणाही माणसाचें व्याख्यान करतां कामा नये असा कायमचा हुकूम काढला. वास्तविक रा. वैद्य यांनीं आपल्या भाषणांत राजकीय प्रश्नांची चर्चा मुळींच केली नव्हती. तथापि त्या काळीं कॉलेजच्या चालकांची वृत्ति राष्ट्रीय पक्षाच्या विरुद्ध असल्यानें " Prevention is better than cure " या म्हणीप्रमाणें हा हुकूम काढला होता हें उघड आहे.

यानंतर १९०५ सालीं पुण्यास वक्तृत्वोत्तेजक सभेतर्फे झालेल्या वक्तृत्व स्पर्धेचा उल्लेख येथें केला पाहिजे. ही स्पर्धा आर्यभूषण नाटकगृहांत योजिली होती. स्पर्धेचा विषय ' कॉंग्रेसचें कार्य व त्यांत सुधारणेची आवश्यकता ' असा होता. या विषयासाठीं बोलणारे २७ उमेदवार होते व परीक्षकांत लो. टिळक, कै. शिवराम महादेव परांजपे ( काळकर्ते ), कै. न. चिं. केळकर व कै. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर हे चौघेजण होते. यापूर्वीं ही संस्था मुमूर्षु अवस्थेंत असून तिचें उज्जीवन याच सालीं प्रथम होत असल्यानें वरील परीक्षकरत्नांनीं परीक्षणाच्या कामीं सहकार केला होता. या स्पर्धेंत माझा पहिला नंबर आल्यानें मला रु. ३० चें पहिलें बक्षीस मिळालें. सर्व उमेदवारांचीं भाषणें झाल्यानंतर परीक्षक मंडळातर्फे कै. तात्यासाहेब केळकर यांनीं भाषण केलें.

या स्पर्धेनंतर थोड्याच दिवसांनीं असाच वक्तृत्वस्पर्धेचा समारंभ कल्याण येथें झाला. त्यांतहि मी भाग घेतला होता. त्या स्पर्धेंत सुद्धां माझ्या विषयांत मला पहिलें बक्षीस मिळून दुसऱ्या विषयाकरितां मला परीक्षक म्हणून नेमण्यांत आलें.

मी लो. टिळकांच्याकडे जाऊं लागल्यापासून माझी वाचनाची

अभिरुचि पाहून व त्यांतहि प्राचीन वाङ्मयाबद्दलची माझी आवड जाणून लो. टिळकांनीं वैदिक कालासंबंधींची माहिती त्यांच्या फुरसतीच्या वेळीं मला थोडी थोडी देण्यास सुरवात केली; ती मी मोठ्या आवडीनें ऐकिली त्यामुळेंच पुढें त्या विषयावर माझी भक्ति बसली.

या सुमारास लो. टिळकांनीं सन १९०४ सालच्या डिसेंबर महिन्यांत मुंबईच्या अपोलोबंदरावरील 'Graduates Association' पुढें Chaldean and Indian Vedas" या विषयावर एक व्याख्यान दिलें. तेंच पुढें सन १९१७ सालीं डॉ. भांडारकर स्मृतिग्रंथांत प्रसिद्ध करण्यांत आलें. त्या व्याख्यानासंबंधानें नंतर मी लो. टिळकांना विचारतां त्या संबंधींची माहिती त्यांनीं मला दिली. मेसापोटेमियाच्या दक्षिण भागाला पूर्वीं सुमेर देश असें म्हणत. त्यालाच पुढें खाल्डिया असें म्हणूं लागले. या देशाच्या संबंधाची माहिती सन १९०६ सालीं फार थोडी उपलब्ध होती. तरीहि सुमेरी अथवा खाल्डियन वाङ्मयाच्या त्या काळपर्यंत प्रसिद्ध झालेल्या थोड्या उताऱ्यावरून लो. टिळकांनीं कांहीं अनुमानें बांधलीं. आपल्या वेदांत आढळणारे कांहीं शब्द उघडउघड संस्कृतापासून उद्भवलेले नसतांहि ते आपल्या वेदांत आढळतात. त्या शब्दांचा माग लो. टिळकांना खाल्डियन वाङ्मयांत लागला, यावरून या उभय वाङ्मयांत पुष्कळ देवघेव झाली असली पाहिजे हें उघड होतें. त्यावरून या दोन देशांचा वेदकाळीं संबंध असला पाहिजे असें अनुमान त्यांनीं केलें. या विषयावर त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार हें अनुमान अचूक ठरलें ही त्यांच्या बुद्धिवैभवाची साक्षच होय.

यानंतर लो. टिळक १९२० सालीं वारले. त्यानंतर सुमेरी वाङ्मयांतील 'गिल्गमेश' नांवाच्या आपल्याकडील रामायणासारख्या अपूर्व काव्याचें इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध झालें, तें वाचल्यावर माझी खात्री झाली कीं, या काव्यांतील हकीकतीशीं समानार्थक अशी हकीकत आपल्या वेदांत आहे. म्हणून या उभय वाङ्मयांतील हकीकतींचा अभ्यास करून सन १९२८ सालीं मी माझें 'हिंदी-सुमेरी-संस्कृति' हें पुस्तक 'चित्रमयजगत्' या मासिकांतून खंडशः प्रसिद्ध केलें व नंतर तें पुस्तकरूपानेंहि प्रसिद्ध झालें आहे. त्यांत अनेक पुराव्यांवरून सुमेरी लोक हे

आर्यवंशाचेच होते असा सिद्धांत मी प्रतिपादिला आहे. पण यानंतर कै. चिंतामणराव वैद्य यांनीं प्रसिद्ध केलेल्या ‘ संस्कृत वाङ्मयाचा इतिहास खंड १, वैदिक युग ’ या ग्रंथाच्या एका परिशिष्टांत माझ्या पुस्तकाचा परामर्ष घेऊन माझा सिद्धांत बरोबर नाहीं असें प्रतिपादिलें आहे. पण त्यानंतर त्या विषयावर जे अनेक लेख प्रसिद्ध झाले त्यांत माझा निष्कर्ष मान्य करण्याकडे लेखकांची प्रवृत्ति असल्याचें दिसून आलें. पण अखेर सरकारनें दोन वर्षांपूर्वीं नेमलेल्या पंचांग–संशोधन–समितीनें जो आपला अहवाल कांहीं दिवसांपूर्वीं प्रसिद्ध केला त्यांत तर माझ्या सिद्धांताचा संभाव्य म्हणून स्वीकार केला आहे. त्या रिपोर्टाच्या पृष्ठ २१५ वर म्हटलें आहे कीं, ‘According to one view, some of the royal families of Asia Minor were probably vedic Aryans.”

अशा रीतीनें लो. टिळकांकडून मिळालेल्या प्रोत्साहनानें मी या विषयाचा व्यासंग पुढें चालू ठेवला व त्यावर पुस्तकें लिहिलीं याचें श्रेय त्यांनाच दिलें पाहिजे.

त्यावेळीं म्हणजे सन १९०५ सालीं पुण्यास म्युनिसिपालिटीची निवडणूक होणार होती. तिच्यांत बंगालच्या फाळणीमुळें सुरू झालेल्या नवीन चळवळीनें चैतन्य आणलें व ही निवडणूक अटीतटीनें लढविली गेली. त्यावेळीं लो. टिळक हे दाणे आळींतील सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत जवळजवळ महिनाभर रोज जात असत व तेथें जमलेल्या मंडळींना म्युनिसिपल कामाचें शिक्षण संभाषणरूपानें देत असत. त्याचा सभासदांना फार उपयोग होण्यासारखा होता. ती निवडणूक लो. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षानें जिंकली. तेथपर्यंत स्थानिक स्वराज्याच्या कामांत सुशिक्षित मंडळी फारसें लक्ष घालीत नसत. पण स्थानिक स्वराज्य हा संपूर्ण स्वराज्याचा पाया आहे या लोकमान्यांच्या शिकवणीमुळें त्या कामांत अधिक लक्ष घालण्याच्या लोकांच्या निर्धारांत भर पडली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सन १९०७ सालीं पंजाबांत लाला लजपतराय व सरदार अजित सिंह या दोघांची सन १८१८ च्या एका जुन्या कायद्यान्वयें धरपकड करण्यांत आली. ही बातमी पुण्यास दुपारच्या सुमारास कळली. त्यावेळीं लो. टिळक सिंहगडावरील आपल्या बंगल्यांत राहत होते. तेथून त्यांना बोलाविण्यासाठीं

खास मनुष्य पाठविण्यांत आला व त्याच्या बरोबरच ते आले. सायंकाळीं त्यांच्या घरीं प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक होऊन या अन्यायाच्या प्रतिकारासाठीं जोराची चळवळ केली पाहिजे असें लो. टिळकांनीं सांगितलें. यानंतरच लाल–बाल–पाल ही त्रयी हिंदुस्थानाला पूज्य असल्याची घोषणा यापुढें कित्येक वर्षांपर्यंत केली जात असे. यांतील तिसरे गृहस्थ बिपिनचंद्र पाल हे कलकत्त्याहून ‘ New India ’ नांवाचें वृत्तपत्र इंग्रजींत चालवीत असत. त्यांतील इंग्रजी भाषा फार सुंदर असे व त्या पत्रानें देशजागृतीचें मोठें कार्य केलें. बंगाल व महाराष्ट्र यांचा स्नेहसंबंध पूर्वीपासूनच घनिष्ट होता; त्यांत बंगालच्या फाळणीचा प्रतिकार करण्यासाठीं बंगालनें सुरू केलेल्या चळवळीला महाराष्ट्रानें ताबडतोब व जोराचा पाठिंबा दिला ही या स्नेहाचीच साक्ष होय.

अशा प्रकारें सार्वजनिक विषयांतच आपला सर्व काल व शक्ति लो. टिळकांनीं घातल्यानें घरांतील गोष्टींकडे त्याचें दुर्लक्षच होत असे. एकदां एका अनाथ विधवा बाईनें आपल्या मिळकतीचे कागदपत्र आणून त्यांना दाखविले. ते वाचून तिला सल्ला देण्यांत दुपारचे दोन बाजले व घरांतून जेवणाचीं अनेक वेळां बोलावणीं आलीं तरी ते उठले नाहींत असें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे.

यावेळीं ‘ ज्ञानप्रकाश ’ या वृत्तपत्राचें दैनिकांत रूपांतर झालें. त्याचे संपादक म्हणून कै. वासुदेव गोविंद आपटे यांना नेमिलें होतें. वासुदेवरावांचे भाचे कै. गंगाधर नारायण सहस्रबुद्धे यांचे वडील माझ्या गांवीं, खेड येथें, मामलेदार होते. तेव्हांपासून रा. गंगाधरपंत माझे बालस्नेही होते. त्यांच्यामुळें मी वासुदेवराव आपटे यांच्याकडे जाऊं लागलों. त्यांचा व माझा पुढें साहित्यपरिषदेच्या कारणानें फार निकट संबंध जडला व तो त्यांच्या मृत्यूपावेतों तसाच अबाधित राहिला. रा. वासुदेवरावांचें राजकारण नेमस्त असून ते लो. टिळकांचे विरोधी होते. माझीं मतें लो. टिळकांच्या प्रणालींतील होतीं हें रा. वासुदेवराव यांना माहीत होतें, तरीहि त्यांच्या व माझ्या संबंधांत त्यामुळें व्यत्यय आला नाहीं.

यावेळीं हिंदुस्थानांत व विशेषतः महाराष्ट्रांत राजकारण थंडच असे. स्वदेशी चळवळीला सुरुवात होईपर्यंत तो थंडपणा तसाच टिकला. पण तो

पुढील चळवळीचा पूर्वगामी काळ होता. त्या काळांत न्या.मू. चंदावरकरां-सारखे गृहस्थ कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून एकदम हायकोर्टाच्या न्याया-धिशाच्या जागेवर उडी मारूं शकत असत, यावरून त्यावेळच्या राज-कारणाची कल्पना येईल. महाराष्ट्रांत चाफेकरांच्या पराक्रमाचे पडसाद अजून दुमदुमतच होते.याच सुमारास कै.शिवराम महादेव परांजपे "काळ" नांवाचें वर्तमानपत्र काढून त्यांतून लेखनद्वारें स्वतंत्रतेच्या चळवळीची नौबत झडवीत असत. त्यांच्यासारखा मराठी वक्ता महाराष्ट्रांत अजूनहि झाला नाहीं. त्यांचें भाषेवरील प्रभुत्व, सबंध भाषणांतून अथवा लेखांतून विकसविलेली दीर्घ उपमा, त्यांचा नर्म विनोद, तीव्र उपरोध व व्याकरणाची शुद्धता ही श्रोत्यांना अगर वाचकांना मंत्रमुग्ध बनवीत असत. त्यामुळें महाराष्ट्रांतील तरुण वर्ग साहजिकच त्यांच्या विचारप्रणालीकडे ओढला जात असे. 'अभिनव भारताचे' प्रमुख सभासद तर लो. टिळकांच्या विचारांपेक्षां शिवरामपंतांच्या विचारांकडेच अधिक आकर्षिले जात. लो. टिळक यांच्या पुढारीपणाच्या स्पर्धेला शिवरामपंत एक प्रकारें आव्हानच त्यावेळीं देत असत, असें म्हटलें तरी चालेल. 'अभिनव भारताचा' एक साक्षेपी सभासद या नात्यानें शिवरामपंतांच्याकडे मीहि त्याकाळीं पुष्कळ जाऊं लागलों. वक्त्यांकडे त्यांचें लक्ष अधिक जात असल्यानें त्यांनींहि मला पुष्कळ उत्तेजन दिलें.

तथापि लो. टिळक यांच्याकडील माझें जाणें व त्यांच्या विषयींची माझी श्रद्धा हीं अगदीं अबाधित राहिलीं होतीं.

या सुमारास आम्ही कांहीं विद्यार्थ्यांनीं सिंहगडावर जाऊन तेथील सर्व पुण्यस्थलांचें दर्शन घेतलें. तेथें लो. टिळकांच्या बंगल्यांतच आम्ही उतरलों होतों. तेथें तीन दिवस राहून तानाजी ज्या मार्गानें गडावर चढला ती जागा वगैरे सर्व पाहून आम्ही पुण्यास परतलों.

यावर्षी पुण्यास लकडीपुलावरील विठ्ठलमंदिरांत सालाबादप्रमाणें शिवराज्याभिषेक उत्सव साजरा करण्यांत आला. त्यावेळीं या उत्सवांत माझें व्याख्यान ठेवलें होतें. व्याख्यानाचा विषय 'महाराष्ट्रधर्म व मराठ्यांची मर्दुमकी' हा होता. त्या प्रसंगीं अध्यक्षस्थान लो. टिळकांनीं स्वतः मंडित केलें होतें. त्याचा वृत्तांत त्यानंतरच्या केसरीच्या दोन अंकांतून

प्रसिद्ध झाला होता. तोच पुढें मी प्रसिद्धिलेल्या निबंधसंग्रहाच्या 'साहित्य-प्रकाश' नांवाच्या पुस्तकांत दिला आहे.

त्यावेळचें कॉलेजच्या वसतिगृहांतील जीवन अगदीं देशविचारशून्य असेंच होतें. तेथील विद्यार्थ्यांत विड्या ओढणें–फार काय मद्यपान करणें-वगैरे गोष्टींचा प्रसार बराच असे. तथापि सुदैवाची गोष्ट ही कीं, या व्यसनांना मी अथवा माझे निकटचे कोणीहि मित्र बळी पडलों नाहीं. आजमितीपर्यंत कधींहि विडी, तंबाखू, तपकीर, वगैरेंचा स्पर्शहि मला झालेला नाहीं; मग याहून तीव्र व्यसनांची तर गोष्टच करावयास नको. या व्यसनांच्या कामीं माझें मन वळविण्याचे पुष्कळ प्रयत्न विद्यार्थ्यांच्या-कडून झाले, पण ते सर्व व्यर्थ ठरले.

आम्ही वसतिगृहांत असतांना श्री. सावरकर यांनीं 'आर्यन' या नांवाचें एक हस्तलिखित साप्ताहिक जेवण्याच्या क्लबाच्या फलकांवर स्वतःच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला होता. त्यांत मीहि सहभागी होतों. त्या साप्ताहिकांत 'नरकांतील दरबार' या नांवाचा एक उपरोधिक लेख मी लिहिला होता, त्यानंतर कांहीं दिवसांनीं 'भाला'कार रा. भाऊसाहेब भोपटकर यांनीं आपल्या 'भाला' पत्रासाठीं एकादा लेख देण्याची मजजवळ मागणी केली. त्यांना मी वरील लेख दाखविला. तो त्यांना फार पसंत पडल्यानें त्यांनीं आपल्या पत्रांत तो प्रसिद्ध केला. त्यानंतर ४।५ महिन्यांनींच त्या लेखाबद्दल रा. भोपटकर यांच्यावर सरकारनें राजद्रोहाचा खटला भरला व त्याच दिवशीं त्यांच्या घराची करून झडती घेतली. त्यावेळीं रा. भोपटकरांच्या लिहिण्याच्या डेस्कखालीं, माझ्या स्वतःच्या हस्ताक्षरांत लिहिलेली त्या लेखाची प्रत कांहीं किरकोळ कागदांत होती. पोलिसांनीं झडतीच्या वेळीं डेस्कमधील सर्व कागद तपासले, पण त्याच्याखालील कागद त्यांच्या दृष्टींतून निसटले. पुढें झडती संपल्यावर रा. भाऊसाहेब यांना माझ्या लेखाचा कागद सापडला व अर्थातच तो त्यांनीं फाडून टाकला. त्यावेळीं मी माझ्या गांवीं खेड येथें होतों. झडतीची बातमी कळतांच लो. टिळकांनीं एक खास घोडागाडी करून माझ्या एका मित्रास माझ्या गांवीं रातोरात पाठविलें. ते मित्र तेथें रात्रीं दोन तीनचे सुमारास आले व त्यांनीं मजजवळ आक्षेप

घेण्यासारखे कांहीं कागदपत्र असल्यास त्यांचा नाश करण्याचा लो. टिळकांचा निरोप मला कळविला. त्याप्रमाणें पहांट होण्यापूर्वींच आम्ही तें काम उरकलें. लो. टिळकांना अशी भीति होती कीं, त्या लेखाचा लेखक म्हणून कदाचित् मजवरहि खटला भरला जाईल अथवा माझ्या घराची झडती घेतली जाईल; म्हणून स्वखर्चानें त्यांनीं माझ्या मित्रास मजकडे पाठविलें. पण पुढें मजाविरुद्ध कांहीं काम चाललें नाहीं. श्री. भाऊसाहेब भोपटकरांच्यावर चाललेल्या खटल्याचें काम मात्र पुढें मुंबई हायकोर्टांत सेशन कोर्टांत न्यायमूर्ति बॅटी ( Batty ) या न्यायाधीशापुढें चाललें. त्यावेळीं लो. टिळकांना त्यानंतर कांहीं वर्षांनीं राजद्रोहाच्या खटल्यांत शिक्षा सांगणारे त्यावेळचे न्यायाधीश न्या. मू. मि. दावर हे श्री. भोपटकरांचे वकील होते. त्यांनीं हा लेख एका विद्यार्थ्यानें लिहिला आहे अशी तक्रार करून त्या गुन्ह्याचें स्वरूप हलकें करण्याचा प्रयत्न केला. पण अखेरीला बॅटीसाहेबांनीं "भाला"कारांना दोषी ठरवून सहा महिन्यांची साधी कैद व दंड अशी शिक्षा दिली. मात्र त्यानंतर त्यांची वकिलीची सनद तशीच कायम राहिली व श्री. भोपटकर पुढें अनेक वर्षें वकिली करीत होते, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. हा प्रसंग माझ्या अल्पवयांत स्मरणीय असा झाला. माझ्या लेखाबद्दल दुसऱ्यास शिक्षा झाली ही गोष्ट शल्याप्रमाणें माझ्या मनांत बोचत राहिली.

या सुमारास बंगालची फाळणी होऊन सर्वत्र व विशेषतः महाराष्ट्रांत स्वदेशी चळवळ जोरानें सुरू झाली. निरनिराळ्या ठिकाणीं मीहि कांहीं व्याख्यानें दिलीं. श्री. सावरकरांनीं पुष्कळच भाग त्या चळवळींत घेतला होता. त्यांतील एका व्याख्यानामुळें त्यांना फर्ग्युसन कॉलेजच्या वसतिगृहांतून काढून टाकण्याचा हुकूम कॉलेजच्या चालकांनीं केला. पण पुढें ते बी. ए.ची परीक्षा पास झाले व त्यांनीं इंग्लंडला जाण्याचा विचार चालविला.

अशा प्रकारें श्री. सावरकरांचें पुण्यांतील काम जवळजवळ संपलें. मला बी. ए. च्या परीक्षेनंतर फेलोशिप मिळण्याची आशा असल्यानें एल्‌एल्.बी.च्या पहिल्या वर्षाच्या टर्म्स्‌हि भरतां याव्या व त्यावर्षींच फेलोशिप घेऊन एम्. ए. च्या परीक्षेला बसतां यावें अशा हेतूनें मीहि पुणें सोडलें व मुंबईस विल्सन कॉलेजांत बी. ए. च्या अभ्यासासाठीं गेलों.

## .१५.

मुंबईस गेल्यावर मला नवीन जगांत गेल्यासारखें वाटलें. तेथें विल्सन कॉलेजच्या वसतिगृहांतच समुद्राच्या समोरच्या एका खोलींत मला जागा मिळाली. तेथील माझ्या सहाध्यायांत ना. बाळ गंगाधर खेर हे होते. व त्यांचे मामा श्री. पांडुरंग दामोदर गुणे हे त्यावेळीं फेलो होते. सदर गुणे त्यानंतर जर्मनींत गेले. तेथें अत्यंत सन्मानानें डॉक्टरेट मिळवून ते हिंदुस्थानांत परत आले. जर्मनीला जाण्यापूर्वीच ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद झाले होते. त्या कराराप्रमाणें ते फर्ग्युसन कॉलेजांत संस्कृतचे प्राध्यापक म्हणून रुजूं झाले. पण दुर्दैवानें पुढें त्यांना क्षयाचा विकार जडून ते अकालीं निधन पावले, ही साहित्याची फार मोठी हानि झाली. श्री. बाळासाहेब खेर यांचें सौजन्य तर प्रसिद्धच आहे. व त्याचा लाभ अजूनही मला मिळत आहे. विलायतेस हायकमिशनर म्हणून जाण्यापूर्वी मुंबईचे मुख्य प्रधान म्हणून असतांना त्यांनीं बडोद्यास भेट दिली. त्यावेळींहि त्यांची व माझी पुष्कळ वेळ भेट झाली होती. आमचा पत्रव्यवहार चालू असून त्यांचें सौजन्य माझ्या निरंतर प्रत्ययास येतें.

या सुमारासच विल्सन कॉलेजांत एक घटना घडली. आषाढी एकादशीचे दिवशीं सुट्टी मिळावी म्हणून आम्ही विद्यार्थ्यांनीं प्रिन्सिपॉल डॉ. मॅकिकन यांच्याकडे मागणी केली, ती त्यांनीं नामंजूर केली. त्यावेळीं आम्ही विद्यार्थी संप करून कॉलेजांत गैरहजर राहिलों. या प्रकरणीं माझा हात असावा अशी डॉ. मॅक्किन यांना शंका आली व म्हणून त्यांनीं त्या संबंधाची माझ्या पूर्ववृत्ताची चौकशी फर्ग्युसन कॉलेजांत केली. तींत त्यांना मिळालेल्या हकीकतीवरून त्यांच्या समजुतीला पुष्टि मिळाल्याचें त्यांनीं मला सांगितलें व मला धमकीहि दिली. पण पुढें कांहींहि न होतां माझा अभ्यास सुरळीत चालू झाला.

तेथें असतांना “ विहारी ” या नांवाचें वर्तमानपत्र त्यावेळी श्री. चिपळूणकर हे काढीत असत. त्या पत्रावरहि पुढें राजद्रोहाचा खटला झालाच. पण मी मुंबईस असतांना रा. चिपळूणकरांच्या सांगण्यावरून

'विहारी'त अनेक लेख लिहिले आहेत. हें पत्र राष्ट्रीय विचारांचा प्रसार करणारें होतें हें सांगणें नकोच.

अशा प्रकारें मुंबईस बी. ए. चा अभ्यास पुरा करून मी परीक्षेस बसलों व दुसऱ्या वर्गांत पास झालों. पण मुंबईची हवा मला इतकी बाधली की, जर मी तेथें आणखी कांहीं दिवस राहिलों तर मला क्षयाचा विकार होईल इतकी आम्लपित्ताची व्याधि जडली. त्यामुळें स्थलांतर करणें अवश्य झालें. या कारणानें व शिवाय त्याकाळीं वऱ्हाड नागपूरच्या प्रदेशांत वकिलांची प्राप्ति फार असते अशी माहिती मिळाल्यानें, मी शेवटीं एल्‌एल्. बी. साठीं नागपुरास जाण्याचें ठरविलें.

याच सुमारास आमच्या घरांतच एक लहानसें वादळ माझ्या राजकीय मतांमुळें उठलें.आमच्या गांवीं-खेड येथें-मध्य विभागाचे कमिशनर मि.गिब्स यांनी तेथील म्युनिसिपल शाळेच्या मराठी विद्यार्थ्यांना खाऊसाठीं रु. १० दिले होते. त्या रुपयांचे विलायती साखरेचे पेढे करून ते मुलांना वाटण्याचें तेथील हेडमास्तरांनीं ठरविलें. समारंभाच्या वेळीं तेथें मामलेदार असलेले पळशीकर या नांवाचे गृहस्थ अध्यक्ष होते. त्याकाळीं सर्वत्रच स्वदेशी विचारांचें वारें वाहात असल्यानें लहान विद्यार्थ्यांमध्येंहि तें शिरलें होतें. म्हणून मुलांनीं समारंभाच्या वेळीं ते पेढे फेकून दिले व वंदेमातरम्‌च्या गर्जना केल्या. त्यामुळें चिडून जाऊन पळशीकरांनीं या गोष्टीसंबंधानें खुलासा मागितला. वस्तुतः या गोष्टीशीं माझा कांहींहि संबंध नव्हता तरीहि त्या गांवांतील एक चळवळ्या विद्यार्थी म्हणून माझ्यावर त्या प्रसंगाची जबाबदारी टाकण्याचें हेडमास्तरांनीं ठरविलें व असा खुलासा दिला कीं, मी शाळेंत जाऊन, समारंभापूर्वीं एक व्याख्यान देऊन हे विलायती साखरेचे पेढे फेकून देण्यास विद्यार्थ्यांस उत्तेजित केलें. रा. पळशीकरांनीं हा खुलासा घेऊन लगेच पुण्यास जाऊन तो कलेक्टरांना दिला. कलेक्टरांनीं मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाईस चॅन्सेलर प्रि. सेलबी यांच्याकडे तक्रार नोंदविली व शक्य तर मला नापास करविण्याबद्दल खटपट केली. परंतु ही खटपट चालू असतांनाच माझा परीक्षेचा निकाल लागल्यामुळें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. या प्रकरणीं मला श्री. दाजीसाहेब खरे यांची पुष्कळ मदत झाली. त्यांनीं न्या. मू. चंदावरकर यांनाहि ही हकीकत कळविली व त्यांत

असेंहि सांगितलें कीं, "रा. पळशीकर मामलेदार यांनीं ज्या हकीकतीच्या आधारावर आपटे यांनीं समारंभापूर्वी शाळेंत येऊन व्याख्यान दिल्याचें लिहिलें होतें ती हकीकत खोटी असून, ती केवळ पळशीकर मामलेदारांच्या सांगण्यावरून लिहिली असल्याचें त्यानंतर हेडमास्तर यांनीं पाठविलेल्या अर्जांत म्हटलें आहे. हा अर्ज देण्यापूर्वी रा. पळशीकर यांची खेडहून बदली झालेली असल्यानें हेडमास्तरांना असा अर्ज देतां आला, त्यावरून ही सर्वच हकीकत जमवून लिहिलेली असून ती खोटी आहे असें सिद्ध होतें." यानंतर मी नागपुरास गेलों व तेथील लॉ कॉलेजांत गेल्यावर मजकडे युनिव्हर्सिटीकडून लिखाण आलें कीं, तुमच्याविरुद्ध तक्रार नोंदविली असल्यानें तुम्हांला बी. ए. ची पदवी दिली जाणार नाहीं. याच वेळीं मी मागें उल्लेखिलेले फर्ग्युसन कॉलेजांतील इंग्रजीचे प्राध्यापक कै. ज. वि. ओक हे नागपूरच्या "नील सिटी स्कूल"चे प्रिन्सिपॉल म्हणून नोकरींत लागले होते. त्यांचा सल्ला मी घेतला. तेव्हां त्यांनीं युनिव्हर्सिटीकडे माझ्यावरील आक्षेपाचा तपशील मागण्यास मला सांगितलें. त्याप्रमाणें मी तो मागविला. एवढ्यांत लो. टिळकांच्या सांगण्यावरून मला एका गृहस्थानें तार करून पुण्यास बोलाविलें. मी लो. टिळकांना भेटलों व त्यांनीं मला मुंबईतील सुप्रसिद्ध वकील व लो. टिळकांचे स्नेही रा. दाजी आबाजी खरे यांच्याकडे एक पत्र देऊन पाठविलें. त्याप्रमाणें मी तेथें जाऊन रा. दाजीसाहेबांकडे ८–१० दिवस राहिलों. त्यांनीं मजसाठीं बऱ्याच खटपटी केल्या व माझ्या विरुद्धच्या तक्रारींबद्दल सेनेटरांचे लेखी अभिप्राय मागविण्याची खटपट केली. त्यांतील पहिले कांहीं अभिप्राय माझ्या बाजूचे असल्यानें बाकीच्या सेनेटरांनीं त्याखालीं नुसत्या सह्या केल्या व हें प्रकरण निकालांत काढलें. त्यामुळें मला फेब्रुवारीच्या पदवीदान समारंभांत पदवी न मिळतां ती सप्टेंबर महिन्यांत झालेल्या पदवीदान प्रसंगीं मिळाली.

पण या जाहीर वाच्यतेमुळें माझ्या वडिलांचा मजवर राग झाला व तुला पदवी मिळाली नाहीं तर पुढें कांहींहि मदत मी करणार नाहीं असें त्यांनीं रागाच्या भरांत सांगितलें. ही गोष्ट मी अर्थातच लो. टिळकांना कळविली. त्यांनीं मला संपूर्ण आश्वासन देऊन उमरावतीचे पुढारी विख्यात

देशभक्त कै. दादासाहेब खापर्डे यांच्याकडे पत्र लिहून पाठविलें. दादासाहेबांच्या अपूर्व लौकिकामुळें मी भीतभीतच त्यांच्या घरीं उमरावतीस गेलों. पण तेथें त्यांनीं मला इतक्या प्रेमळपणानें वागविलें कीं, मला परकेपणा बिलकूल भासूं दिला नाहीं. नागपुरास मला रहावयाचें असल्यानें तेथें त्यांच्या देखरेखीखालीं चाललेल्या पटवर्धन हायस्कूल नांवाच्या शाळेंत शिक्षक म्हणून मला नेमण्याचें त्यांनीं आश्वासन दिलें. त्याप्रमाणें मी करणार होतों. एवढ्यांत माझ्या वडिलांचें घरीं येण्याबद्दल मला पत्र आलें. तेथपर्यंत त्यांचा राग शमला होता व त्यांनीं नागपूरचा माझा खर्च यथापूर्व चालविण्याचें कबूल केल्यामुळें मला पटवर्धन हायस्कुलांत नोकरी करावी लागली नाहीं व माझा कार्यक्रम पुढें चालू झाला.

## .१६.

या सुमारास नागपुरासहि मी अगदीं अनपेक्षित वातावरणांत गेलों होतों. तेथें कै. अच्युतराव कोल्हटकर हे सुप्रसिद्ध देशभक्त आपल्या वडिलांपासून केवळ राजकीय मतांसाठीं निराळे होऊन देशसेवक या नांवाचें वर्तमानपत्र चालवीत होते. त्यांचे मदतनीस म्हणून कै. गोपाळराव ओगले हे पुण्याहून तेथें गेले होते. त्या दोघांचा व माझा अत्यंत दृढ संबंध जडला. ते दोघे, मी आणि आमचे आणखी एक स्नेही रा. दामले या नांवाचे होते; या चौघांची चौकडी रोज देशसेवक ऑफिसमध्यें बसत असे. त्यावेळीं अर्थात राजकारणाची एकसारखी चर्चा चालू असे.

त्या काळच्या त्या भागांतील राजकीय परिस्थितीचें थोडेंसें वर्णन येथें देणें उपयुक्त होईल. त्याकाळीं वऱ्हाड व मध्यप्रदेशांतील चार मराठी जिल्हे यांचा राज्यकारभार जरी एकाच चीफ कमिशनरच्या देखरेखीखालीं चालत असे, तरी मुलकीच्या व न्यायखात्याच्या दृष्टीनें हे दोन भाग निराळे समजले जात असत. त्याचें कारण असें असे कीं, वऱ्हाड हा निजामापासून इंग्रजांनीं वहिवाटीसाठीं घेतलेला प्रदेश म्हणून समजला जात असल्यानें व त्यावर नांवाला तरी निजामाचेंच अधिपत्य मानलें जात असल्यानें या

भागाचा कारभार निराळा होत असे. त्यावेळीं वऱ्हाडांत राष्ट्रीय जागृति नुकती कोठें होऊं लागली होती. हा भाग संपन्न असल्यानें तेथील लोक आपआपल्या व्यवसायांतच अधिक निमग्न असत. अमरावतीस असलेले रा. दादासाहेब खापर्डे हे या पूर्वींच्या काळांत सरकारी गोटांतलेच समजले जात. नंतर त्यांचा व लो. टिळकांचा ताई महाराजांच्या खटल्यापासून अधिक संबंध आल्यानें ते राष्ट्रीय वृत्तीचे होऊं लागले होते. त्यावेळीं वऱ्हाडांत इतर फारशी चळवळ नसे. खुद्द नागपूर हें मात्र राजधानीचें शहर असल्यानें तेथें डॉ. मुंजे, श्री. अच्युतराव कोल्हटकर, नारायणराव अळेकर, नीलकंठराव उधोजी वगैरे गृहस्थ नुकतीच राष्ट्रीय चळवळ करूं लागले होते. या वृत्तीचा प्रचार करणारें एकच वर्तमानपत्र ‘ देशसेवक ’ हें श्री. कोल्हटकर यांनीं सुरू केलें होतें. या पुढाऱ्यांच्या मानानें इतर ठिकाणाप्रमाणेंच विद्यार्थ्यांच्यांत मात्र अधिक जागृति आलेली होती. तथापि ती दाबून टाकण्याचा प्रयत्न त्यावेळचे चीफ कमिशनर मि. क्रॅडॉक हे करीत.

त्या सुमारास तेथील विद्यार्थिवर्गांत राष्ट्रीय मताचा प्रचार करण्यासाठीं म्हणून आम्ही ‘ विद्यार्थी समाज ’ या नांवाची संस्था काढली. तिचे अध्यक्ष श्री. भवानीशंकर नियोगी हे होते. पुढें कांहीं वर्षें वकिलीचा उत्कृष्ट व्यवसाय चालविल्यावर त्यांना नागपूर हायकोर्टाचे जज्ज म्हणून नेमण्यांत आलें व शेवटीं कांहीं काल ते तेथील चीफ जस्टिसच्या हुद्यावरहि होते. याशिवाय त्यांनीं अनेक सार्वजनिक कामाचीं महापदें भूषविलीं आहेत. ते हल्लीं निवृत्त जीवन काढीत आहेत. हे गृहस्थ अत्यंत हुषार व इंग्रजींतील उत्कृष्ट वक्ते म्हणून नांवाजलेले आहेत. त्यांची मैत्री ही माझ्या अमूल्य ठेव्यांपैकीं एक ठेवा आहे. या विद्यार्थी समाजाचा चिटणीस मी होतों. त्यावेळीं तेथें एक चमत्कारिक प्रकार घडला. तेथील ‘महाराजबाग’ नांवाच्या बगीच्यांत राणी व्हिक्टोरियाचा पुतळा बसविलेला होता. त्याला एके दिवशीं जाऊन कोणीतरी डांबर फांसलें. अर्थात् त्यासंबंधानें तपास सुरू झाला व त्या प्रकरणांत मला अटक करण्यांत येऊन पोलिस चौकीवर नेण्यांत आलें. ही बातमी लगेच पसरली. रा. अच्युतराव कोल्हटकर यांनीं तेथील पोलिस सुपरिंटेंडेंट यांची गांठ घेऊन त्यांना हकीकत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळ
अनुक्रम क्रमांक नों. दि.

समजावली. वस्तुतः मी नागपुरांत त्यावेळीं नवीन असल्यानें तेथील लोकांशीं माझा कांहींहि संबंध नव्हता. तरीहि माझी माहिती पोलिसांना लागल्या-मुळें त्यांनीं डांबर फासण्याच्या प्रकरणीं मला अटक केली होती. तींतून अच्युतराव कोल्हटकर यांनीं जामिनावर माझी सुटका करविली. पण पुढें पोलिसांनाहि या प्रकरणीं कांहींहि निश्चित माग न लागल्यानें तें प्रकरण तसेंच मिटविण्यांत आलें व पुढें मला त्रास न होतां त्या वर्षीं परीक्षेला बसून मी पहिल्या वर्गांत पासहि झालों. या सुमारासच कलकत्त्यास 'माणिकतोला बॉंब केस' या नांवानें प्रसिद्ध झालेला खटला कोर्टांत चालू होता. त्याचे कांहीं धागेदोरे नागपुरास असल्याचा पोलिसांना वहीम आल्यावरून त्यांनीं तेथील दोघातिघां विद्यार्थ्यांना अटक केली. नागपूरचा विद्यार्थी म्हटला म्हणजे तो 'विद्यार्थी समाजाचा' सभासद असलाच पाहिजे असें समीकरण होण्याइतकें 'विद्यार्थी समाजाचें' कार्य त्याकाळीं प्रभावी झालें होतें. या विद्यार्थ्यांना दोन तीन वर्षें कच्च्या कैदेंत डांबून शेवटीं त्यांना शिक्षा सुनविण्यांत आली. पण पुढें या निर्णयावर त्यांनीं अपील केलें व त्यांत ते सुटले. तथापि या गोष्टीवरून नागपूरच्या विद्यार्थिवर्गाविषयीं तेथील पोलिस किती साशंक झाले होते हें दिसून येईल.

यानंतर लौकरच खुद्द श्री. अच्युतराव कोल्हटकर यांच्या देशसेवक पत्रांत कांहीं आक्षिप्त लिखाण आल्याच्या आरोपावरून त्यांच्यावर राज-द्रोहाचा खटला भरण्यांत आला व त्यांत त्यांना दोन वर्षें सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यांत आली. या शिक्षेच्या मुदतींत त्यांचे फार हाल करण्यांत आले. त्यांना तुरुंगांतील शिस्तीसंबंधाच्या निमित्तानें कांहीं दिवस गोण-पाटाचे कपडे वापरण्यास देण्यांत आले होते. त्यामुळें त्यांचें सर्व अंग सोलून लाल झालें होतें. अशा स्थितींत त्यांना एका गांवाहून दुसऱ्या गांवच्या तुरुंगांत नेतांना ते नागपुरावरून जाणार असल्याची बातमी कळल्या-वरून त्यांना भेटावयास इतर कांहीं लोकांबरोबर मीहि गेलों होतों. त्यावेळी त्यांची शरीरस्थिति मी प्रत्यक्ष पाहिली होती. त्यांच्या शिक्षेची मुदत पुरी झाल्यावर त्यांची सुटका झाली व त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांनीं आपल्या कार्याचें स्थान नागपूर हें बदलून ते मुंबईस गेले.

त्या वेळच्या मध्यप्रांतांतील राजकीय दडपशाहीचा नमुना म्हणून

आणखी एक उदाहरण देण्यासारखें आहे व तें यापूर्वीं मी उल्लेखिलेल्या श्री. जनार्दन विनायक ओक यांचें होय. फर्ग्युसन कॉलेजांतून ते निवृत्त झाले तेव्हां त्यांची प्रकृति नादुरुस्त झाली होती, म्हणून मध्यप्रांतांतील त्यांच्या एका आप्ताकडे " बालाघाट " या गांवीं ते हवा बदलण्यासाठीं म्हणून गेले होते. तेथील वाचनालयाच्या वार्षिक प्रसंगीं त्यांना एक भाषण करण्यास सांगण्यांत आलें. त्यावरून वाचनालयाच्या कार्याबद्दल त्यांनीं भाषण केलें. योगायोगानें त्यावेळीं मध्यप्रांताचे चीफ कमिशनर मि. क्रॅडॉक हे त्यावेळीं दौऱ्यावर तेथेंच गेले होते. त्यांच्या अध्यक्षतेखालीं वरील समारंभ झाला. त्यावेळीं मि. क्रॅडॉक यांना श्री. ओक यांचें भाषण इतकें आवडलें कीं, त्यांनीं थोड्या दिवसांनंतर नागपूरच्या नुकत्याच रिकाम्या झालेल्या "नील सिटी हायस्कूल"च्या हेडमास्तराच्या जागेवर श्री. ओक यांची नेमणूक केली. तेथें श्री. ओक यांनीं वर्ष–दीडवर्ष काम केलें असेल एवढ्यांत 'रिस्ले सर्क्युलर' या नांवानें कुप्रसिद्ध झालेल्या परिपत्रकाचा अंमल सुरू झाला. त्याचा आशय असा होता कीं, "कोणत्याहि शाळेंतील दरेक मास्तरानें आपल्या वर्गांतील विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधानें, केवळ शाळेंतच नव्हे, तर शाळेबाहेरहि देखरेख ठेवून आक्षेपार्ह वर्तनाबद्दलचा रिपोर्ट सरकारी शाळाखात्याकडे रुजूं केला पाहिजे व आपल्या शाळेंतील सर्व मास्तरांच्या देखरेखीबद्दल त्या शाळेचे हेडमास्तर जबाबदार धरले जातील." हें सर्क्युलर निघाल्यावर श्री. ओक यांनीं त्याबद्दलची आपली संपूर्ण अमान्यता सरकारकडे कळविली. त्यांनीं लिहिलें कीं, 'विद्यार्थ्यांच्या शाळेंतील शिस्तीबद्दल शिक्षकाला जबाबदार धरणें हें योग्य असलें तरी शाळेबाहेरील त्यांच्या वर्तनावर देखरेख ठेवण्याचें गुप्त पोलिसाचें काम करावयास त्यांना सांगणें हें त्यांच्या दर्जाला कमीपणा आणण्यासारखें आहे; म्हणून या सर्क्युलराचा अंमल माझ्या शाळेंत मी करणार नाहीं.' यानंतर तसा अंमल हेडमास्तर या नात्यानें तुम्हांला करावाच लागेल असें त्यांना कळविण्यांत आल्यावरून त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा ताबडतोब वरिष्ठांकडे पाठविला. या नोकरींतून ते मोकळे झाल्यावर ते मला फक्त १९१७ सालीं इंदुरास झालेल्या साहित्य संमेलनाच्या प्रसंगीं भेटले होते. तेव्हांच क्षयरोगानें त्यांची प्रकृति

पुष्कळच नादुरुस्त झालेली मला आढळली व त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्या विकारानेंच त्यांचा अंत झाला. अत्यंत हुषार व अतिशय विद्वान असा हा पुरुष दुर्दैवानें फुकट गेला असेंच सर्वांना वाटलें.

अशा प्रकारें आम्ही शिक्षणाचें व मतप्रचाराचें कार्य करीत असतांना आम्हांवर सरकारी रोषाचे कांहीं प्रसंग आले. पण त्यांचा उल्लेख करण्याचें येथें कारण नाहीं. त्या वर्षीच्या प्रीव्हियस एल्एल्. बी. च्या म्हणजे दुसऱ्या एल्एल्. बी. च्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेला मी बसलों व पहिल्या वर्गांत पास झालों. त्यापूर्वी मुंबई विश्वविद्यालयाची परीक्षाहि मी पास होऊन तींत पहिल्या वर्गांत दुसरा आलों होतों. हा निकाल लागल्यानंतर दुसऱ्या एल्एल्. बी.चा अभ्यास चालू झाला. आम्हीं नागपूरचे पांच विद्यार्थी या परीक्षेस होतों. ही परीक्षा अलाहाबादेस म्यूर सेंट्रल कॉलेजच्या भव्य इमारतींत झाली. त्यावेळीं परीक्षेला बसलेल्यांपैकीं आम्ही तिघेजण पास झालों. अलाहाबादेस असतांना आम्ही विद्यार्थी पं. मदनमोहन मालवीय यांच्या घरीं जाऊन त्यांना भेटलों. तेव्हां ते दोन तीन कलाक आमच्याशीं बोलत बसले होते व भावी बनारस हिंदु युनिव्हर्सिटीची रूपरेषा व तींत बांधावयाच्या इमारतींचे नकाशे त्यांनीं आम्हांस दाखविले. त्यावेळीं कल्पनेच्या पलिकडे या विद्यापीठाची दौड मुळींच गेली नव्हती. तरी त्यानंतर त्यांनीं तेथें तीन चार कोटींच्या इमारती बांधल्या व सन १९१६ सालीं त्या विद्यापीठाचा उद्‌घाटन समारंभहि करविला. अशा अलौकिक पुरुषाची भेट झाल्यानें आम्हांस परमलाभ झाल्यासारखा वाटला.

## .१७.

माझी परीक्षा झाल्यानंतर मी प्रथम वऱ्हाड प्रांतांत वकिलीची सनद मिळविण्यासाठीं अर्ज केला. त्यावेळीं नागपूरचें स्वतंत्र विद्यापीठ नसल्यानें व वऱ्हाड हा औपचारिकरीत्या तरी निजामाचा प्रांत असल्यामुळें तो कारभाराच्या दृष्टीनें नागपूरहून निराळा समजला जाई, हें मागें सांगि-तलेंच आहे. मी सनदेचा प्रयत्न केला पण वऱ्हाडचें माझें नागरिकत्व

मी सिद्ध करूं शकलों नाहीं. यामुळें मला तेथें सनद मिळाली नाहीं. त्यानंतर मी खुद्द नागपूर प्रांतांत अर्ज केला, परंतु तेथपर्यंत माझ्या राष्ट्रीय चळवळींची हकीकत तेथील सरकारांना जाऊन पोहोंचल्यानें त्यावेळचे ज्यूडीशियल कमिशनर मि. ड्रेक ब्रॉकमन यांनीं मला भेटीस बोलावून खुलासा मागितला. नंतर कांहीं दिवसांनीं पुन्हां मला बोलावून सांगितलें कीं, "तुझ्याविरुद्ध सरकारजवळ आक्षेपक असा निश्चित पुरावा नसल्यानें तुला सनद न देण्याला तें कारण जरी मी देऊं शकलों नाहीं, तरी तूं या प्रांताचा कायमचा रहिवासी नाहींस इतकें मला म्हणतां येतें. म्हणून मी तुला तूर्त सनद देऊं शकत नाहीं. तूं कांहीं दिवस येथें स्थावर मिळकत घेऊन व आपलें वर्तन सरकारला पसंत पडेल असें ठेवून पुन्हां अर्ज कर म्हणजे मी तो मंजूर करीन." अशा रीतीनें मला नागपुरास सनद मिळूं शकली नाहीं. म्हणून मुंबई हायकोर्टांत मी अर्ज केला. तेथून मला उत्तर आलें कीं, फक्त मुंबई विश्वविद्यालयाची एल्‌एल्. बी. ची परीक्षा पास होणाऱ्यासच मुंबई इलाख्यांत सनद मिळूं शकते, असा येथील नियम असल्यानें माझा अर्ज मंजूर करतां येत नाहीं. त्यावेळचा नागपूरचा एल्‌एल्. बी. चा क्लास अलाहाबाद विद्यापीठाला जोडलेला असल्यानें तेथें खटपट करूं म्हटलें तर तेथें उर्दू भाषा उत्तम रीतीनें लिहितां वाचतां येते अशा बद्दलचा दाखला रुजूं केल्याशिवाय तेथेंहि सनद मिळूं शकत नाहीं असें मला कळलें. तो दाखला मी रुजूं करूं शकत नसल्यानें व शिवाय मला उत्तर प्रदेशासारख्या दूरच्या प्रांतांत राहण्याची इच्छा नसल्यानें मी तो विचारहि सोडून दिला. अशा प्रकारें दोन घरचाच नव्हे पण तीन घरचा पाहुणा उपाशी अशासारखा मी झाल्यानें, पुढें काय करावें याचा थंडपणें विचार करण्यासाठीं म्हणून, मी आपल्या गांवीं गेलों व अशा रीतीनें नागपूर प्रांतांत वकिली करून तेथें कायमचें वास्तव्य करण्याचा माझा बेत फसला.

या अवधींत, सातारा जिल्ह्यांतील वाई येथें श्री. शंकराचार्यांच्या हस्तें कोटिलिंगार्चनाचा मोठा समारंभ करण्यांत आला होता. त्यासाठीं मी गेलों होतों व त्यावेळीं महाबळेश्वर, पांचगणी व प्रतापगड किल्ला या ठिकाणींहि मी जाऊन आलों. प्रतापगडचें हें दर्शन मला दुसऱ्यानें घडलें.

यापूर्वींहि एकवेळ मी तेथें जाऊन आलोंच होतों.

नागपूरला अच्युतराव कोल्हटकर यांच्या ‘ देशसेवक ’ वर्तमानपत्राला परत-भेट म्हणून महाडचे कै. विष्णु गोपाळ नवाथे हे काढीत असलेल्या ‘ कुंडली विज्ञान ’ या नांवाच्या मासिकाचे अंक येत असत, ते माझ्या पाहण्यांत आले होते. त्यावरून मला त्या विषयाचें आकर्षण वाटूं लागलें व मी त्या मासिकाचे सर्व जुने अंक वाचून काढले व ते मी अच्युतरावांच्याकडून कायमचे मिळविले. पण त्या अभ्यासांत मला एक अडचण भासूं लागली. रा. नवाथे हे कट्टर सायनवादी असल्यानें त्यांच्या मासिकांतील ग्रहांच्या राशींचा व निरयन पंचांगांतील राशींचा मेळ बसेना. म्हणून त्यासंबंधींचा खुलासा मागण्यासाठीं मी रा. नवाथे यांना महाडास पत्र लिहिलें. त्यांचें उत्तर आलें कीं, यासंबंधाची माहिती पत्रानें देण्यासारखी नाहीं, असें म्हणून ती माहिती घेण्यासाठीं मला महाडास येण्याचें आमंत्रण दिलें. मलाहि त्यावेळीं कांहीं उद्योग नसल्यामुळें मी त्यांचें आमंत्रण स्वीकारून प्रथम माझ्या गांवीं जाऊन तेथून मुंबईवरून समुद्रमार्गें ‘ काली नदी ’ या बोटीनें महाडास गेलों. तेथें माझा मुक्काम सव्वा ते दीड महिना झाला. त्यावेळीं रा. नवाथे यांनीं मला अत्यंत प्रेमानें वागवून ज्योतिषाची पुष्कळच माहिती दिली व पुढील अभ्यासासाठीं म्हणून त्यांनीं जपून ठेवलेला वर्णनात्मक कुंडली-संग्रहहि मला दिला. तो मी पुढें सहा महिनेपर्यंत अभ्यासिला. रा. नवाथे यांचें आयुष्यांतील ध्येय पैसे मिळविणें हें नसून ज्योतिषशास्त्राचा नवीन सुशिक्षितांत प्रसार करणें हें होतें. त्यामुळें तर त्यांनीं जास्तच आनंदानें मला सर्व माहिती पुरविली. या प्रसंगाची सविस्तर हकीकत, मी आपल्या ‘ माझी ज्योतिषविषयक संस्मरणें ’ या नांवाची पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांच्या ‘ ज्योतिर्भूषण ’ या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेली जी लेखमाला आहे, तींत दिली असल्यामुळें तिची पुनरुक्ति येथें करीत नाहीं. तथापि इतकें अवश्य मी म्हणूं शकतों कीं, कै. श्री. नवाथे हे माझे ज्योतिष गुरु होते व त्यांच्या १९३१ सालीं झालेल्या मृत्यूपर्यंत त्यांचा व माझा स्नेह अबाधित रीतीनें चालू राहिला होता.

महाडाहून मी माझ्या गांवीं परत गेलों व तेथें माझ्या पुढील आयुष्यासंबंधानें जें ठरविलें तें यापुढें मी देत आहें.

## .१८.

सन १९१० सालीं माझे वडील वारले. त्यांना उदराचा विकार झाला होता. औषधोपचारासाठीं ते अखेरचे चार महिने खेडाहून पुण्यास आले होते. ते गेल्यानंतर आमचें खेडचें घरच विस्कळित झालें. त्यानंतर दोन वर्षांनीं मी बडोद्यास प्रयत्न केला व सन १९१२ सालीं तेथें वकिलीस आलों.

माझे वडील वकील होते हें मी पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यांचे एक पक्षकार मूळचे बडोद्याचे रहिवासी होते. त्यांनीं या सुमारास माझ्या वडिलांना सांगितलें कीं, बडोदें राज्यांत वकिलीच्या धंद्याला चांगला अवसर असून तें स्वतंत्र राज्य आहे. तेव्हां तेथें जाऊन तेथील सनद काढावी. त्यावेळीं लो. टिळक हे मंडाले येथें शिक्षा भोगीत असल्यानें ते अर्थातच पुण्यास नव्हते, पण मी मागें उल्लेखिलेले बडोद्याच्या बापट कमिशनमधील रा. बापट हे स्वतः लो. टिळकांचे परमस्नेही असल्यानें त्यांच्या घरीं नेहमीं येत असत, ते मला तेथें भेटले. बापट कमिशनसंबंधाची हकीकत कै. श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या टिळक चरित्रांत दिली असल्यानें मी ती येथें पुन्हां देत नाहीं. त्यांच्या मदतीनें मला पुढें बडोद्यांत वकिलीची सनद मिळाली.

वस्तुतः यापूर्वीं धंदेविषयक तीन निरनिराळ्या संधि मला मिळाल्या होत्या. प्रथमतः मी विलायतेस आय्. सी. एस्. च्या अभ्यासास जावें असा विचार मी बी. ए. झाल्यावर चालला होता. कारण मला आय्. सी. एस्. होण्यास अभ्यासासाठीं तेथें तीन चार वर्षें मिळण्यासारखीं होतीं. पण विलायतेंत जाण्यानें मनुष्य धर्मभ्रष्ट होतो व नशिबांत असेल तर आय्. सी. एस्च्या पगाराइतके पैसे येथेंहि स्वतंत्र धंद्यांत मिळूं शकतील अशा विचार-सरणीनें माझ्या वडिलांनीं तो बेत मोडून काढला. त्यानंतर म्हणजे फर्ग्युसन कॉलेजतर्फे मला अशी सूचना करण्यांत आली होती कीं, मी त्या संस्थेचा आजीव सभासद होऊन संस्थेच्या खर्चानें दोन वर्षें इंग्लंडमध्यें इंग्रजीचा व दोन वर्षें जर्मनींत संस्कृतचा अभ्यास करावा व पुढें परत आल्यावर फर्ग्युसन कॉलेजच्या शिक्षकवर्गांत दाखल व्हावें. ही सूचना मला प्रो. पानसे यांनीं

केली होती. पण तीहि पुढें बारगळली. त्यानंतरची तिसरी संधि मला सर्वांत आवडेल अशी होती. ज्यावेळीं मी बी. ए. झाल्यानंतर त्या परीक्षेची पदवी मला देण्यासंबंधानें युनिव्हर्सिटीतर्फे आक्षेप घेण्यांत आला, त्यावेळीं मला तो आक्षेप दूर करण्याच्या कामीं लो. टिळकांनीं मदत केली होती हें मी पूर्वी सांगितलेंच आहे. त्यावेळीं लो. टिळकांनीं आपला मनोदय मजजवळ प्रथमच बोलून दाखविला कीं, 'तुम्ही पुढें केसरीच्या संपादक-वर्गांत यावें अशी माझी इच्छा आहे. त्यासाठीं तुम्ही एल्‌एल्. बी. झालें पाहिजे; कारण केसरीचें संपादकत्व म्हणजे कायद्याच्या तारेवरील कसरत होय. ती करण्यासाठीं केसरीचा संपादक कायदे जाणणारा अवश्य पाहिजे.' कदाचित् ही सूचना पुढें अमलांतहि आली असती, पण तत्पूर्वींच लो. टिळकांना शिक्षा होऊन ते देशाबाहेर गेले होते. त्यामुळें अर्थांतच ही संधीहि निष्फळ झाली व शेवटीं बडोद्यांत वकिली करण्याचा योग मला आला.

रा. बापट हे कै. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या अत्यंत मेहेर-बानींतले होते व महत्त्वाच्या राजकीय बाबतींत रा. बापट यांनीं त्यांना अमूल्य मदतहि केली होती. त्यामुळें बापट कमिशननें जरी त्यांना अखेरीस निर्दोष ठरविलें तरी त्यांना पुढें नोकरींत न ठेवितां पेन्शन देऊन निवृत्त करण्यांत आलें. या निवृत्त जीवनांत ते पुणें येथें राहत असत. त्यांना मी माझी हकीकत सांगितल्यावर ते मला म्हणाले कीं, मी तुम्हांस बडोद्यांत नक्की सनद देववितों. असें म्हणून त्यांनीं मला त्यावेळचे न्यायखात्याचे नायब दिवाण कै. आप्पासाहेब शारंगपाणी व श्रीमंत संपतराव गायकवाड यांच्याकडे शिफारसपत्रें दिलीं. तीं घेऊन मी बडोद्यास गेलों. पण तेथें वरील गृहस्थांचा परिचय करून घेण्याव्यतिरिक्त रा. बापट यांच्या वजनाचा उपयोग करून घेण्याची जरुरी मला पडली नाहीं; कारण मला तेथें नियमा-प्रमाणेंच सनद मिळाली.

पण पुढें लौकरच माझ्या अपेक्षेप्रमाणें अडचण आलीच. ब्रिटिश सरकारच्या पोलिस खात्याकडून बडोदें सरकारकडे मजविरुद्ध तक्रार केली गेली व त्यावेळचे बडोद्याचे दिवाण श्री. बिहारीलाल गुप्त यांनीं मला अथवा बडोद्याच्या हायकोर्टालाहि न विचारतां एकतर्फी हुकूम करून माझी

सनद कायमची रद्द केली. मी रा. गुप्त यांना भेटून सर्व हकीकत समजावून सांगितली. तेव्हां ते गृहस्थ न्यायी असल्यानें त्यांनीं माझी सनद पुन्हां परत देण्याचें मला आश्वासन दिलें. पण त्यासाठीं मला बडोदें येथेंच सुमारें दहा महिने तसेंच रहावें लागलें. शेवटीं त्यांनीं पुन्हां विचार करून माझी सनद मला परत दिली व तेव्हांपासून मी येथेंच धंदा करीत आहे.

खरोखरी त्यावेळीं प्रचलित राजकारणांतून निवृत्त होण्याचा प्रसंग आल्यानें मला वाईट वाटलें; परंतु आत्मविचारानें माझें मलाच पटलें कीं, माझी खरी वृत्ति विद्यार्थ्यांचीच असून, लेखन–वाचनांत मला जो आनंद वाटतो तो इतर कशांतहि वाटत नाहीं. ही संधि मला बडोद्यास फार उत्कृष्ट मिळाली व तिचा मी अगदीं भरपूर फायदा घेतला आहे. माझ्या येण्यापूर्वीं २–३ वर्षें स्थापन झालेल्या येथील सेंट्रल लायब्ररीचा मी उत्तम उपयोग करून घेतला. येथील सरकारी ग्रंथमालेंतून व इतर ठिकाणीं मिळून मी सुमारें १५ ग्रंथ प्रकाशित केले. शेंकडों व्याख्यानें स्वतः दिलीं व हिंदुस्थानांतील अनेक विद्वानांना आमंत्रून श्रीमंत सयाजी-राव महाराज यांनीं त्यांचीं जीं व्याख्यानें करविलीं तीं ऐकण्याची संधि मी भरपूर घेतली. खुद्द श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या सहवासांत अनेक बौद्धिक प्रश्नांची चर्चा केली. बडोद्याबाहेरील अनेक वाङ्मयीन चळवळींत भाग घेतला व अशा रीतीनें माझी बौद्धिक भूक मी भागविली आहे व माझ्या आयुष्यांतील आवडीची गोष्ट करण्याची एकहि संधि मी दवडली नाहीं. हा मी बडोद्यास येण्यानें माझ्या दृष्टीनें मला अपूर्व लाभ झाला आहे.

यानंतरचीं ३–४ वर्षें माझा धंद्यांत जम बसविण्यांतच मीं घातलीं.

## .१९.

बडोद्यास पूर्वी गंगनाथ विद्यालय या नांवाची शुद्ध राष्ट्रीय शिक्षणाची शाळा स्थापन झालेली होती. तिचा उद्देश पुणें जिल्ह्यांतील तळेगांव येथें कै. प्रो. विजापूरकर यांनीं स्थापन केलेल्या समर्थ विद्यालयाप्रमाणेंच होता.

त्यामुळेंच त्यावेळच्या इंग्रज सरकारनें ज्याप्रमाणें तळेगांवचें समर्थ विद्यालय सक्तीनें बंद करविलें त्याचप्रमाणें बडोद्याचें गंगनाथ विद्यालयहि बंद करावयास लाविलें. म्हणून त्या विद्यालयाचा जो कांहीं निधी होता तो शिक्षणविषयांतच खर्च करण्याच्या दृष्टीनें त्या विद्यालयाच्या चालकांनीं तत्पूर्वीं बडोद्यास स्थापन झालेल्या एका स्वतंत्र विद्यालयास दिला. या विद्यालयाचें नांव महाराणी चिमणाबाई हायस्कूल असें ठेविण्यांत आलें. या संस्थेचा सेक्रेटरी म्हणून माझी १९२० सालीं नेमणूक झाली व त्या नात्यानें पुढील पांच वर्षेपर्यंत त्या संस्थेची व्यवस्था मजकडेसच होती. अशा प्रकारें एका शिक्षणसंस्थेचा अंतर्गत व्यवहार मजकडेसच असल्यानें शिक्षणविषयक प्रश्नांची बारीक माहिती मला होऊं शकली.

बडोद्यास सन १८९० सालीं येथील कांहीं विद्वान गृहस्थांच्या खटपटीमुळें मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठीं म्हणून ‘सहविचारिणी–सभा’ या नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली होती. त्या सभेचा सेक्रेटरी मी सन १९१६ ते १९१९ हीं तीन वर्षें होतों. सन १९१६ सालीं मी व कै. ज. स. कुडाळकर यांची नेमणूक झाली. रा. कुडाळकर हे येथील सरकारी मोफत वाचनालय संस्थांचे क्युरेटर–प्रमुख–होते. आम्ही उभयतां मिळून सन १९१९ पर्यंत सेक्रेटरीचें काम केलें. त्यानंतर सन १९२० सालीं या संस्थेचें मुखपत्र म्हणून एखादें नियतकालिक काढावें असें संस्थेनें ठरविलें व त्याचें नांव “सहविचार” असें ठेविलें. या नियतकालिकाचे संपादक म्हणून मी व प्रो. चिं. वि. जोशी या उभयतांची नेमणूक करण्यांत आली. या मासिकांतील लेख भारदस्त व वाङ्मयप्रवर्धक असावे अशी आम्ही काळजी घेत होतों. परंतु या मासिकाचा उत्कर्ष केव्हांहि झाला नाहीं. कांहीं वर्षेपर्यंत आम्ही या मासिकाच्या संपादकांचें काम करून पुढें तें सोडल्यावर दुसरे संपादक आले. त्यांनीं मासिकाच्या दुःस्थितीमुळें या मासिकाचें रूपांतर करून द्वैमासिक, त्रैमासिक, षण्मासिक व वार्षिक अशीं त्याला स्वरूपें दिलीं व अखेर तें बंद करण्यांत आलें. पण आमच्या संपादकत्वाच्या अवधींत सन १९२७ सालीं श्रीशिवाजी महाराजांचा त्रिशतवार्षिक उत्सव आल्यामुळें आम्ही त्या मासिकाचा खास अंक काढला होता. दुर्दैवानें त्या मासिकाला आश्रय न मिळाल्यामुळें तें अल्पजीवी

ठरलें व बडोद्यांतील वाङ्मय–प्रसाराचें एक चांगलें साधन नाहींसें झालें ही खेदाची गोष्ट होय.

त्या अवधींत येथील ‘ सहविचारिणी ’ सभेंत काम करून तिला नवीन चैतन्य देण्याच्या कामीं मी व माझे मित्र—येथील सेंट्रल लायब्ररीचे त्यावेळचे क्युरेटर कै. जनार्दन सखाराम कुडाळकर–या दोघांनीं सहचिटणीस म्हणून पुष्कळ मेहेनत केली व त्या सभेमार्फत एक ‘हेमंत–व्याख्यानमाला’ योजून ती पार पाडली. अशा रीतीनें वकिलीचा धंदा व वाङ्मयीन व्यवसाय यांत मिळून माझा काळ त्यावेळीं जात होता. माझे सहचिटणीस हे लायब्ररीच्या व्यवस्थेच्या कामांत फार हुषार असून, मद्रास येथें लॉर्ड विलिंग्डन हे तेथील गव्हर्नर असतांना तेथें जें पहिलें वाचनालय संमेलन भरलें त्याचे ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते. त्यावेळीं लॉर्ड विलिंग्डन यांनीं त्यांची मुक्तकंठानें प्रशंसा केली होती.

यानंतर १९१७ च्या फेब्रुवारी महिन्यांत इंदुरास महाराष्ट्र साहित्य संमेलन भरलें होतें त्याला मी गेलों होतों. त्या संमेलनाचे अध्यक्ष कै. गणेश जनार्दन आगाशे हे होते. संमेलनाच्या पहिल्याच दिवशीं कै. रा. तात्यासाहेब केळकर हे पुण्याहून संमेलनासाठीं आले असतां त्यांना तेथील संस्थानी पोलिसांनीं अडवून ठेविलें व पुढें त्यांना श्रीमंत सरदार माधवराव किबे, डॉ. तांबे वगैरे गृहस्थांनीं जाऊन सोडवून आणलें, ही त्यावेळची एक स्मरणीय गोष्ट घडली. संमेलनास संस्थानाधिपति श्रीमंत शिवाजीराव होळकर हे उपस्थित होते व त्यांनीं सभेमध्यें मराठी शब्दकोष तयार करण्यासाटीं म्हणून दहा हजार रुपयांची देणगी जाहीर केली. त्यावेळपर्यंत साहित्यपरिषदेला कायदेशीर घटना नसल्यामुळें या रकमेचा स्वीकार करतांना तशी घटना करणें अर्थातच अवश्य झालें. ती घटना घडविण्यासाठीं म्हणून तेथें एक समिति नेमण्यांत आली. तींत कै. आप्पासाहेब शारंगपाणी व मी या दोन बडोद्याच्या गृहस्थांचा समावेश केला गेला होता. पुढें ती घटना मंजूर झाली व इंदूरकरांनीं देऊं केलेले दहा हजार रुपये परिषदेस मिळाले.

त्यावर्षी बडोद्यास प्लेगची सांथ पसरली व आम्ही गांवाबाहेरील काशीविश्वेश्वराच्या मंदिरांत रहावयास गेलों, पण तेथें दुर्दैवानें आघात केलाच व

माझी पत्नी विषमाच्या आजारानें तेथेंच निधन पावली. ४।५ महिने तेथें राहून नंतर आम्ही गांवांत परत आलों.

यापूर्वी सन १९१६ सालीं माझें पहिलें पुस्तक 'सुधारणा आणि प्रगति' हें प्रसिद्ध झालें व त्यानंतरच्या काळांत एकामागून एक अशीं क्रमाक्रमानें इतर पुस्तकेंहि प्रसिद्ध झालीं.

यानंतर सन १९१९ सालीं माझा दुसरा विवाह झाला. माझी ही पत्नी अहमदनगरजवळील अकोळनेर येथील दाभोळकर या इनामदार घराण्यांतील होती.

याच सालीं अमृतसरला हिंदी राष्ट्रीय सभेचें सुप्रसिद्ध अधिवेशन भरणार होतें. त्यासाठीं लो. टिळक व त्यांच्या बरोबरचे शेंकडों अनुयायी खास गाडीनें जाण्यासाठीं मुंबईहून निघाले होते. त्यांनीं वाटेंत बडोदें येथें थोडा तरी वेळ मुक्काम करावा अशी त्यांना आगाऊ विनंति करण्यांत आली होती व ती त्यांनीं मान्य केली होती. त्याप्रमाणें त्यांची स्पेशल गाडी सायंकाळीं बडोद्यास येऊन पोचली. लो. टिळकांचे एक मित्र श्री. आप्पासाहेब शारंगपाणी हे त्यावेळीं बडोद्यासच सेवानिवृत्तींत राहत असत. त्यांच्याकडे त्यांनीं कांहीं तास मुक्काम केला. त्यावेळीं त्यांना व त्यांच्या बरोबरीच्या सर्व मंडळींना बडोदेकरांतर्फे एक थाटाची मेजवानी देण्यांत आली होती व त्यानंतर त्यांचें प्रचलित राजकारणावर एक व्याख्यान झालें. बडोद्यास त्यापूर्वीपासूनच्या जवळजवळ पंचवीस वर्षांत त्यांचें आगमन व व्याख्यान केव्हांहि झालेलें नव्हतें व त्याच्या पुढच्याच वर्षी म्हणजे सन १९२० सालीं ते निधन पावल्यानें अर्थातच सन १९१९ नंतर ते बडोद्यास आले नाहींत. यामुळें कित्येक वर्षांत त्यांच्या व्याख्यानाचा लाभ पहिल्यानेंच होत असल्यानें व्याख्यानाला अतोनात गर्दी झाली होती. त्या व्यवस्थेंत येथील इतर कार्यकर्त्यांच्या बरोबरच मीहि असल्यानें त्यावेळीं त्यांच्याशीं थोडेसें बोलण्याचा सुप्रसंग मला आला होता.

यानंतर याच सालीं लो. टिळक कॉंग्रेसच्या तर्फे डेप्युटेशन घेऊन विलायतेस जाणार होते. परंतु कोलंबोस गेल्यानंतर त्यांचा पासपोर्ट रद्द करण्यांत आल्यामुळें ते तेथें जाऊं शकले नाहींत. परंतु मुंबईहून विलायतेस जाण्यासाठीं निघण्यापूर्वी त्यांचे एक जुने स्नेही रा. विश्वनाथ आबाजी मराठे

यांनीं त्यांना आपल्या घरीं जेवणास बोलाविलें होतें. हा प्रसंग रा. मराठे यांनीं अगदीं खाजगी असा केला होता. रा. मराठे यांचा व माझा नात्याचा संबंध असल्यानें त्यांनीं मला लो. टिळकांच्या पंक्तीस भोजनासाठीं बोलाविलें होतें. त्याप्रसंगीं लो. टिळकांनीं मनमोकळेपणानें तत्कालीन राजकीय परिस्थितीविषयीं व विलायतेस आपण करणार असलेल्या कार्याविषयीं आणि त्यांतील संभाव्य यशापयशाविषयीं चर्चा केली. ती फार उद्‌बोधक अशी होती व तीमुळें त्यांचे अंतर्गत विचार आम्हाला कळूं शकले.

याच्या पुढील वर्षीं म्हणजे सन १९२० च्या मे महिन्यांत लो. टिळकांच्या राहत्या वाड्यांत त्यांनीं "चिरोल केस"मध्यें केलेल्या खर्चाची भरपाई करण्यासाठीं म्हणून, त्यांना तीन लाख रुपयांची थैली समर्पण करण्याचा समारंभ फार थाटानें उरकण्यांत आला. दुर्दैवानें त्या पूर्वीं कै. अच्युतराव कोल्हटकर यांनीं लो. टिळकांविषयीं गैरसमज पसरविणारीं कांहीं बेछूट विधानें वर्तमानपत्रद्वारा केलीं होतीं. वस्तुतः कै. अच्युतराव हे हाडाचे अस्सल देशभक्त असून त्यांना नागपुरास त्यांच्या 'देशसेवक' वर्तमानपत्रांतील कांहीं लेखांबद्दल राजद्रोहाच्या आरोपावर ज्यावेळीं सक्तमजुरीची शिक्षा झाली होती त्यावेळीं मध्यप्रांताच्या बेजबाबदार सरकारनें त्यांचे फार हाल केले होते. ते त्यांनीं आनंदानें सोसले होते, एवढेंच नव्हें तर त्याबद्दल त्यांनीं अवाक्षरहि आपल्या तोंडानें कधींहि काढलें नव्हतें. पण पुढें नागपूर सोडून ते मुंबईस आले व त्यांनीं 'Message' या नांवाचें वर्तमानपत्र काढलें. तें बुडीत ठरल्यामुळें असो अथवा अन्य कांहीं कारणांमुळें असो, त्यांच्या वृत्तींत फरक पडला व ते लो. टिळकांची निंदा करूं लागले. त्या निंदेंत त्यांनीं कांहीं खोटीं विधानेंहि केलीं होतीं. त्यांचा सडेतोड जबाब लो. टिळकांनीं पुण्याच्या या थैलीसमर्पण विधीच्या सभेंत दिला. त्यामुळें तर त्यानंतर कै. अच्युतरावांची जी नाचक्की झाली तिच्यांतून ते कधींच डोकें वर काढूं शकले नाहींत. यानंतर मृत्यूपूर्वीं एकदोन वर्षें अगोदर त्यांना बडोदें येथील सहविचारिणी सभेनें व्याख्यानासाठीं बोलाविलें होतें तेव्हां नागपूरच्या आमच्या निकट स्नेहामुळें अर्थातच ते मजकडे उतरले होते. तेव्हां त्यांच्या लो. टिळकांच्याविषयींच्या वर्तना-

बद्दलचा खुलासा मीं त्यांना विचारला असतां ते कांहींच बोलूं शकले नाहींत यावरून मी काय तें समजलों.

दुर्दैवानें हा समारंभ मे महिन्यांत झाल्यानंतर दोन महिन्यांनीं मुंबईस त्यांच्यावर सरकारनें केलेल्या आणखी एका खटल्यांत हजर होण्यासाठीं लो. टिळक मुंबईस गेले. त्या खटल्याचें काम पुरें झाल्यानंतर त्यांना ताप येऊं लागला व त्यांतच अखेर त्यांचा १ ऑगस्ट १९२० रोजीं अंत झाला. यामुळें त्यापूर्वीं दोन महिने अगोदर पुण्याच्या समारंभाच्या वेळीं मी तेथें गेलों असतांना ज्या कांहीं वेळां त्यांची व माझी भेट झाली ती अखेरचीच ठरली. बडोद्यांतील अनेक लोक त्यांच्या आजारीपणांत प्रत्येक तासाला त्यांच्या प्रकृतीच्या हकीकतीची प्रतीक्षा करीत असतांनाच एके दिवशीं रात्रीं त्यांच्या निधनाची हकीकत बडोद्यास कळली व सर्वांना दुःखाचा मोठा धक्का बसला.

पुढें सन १९२१ च्या जुलै महिन्यांत पुण्यास अखिल भारतीय ज्योतिष संमेलन भरविण्याचें पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन यांनीं ठरविलें. अशा प्रकारचें संमेलन पाहिल्यानेंच भरविलें जात होतें; व त्यामुळें त्याचें यश संशयितच होतें. तरीहि पंडित रघुनाथशास्त्री यांनीं हा प्रयत्न करण्याचें धाडस केलें. त्यासाठीं त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं त्यावेळीं ज्योतिषशास्त्राच्या प्रचारांत अग्रस्थानीं असलेले माझे गुरु श्री. विष्णु गोपाळ नवाथे यांचीच नेमणूक करण्याचा विचार पं. रघुनाथशास्त्री यांनी करून तशी पृच्छा त्यांनीं रा. नवाथे यांचेजवळ केली. पण रा. नवाथे यांनीं उदारपणें स्वतः अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें नाकारून त्या पदासाठीं माझें नांव सुचविलें. मला ही गोष्ट माहीत नव्हती. म्हणून पं. रघुनाथशास्त्री यांनीं ज्यावेळीं या संमेलनाचें अध्यक्षस्थान घेण्याबद्दल मला पत्र लिहिलें त्यावेळीं मी त्यांना उत्तरीं रा. नवाथे यांचें नांव सुचविलें. पण तेवढ्यांत मला रा. नवाथे यांनीं पत्रद्वारां झालेली सर्व हकीकत कळवून मलाच अध्यक्षस्थान स्वीकारण्याचा आग्रह केला. त्यावरून मी पं. रघुनाथशास्त्री यांना होकाराचें पत्र लिहिलें. एवढ्यांत प्रसिद्ध विद्वान कै. चिंतामणराव वैद्य यांनीं 'चित्रमयजगत्' या मासिकांतून फलज्योतिषावर हल्ला सुरू केला. श्री. चिंतामणराव वैद्य हे कांहीं बाबतींत

फार विचित्र गृहस्थ होते. वस्तुतः ते फलज्योतिषावर इतका विलक्षण विश्वास ठेवीत कीं, प्रत्येक दिवशीं कोणतेंहि काम करतांना ते ग्रहमान पाहिल्याशिवाय पाऊल टाकीत नसत. तरीहि यावेळीं त्यांनीं फलज्योतिष खोटें आहे असें लिहिण्याचा चंग बांधिला. त्यामुळें संमेलनाच्या चालकांची स्थिति अडचणीची झाली. इतक्यांत मला माझ्या पुण्याच्या कांहीं मित्रांकडून अशीं पत्रें आलीं कीं, तुम्ही या संमेलनाचें अध्यक्षस्थान घेऊं नये, कारण पुण्यांत ही सभा उधळून लावण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. अशा स्थितींत तुम्ही आल्यास तुमचें नांव विनाकारण बद्दू होईल. पण मी या सूचनांना भीक न घालतां आग्रहानें माझा होकार खरा करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें मी पुण्यास गेलों. पण तेथें गेल्यावर जें संमेलन झालें त्यांत विरोधाचा मागमूसहि दिसला नाहीं.

कै तात्यासाहेब केळकर हे त्या संमेलनासच केवळ नव्हे तर त्याच्या विषय समितींतहि हजर राहिले. कै. शिवरामपंत परांजपे यांनीं तर माझ्या अध्यक्षस्थानाचा ठरावच स्वतः सभेपुढें मांडिला. मीहि भर संमेलनांत विरोधकांना पुढें येऊन आपला विरोध दर्शविण्याचें उघड आव्हान दिलें. पण एकहि मनुष्य पुढें आला नाहीं. त्या प्रसंगीं स्वागताध्यक्षाचें स्थान कै. वामनराव पोतदार या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध गृहस्थांनीं स्वीकारलें होतें. संमेलन उत्तम रीतीनें पार पडलें; हें पाहून तेथें उपस्थित असलेले माझे गुरु रा. नवाथे यांच्या डोळ्यांतून पडलेले आनंदाश्रू मी कधींहि विसरणार नाहीं. अशा प्रकारें हें कार्य पुरें होतें तोंच दुसऱ्या एका संमेलनाची धुरा वाहण्याचें कार्य मजकडे आलें.

इंदुरास १९१७ सालीं साहित्यसंमेलन झाल्यापासून त्याची बैठक ४ वर्षेपर्यंत झालीच नव्हती. वस्तुतः त्यापुढील संमेलन नागपुरास भरावें असें त्या संमेलनांतच ठरलें होतें. पण या बाबतींत नागपूरचे लोक कांहीं हालचाल करीनात; मग त्याचें कारण काय असेल तें असो. तेव्हां पुढील संमेलन बडोद्यास भरवावें असें येथील सहविचारिणी सभेनें ठरविलें व त्याप्रमाणें तयारी सुरू झाली. संमेलनाचा मुख्य चिटणीस मी होतों व स्वागतमंडळाचे अध्यक्ष कै. श्री. संपतराव गायकवाड हे होते. या संमेलनाचें अध्यक्षस्थान कोणास द्यावें याबद्दल वाटाघाट होऊन स्वागतसभेनें

असें ठरविलें कीं, श्रीमंत संपतराव व मी दोघांनीं मिळून पुण्यास एक तज्ञ लोकांची सभा बोलवावी व त्या सभेच्या मताप्रमाणें अध्यक्षाची नेमणूक सहविचारिणी सभेनें करावी. त्या वर्षीच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक समारंभाचें अध्यक्षस्थान श्रीमंत संपतराव यांना दिलें असल्यानें ते पुण्यास जाणारच होते. त्यांच्या बरोबरच मीहि गेलों. आम्ही तेथें इचलकरंजीकरांच्या वाड्यांत राहिलों होतों. तेथें आम्ही पुण्याच्या सुमारें ५०–६० प्रसिद्ध साहित्यिकांची सभा बोलाविली व तींत बडोद्याच्या संमेलनाचें अध्यक्षस्थान कै. रा. तात्यासाहेब केळकर यांना द्यावें असें मत पडलें. त्यावरून आम्ही बडोद्यास परत आल्यावर तशा अर्थाचा ठराव कार्यकारी मंडळांत करून तो रीतसर केळकर यांना कळविला.

परंतु या उद्योगाचा प्रवाह सुरळीत चालण्याचा योग नव्हता. हें साल सन १९२१ चें होतें. त्यासालीं ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यांत त्यावेळचे केसरीचे संपादक कै. तात्यासाहेब केळकर यांनीं केसरींतून कोल्हापूरचे त्यावेळचे महाराज कै. शाहू छत्रपति यांच्या लो. टिळकांविरुद्धच्या उपद्-व्यापाची माहिती प्रसिद्ध केली. शाहू छत्रपतींनी लो. टिळकांच्या विरुद्ध इंग्रज सरकाराशीं कारस्थान चालवून त्यांचें काम अटकविण्याची अमूलाग्र खटपट केली होती. तिचा सर्व पत्रव्यवहार केसरींतून प्रसिद्ध झाला होता. यामुळें तेथील कांहीं मंडळी संतापली व शाहू छत्रपती हे श्रीमंत सयाजीराव महाराज यांचे व्याही असल्यानें त्यांच्याविरुद्धचें केसरीचें प्रकाशन श्रीमंत सयाजीराव महाराज यांना अप्रिय होईल अशी सबब सांगून, तात्यासाहेब केळकर यांची या संमेलनाच्या अध्यक्षपदीं झालेली नेमणूक रद्द करण्याचा प्रश्न उपस्थित केला. कै. केळकरांना सभेचें आमंत्रण रीतसर दिलें असल्यानें त्यांची नेमणूक आतां रद्द कशी करतां येईल असा प्रश्न निघाला त्यावेळीं या नाराज मंडळींनीं असें सुचविलें कीं, केळकरांच्या कोणी मित्रा-मार्फत त्यांना ही हकीकत कळवून त्यांच्याकडूनच आपण संमेलनाचे अध्यक्ष होण्यास कबूल नाहीं असें पत्र आणविण्याची व्यवस्था करावी. परंतु असल्या खटपटीला न बधतां स्वागताध्यक्ष श्रीमंत संपतराव भक्कम राहिले व सभेपुढें आलेली सूचना त्यांनीं फेटाळून लाविली.

तथापि आणखी एका दिशेनेंहि रा. तात्यासाहेब केळकर यांची

नेमणूक रद्द करण्याची खटपट चालली होती. कै. रा. दामोदर गणेश पाध्ये या नांवाचे गृहस्थ, मुंबईच्या सर गोकुळदास तेजपाल हायस्कूलचे निवृत्त मुख्याध्यापक, यांना इंदूरच्या महाराजांनीं दिलेल्या १०,००० रुपये देणगीचे कोषाधिकारी म्हणून नेमण्यांत आलें होतें. तथापि त्यांनीं ती रकम अथवा तिचें व्याजहि साहित्यपरिषदेस देण्याचें साफ नाकारलें. इतकेंच नव्हें तर त्यांनीं एक तार करून मला मुंबईस बोलाविलें. मी तेथें गेल्यावर त्यांनीं मला सांगितलें कीं, तुम्ही केलेली अध्यक्षाची निवडणूक आम्हांला मान्य ठेवतां येत नाहीं; कारण आम्हीं त्या कामीं अगोदरच इचलकरंजीचे अधिपति श्रीमंत बाबासाहेब घोरपडे यांना अध्यक्षस्थान देण्याचें ठरविलें आहे. मी त्यांना जबाब दिला कीं, संमेलन बडोदेकर मंडळी स्वतः मेहेनत व खर्च करून भरविणार असल्यानें अध्यक्ष निश्चित करण्याचा काडीचाहि अधिकार तुम्हांस नाहीं. म्हणून आम्ही तुम्हांस ओळखीत नाहीं व तुमच्या विरोधाची पर्वाहि करीत नाहीं. इतकेंच नव्हें तर तुम्ही विरोध केल्यास संमेलनांतून शिल्लक राहिलेल्या रकमेचा चतुर्थांशहि आम्ही तुम्हांस देणार नाहीं. आम्हांस परिषदेच्या अनुमतीची जरूर नाहीं. आम्ही आपलें संमेलन स्वतंत्र रीतीनें करूं. असें सांगून मी परत आलों व त्याप्रमाणें तें संमेलन भरलें.

आजपर्यंत भरलेल्या सर्व मराठी साहित्य संमेलनांत हें संमेलन वैभवानें, उत्साहानें, उदारपणानें व विद्वत्तेनें सर्वश्रेष्ठ झालें असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. तरीहि आम्हां कार्यकर्त्यांना आणखी एका दिव्यांतून जावें लागलें. त्याचा प्रकार असाः—

संमेलन ज्या दिवशीं भरण्याचें ठरविण्यांत आलें होतें त्यापूर्वी दोनच दिवस अगोदर, श्रीमंत सयाजीराव गायकवाड विलायतेहून हिंदुस्थानांत आले. ते आल्यावर आम्हांस अशी बातमी लागली कीं, संमेलनाच्या सुरुवातीच्या आदल्या रात्रींच ते दिल्लीस जातील. असें होण्यानें अर्थातच संमेलनास पूर्वी विरोध करणाऱ्या मंडळींना फावलें असतें व त्यांना असें म्हणण्यास जागा मिळाली असती कीं, रा. केळकरांना अध्यक्ष केल्यामुळेंच, तें संमेलन टाळण्यासाठीं महाराज दिल्लीला निघून गेले. यामुळें महाराजांच्या जाण्याची बातमी आम्हांस कळल्यावर, महाराज बडोद्यास आल्याबरोबर

या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्रीमंत संपतराव गायकवाड व संमेलनाचा मुख्य चिटणीस मी अशा दोघांनीं मिळून महाराजांची भेट घेतली व सर्व हकीकत त्यांना निवेदन केली. त्यावेळीं महाराजांनीं सांगितलें कीं, संमेलन टाळण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. पण दिल्लीस व्हाईसरॉय यांना भेटण्याची योजना मी विलायतेहूनच केली असल्यानें ती आतां टाळणें शक्य नाहीं. असें सांगून व थोडा वेळ विचार करून त्यांनीं आम्हांस सांगितलें कीं, याला एक उपाय आहे. जर तुम्ही आपलें संमेलन ठरल्याच्या आदल्या दिवशीं दुपारीं भरवूं शकाल तर मी त्यास जरूर हजर राहीन व रात्रीच्या गाडीनें दिल्लीस जाईन. महाराजांच्या या सूचनेचा आम्ही स्वीकार केला व सर्व बाहेरच्या प्रतिनिधींना तारा करून संमेलनाच्या तारखांतील फेरबदल त्यांना कळविला. त्याप्रमाणें सर्व प्रतिनिधी आले व हें संमेलन अत्यंत थाटानें पार पडलें.

हें संमेलन येथील इंदुमती महालाच्या विशाल प्रांगणांत भरलें होतें. त्याला श्रीमंत महाराज, राजघराण्यांतील इतर सर्व मंडळी, द्वारकापीठाचे श्री शंकराचार्य, बडोद्याचे रेसिडेंट, दिवाण सर मनुभाई मेहता व येथील झाडून सर्व अधिकारी हजर होते. संमेलनाच्या सुरुवातीपूर्वी अध्यक्ष कै. केळकर यांनीं मला सांगितलें कीं, “ माझ्या भाषणांतून कोणीहि प्रसिद्ध व्यक्तीनें उठून जाऊं नये असें माझें मत आहे. माझें भाषण पुरें होण्यास २–२॥ तास तरी लागतील. इतका वेळ बसण्याची महाराजांची तयारी नसली तर माझें भाषण हवें तेवढें लहान करण्यास मी तयार आहें. ” अर्थात् याबद्दल महाराजांना कोण विचारूं शकणार होता व त्यांच्याबद्दल अशी हमी कोण देणार होता ? म्हणून मी आपल्या मनानेंच श्री. केळकर यांना सांगितलें कीं, “ तुमच्या भाषणांतून महाराज मधून उठून जाणार नाहींत. तुम्ही आपलें भाषण एक शब्दहि न गाळतां पुरें वाचा. ” यानंतर त्याप्रमाणें श्री. केळकरांनीं आपलें भाषण पुरें वाचून दाखविलें. त्याला जवळजवळ तब्बल अडीच तास लागले. तरीहि महाराज मधून उठून गेले नाहींत, इतकेंच नव्हे तर त्यांनीं मला केळकरांचें भाषण चालू असतांनाच बोलावून सांगितलें कीं, जमलेल्या प्रतिनिधींपैकीं निवडक शंभर मंडळींना आजचा कार्यक्रम संपल्यानंतर सरकारी उद्यानोपहाराचें आमंत्रण तुम्ही

दरेकाजवळ जाऊन स्वतः द्या. त्याप्रमाणें मी आमंत्रण दिलें व कार्यक्रम संपल्यानंतर तो उद्यानोपहार इमारतीच्या मागल्या बाजूच्या विस्तीर्ण पटांगणांत झाला. त्यावेळीं दरेक प्रतिनिधीची ओळख करून देण्याचें काम मला सांगितलें. त्याप्रमाणें मी केलें. नंतर सुमारें एक तासानें हा समारंभ संपल्यानंतर श्री. केळकर यांची महाराजांनीं कांहीं वेळ स्वतंत्र खाजगी मुलाखत घेतली. त्यांत अनेक राजकारणी प्रश्नांचा ऊहापोह त्यांनीं केला. त्यावेळीं मी हजर होतों. ही मुलाखत रात्रीं ११ वाजतां संपल्यानंतर महाराज स्टेशनवर जाऊन आपल्या खास डब्यांत निजले व नंतर दिल्लीस रवाना झाले.

या संमेलनांतील श्री. केळकरांचें भाषण हें आजपर्यंतच्या सर्व अध्यक्षीय भाषणांत मेरुमण्यासारखें श्रेष्ठ ठरलें आहे. या भाषणांतच त्यांनीं आपली 'सविकल्प समाधि' ची उपपत्ती प्रतिपादिली. ती प्राचीन साहित्यकार आचार्यांच्या उपपत्तीच्या तोडीची आहे हें आतां सर्वमान्य झालें आहे.संमेलनास आलेल्या प्रतिनिधींकडून भोजनाबद्दल व राहण्याबद्दल कांहींहि शुल्क घेण्यांत आलें नव्हतें. या संमेलनाच्या अखेरीस नागपूरचे कवि श्री. आनंदराव टेकाडे यांनीं आपली 'हा हिंद देश माझा' ही सुप्रसिद्ध कविता म्हटली, तेव्हां तर सभागृहांत देशभक्तीचा व उत्साहाचा पूरच ओसंडून गेला. अशा प्रकारें हें संमेलन त्याच्यावर आलेल्या अनेक विघ्नातून पार पडून अत्यंत यशस्वी रीतीनें साजरें होऊन गाजलें.

यानंतरच्या वर्षी म्हणजे सन १९२२ साली पुण्यास कविसंमेलन भरविण्यांत आलें होतें. माझ्या समजुतीप्रमाणें हें पहिलें व शेवटचेंच कवि संमेलन भरलें. त्यांतहि मी भाग घेऊन भाषण केलें होतें.

## .२०.

या वर्षी एका विशेष कामासाठीं माझी योजना झाली. श्रीमंत सयाजीराव यांच्या द्वितीय चिरंजीवांचें लग्न धारच्या महाराजांच्या नातेवाईक कन्येशीं घाटत असतांना त्यामध्यें कांहीं विक्षेप आल्यामुळें तो

दूर करून, या लग्नास धारचे माजी महाराज श्रीमंत उदाजीराव पवार यांची संमति मिळविण्याचें काम मला सांगण्यांत आलें. त्याप्रमाणें मी तेथें जाऊन, उपस्थित झालेला उभयपक्षांतील गैरसमज दूर करून लग्न निश्चित करण्याच्या कामांत यशस्वी झालों व त्यानंतर तो विवाहहि बडोद्यास साजरा करण्यांत आला.

यानंतर असाच एक दुसरा प्रसंग मला आला. श्रीमंत सयाजीराव यांच्या कन्या इंदिराराजे यांचा विवाह कुचबिहारच्या महाराजांशीं सन १९१३ सालीं झाला होता. ते महाराज सन १९२२ च्या अखेर विलायतेस निधन पावले व श्रीमती इंदिराराजे लवकरच कुचबिहारला परत आल्या. तेथें त्यांच्या अज्ञान चिरंजीवांना राज्याभिषेक व्हावयाचा होता. पण त्या बालराजांच्या अज्ञानपणांत राज्यकारभाराची जी व्यवस्था करण्याचें ब्रिटिश सरकारनें योजिलें होतें त्यांत श्री. इंदिराराजे यांना स्थान न देण्याची व्यवस्था होती. अर्थातच त्यांच्या मानी स्वभावाला हें न पटल्यानें त्यांनीं त्या कामीं व्हाइसरॉय यांच्यापर्यंत कायदेशीर खटपट करण्याचें ठरविलें. त्यापूर्वींच्या कांहीं वर्षांपासून बडोद्याच्या राजघराण्याशीं माझा निकट संबंध आलेला होता. त्यामुळें माझा थोडाबहुत सल्ला घेण्यासाठीं म्हणून तार करून कुचबिहारच्या महाराणीसाहेबांनीं मला बोलाविलें होतें. कुचबिहारचा पल्ला दूरचा व तें स्थान मला अपरिचित म्हणून मी जरा जाण्यास हो ना करीत होतों. पण शेवटीं मी तेथें गेलों. कुचबिहारला जवळ जवळ पंधरा दिवस मी राहिलों. तेथील सौंदर्य फार रम्य आहे. हिमालयाच्या रांगा त्या शहराच्या मागें उत्तरेस असून त्या निरंतर बर्फाच्छादित असल्यानें त्यांच्याकडे नुसत्या डोळ्यानें दिवसा पाहाणें अपायकारक असतें व म्हणून रंगाचा चष्मा घालूनच त्यांच्याकडे पाहावें लागतें. कुचबिहार हें संस्थान आसामच्या जवळ असल्यानें तेथें हत्ती मोठ्या कदाचे व पुष्कळ असतात. अशा अनेक हत्तींच्या सोंडांत अभिषेकाचे सच्छिद्र कलश देऊन, त्यांना वर्तुळाकार उभे करून, त्यांच्याकडून नवीन राजावर राज्याभिषेकाच्या वेळीं जलसिंचन करविण्याचा देखावा तर मला फारच अपूर्व वाटला. त्या राज्यांतील ‘ जयंती ’ या नांवाचें हिमालयाच्या पायथ्याशीं अखेरचें ठिकाण आहे. तेथें जाऊन आम्ही

हत्तीवरून फिरलों. तें स्थान ‘ तराई ’ जंगलांतील असल्यामुळें तेथें एक विशेष चमत्कार पहाण्यांत आला. तो असा कीं, तेथील गवत इतकें उंच होतें कीं, हत्तीवर बसून आम्ही ज्या गवतांतून गेलों त्याच्यापेक्षां उंच त्या गवताचीं टोकें वाढलेलीं होतीं. कुचबिहारहून मी कलकत्त्याला परत आल्यावर जगन्नाथपुरी व भुवनेश्वर या क्षेत्रांचीहि भेट घेतली. तसेंच तेथून काशी येथें येऊन तेथील हिंदुविद्यापीठ व त्या गांवापासून थोड्या अंतरावर असलेलें ‘ सारनाथ ’ हें गौतमबुद्धाच्या प्रथम उपदेशाचें स्थानहि अवलोकिलें. अशा रीतीनें हा अनपेक्षित व अत्यंत आल्हाददायक प्रवास पुरा करून मी मार्च महिन्यांत बडोद्यास परत आलों.

या सुमारास एक दोन वर्षांपूर्वींपासून माझ्या मुंबईसहि अनेक खेपा झाल्या. रा. सरदेसाई बंधूंमध्यें सन १९२१ पासून चाललेल्या दिवाणी खटल्यांत वादीतर्फे वकील मी होतों व म्हणून त्या कामांत कमिशननें साक्षी घेण्यासाठीं मुंबई, भावनगर वगैरे ठिकाणीं मला जावें लागलें.

सन १९२३ व २४ सालीं माझ्या बंधूचें लग्न, मुलाची मुंज व मुलीचें लग्न अशीं कार्यें करण्यांत आलीं.

सन १९२६ सालीं मुंबईस इंदूरचे श्रीमंत सरदार किबे यांच्या अध्यक्षतेखालीं साहित्यसंमेलनाची बडोद्यानंतरची बैठक भरली होती व त्यापुढील सालीं १९२७ ला मुंबईनंतरची बैठक पुण्यास श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. या दोन्ही प्रसंगीं मी हजर होतों. तेथें साहित्य परिषद व 'साहित्यसंमेलन या उभयसंस्थांतील वाद फार कडाक्यानें आम्ही लढविला. आमचे प्रतिपक्षी अर्थातच त्यावेळचे परिषदेचे मिरासदार कै. दामोदर गणेश पाध्ये हे होते. ते जेव्हां परिषदेचा निधि व त्याचें व्याज देण्यास नाकबुली दर्शवूं लागले, त्यावेळीं हें प्रकरण कोर्टांत नेण्याची धमकी आम्हीं रा. पाध्ये यांना दिली तेव्हांच ते नरमले व त्यांनीं परिषदेस मूळ रकमेचें व्याज देऊं केलें व अशा रीतीनें हा वाद आम्ही जिंकला.

सन १९२७ साल हें श्री शिवाजीमहाराजांच्या जन्माचें त्रिशत्–सांवत्सरिक वर्ष होतें. म्हणून तो उत्सव बडोद्यास फार मोठ्या प्रमाणांत

करण्याची योजना केली होती. या समारंभाचे मी व माझे स्नेही प्रो. माणिकराव असे दोघे सहचिटणीस होतों. त्या समारंभांत येथील सुप्रसिद्ध कलाकार श्री. महादेव काशिनाथ कोल्हटकर यांनीं केलेल्या श्री शिवाजी-महाराजांच्या पुतळ्याची शास्त्रशुद्ध प्राणप्रतिष्ठा करण्याची योजना केली होती. तो पुतळा श्री. कोल्हटकर यांच्या घरून पालखींतून सर्व शहरभर मिरवून आणण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें मिरवणूक काढली होती. तींत हजारों लोक सामील झाले होते. पण याच प्रसंगीं बडोद्यांत माझ्या आठवणीच्या अनेक वर्षांत झालेला पहिला हिंदुमुसलमानांचा दंगा झाला. मिरवणूक राव-पुऱ्यांतून येत असतां वाटेवरच्या एका मशिदींत अनेक मुसलमान एकत्र झाले होते व तेथें त्यांनीं दगड, विटा व काठ्या वगैरेंचा फार मोठा संग्रह करून ठेवला होता. त्या मशिदीसमोर श्री शिवाजीमहाराजांची पालखी येतांच मुसलमानांनीं दगड विटा यांचा इतका प्रचंड हल्ला केला कीं, त्यामुळें माणसेंहि ओळखूं येईनाशीं झालीं. पालखीजवळूनच मी व प्रो. माणिकराव चाललों होतों. मुसलमानांचा उद्देश शिवाजी महाराजांची मूर्ति फोडण्याचा होता. तपास करितां असें कळलें कीं, बडोद्याच्या कांहीं माथेफिरू मुसलमानांनीं बाहेरून भाडोत्री गुंड बोलावून हा हल्ला करविला होता. परंतु त्यावेळी मुसलमानांना असा जबरदस्त चोप बसला कीं, त्यानंतरच्या अनेक वर्षांत त्यांनीं हिंदूंच्या विरुद्ध वर डोकें काढलें नाहीं. हा हल्ला मुसलमानांनीं मशिदीवरून वाद्यें वाजवीत नेण्याच्या निमित्तानें केला होता. त्यानंतर श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं पूर्वीचे सर्व कागदपत्र पाहून व तपासून असा हुजूर हुकूम काढला कीं, बडोदे राज्यांतील कोणत्याहि रस्त्यावरून वाद्यें वाजवीत जाण्याचा सर्व नागरिकांना पूर्ण हक्क आहे व त्याला कोणीहि बंदी करतां कामा नये, केल्यास तो गुन्हा समजला जाईल. असो. अशा रीतीनें मूर्तीला कांहींहि अपाय न होतां ती प्रो. माणिक-रावांच्या व्यायामशाळेंत सुरक्षित आणण्यांत आली.

शिवरायांच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचा मुख्य समारंभ दुसऱ्या दिवशीं योजण्यांत आला होता. ती प्राणप्रतिष्ठा कोल्हापूरच्या महाराणी व श्रीमंत सयाजीराव यांची नात श्रीमंत इंदुमतीराजे भोसले यांच्या हस्तें करण्याचें ठरलें होतें. समारंभासाठीं बारा ब्राह्मणांना आगाऊ आमंत्रण देऊन ठेवलें

होतें. व त्यांनींहि येण्याचें कबूल केलें होतें. पण चमत्कार असा कीं, शिवाजी महाराजांसारख्या पुरुषाची देवाप्रमाणें प्राणप्रतिष्ठा करण्याचें सदरहू ब्राह्मणांना नापसंत असल्यानें त्यांच्यापैकीं एकहि जण दुसऱ्या दिवशीं समारंभाच्या वेळीं हजर झाला नाहीं. त्यांच्याकडे तपास करवितां, त्यांतील कांहीं जण बाहेरगांवीं निघून गेल्याचें कळलें. कांहींनीं स्वतः आजारी असल्याचें सांगितलें व या ना त्या कारणानें कोणीहि तेथें येईना. व्यायामशाळेचें पटांगण तर सहस्रावधि आमंत्रित पाहुण्यांनीं फुलून गेलें होतें. पण ऐनवेळीं असा दगा झाल्यानें विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा जाहीर केल्याप्रमाणें कशी करावयाची हा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळीं मी सांगितलें कीं, मी सर्व वैदिक कर्म शिकलों आहें. विधि मला मुखोद्‍गत नसले तरी पोथीवरून मी पुरोहिताचें काम योग्य रीतीनें करूं शकेन. त्याप्रमाणें मी घरून पोथी मागवून तीवरून सर्व काम उरकलें व विधिपूर्वक प्राणप्रतिष्ठा पूर्ण झाली. हा शिवाजीमहाराजांचा अर्धपुतळा व्यायाम मंदिराला जोडून बडोद्याचे माजी सुप्रसिद्ध अधिकारी व देशभक्त कै. खासेराव जाधव यांच्या स्मरणार्थ त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांचे कनिष्ठ बंधु कै. मेजर माधवराव जाधव यांनीं बांधून दिलेल्या खास मंदिरांत बसविण्यांत आला आहे व तेथें प्रतिवर्षीं वैशाख महिन्यांत शिवाजी महाराजांच्या जन्मतिथीच्या प्रसंगीं उत्सव अजूनहि साजरा करण्यांत येतो.

## .२१.

याच सालीं बडोद्याचे माजी दिवाण सर मनुभाई मेहता हे निवृत्त झाले व त्यांच्या जागीं सर व्ही. टी. कृष्णमाचारी यांची नेमणूक होऊन त्यांना अधिकाराचीं वस्त्रें श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या वाढदिवसाच्या दरबाराच्या प्रसंगीं देण्यांत आलीं. या दिवाणांनीं बडोद्याच्या इतिहासांत सर्वांत लांब मुदतीपर्यंत म्हणजे १७॥ वर्षें दिवाणगिरी केली.

या वर्षाच्या जुलै महिन्यांत बडोद्यास विलक्षण पाऊस पडून महापूर आला. सात दिवसांत मिळून ६४ इंच पाऊस पडला. त्यामुळें बडोद्या-

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 24908 दि: ११-
क्रमांक 808 नोंद दि. 93/

नजीकचा एक तलाव फुटला व त्याचेंहि पाणी बडोद्यांत शिरलें. या पुरानें इतका कहर झाला कीं, बडोद्यांतील सर्वांत खोल अशा भागांतील बंगल्यांचे दोन दोन मजले पाण्यानें भरून गेले. कांहीं माणसें पुराच्या जोरानें वाहवलीं, तीं वाटेंतील झाडांवर अडकलीं गेलीं व तेथें तीन तीन दिवस राहिलीं. शहरांतील सर्व दळणवळण तुटून गेलें. रेल्वेची वाहतूक बंद झाली. विजेचा कारखाना बंद पडला व त्यामुळें बडोद्याचा सर्व जगाशीं असलेला संबंध थोडे दिवस तुटला. शहरांतील असंख्य घरें पडलीं व त्याखालीं कित्येक लोक चिरडून मेले. पण त्यानंतर पूर ओसरल्यानंतर बडोद्याच्या म्युनिसिपालिटीनें घेतलेल्या सुंदर इलाजांमुळें शहरांत रोगाची साथ पसरेल अशी जी भीति होती ती मात्र खरी ठरली नाहीं.

या पुरामुळें उध्वस्त झालेलीं असंख्य घरें बांधून लोकांना अनेक प्रकारची मदत देण्यासाठीं म्हणून एक मध्यवर्ती समिति स्थापन करण्यांत आली. तिचे अध्यक्ष कै. श्रीमंत महाराजकुमार धैर्यशीलराव हे होते. शहराचे भाग पाडून त्यावर एक एक चिटणीस नेमण्यांत आला होता. बाबाजीपुरा या भागाचें चिटणीसपद मजकडे होतें. जुनीं पडलेलीं घरें उकरून काढून त्याखालीं दबलेलीं माणसें व मालसामान काढावें लागलें. अशा एका प्रसंगीं श्रीमंत धैर्यशीलराव यांनीं स्वतः हातांत कुदळ घेऊन खणलें. हें एकंदर काम जवळजवळ वर्षदीडवर्ष पुरलें. तेवढ्या अवधींत शहराची सफाई झाली व समितीतर्फे देण्यांत आलेल्या मदतीनें कित्येक लोकांनीं आपलीं घरें नवीन व पक्कीं बांधलीं. तीं पूर्वीपेक्षां अधिक चांगलीं व टिकावू झालीं. अशा रीतीनें, अखेर परिणामीं, बडोदें शहराचा या पुरामुळें एका अर्थानें लाभच झाला होता. मात्र त्या पुराच्या भयंकर दिवसांत लोकांवर ओढवलेलें संकट व त्यांनीं वाहिलेली काळजी भयावह होती. या पुरामुळें बडोद्यास आणखी एक लाभ झाला. तो येथें नमूद केला पाहिजे.

या पुरामुळें नुकसान झालेल्या लोकांपैकीं अनेक जातींच्या लोकांनीं आपआपल्या ज्ञातीबांधवांना मदत केली, पण ब्राह्मण वर्गाच्या लोकांना कांहींहि मदत मिळूं शकली नाहीं. त्यावेळीं इंदूरच्या ब्राह्मणसभेनें आपण होऊन त्यांच्याकडे मागणी न करतांहि ७०० रुपयांची मदत बडोद्यांतील

ब्राह्मणसमाजाकरितां पाठविली हें त्यांना अत्यंत भूषणास्पद आहे. यामुळें स्फूर्ति होऊन बडोद्यास ब्राह्मणसभा स्थापण्याची योजना बडोद्याचे त्या वेळचे सर न्यायाधीश ( चीफ जस्टिस ) कै. गोपाळ कृष्ण दांडेकर यांच्या प्रमुखत्वानें करण्यांत आली. नेहमींच्या प्रत्याघाती स्वभावाप्रमाणें कांहीं उपद्व्यापी गृहस्थांनीं या सभेच्या स्थापनेस प्रारंभींच्या सभेंतच विरोध केला व तो कांहीं काळपावेतों चालूहि ठेवला. पण कै. दांडेकर यांच्या अथांग परिश्रमांमुळें व त्यांच्या वजनामुळें या विरोधी लोकांचें कांहीं चाललें नाहीं. पुढें विरोधीहि या संस्थेंतच दाखल झाले व संस्थेच्या संस्थापकांपैकीं आपण स्वतः असल्याचें प्रतिपादन करूं लागले. कांहीं काळपर्यंत ही सभा भाड्याच्या जागेंत आपली कचेरी ठेवून काम करीत असे. पण त्यानंतर संस्थेला एक सुंदर इमारत करण्याचा बेत श्री. दांडेकर यांनीं केला व त्यासाठीं रक्कम गोळा करण्यास सुरुवात केली. कै. दांडेकर यांचे बरोबरच येथील कै. डॉ. रा. भि. जोशी यांचीहि मदत या कार्यांत फार झाली. पुढें प्रताप रस्त्यावरील मोकळी जागा खरेदी करून त्यावर ही भव्य इमारत बांधण्यांत आली आहे. तिला विटा वगैरे सामान पुरविण्याचें कार्य येथील सुप्रसिद्ध कारखानदार श्री. परशुरामपंत गणपुले यांनीं केलें. तसेंच त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं संस्थेचें मकाणहि बांधविलें. मीं महाराष्ट्रांतील अनेक ठिकाणच्या ब्राह्मणसभा पाहिल्या आहेत; पण या मकाणाची व त्यांतील सामानाची त्याच्या अर्ध्यानेंहि बरोबरी करूं शकेल असें एकहि ठिकाण मला आढळलें नाहीं. येथें हिंदुजातीच्या सर्व पोट–विभागांतील लोकांना लग्नकार्यासाठीं, सभा संमेलनासाठीं, अतिथिगृहासाठीं व धार्मिक उत्सवासाठीं भाड्यानें जागा मिळूं शकते. ही जागा मध्यवर्ति असल्यानें पुष्कळ समारंभ या जागेंत नित्य होतात. त्याच्या भाड्यांतून इमारतीची व्यवस्था व दुरुस्ती केली जाते. अशा प्रकारें बडोद्याच्या पुरानें बडोद्यांतील ब्राह्मणसमाजालाहि एक मोठा लाभ या वर्षीं करून दिला.

संग्रहालय ... १४८३ १०१



सन १९२८ सालीं ' हिंदी–सुमेरी–संस्कृति ' या विषयावरील माझे लेख पुण्याच्या ' चित्रमयजगत् ' या मासिकांत प्रसिद्ध होत होते. त्यापूर्वी माझीं दुसरीं ५–६ पुस्तकेंहि प्रकाशित झालीं होतीं व त्यांपैकींच पहिलें ' सुधारणा आणि प्रगति ' हें पुस्तक मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए. च्या परीक्षेसाठीं पाठ्यपुस्तक म्हणून पुढें नेमिलें गेलें. शिवाय या पुस्तकाचीं गुजराथी व हिंदी या भाषांतून भाषांतरेंहि प्रसिद्ध झालीं. पण 'हिंदी-सुमेरी -संस्कृति ' या ग्रंथांतील विवेचन निव्वळ नवीन संशोधनात्मक होतें. सुमेरी वाङ्मयांतील ' गिल्गमेश ' या काव्याचें इंग्रजी भाषांतर त्यावेळीं उपलब्ध झालें होतें. त्यांतील हकीकतींशी भारतीय ऋग्वेदांतील ' वृत्रवधाची ' कथा देऊन त्या दोहोंचें साम्य या ग्रंथांत मीं दाखविलें आहे हें वर सांगितलेंच आहे.

सन १९३१ सालीं पुण्यास ' भारत इतिहास संशोधक मंडळांत ' ' भारतीय आर्यांचे भाऊबंद ' या विषयावर माझ्या वरील पुस्तकाच्या अनुरोधानेंच मी एक व्याख्यान दिलें. तसेंच त्या वर्षींच्या वसंत व्याख्यान मालेंत कै. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली ' साहित्यानंदाची उपपत्ति ' या विषयावर मीं व्याख्यान दिलें. त्यांत सन १९२१ सालच्या तात्यासाहेबांच्या बडोद्याच्या अध्यक्षीय भाषणाच्या उपपत्तीची मी चिकित्सा करून तींत भारतीय योगशास्त्रांतील द्विविध मनाच्या उपपत्तीची जोड दिली. तिचा तात्यासाहेब यांनीं आपल्या भाषणांत स्वीकार करून " आत्मौपम्य " बुद्धीनेंच मनुष्य हा विविध भूमिकांचा आस्वाद घेतो असें विशेषरूपानें सांगितलें.

त्या सालचें महाराष्ट्र साहित्यसंमेलन दक्षिण हैद्राबादेस भरणार होतें, त्यासाठीं मी गेलों. त्या संमेलनाचें अध्यक्षस्थान कै. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांना देण्यांत आलें होतें. हें संमेलन तेथील ' विवेक वर्धिनी ' शाळेच्या आवारांत खास विस्तीर्ण मंडप घालून त्यांत भरविण्यांत आलें होतें. या संमेलनाच्या स्वागतमंडळाचे कार्याध्यक्ष तेथील हायकोर्टाचे जज्ज ना. केशवराव कोरटकर होते. हैद्राबादच्या त्या काळच्या सोटेशाहीच्या

अंमलांत सभा–संमेलनें वगैरे फारशीं होतच नव्हतीं. हायकोर्टजज्ज ना. केशवराव कोरटकर हे तत्पूर्वीं दरवर्षीं उन्हाळ्यांत पुण्याला येत असल्यानें त्यांचा व माझा बराच परिचय झाला होता. या कारणानें व बडोद्याच्या संमेलनाचा मुख्य चिटणीस मी असल्यामुळें, संमेलनाच्या कामाविषयीं कांहीं माहिती मिळविण्याच्या हेतूनें, ना. केशवराव कोरटकर यांनीं मला बोलावून माझ्याशीं विचार–विनिमय केला होता. हें संमेलनहि यशस्वी रीतीनें पार पडलें. त्यांत अध्यक्ष डॉ. केतकर यांनीं हैद्राबाद सरकारच्या मराठीच्या अनास्थेविषयीं खरपूस समाचार घेतला होता. तथापि तेथील मोगलाई अंमलामध्यें डॉ. केतकरांच्या मराठी भाषणाचा अनुवाद होऊन त्याची दखल तेथील सरकार घेईपर्यंत संमेलन संपून डॉ. केतकर तेथून परत रवानाहि झाले होते. नाहींतर त्यांच्यावर कांहींतरी इलाज करण्याचा तेथील सरकारचा विचार होता असें मागाहून मला ना. केशवराव यांच्याकडून कळलें.

त्यांनंतर नांदेड, औरंगाबाद, पैठण, सुलतानबाद, वेरूळचीं लेणीं, देवगिरी ऊर्फ दौलताबादचा किल्ला व कृष्णेश्वरचें ज्योतिर्लिंग हीं स्थळें पाहून मी बडोद्यास परत आलों.

सन १९३१ च्या डिसेंबर महिन्यांत बडोदें येथें एक वाङ्मय परिषद भरविण्याची योजना करण्यांत आली. त्यापूर्वींच्या सालीं म्हणजे १९३० या वर्षीं येथील महाराणी चिमणाबाई हायस्कूलमध्यें एक छोटेसें स्नेहसंमेलन भरविण्यांत आलें होतें व त्यासाठीं अध्यक्ष म्हणून कै. वामन मल्हार जोशी यांना बोलाविलें होतें. त्या संमेलनास कांहीं थोडया आमंत्रित मंडळींसच बोलाविलें होतें. त्यांत कांहीं ठराव वगैरे न करतां थोडया वाङ्मयीन प्रश्नांचीच चर्चा करून त्यावर बोलण्याची स्थानिक साहित्यिकांना संधि देण्यांत आली होती. हा प्रयोग यशस्वी वाटल्यानें सन १९३१ सालीं मोठी वाङ्मय परिषद भरविण्याचें ठरविलें गेलें. या परिषदेच्या स्वागताध्यक्षाच्या स्थानीं माझी नेमणूक झाली होती, तसेंच अध्यक्षाच्या जागीं कै. श्री. तात्यासाहेब केळकर यांना बोलाविण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें ही परिषद येथील विशाल महाराजा नाटकगृहांत भरविण्यांत येऊन संमेलनाचें काम ता. २१ व २२ डिसेंबर हे दोन दिवस चाललें. आपल्या

अध्यक्षीय भाषणांत कै. तात्यासाहेबांनीं अशा प्रांतिक संमेलनाची जोरदार तरफदारी केली. अशा संमेलनांतून कोणताहि ठराव न करतां केवळ वाङ्मयीन प्रश्नांची चर्चा करण्याची प्रथाच यानंतरच्या सर्व परिषदांतून कायम ठेविली गेली. हें वाङ्मय परिषदेचें पहिलें अधिवेशन म्हणून समजलें गेलें. त्यानंतर २५ वर्षांत मिळून १९ व्या संमेलनापर्यंत परिषदेनें मजल गांठली. त्यामुळें या परिषदांचा रौप्यमहोत्सव सन १९५६ च्या जानेवारींत साजरा करण्यांत आला व त्या प्रसंगानें, त्या पूर्वीच्या सर्व परिषदांची हकीकत एका पुस्तकरूपानें त्या त्या वेळच्या स्वागताध्यक्षांकडून लिहवून घेऊन प्रसिद्ध केली आहे. तसेंच यावेळपर्यंतच्या साहित्यसेवकांकडून लेख लिहवून घेऊन पन्नास लेखांचें दुसरें एक पुस्तक 'वटपत्रें' या नांवानें प्रसिद्ध करण्यांत आलें. पूर्वी बडोदें शहराचें नांव 'वटपत्र' असें असल्याचें आढळतें. त्यामुळें त्या शब्दाशीं 'वटपत्रें' या शब्दाचा अन्वय मनोरम वाटेल.

सन १९३२ सालीं माझी आई बडोद्यास निधन पावली व माझा एक प्रपंचांतील आधार तुटला. माझे वडील वारल्यानंतर तिनें माझ्या संसाराची उत्तम तऱ्हेनें काळजी वाहिली होती. ती गेल्यानें मला उघडें पडल्यासारखें वाटलें.

सन १९३२ च्या एप्रिल महिन्यांत विलायतेहून श्रीमंत सयाजीराव यांनीं बडोदें येथें दिवाण सर व्ही. टी. कृष्णम्माचारी यांना एक पत्र लिहून कळविलें कीं, मराठी भाषेंत नीतिशास्त्राचा इतिहास व विवेचन करणारें पुस्तक माझ्या पाहण्यांत नाहीं. विलायतेस असतांना अनेक विद्वानांशीं माझी चर्चा झाली व त्यांनीं मला असा प्रश्न विचारला कीं, तुमच्या माहितींत हिंदी भाषेंत नीतिशास्त्रावर कोणता ग्रंथ आहे? त्यावेळीं मी त्यांना उत्तर देऊं शकलों नाहीं. म्हणून असा ग्रंथ जर रा. आपटे लिहिण्यास तयार असतील तर तो त्यांना अवश्य लिहिण्यास सांगावें. त्यासंबंधानें, यावरून दिवाणांनीं मला विचारलें. तेव्हां मी होकारार्थी जबाब दिला. तो महाराजांना विलायतेस पोहोचल्यानंतर त्यांनीं या ग्रंथांत काय असावें याबद्दल एक कलमबंदी योजना लिहून पाठविली. ती अशी कीं, या ग्रंथांत वेद-कालापासून आतांपर्यंतच्या प्रमुख नीतिशास्त्रकारांचें व त्यांनीं प्रति-

पादिलेल्या तत्त्वांचें विवेचन एका भागांत असावें; दुसऱ्या भागांत सॉक्रेटिसापासून आतांपर्यंतच्या पाश्चात्य नीतिकारांचें व त्यांच्या तत्त्वांचें विवेचन असावें; तिसऱ्या भागांत या दोन्ही नीतिशास्त्रांच्या प्रमेयांचें तुलनात्मक विवेचन असावें; नीतिशास्त्रविषयक पाश्चात्य शब्दांचें पर्यायवाचक देशी शब्द बनवावे व त्यांची एक यादी अलाहिदा या पुस्तकांतच द्यावी; सर्व नीतिशास्त्रज्ञांचे काल यावत्शक्य यावेत; दरेक परिच्छेदाला तद्वाचक संज्ञा असावी वगैरे वगैरे. त्यांनीं आणखी असेंहि लिहिलें कीं, "मी हिंदुस्थानांत सात आठ महिन्यांनीं परत येईन त्या वेळपर्यंत या ग्रंथाचें हस्तलिखित तयार झालें असेल तर तें रा. आपटे यांनीं मला वाचून दाखवावें म्हणजे तें पूर्ण झाल्यावर सदरहू ग्रंथ छापण्यांत येईल." याप्रमाणें ७-८ महिन्यांत मीं तो सर्व ग्रंथ लिहून तयार केला. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यांत महाराज हिंदुस्थानांत परत आल्यावर सुमारें एक महिन्यानें माझें हस्तलिखित मीं महाराजांना वाचून दाखविण्यास सुरुवात केली. आम्ही उभयतां राजवाड्यांत रोज तीन तास यासाठीं बसत असूं व अशा रीतीनें सुमारें सव्वा महिन्यांत मी त्या ग्रंथाचें वाचन पुरें केलें. तें महाराजांनीं पसंत केल्यावर 'नीतिशास्त्रप्रबोध' या नांवानें तो ग्रंथ मीं प्रसिद्ध केला. त्याबरोबरच 'सुलभनीतिशास्त्र' म्हणून त्या ग्रंथांतील प्रमेयांचें सोपें विवेचन असलेलें आणखी एक लहान पुस्तक मी प्रसिद्ध केलें.

अशा प्रकारें हा ग्रंथ वाचून पूर्ण झाला, त्या दिवशीं महाराजांनीं मला सांगितलें कीं, माझ्या ६० वर्षांच्या दीर्घ कारकीर्दींत मीं माझ्या प्रजेच्या कल्याणासाठीं मला जें जें योग्य वाटलें तें तें केलें. अर्थात् तें हुजूर हुकुमांच्या द्वारें मीं केलें. त्या हुकुमांचे सहा भाग छापून प्रसिद्ध आहेत, पण ते हुकूम कोणत्या परिस्थितींत केले याबद्दल त्या हुकुमांत कांहींहि खुलासा केलेला नाहीं. ६० वर्षांच्या परिस्थितींत पुष्कळच बदल झाला आहे. त्यामुळें त्या हुकुमांचा बोध होणें हल्लीं दुष्कर झालें आहे. तेव्हां तशा प्रकारचे खुलासे व टिप्पणी देऊन त्या पुस्तकांचें जर तुम्ही संपादन कराल तर मला आनंद होईल. तेव्हां मी त्यांना सांगितलें कीं, हुजूर हुकूम वाचणें हें फक्त सरकारी नोकरांचेंच कर्तव्य समजलें जाईल व ते नोकर तर आपल्या नित्याच्या कामाशिवाय कांहींहि वाचीत नाहींत. इतर लोक

तर त्याकडे पहाणारहि नाहींत. तेव्हां त्या हुकुमांचें संपादन करण्याऐवजीं जर महाराजांचें सरकारी कागदपत्रांवरून अधिकृत असें चरित्र लिहिलें तर तें सर्व लोकांना मनोरंजक वाटेल व त्यांत वरील हुजूरहुकुमांच्या प्रसंगांचा खुलासाहि आपोआप येईल.

त्यावेळीं महाराज कांहीं बोलले नाहींत, पण पुढें एकदोन दिवसांनींच त्यांनीं दिवाणांना माझ्या घरीं पाठविलें. नंतर त्यांनीं मजकडून मला पाहिजे असलेल्या साधनांची नोंद करून घेतली. त्यानंतर महाराजांनीं दिवाणांना असा हुकूम दिला कीं, आपल्या सर्व कारकीर्दीतील राज्यकारभाराचे, तसेंच खाजगी जीवनाचे जे जे कागद असतील ते सर्व रा. आपटे यांना पुरवावे व त्यांना चरित्र लेखनाच्या कामीं जी जी मदत लागेल ती ती सर्व पुरवावी. त्याप्रमाणें २–२॥ वर्षें खपून मीं ते सर्व कागदपत्र पाहून महाराजांचें मराठींतून तीन खंडांत चरित्र लिहिलें. त्यानंतर सन १९३६ च्या जानेवारींत महाराजांच्या कारकीर्दीचा हीरकोत्सव साजरा झाल्यावर महाराज व मी असे रोज सुमारें सात तास बसत होतों. त्यावेळीं मी तें सर्व चरित्र त्यांना वाचून दाखविलें. त्यास ३॥ महिन्यांचा अवधि लागला. त्या अवधींत त्यांनीं राज्यकारभाराच्या कोणत्याहि कामाकडे लक्ष न देतां व कोणाचीहि भेट न घेतां केवळ चरित्रश्रवणाकडेच लक्ष दिलें. वाचनाच्या पहिल्याच दिवशीं त्यांनीं मला सांगितलें कीं, मी जें हें चरित्र तुम्हांकडून वाचवून घेत आहें त्यांत तुम्ही माझ्या मतासाठीं एक काडीचाहि फेरफार करतां कामा नये. या शर्तीवरच हें वाचन मी ऐकेन. फक्त तुम्हांला जी माहिती नसेल ती देण्याच्या हेतूनेंच मी हें चरित्र ऐकणार आहें. ही शर्त मी कबूल केली व त्याप्रमाणें माझ्या मूळ लेखनांत नवीन माहितीखेरीज मी रतिमात्र फरक केला नाहीं. हें चरित्र तीन खंडांत व तेराशें पानांत मिळून पुरें झालें आहे. कर्नाटक प्रेसचे त्यावेळचे मालक रा. मंगेशराव कुलकर्णी यांनीं तें अत्यंत सुंदर रीतीनें छापून दिलें आहे व श्रीमंत सयाजीराव महाराजांच्या कारकीर्दीचें अधिकृत विवेचन करणारें असें तें एकच पुस्तक मराठी भाषेंत प्रसिद्ध झालेलें आहे असें निःसंशय रीतीनें म्हणतां येईल.

या चरित्राच्या वाचनाच्या कारणानें ३॥ महिनेपर्यंत महाराजांचा व

माझा जो निकट संबंध आला त्यांत त्यांच्या अंगचे अनेक गुण माझ्या प्रतीतीस आले व त्यामुळें त्यांच्याविषयींचा माझा आदर नुसता वाढला, एवढेंच नव्हें तर त्यांच्या सान्निध्यांत असतांना देशभक्तीच्या व चारित्र्याच्या उच्च वातावरणांत वावरत असल्याप्रमाणें मला वाटत असे. हा मी माझ्या आयुष्यांतील फार मोठा लाभ समजतों. ज्याप्रमाणें माझ्या आयुष्यांतील पहिलीं कांहीं वर्षें लो. टिळकांच्यापाशीं काढल्यानें मला त्यांच्या श्रेष्ठतेचा कांहींसा बोध होऊं शकला, तशाच प्रकारचा अनुभव भारताच्या या दुसऱ्या श्रेष्ठ विभूतीच्या सहवासांत असतांना मला आला. हा लाभ काय लहान म्हणावयाचा ?

## .२३.

या काळांतील मी पाहिलेल्या एकदोन उदाहरणांवरून महाराजांच्या स्वभावाची व चारित्र्याची कल्पना येऊं शकेल. या काळांत महाराजांना गाऊटचा विकार असे. त्याच्या योगानें त्यांचे पाय इतके ठणकत कीं, त्यांना जराहि स्पर्श झाला तरी त्यांना दुःखप्रद वाटे. अशा स्थितींत त्यांचें अंथरुण एका बैठ्या पलंगावर घातलेलें असे. त्यावर निजूनच ते माझ्या पुस्तकाचें श्रवण करीत. एके दिवशीं त्यांचा ठणकता पाय जेथें येई त्या ठिकाणीच चादरीखालीं एक लहानसा खडा राहिला होता. त्यामुळें त्यावर पाय ठेवतांच त्यांना फार त्रास झाला. त्याबरोबर त्यांनीं आपलें अंथरूण घालणाऱ्या हुजऱ्यास बोलाविलें. स्वतः आपण कष्टानें उठून हातांत काठी घेऊन उभे राहिले व त्यांनीं त्या हुजऱ्यास आपल्या पलंगावर निजविलें. मी नित्याप्रमाणें वाचनास गेलों व गॅलरींतून आंत डोकावून पाहिलें तर महाराजांच्या पलंगावर हुजऱ्या निजलेला असून त्याच्या पायापाशीं महाराज काठीवर टेकून उभे आहेत. हें पाहून मी इतका चकित झालों कीं, माझ्या डोळ्यांवर माझा विश्वास बसेना. महाराजांची पाठ मजकडे होती व ते हुजऱ्यास सांगत होते कीं, “ पहा, पहा माझ्या पायाखालीं हा खडा कसा राहिला. तुम्ही असेंच अंथरुण घालतां काय ? तुमच्या पायास तो खडा

लागतो कीं नाहीं ? " इतकें म्हटल्यावर तो हुजऱ्या उठला व अर्धमेला होऊनच शरमेनें मान खालीं घालून निघून गेला. एवढ्यांत महाराज तोंड फिरवून पलंगावर निजले, तों त्यांची नजर मजकडे गेली. मीहि लाजल्या-सारखा झालों. तेव्हां महाराजांनीं मला आंत बोलावलें व म्हणाले कीं, 'नोकर लोकांना कधींहि अपशब्द बोलूं नये. अशा उपायानेंच त्यांना लाजवावें.' दुसऱ्या एखाद्या राज्यांत अशा नोकरास चाबकानेंच मारण्यांत आलें असतें. पण महाराजांची नोकरांशीं वागण्याची पद्धतच निराळी होती.

दुसरा एकच प्रसंग मी देतों. महाराजांना त्या दिवशीं ताप आल्यामुळें त्यांनीं वाचन करवून घेऊं नये असा त्या दिवशीं त्यांच्या डॉक्टरांनीं सल्ला दिला होता. ते स्वतः तिसऱ्या मजल्यावर होते व त्यावेळचे हंगामी दिवाण रा. ब. आंबेगांवकर हे तळमजल्यावर बसले होते. तेथें नित्याप्रमाणें मी माझें हस्तलिखित घेऊन गेलों. तेव्हां श्री. आंबेगांवकरांनीं मला सांगितलें कीं, आज महाराजांची प्रकृति बरी नसल्यानें तुम्ही त्यांच्याजवळ वाचूं नका. इतक्यांत महाराजांच्याकडून एक नोकर खालीं आला व त्यानें सांगितलें कीं, रा. आपटे आले किंवा नाहीं हें महाराजांनीं विचारलें आहे, ते आले असल्यास त्यांना वर पाठवावें. अर्थात् मी आलोंच नाहीं अशी संपादणी करण्यास त्यामुळें अवसरच उरला नाहीं. तेव्हां श्री. आंबेगांवकर यांनीं महाराजांच्याकडे त्याच हुजऱ्यामार्फत निरोप पाठविला कीं, आपटे आले आहेत पण आपली प्रकृति बरी नसल्याचें कळल्यावरून त्यांनीं आपलें हस्तलिखित आणिलें नाहीं. वस्तुतः मी हस्तलिखित घेऊनच गेलों होतों. श्री. आंबेगांवकरांचा निरोप घेऊन महाराजांच्याकडे गेलेला हुजऱ्या लगेच परत येऊन त्यानें महाराजांचा उलट निरोप असा कळविला कीं, आपटे यांना सांगावें कीं, तुम्ही सरकारी मोटार घेऊन घरून हस्तलिखित घेऊन या. तेव्हां श्री. आंबेगांवकर अगदींच गार झाले. मीहि हस्तलिखित आण-ण्याच्या निमित्तानें सरकारी मोटारींतून एक फेरफटका मारून येऊन परत राजमहालांत गेलों व हस्तलिखित घेऊन महाराजांच्याकडे गेलों. ते म्हणाले कीं, "गाऊटमुळें माझा पाय फार दुखत असल्यानें माझें सर्व लक्ष तिकडेच लागतें. त्याला विरंगुळा हवा म्हणून नेहमींप्रमाणें तुम्ही आपलें वाचन करा." अर्थात् मी वाचन केलें हें सांगावयास नकोच.

# .२४.

सन १९३३ च्या मे महिन्यांत मी माझे आप्त रा. गोळे यांच्याबरोबर सुमारें महिनाभर महाबळेश्वरास राहिलों होतों. त्यावेळीं पांचगणी पाहिली व प्रतापगडचें तिसरें दर्शनहि मला घडलें.

त्याच सालच्या जुलै महिन्यांत पुण्यास फर्ग्युसन कॉलेजच्या मराठी वाङ्मयमंडळातर्फे त्या कॉलेजच्या वाडिया सभागृहांत कै. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं माझें व्याख्यान झालें. मी त्या कॉलेजचा मूळचा विद्यार्थी असल्यानें या आमंत्रणाचा मला गौरव वाटला.

मी पुण्याहून परत आल्यावर त्याच वर्षाच्या म्हणजे १९३३ च्या ऑगस्ट महिन्यांत उज्जयिनी येथें महाराष्ट्र वाङ्मय संस्थेच्या समारंभाचें अध्यक्षस्थान मला देण्यांत आल्यानें मी तेथें गेलों होतों. स्वागताध्यक्ष म्हणून उज्जयिनीच्या माधव कॉलेजचे प्रिन्सिपॉल व सुप्रसिद्ध गणितज्योतिषी कै. गोविंद सदाशिव आपटे यांची योजना झाली होती. तो समारंभ तीन दिवस विशेष उत्साहानें पार पडला. विशेष उत्साहानें म्हणण्याचें कारण कीं, त्यावेळेपर्यंत ग्वाल्हेर संस्थानांत वाङ्मयीन समारंभ करण्याची व त्यासाठीं त्या संस्थानाबाहेरील गृहस्थास अध्यक्ष म्हणून बोलावण्याची पद्धति फार कमी असे. यामुळें केवळ उज्जयिनीचेच नव्हे तर इंदूर, ग्वाल्हेर वगैरे ठिकाणचेहि अनेक गृहस्थ या समारंभास हजर होते.

या सालच्या म्हणजे सन १९३३ च्या डिसेंबर महिन्यांत प्राच्यविद्या-परिषदेचें (Oriental Conference) अधिवेशन बडोद्यास भरविण्याचें नक्की केलें होतें. ही परिषद केवळ हिंदुस्थानांतील पंडितांचीच नसून तींत परदेशांतील लोकहि येत असत. या परिषदेच्या संबंधानें महाराजांनीं स्वतः लक्ष घातलें व ही परिषद् फार मोठ्या प्रमाणावर व्हावी असा हुकूम त्यांनीं दिला होता. परिषदेच्या अध्यक्षस्थानी पाटण्याचे वकील व सुप्रसिद्ध विद्वान श्री. काशीप्रसाद जयस्वाल यांची नेमणूक झाली होती. श्री. जयस्वाल यांनीं सनोत्तर १५० ते ३५० या अंधयुग समजल्या गेलेल्या भागावर संशोधन करून आपलें नवीन पुस्तक थोड्याच काळापूर्वी प्रसिद्ध केलें होतें.

त्यांत ' भारशिव नाग राजे ' व ' वाकाटक राजे ' यांच्यासंबंधानें शिक्के, नाणीं व लेख वगैरे नवीन साधनें मिळवून त्यावरून आपला ग्रंथ लिहिला होता. हीं सर्व साधनें तेथपर्यंत अगदीं अप्रसिद्धच होतीं. या भारशिव राजांनींच काशी येथें दहा अश्वमेध यज्ञ केल्यानें तेथील एका प्रसिद्ध घाटाला दशाश्वमेध घाट असें नांव दिलें गेलें ही माहितीहि फार मनोरंजक होती. याशिवाय त्यांनीं Hindu Polity अथवा हिंदु राज्य पद्धतीचीं तत्त्वें या नांवाचा एक अपूर्व व आधारभूत ग्रंथहि लिहिला होता. असे अध्यक्ष या परिषदेस मिळाल्यानें तिच्यासंबंधाची तज्ज्ञ लोकांची जिज्ञासाहि फार वाढली होती. या परिषदेच्या सभा-समितीच्या चिटणीसाचें काम मजकडे होतें. परिषदेच्या उपशाखांच्या सभा भरविणें हें त्याअन्वयें माझें काम होतें. या उपशाखांच्या सर्व सभांना महाराज सयाजीराव हे स्वतः उपस्थित होत असत; त्यामुळें या सर्व सभांना हजर राहणें मलाहि प्राप्तच होतें. यामुळें अनेक विद्वानांच्या विद्वत्तेचा मला लाभ घेतां आला.

या संमेलनासंबंधाची एक गोष्ट मला येथें अवश्य नमूद करावीशी वाटते. या अधिवेशनाचें उद्‌घाटन श्रीमंत महाराज सयाजीराव यांच्या हस्तें झालें. त्यावेळीं त्यांनीं आपलें छापील उद्‌घाटनाचें भाषण वाचून दाखविलें. त्यावेळीं माझ्याशेजारीं बसलेले पंजाब विद्यापीठाचे उपकुलपति कै. डॉ. वुलर हे मला म्हणाले कीं, तुमच्या महाराजांनीं भाषण फार सुंदर वाचलें. या म्हणण्यांतील ध्वनि असा होता कीं, चांगल्या वाचनापुरतीच महाराजांची विद्वत्ता असेल. पण पुढें स्वागताध्यक्ष दिवाण व अध्यक्ष श्री. जयस्वाल यांचीं भाषणें झाल्यावर श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं टाचणांवांचून अस्खलित इंग्रजी भाषण करून प्राच्यविद्येच्या अनेक प्रमेयांचें जेव्हां विवेचन केलें तेव्हां तर डॉ. वुलर हे चकितच होऊन गेले व ते मला म्हणाले, 'Oh my God, मला स्वप्नांतही अशी कल्पना नव्हती कीं, महाराज इतकें सुंदर इंग्रजी अचानक बोलूं शकतात व प्राच्यविद्येचा त्यांचा परिचय इतका सखोल आहे.' या संमेलनाच्या प्रसंगींहि सर्व पाहुण्यांची व्यवस्था बडोद्याच्या लौकिकास शोभेल अशा उत्तम रीतीनें ठेवण्यांत आली होती.

परिषद संपल्यानंतर, मी येथील महाराणी चिमणाबाई हायस्कूल या संस्थेतर्फें विद्यार्थ्यांना व इतर पाहुण्यांना त्यांच्या विद्वत्तेचा लाभ मिळावा

म्हणून एक व्याख्यान देण्याची श्री. जयस्वाल यांना विनंति केली. त्या प्रसंगीं घडलेल्या एका विनोदी प्रसंगाचा उल्लेख मनोरंजक वाटेल. श्री. जयस्वाल यांचा व्याख्यानाच्या आरंभीं श्रोत्यांना परिचय करून देते वेळीं मी गौरवार्थ म्हटलें कीं, " गीर्वाण भाषेंत अध्ययन, अध्यापन व संशोधन करणें हें ब्राह्मणाचें कर्तव्य आहे. तें श्री. जयस्वाल यांनीं फार उत्तम तऱ्हेनें केलें असल्यामुळें ते महाब्राह्मण या पदवीस पात्र आहेत. " मी असें बोलतांच श्री. जयस्वाल मोठ्यानें हसले. त्यांच्या हसण्याचें कारण मला त्यावेळीं समजलें नाहीं. पण व्याख्यानानंतर त्यांना याबद्दल मी विचारतांच त्यांनीं सांगितलें कीं, " आमच्याकडे स्मशानांतील अंत्यविधि करणाऱ्या ब्राह्मणांस ' महाब्राह्मण ' म्हणतात. ती पदवी तुम्ही मला दिलीत म्हणून मला हंसू आलें." भिन्न प्रांतांतील शब्दप्रयोगांची माहिती नसल्यानें असे मजेदार प्रमाद कधीं कधीं घडतात.

सन १९३४ च्या मार्च महिन्यांत मुंबईस कै. श्री. यंदे यांच्या ग्रंथ-संपादक मंडळीचा मोठा उत्सव करण्यांत आला. त्याप्रसंगीं अध्यक्षस्थान श्रीमंत महाराणी चिमणाबाईसाहेब यांनीं भूषविलें होतें. त्याप्रसंगीं कांही विद्वानांना सन्मानार्थ शालजोड्या देण्यांत आल्या होत्या. त्या मानकऱ्यांत मीहि होतों

याच वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यांत इंदुरास मध्यभारतीय महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अधिवेशन भरलें. त्याप्रसंगीं संमेलनाध्यक्ष म्हणून माझी नेमणूक झाली होती. संमेलनाचा समारंभ तेथील टाऊनहॉलमध्यें करण्यांत आला होता. त्या प्रसंगीं श्रीमंत यशवंतराव महाराज, माजी महाराज श्रीमंत तुकोजीराव, दिवाण श्री. बापना, राज्य सल्लागार कै. श्री. माडगांवकर व राजघराण्यांतील तेरा चौदा मंडळी उपस्थित होती. समारंभ तीन दिवसपर्यंत थाटानें झाला. त्यानंतरच तेथें नवरात्रांतील शारदोत्सवहि साजरा करण्यांत आला. त्यांत व इतर ठिकाणीं मिळून माझीं पांचसहा व्याख्यानें झालीं.

सन १९३५ हें साल मला दुःखाचें गेलें. कारण त्या सालीं माझी दुसरी पत्नी निवर्तली.

यापुढें सन १९३६ हें साल वर म्हटल्याप्रमाणें श्रीमंत महाराजांच्या

हीरकमहोत्सवांत, त्यांना त्यांचें चरित्र वाचून दाखविण्यांत व त्यानंतर तें छापवून प्रसिद्ध करण्यांत गेलें. मी महाराजांना चरित्र वाचून दाखवीत असतांना त्यांनीं मी बडोद्यास येईपर्यंतच्या काळाची सर्व माहिती मला पुरविली व तत्संबंधाचे आधारभूत कागदहि मला उपलब्ध करून दिले. त्यामुळेंच चरित्र अधिकृत, साधार व परिपूर्ण झालें आहे असें म्हणतां येईल. वस्तुतः माझा टंकमुद्रित मजकूर वाचून घेण्यांत व त्यांत स्वतःच्या माहितीची नवीन भर घालण्यांत रोज सात कलाक असे साडेतीन महिने पर्यंत काम करणें हें किती कठीण आहे याची कल्पना येईल.

सन १९३८ सालीं मुंबईस मराठी साहित्यसंमेलनाचें अधिवेशन भरलें होतें. त्यास मी हजर राहिलों होतों. अध्यक्षस्थानीं श्री. विनायकराव सावरकर व स्वागताध्यक्ष श्री. नामदार बॅ. जयकर हे होते. याच संमेलनांत, ‘ लेखकांनीं यापुढें आपल्या लेखण्या मोडून टाकून हातांत बंदुका घ्याव्यात ’ असें सावरकरांनीं सांगितलें होतें. यामुळें तें अधिवेशन लोकांच्या स्मरणांत राहिलें. यांतच मुलींचे नाच, गाणीं वगैरे साहित्याशी संबंध नसलेले प्रकार प्रथमतः मोठ्या प्रमाणावर दृग्गोचर झाले व त्यांची प्रथा दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. यामुळें त्या संमेलनांचें ‘ साहित्य संमेलन ’ हें मूळचें उद्दिष्ट नाहींसें होऊन तीं आतां ‘ करमणूक संमेलनें ’ म्हणून भरत असतात एवढें खरें. साहित्याचा केवळ झिरझिरीत पडदा ठेवून त्याच्या आड असे प्रकार सुरू केल्यानें अशा संमेलनांस ‘ साहित्य संमेलनें ’ म्हणणें म्हणजे केवळ शिष्टाचार होय.

साहित्य संमेलनानंतर मी नित्याप्रमाणें कल्याणास माझे मेव्हणे कै. बापूसाहेब मेघःश्याम यांच्याकडे गेलों. त्यावेळीं श्री. चिंतामणराव वैद्य हे फार आजारी असल्याची बातमी कै. बापूसाहेबांनीं मला सांगितली. त्यावरून आम्ही त्यांना भेटावयास गेलों. चिंतामणराव १९०५ सालीं ग्वाल्हेरहून सरन्यायाधीशाचें स्थान सोडून कल्याणास कायमचे राहण्यास आले, तेव्हां-पासूनच त्यांचा व माझा स्नेह झाला होता. तो या वेळीं ते निधन पावेपर्यंत अबाधित राहिला. एवढ्या अवधींत ते अनेक वेळां बडोद्यास आले. त्यांपैकीं कित्येक वेळां तर ते मजकडेच उतरत व दुसऱ्या कांहीं वेळां आपला सर्व काळ मजकडेच काढीत. त्यांनीं इंग्रजींत लिहिलेलें ‘ संस्कृत

वाङ्मयाचा इतिहास, खंड पहिला, वैदिक काल ’ हें पुस्तक मी खटपट करून बडोदें सरकारमार्फत प्रसिद्ध करविण्यास मदत केली होती. इतरहि अनेक वाङ्मयीन कार्यांत आम्ही सहकार्य केलें होतें. पुण्याच्या भारत–इतिहास–संशोधक मंडळाच्या वार्षिक समारंभाला मी अनेक वर्षें हजर राहत असें. त्यावेळीं त्या संस्थेचे कायमचे अध्यक्ष म्हणून अध्यक्षस्थान ते स्वीकारीत. अशा एका प्रसंगीं तर एकदां त्यांना दुसरें कांहीं काम असल्यामुळें ते सभास्थानांतून निघून गेले, त्यावेळीं त्यांनीं आपल्या जागीं मला बसण्यास सांगितलें होतें. अशा रीतीनें तेहतीस वर्षेंपर्यंत आमचा स्नेह सतत वृद्धिंगतच होत होता. मी या खेपेस कल्याणास त्यांच्याकडे गेलों त्यावेळीं ते अत्यवस्थच होते. त्यांचें व माझें कांहीं बोलणें त्यावेळीं झालें पण पुढें दोनच दिवसांनीं त्यांचें अवसान झालें व महाराष्ट्रांतच नव्हे तर अखिल भारतांत गाजलेला हा विद्वानांचा मेरूमणी निखळून पडला. त्यांनीं लिहिलेलें पुस्तक ‘संस्कृत वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ला’ याचें त्यांच्याच खास सांगण्यावरून सन १९३० सालीं मी केसरींत सात-आठ अंकांत मिळून परीक्षण केलें होतें.

## .२५.

या सालींच जळगांव येथील शारदोत्सवाच्या समारंभाचा अध्यक्ष म्हणून मला बोलाविल्यावरून मी तेथें गेलों होतों. तेथें माझी ३।४ व्याख्यानें झालीं.

त्यानंतर सन १९३७ च्या ऑगस्ट महिन्यांत मुंबईच्या मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ३८ व्या वार्षिक अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून मी गेलों होतों. त्या प्रसंगीं ‘वाङ्मयाचा पंचकोश’ या विषयावर माझें भाषण झालें. त्याच सालच्या डिसेंबर महिन्यांत बडोदें येथील श्री. जयसिंहराव वाचनालयाचा हीरकमहोत्सव साजरा करण्यांत आला. सन १८७५ सालीं श्रीमंत सयाजीराव महाराज गादीवर बसल्यावर त्या प्रसंगाचें स्मारक म्हणून व त्या वेळच्या लोकांचें अज्ञान कमी करण्यासाठीं म्हणून या

वाचनालयाची स्थापना झाली. हें वाचनालय सरकारी संस्था नसून हिचे वर्गणीदार आहेत व त्यांच्याकडून निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत या संस्थेची व्यवस्था करण्यांत येत असते. या संस्थेच्या हीरकमहोत्सवाच्या प्रसंगीं मुंबईच्या सेंट झेवियर कॉलेजमधील माजी विद्वान प्राध्यापक रे. फादर हेरास यांना अध्यक्ष म्हणून बोलाविलें होतें. या उत्सवास श्रीमंत महाराज सयाजीराव हे स्वतः उपस्थित होते. हा मोठा लाभ होता. त्या प्रसंगींचें फादर हेरास यांचें भाषण उत्कृष्ट झालें असून त्यांत त्यांनीं जगांतील सर्व मोठमोठ्या वाचनालयांचा परामर्ष घेऊन त्यांची माहिती सांगितली होती.

सन १९३८ च्या जानेवारी महिन्यांत माझे मित्र श्री. सावरकर यांना बडोदें येथें येण्याचें आमंत्रण देण्यांत आलें होतें. त्यापूर्वीं त्यांच्यावर ब्रिटिश सरकारकडून घातलेल्या नियंत्रणांतून त्यांची मुक्तता थोड्याच काळापूर्वीं त्यावेळचे मुंबई सरकारचे मंत्री कै. जमनादास मेहता यांच्या रदबदलीनें झाली होती. त्यानंतर त्यांचा पहिला सार्वजनिक सत्कार बडोद्यानेंच केला. श्री. सावरकर यांचे त्यावेळीं प्रो. माणिकराव यांच्या व्यायाममंदिरांत ‘ देशी रियासतें ’ या विषयावर हिंदींत भाषण झालें. त्याप्रसंगी अध्यक्ष-स्थान मला देण्यांत आलें होतें. त्या प्रसंगीच्या भाषणांत श्री. सावरकरांनीं आम्ही उभयतां फर्ग्युसन कॉलेजमध्यें विद्यार्थी असतांना एकमेकांच्या अध्यक्षतेखालीं केलेल्या भाषणांचा उल्लेख करून पूर्वस्मृतीला उजळा दिला. त्याप्रसंगीं सुमारें २५००० लोक व्याख्यान ऐकत होते. व्यायामशाळेचें एवढें मोठें मैदान पण तें तर श्रोत्यांनीं भरून गेलेंच होतें, पण दाण्डिया-बाजारपर्यंतचा सर्व रस्ता पण श्रोत्यांनीं भरून गेला होता. एवढा प्रचंड समुदाय तेथपर्यंतच्या कोणत्याहि भाषणास जमला नव्हता. ध्वनिक्षेपकांची व्यवस्था चांगली असल्यामुळेंच इतका विशाल जनसमुदाय सावरकरांचें भाषण चांगल्या रीतीनें ऐकूं शकला. अशा प्रकारें सावरकरांचा हा बडोद्याचा दौरा त्यावेळीं फार गाजला. त्यानंतरहि दोन तीन वेळां त्यांचें आगमन बडोद्यास होऊन त्यांचीं भाषणेंहि येथें झाली.

याच सालच्या म्हणजे सन १९३८ च्या ऑक्टोबर महिन्यांत माझें नागपूरला जाणें झालें. तेथील ज्या नील सिटी स्कूलच्या इमारतींतच मी

पूर्वी नागपूरला असतांना आमचा एलएल्. बी. चा क्लास भरत असे, त्या नील सिटी स्कूलचा ज्युबिली समारंभ करण्याचें त्या शाळेच्या चालक वर्गानें ठरविलें होतें व त्यासाठीं तेथील सुप्रसिद्ध डॉ. ना. भा. खरे यांची अध्यक्ष म्हणून योजना केली होती. डॉ. खरे पूर्वी पहिल्या कॉंग्रेस राजवटींत मध्यप्रदेशाच्या सरकारचे मुख्यमंत्री म्हणून नेमिले गेले होते. पण पुढें त्यांचा कॉंग्रेसशीं मतभेद झाल्यामुळें त्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला होता. नील सिटी स्कूलच्या ज्युबिली समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें. तरी ऐन वेळीं ते हृदयाच्या विकारानें आजारी झाल्यामुळें अध्यक्षस्थानीं दुसऱ्या कोणाची तरी नेमणूक करणें अवश्य झालें. म्हणून शाळेच्या चालकांनीं त्या स्थानासाठीं मला बोलाविण्याचें ठरवून तशा अर्थाचें पत्र मला पाठविलें. त्यावरून मी नागपुरास गेलों. तेथील ज्युबिली समारंभ पार पडल्यावर मी डॉ. खरे यांच्या समाचारार्थ रा. गोपाळराव ओगले (संपादक महाराष्ट्र) यांच्या सह गेलों. तेव्हां डॉ. खरे यांच्याकडे श्री. सुभाषचंद्र बोस आल्याचें आम्हांस कळलें. त्यावरून डॉक्टरसाहेबांना आम्ही आल्याची वर्दी देऊन आम्ही परत जात असल्याचें कळविलें. तेव्हां डॉ. खरे यांनीं आम्हांला जाऊं न देतां आंत बोलाविलें. तेथें कलाक दीड कलाक आम्ही बसलों. त्या दरम्यान श्री. सुभाषचंद्र बोस व डॉ. खरे यांच्या प्रचलित राजकारणावर ज्या गोष्टी झाल्या त्या आम्हांस ऐकावयास मिळाल्या. त्यावेळीं श्री. सुभाषचंद्र हे नागपुरास व्याख्यानाच्या दौऱ्यावर आले होते. श्री. सुभाषचंद्र यांच्या खुल्या दिलानें बोललेल्या गोष्टी ऐकण्याचा हा अपूर्व लाभ मला मिळाला. यानंतरहि श्री. सुभाषचंद्र हे असेच व्याख्यानाच्या दौऱ्यावर बडोद्यास आले असतां तीन तासपर्यंत त्यांच्या सहवासाचा लाभ मला मिळाला. त्याबद्दलची हकीकत योग्य स्थळीं येईलच.

या माझ्या नागपूरच्या खेपेंतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार यांनीं मला संघाला भेट देण्यास बोलाविलें. मी नागपुरास शिकत असल्यावेळेपासून डॉ. हेडगेवार यांचा व माझा परिचय झाला होता. म्हणून त्यानंतर मी बडोद्यास आल्यावर ते दहाबारा वेळां मजकडे आले होते. तेलंग खेडीच्या मैदानावर संघाच्या सुमारें १००० सभासदांची

कवायत त्यांनीं करविली व त्यांना उद्देशून एक भाषण करण्यासहि त्यांनीं मला सांगितलें. अशा प्रकारें विद्यार्थी या नात्यानें मी नागपूर सोडल्यापासून अनेक वर्षांनीं माझी ही नागपूरला पहिलीच भेट झाली. तेथें असतांना माझ्या परिचयाच्या अनेक सार्वजनिक गृहस्थांच्या भेटी मला झाल्या व त्यामुळें माझा हा दौरा यशस्वी होऊन मला समाधान लाभलें.

या सालच्या डिसेंबर महिन्यांत माझे परमस्नेही कै. प्रो. माणिकराव यांचा साठ वर्षांच्या वाढदिवसाचा समारंभ साजरा करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्यासाठीं नेमिलेल्या समितीचा मुख्य चिटणीस म्हणून माझी नेमणूक करण्यांत आली. त्यासाठीं दोनतीन महिने खपून अखेरीस हा समारंभ आम्ही अत्यंत थाटानें साजरा केला. मुंबईचे गोवर्धनदास सुंदरदास हे त्याचे अध्यक्ष होते. बडोद्याचे दिवाण श्री. कृष्णमाचारी, कै. महाराजकुमार श्रीमंत धैर्यशीलराव वगैरे मंडळींची या समारंभांत सतत उपस्थिति होती. यापूर्वीं प्रो. माणिकराव यांच्या वयाला ५० वर्षें पुरीं झालीं होतीं. त्यावेळीं त्यांचा सुवर्ण उत्सवहि करण्यांत आला होता. त्या प्रसंगीं गुजराथचे प्रसिद्ध कवि कै. नानालाल दलपतराम हे अध्यक्षस्थानीं होते. यानंतर अगदीं अलीकडे त्यांच्या वयास ७५ वर्षें पूर्ण झालीं त्यावेळीं त्यांचा अमृतमहोत्सव करण्याचें घाटत होतें, पण दुर्दैवानें तो येथें होऊं शकला नाहीं. राजकीय संकटांत सांपडल्यामुळें त्यांचा व माझा मी बडोद्यास आल्यापासून जो स्नेह जडला तो अखेरपर्यंत कायम होता. त्यांच्या व्यायामशाळेंतील गणेशोत्सव हा अखिल महाराष्ट्रांत गाजलेला आहे. त्यांत अनेक विद्वान वक्त्यांचीं भाषणें झालेलीं आहेत. या उत्सवाला गाणें बजावणें, नाच, नकला, नाटकें वगैरेंचा स्पर्श त्यांनीं कधींहि होऊं दिला नाहीं. व्यायामशिक्षण हें त्यांच्या जीवनकार्याचें एक अंग होतें. पण सार्वजनिक, राष्ट्रीय कार्य हें दुसरें व प्रमुख अंग होतें. ते असत तोंपर्यंत त्यांनीं हें कार्य सतत चालविलें. भव्य व्यायामशाळा स्थापन केली, त्याला जोडूनच शिवाजी मंदिर व अभ्यागतालयहि जोडलें. त्यांचा व्यवसाय म्हणजे अस्थिसंधान. यासाठीं स्वतंत्र दवाखान्याची जोडहि दिली. त्यांचे एक शिष्य सोलापूरचे रा. भागवत यांनीं या व्यायामशाळेला एका सार्वजनिक सभागृहाचाहि लाभ करून दिला. प्रो. माणिकरावांनीं हिंदु-

स्थानांतील अनेक शस्त्रांचा संग्रह केला आहे व बडोद्याच्या राजवाड्यांत तर त्यांनीं एक अत्यंत नमुनेदार व अप्रतिम शस्त्रागार सज्ज केलें आहे. अशा रीतीनें त्यांनीं सर्वकार्यसंपन्न अशी ही संस्था केली. त्यांच्या सन १९५४ सालीं झालेल्या मृत्यूनें बडोद्याचें राष्ट्रीय जीवन वैराण झालें आहे यांत शंका नाहीं.

## .२६.

यानंतर १९३९ साल आलें. तें बडोद्याच्या इतिहासांत फार घातक ठरलें. त्या वर्षाच्या सुरुवातीस श्रीमंत सयाजीराव महाराज विलायतेहून मुंबईला आले, तेव्हां त्यांची प्रकृति नित्याप्रमाणें चांगली होती. पण पुढें ते तेथेंच आजारी पडले. त्यांच्यासाठीं विलायतेहून विमानानें एक तज्ज्ञ डॉक्टर बोलाविले होते व याशिवाय मुंबईचे अनेक वैद्यकीय सल्लागार तर त्यांना मदत करीतच होते. तथापि त्यांचा कांहींहि उपयोग न होऊन दुर्दैवानें ता. ६-२-१९३९ रोजीं त्यांचा मुंबईसच अंत झाला. त्यानंतर त्यांचें शव बडोद्यास आणून तेथें त्यांचा अंत्यविधि करण्यांत आला. त्यावेळीं सहस्रावधि लोकांनीं त्यांना भक्तीची अंजलि दिली.

अशा प्रकारें श्रीमंत सयाजीराव यांची ६४ वर्षांची अत्यंत दीर्घ कारकीर्द संपली. म्हणून यावेळीं बडोद्यांतील सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक वगैरे परिस्थितीचा आढावा घेणें येथें उचित होईल.

या कालांत सामाजिक प्रगति फार झपाट्यानें झाली. श्रीमंत सयाजीराव यांच्या राजवटीच्या सुरुवातीस इतरत्र जशी परिस्थिति होती तशीच बडोद्यासहि होती. त्यावेळीं जातिभेद, सोंवळेंओंवळें, भिन्न पंक्तींचा प्रघात, बालविवाह, शिक्षणाचा अभाव, पुनर्विवाहास बंदी, स्त्रियांची दुरवस्था वगैरे सर्व प्रकारचे दोष समाजांत पूर्णपणें वावरत होते. ते त्यांच्या कारकीर्दींत सर्व हलकेहलके कमी झाले. जातिभेद नाहींसा केला गेला नाहीं पण अनेक जातींत सहकार्य दृढ केलें गेलें. पूर्वीं सोवळ्यांच्या, ओवळ्यांच्या व कपडे घालून बसणाऱ्यांच्या जेवणाच्या पंक्ति निरनिराळ्या बसत असत.

त्याऐवजीं त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस सर्व जातींतील लोक आपखुषीनें एका पंक्तींत बसूं लागले होते. वेदोक्ताविरुद्धची चळवळ आपोआप शमून राजघराण्यांतील सर्व कृत्यें वेदमंत्रांनींच होऊं लागलीं होतीं. सन १८९३ सालीं प्रथम अवश्य व मोफत शिक्षणाचा कायदा केवळ अमरेली प्रांतास लागूं करून व नंतर त्याचा विस्तार सर्व राज्यभर केला गेल्यानें साक्षरतेचें प्रमाण पुष्कळच वाढलें. मुलींच्या प्राथमिक शिक्षणाची सोय अशा प्रकारें करून नंतर त्यांच्या दुय्यम शिक्षणासाठीं स्वतंत्र अशा मोठाल्या शाळा स्थापन करण्यांत आल्या. या संबंधाची एक हकीकत येथें देण्यासारखी आहे. महर्षि धोंडो केशव कर्वे हे आपल्या स्त्री शिक्षणाच्या संस्थेसाठीं मदत मागण्याकरितां सन १९२१–२२ मध्यें बडोद्यास आले होते. ते मजकडेच उतरले असल्यानें महाराजांकडून असा निरोप त्यांना सांगण्यासाठीं मजकडे पोंचविण्यांत आला कीं, बडोदें राज्याबाहेर कार्य करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत देण्याच्या तत्त्वाविरुद्ध महाराज असल्यानें तशी मदत श्री. कर्वे यांनीं अपेक्षूं नये. याचा हेतू एवढाच होता कीं, अशी आर्थिक मदत एकदा बडोदे राज्याबाहेर गेल्यावर कित्येक वेळां तिचा दुरुपयोग होतो. व त्या निधीवर कांहीं नियंत्रण राहूं शकत नाहीं. ही सूचना श्री. कर्वे यांना मिळाल्यामुळें त्यांनीं बडोदा कॉलेजमध्यें श्रीमंत महाराजांच्या समोर झालेल्या आपल्या भाषणांत आर्थिक मदतीची मागणी मुळींच न करतां अशी विनंति केली कीं, माझ्या संस्थेंतील पद्धतीप्रमाणें शिक्षण देणारे वर्ग बडोद्याच्या कन्या शाळेंतच उघडावे. ही मागणी महाराजांना पसंत पडल्यानें ताबडतोब त्यांनीं हुकूम दिला कीं, कर्वे पद्धतीनें शिक्षण देणारे असे इंग्रजी सहावी व सातवीचे (मॅट्रिकचे) वर्ग येथील सरकारी शाळेंतच उघडले जावे. तेव्हांपासून हे वर्ग पुढें चालूंच राहिले. स्त्रिया सार्वजनिक सभांतून भाग घेऊन भाषणें करूं लागल्या. हिंदी भाषेचें महत्त्व महाराजांनीं फार पूर्वींपासून ओळखलें असल्यामुळें येथील सर्व सभांतून इंग्रजी, मराठी, गुजराथी व हिंदी या सर्व भाषांतून भाषणें करण्याचा प्रघात पडला तो शेवटपर्यंत चालूच होता. बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्यांत आला. त्यांत आरंभीं दंडाचीच शिक्षा देण्यांत येत असे. तरी पुढें ती बदलून कैदेची करण्यांत आली. हिंदुधर्मविषयक कायदे विषयवार हप्त्याहप्त्यानें

प्रसृत करण्यांत आले व शेवटीं त्यांचें एकीकरण 'हिंदु निबंध' या नांवानें करण्यांत आलें. सन १९४५ च्या मे महिन्यांत पुण्यास सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें हिंदु कायद्यांचें एकीकरण करावें किंवा नाहीं या विषयावर रमाबाई सभागृहांत मोठा वादविवाद झाला. त्यावेळीं मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश न्या. लोकूर यांना पंच म्हणून नेमण्यांत आलें होतें. सभेच्या सुरुवातीपूर्वी न्या. लोकूर म्हणाले कीं, असा कायदा बडोद्यास असल्याची माझी कल्पना आहे. तो काय आहे हें समजलें तर बरें. तेव्हां तेथें उपस्थित असलेल्या श्री. तात्यासाहेब केळकरांनीं मजकडे बोट दाखवून न्या. लोकूर यांना सांगितलें कीं, "हे बडोद्यासच वकिली करतात, म्हणून यांना ती माहिती विचारा." त्यावरून न्या. लोकूर यांनीं मला विचारतां मी ती माहिती त्रोटक रूपानें त्यांना दिली. तेव्हां ते म्हणाले कीं, "मग हो काय ? या कायद्याच्या एकीकरणाविरुद्धची सर्वच बाजू या हकीकतीनें ढांसळते." यानंतर हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर ना. आंबेडकर हे कायदेमंत्री असतांना त्यांनीं एक हिंदु कायद्याविषयींचें व्यापक विधेयक लोकसभेपुढें आणलें. पण त्याला भयंकर विरोध झाल्यानें त्यांना तें परत घ्यावें लागलें. व त्यानंतर बडोदें राज्यानें केलें त्याचप्रमाणें हप्त्याहप्त्यानें विषयवार कांहीं विधेयकें पुढील कायदेमंत्र्यांनीं मंजूर करून घेतलीं व कांहीं अजून चर्चेसाठीं बाकी आहेत. हीं सर्व मंजूर झाल्यावर त्या सर्वांचें एकीकरण करून एकच हिंदु कायदा करण्याचें लोकसभेंत जाहीर करण्यांत आलें आहे. जर वेळींच बडोद्याचा अनुभव घेऊन त्याप्रमाणें करण्यांत आलें असतें तर सभासदांचा वेळ, पुष्कळसें द्रव्य व श्री. आंबेडकरांची मेहेनतहि फुकट गेली नसती.

यानंतरचा मुद्दा आर्थिक होय. हल्लीं एके ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सर्व वस्तु त्वरित नेण्याची व्यवस्था झाल्यानें आर्थिक बाबतींत बडोद्यांत व इतर प्रांतांत विषमता राहूं शकतच नाहीं. तथापि एकंदरींत पाहतां पुणें, मुंबई, अहमदाबाद वगैरे शहरांपेक्षां बडोद्यास अधिक स्वस्ताई पूर्वींहि होती व अजूनहि आहे. उद्योगधंद्याच्या दृष्टीनें मात्र बडोद्याच्या उत्तरेस अहमदाबाद व दक्षिणेस सुरत हीं औद्योगिक केंद्रें पूर्वींपासून स्थापन झालेलीं असल्यानें बडोद्याला त्या क्षेत्रांत प्रगति करण्यास वाव मिळाला

नाहीं. त्यामुळें बडोदें राज्याची स्थिति जरी संपन्न असली तरी लोकांची आर्थिक परिस्थिति चांगली नव्हती असें म्हणणें भाग आहे.

राजकीय दृष्टीनें पाहतां बडोद्याच्या प्रजेला श्रीमंत सयाजीरावांच्या कारकीर्दींत सर्व हिंदुस्थानांत डोकें वर करून फिरतां येत असे. येथें कोणत्याहि राजकीय पुढाऱ्याच्या येण्याजाण्यावर प्रतिबंध नसे व म्हणून लो. टिळक, शि. म. परांजपे, म. गांधी, डॉ. ॲनी बेझंट वगैरेंसारखी मंडळीहि बिनधोकपणें येऊन व्याख्यानें देत असत. या संबंधानें तर महाराजांचा असा एक हुकूम होता कीं, बडोद्यांतील कोणाच्याहि घरीं कोणी नामांकित पाहुणा आला तर त्याची खबर ताबडतोब राजवाड्यांत पोहोचवावी म्हणजे सवडीप्रमाणें महाराज त्या पाहुण्याची भेट घेतील. तसेंच कोणत्याहि वर्तमानपत्रावर येथें केव्हांहि बंदी घालण्यांत आलेली नव्हती. बडोद्याबाहेरील ब्रिटिश हद्दींतील सरकारला अप्रिय असलेले लोक तर बडोद्यास येऊन स्वस्थतेनें राहत. बारडोलीच्या सत्याग्रहाच्या वेळीं, 'दांडीकूच 'च्या वेळीं, तसेंच सत्याग्रहाच्या इतर चळवळींच्या वेळीं अशा लोकांना बडोदें म्हणजे 'आव जाव घर तुम्हारा' अशी स्थिति होती. बडोद्यांतील लोकांनीं बाहेर व्याख्यानें दिलीं तरी त्यांच्यावर नियंत्रण मुळींच नसे. त्याचप्रमाणें बडोद्यांत नागरिकांनीं केलेल्या कोणत्याहि चळवळीवर प्रतिबंध नसे. याला फक्त एका प्रसंगीं मात्र अपवाद झाला व तो प्रसंग 'दिल्ली दरबारचा.' त्यावेळीं गंगनाथ विद्यालय बंद करण्यांत आलें. कांहीं लोकांना बाहेर जाण्यास सांगण्यांत आलें. तसेंच कांहींना नोकरींतून निवृत्त करण्यांत आलें. अथवा कांहींना खालच्या जागेवर काढण्यांत आलें. तथापि दोनचार वर्षांतच हें सर्व प्रकरण स्थिरस्थावर झाल्यावर पूर्वस्थिति स्थापन करण्यांत आली.

अशा प्रकारें राजकीयदृष्ट्या बडोद्याच्या नागरिकांना खऱ्या स्वातंत्र्याचा पूर्ण अनुभव या दीर्घकाळांत मिळत होता.

धार्मिक बाबतींतील आचारविचारांवर कोणतेंहि नियंत्रण घातलें गेलें नाहीं. बदलती परिस्थिति पाहून लोकांनींच आपण होऊन हलकें हलकें पुढें पाऊल टाकलें. तथापि धर्म हा सर्व प्रगतीचा पाया आहे हें महाराज कधींहि विसरले नाहींत. ते येथें असतांना दर एकादशीस विठ्ठलमंदिरीं

दर्शनास जात, रामजन्माच्या प्रसंगीं सरदार मुजुमदार यांच्याकडे कीर्तनास जात व अशा प्रकारें सर्व जुन्या व चांगल्या रिवाजांचा ते परिपोष करीत. ‘ जोषयेत् सर्व कर्माणि विद्वान युक्तः समाचरन् । ’ हें गीतेंतील तत्त्व त्यांनीं चांगलें ओळखलें होतें व ‘ यद्यदाचरति श्रेष्ठः तदतदेवेतरो जनः । स यत् प्रमाणं कुरुते लोकः तदनुवर्तते ॥ ’ या नियमाप्रमाणें आपल्या आचरणानें प्रजेला आपण मार्गदर्शन करीत असतों हें ते नेहमीं ध्यानांत ठेवीत असत. संक्रांतीला तिळगुळाचा दरबार, दसऱ्याला सोनें देण्याचा दरबार, सरस्वती पूजनाचा समारंभ वगैरे न चुकतां ते करीत असल्यानें लोकहि ते विधि आपापसांत नेमानें करीत असत. स्वतः महाराज बडोद्यास प्रातःकाळीं शंकराची पूजा करीत व कपाळाला केशरी गंध लावीत. यासंबंधानें मी एकदां त्यांना विचारिलें असतां ते म्हणाले, ‘ आपल्या स्वच्छतेची व शुचिर्भूतपणाची जाणीव करून देणारें सुवासिक केशरी गंध आपण कां लावूं नये ? युरोपियन बायका पाव इंच जाड लिपस्टिकचा थर आपल्या ओंठांना देतात हें कृत्य जर सहन करण्यांत येतें तर गंध लावण्यापासून काय नुकसान आहे ? ’ एवंच, सर्व चांगले रीतिरिवाज ते पोशीत असत.

मात्र त्यांच्या विरुद्ध धार्मिक बाबतींत एक मोठा आक्षेप लोकांकडून असा घेतला जाई कीं, त्यांनीं सर्व धार्मिक संस्थांचीं वर्षासनें हलकें हलकें बंद करून टाकलीं. या आक्षेपांत तथ्य नाहीं असें नाहीं. कित्येक ठिकाणीं या वर्षासनांचा उपयोग देशसेवेकरतां न होतां स्वतःच्या कुटुंबाची चैन करण्याकडे होत असे. ही गोष्ट खोटी नाहीं व म्हणून त्या वर्षासनांवर कांही नियंत्रण ठेवणें जरूर असलें तरी सर्वच वर्षासनें रद्द करण्यानें धर्मावर आघात केल्याचा आक्षेप चुकीचा म्हणतां येणार नाहीं. इतका मुद्दा सोडला तर बडोद्यांतील नागरिक धर्मभ्रष्ट केले गेले नाहींत, हें सत्य आहे. या सर्व विवेचनांत श्रीमंत सयाजीराव यांचाच उल्लेख अधिक आल्यानें हें त्यांच्या कृत्यांचें वर्णन आहे कीं बडोद्यांतील परिस्थितीची समीक्षा आहे आहे असा संशय येण्याचा संभव आहे. पण ‘ राजा कालस्य कारणम् ’ या नियमाप्रमाणें त्यांच्या वर्तनाची छाप लोकांवर अत्यंत पडत असल्यानें व ते स्वतः एक चारित्र्यवान् व्यक्ति असल्यानें त्यांची कृति व लौकिक परिस्थिति यांत अशी एकरूपता असल्यास आश्चर्य नाहीं. श्रीमंत सयाजी-

राव यांच्या मृत्यूपूर्वी बडोद्यास अनपेक्षित जातीय दंगल झाली होती. कै. दे. भ. श्री. वल्लभभाई पटेल यांनीं त्यावेळीं बडोदें राज्याचा दौरा काढला होता व त्यांचें स्वागत बडोद्यास करण्याचें ठरलें होतें. तथापि श्री. वल्लभ-भाईनीं आपल्या दौऱ्यांत काढलेल्या कांहीं उद्गारांमुळें बडोद्यांतील कांहीं लोक क्षुब्ध झाले होते व त्यांनीं वल्लभभाईंच्या स्वागतासाठीं उभारलेल्या मंडपाची नासधूस करून त्यांच्या मोटारीवर दगड फेंकले. यामुळें झालेल्या दंगलींतच कोणीतरी माणसानें 'सुर्वे' या नांवाच्या एका तरुण मुलाचा सुऱ्यानें खून केला. यामुळें ही आग अधिकच भडकली. कांहीं दिवसांनीं तिचा उपशम झाला.

## .२७.

त्यानंतर श्रीमंत सयाजीराव यांचे नातू श्रीमंत प्रतापसिंहराव यांच्या राज्याभिषेकाचा बेत ठरवून तो समारंभ एप्रिलच्या अखेरीस अत्यंत थाटानें १०–१५ दिवसपर्यंत साजरा करण्यांत आला. त्यासाठीं नेमिलेल्या 'धार्मिक–विधि' समितींत माझी योजना झाली होती. अगदीं शास्त्रशुद्ध रीतीनें हा समारंभ व्हावा अशी श्रीमंत प्रतापसिंह यांनीं इच्छा प्रदर्शित केल्यावरून त्या समारंभाचें एक पत्रक या धार्मिक समितीनें तयार केलें होतें व तदनुसार सर्व कार्यक्रम यथासांग व्हावेत म्हणून १०-१२ दिवस रोज मला राजवाड्यांत हजर रहावें लागे. हा समारंभ पुरा झाल्यावर त्यांतील धार्मिक विधींचें विवरण करणारें एक पुस्तक मी मराठींत प्रसिद्ध करावें असा हुकूम दिवाण श्री. कृष्णमाचारी यांनीं केला. त्यांतील धार्मिक विधींच्या वर्णनाला प्राचीन व अर्वाचीन अशा सर्व राज्याभिषेकांचीं जीं जीं वर्णनें उपलब्ध होतीं तीं सर्व जोडून 'राज्याभिषेकचंद्रिका' या नांवानें तो ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे.

श्री. वल्लभभाईंच्या निमित्तानें झालेल्या दंग्यानंतर त्याची चौकशी पोलिसांमार्फत सुरू झाली होती. त्यामुळें त्या प्रश्नाची खरी बाजू दिवाणांना समजाविण्यासाठीं मला माउंट अबू येथें जावें लागलें. कारण त्यावेळीं

दिवाण श्री. कृष्णमाचारी हे हवा खाण्यासाठीं म्हणून तेथें गेले होते. तेथें माझा मुक्काम ८–१० दिवस झाला. त्या अवधींत तेथील नकी तलाव, बेडकाचा खडक, देलवाड येथील संगमरवरी जैन मंदिरें व जैन पुतळे वगैरे सर्व प्रेक्षणीय स्थळें मीं पाहिलीं. हिंदुस्थानांतील हवा खाण्याच्या ठिकाणांत अबू हें उंच स्थान आहे.

मी बडोद्यास सरकारी वकिलाचें काम अनेक वर्षे केलें. त्यांतच या वर्षी 'बडोदा लॉ रिपोर्ट्स' संपादण्याचें काम सरकारनें मजकडे सोंपवलें. तें मी व माझे मोठे चिरंजीव–जे एल्एल्. बी. झालेले आहेत, असे उभयतांनीं मिळून सहा वर्षेपर्यंत केलें. त्यांतच यावर्षी बडोद्याच्या वकिलीच्या परीक्षेस व मुंबईच्या बार कौन्सिलप्रमाणें येथें घेण्यांत येणाऱ्या एल्एल्. बी. च्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेस मला परीक्षक म्हणून नेमण्यांत आलें.

या वर्षाच्या अखेरीस मुंबईस किर्ते भंडारी हॉलमध्यें आपटे घराण्याचें संमेलन माझ्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आलें. अशी आमच्या घराण्याची ५–७ संमेलनें झालीं असावींत. या संमेलनास आपटे घराण्यांतील दीडशें, दोनशें मंडळी आली होती. तत्पूर्वी आपटे घराण्याचा इतिहास म्हणून एक पुस्तक वाईचे रा. गोविंद विनायक आपटे यांनीं सर्व देशभर हिंडून प्रसिद्ध केलें होतें. त्यानंतर महाराष्ट्रांतील निरनिराळ्या घराण्यांचे अनेक इतिहास प्रसिद्ध झाले आहेत. पण त्या सर्वांची सुरुवात आमच्या घराण्याच्या इतिहासानें केली आहे, हें आम्हांस गौरवास्पद वाटतें.

सन १९४० सालच्या एप्रिल महिन्यांत येथील प्रजामंडळाच्या आमंत्रणावरून श्री. सुभाषचंद्र बोस हे व्याख्यानाच्या दौऱ्यावर येथें आले होते व त्यांची राजमहालासमोरील मैदानांत हिंदीमध्यें पांचसहा व्याख्यानें झालीं. ते हिंदी जरी चांगले बोलत तरी त्यांत कांहीं अशुद्धता असे. त्यांच्या मुक्कामाच्या दरम्यान येथें गंधर्व नाटक मंडळीच्या नाटकांचे प्रयोग चालू होते. त्यावेळीं कंपनीचे मालक रा. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांना श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं एकदां तरी आपल्या नाटकास यावें अशी इच्छा होऊन त्यांनीं सुभाषचंद्रांना आग्रहाचें आमंत्रण दिलें व तें त्यांनीं स्वीकारलें. त्या दिवशीं 'विद्याहरण' नाटकाचा प्रयोग होता. तेव्हां सुभाषचंद्र यांच्या स्वागत समितींतील एक प्रमुख

कार्यकर्ते व माझे मित्र कै. रा. पाटकर वकील यांनीं श्री. सुभाषचंद्र यांना नाटकाला घेऊन जाण्याचें काम मजकडे सोंपविलें. त्याप्रमाणें श्री. सुभाषचंद्र यांच्याबरोबर मी नाटकास गेलों. वास्तविक तेथें थोडाच वेळ राहण्याचा त्यांचा मानस होता. पण श्री. बालगंधर्व यांच्या गायनावर, अभिनयावर व एकंदर नाटकावर ते इतके विलक्षण खूष झाले कीं, नाटकाचे तीन अंक पुरे होईपर्यंत ते बसले. श्री. बालगंधर्व हे स्त्री नाहींत ही गोष्ट मी त्यांना एक दोन वेळां सांगितली तरी तीवर त्यांचा विश्वास बसेना! इतका बालगंधर्वांच्या रूपाचा व अभिनयाचा एकजीव देवयानीच्या पात्राशीं झालेला त्यांना वाटला. गद्य भाग त्यांना विशेष न समजल्यानें त्यावेळीं व दोन अंकांच्या मधील वेळीं ते मजशीं राजकारणाची थोडीशी वाटाघाट करीत असत. वर्ष दीड वर्षापूर्वींच आम्ही नागपुरास डॉ. खरे यांच्या घरीं भेटल्याचें त्यांनीं आपण होऊन आरंभींच मला सांगितलें. अशा प्रकारें या थोर पुरुषाच्या सहवासाचा लाभ दीर्घ कालपर्यंत मिळाल्यानें मला धन्यता वाटली.

या सालच्या गणेशोत्सवासाठीं मी उत्तर गुजराथेंत अहमदाबाद, मेहसाणा व पाटण या गांवीं व्याख्यानाच्या दौऱ्यावर गेलों होतों. पाटण हें प्रसिद्ध शहर असून पूर्वी अनेक शतकांपर्यंत अनहिलवाड-पट्टण या नांवानें गुजराथची राजधानी म्हणून प्रसिद्ध होतें. सांप्रत त्यांत शेंकडों घरें पडलेलीं असून त्यांची माती, विटा वगैरे सामान तेथल्या तेथेंच पडलेलें दिसतें. तेथें म्युनिसिपालिटी असूनहि तिनें हें पडीक सामान उचलून नेऊन तेथील जागा साफ करविण्याचीहि काळजी घेतलेली नाहीं. या गांवीं पुरातन कालापासून जैन भांडार म्हणून असलेला हस्तलिखित ग्रंथांचा संग्रह फार अलौकिक आहे. हल्लीं त्यासाठीं एक उत्कृष्ट संगमरवरी इमारत बांधण्यांत आली असून त्यांत हा संग्रह अत्यंत व्यवस्थित रीतीनें ठेवलेला आहे. अशीं जैन भांडारें अनेक ठिकाणीं आहेत, पण पाटणचें भांडार त्यांत फार प्रसिद्ध आहे. तेथील ग्रंथ पूर्वीं कोणालाहि पहावयास मिळत नसत, पण अलिकडे नव्या विद्याप्रसाराच्या भावनेमुळें या विषयाच्या विद्यार्थ्यांना तेथील मुख्य गुरूंची परवानगी घेऊन ते ग्रंथ पहातां येतात. किंबहुना अलिकडे जैन गुरु ते ग्रंथ इतरांना दाखविण्यास उत्सुक असतात.

पण पहाण्यास जाणारे विद्यार्थीच दुर्मिळ असतात. मी तें भांडार पहाण्यास मुद्दाम गेलों. त्यावेळीं तेथील गुरूंनीं मला तें अत्यंत आस्थापूर्वक दाखविलें. हे जैन साधु फार वृद्ध असून अति विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनीं माझी उत्सुकता पाहून मला ५–६ दिवस पाटणला राहवून घेतलें. मी रोज तीन तास तेथें काढीत असें. त्या हस्तलिखितांतून त्यांनीं सनोत्तर १३ व्या शतकांतील एका ग्रंथांतील असा उल्लेख मला दाखविला कीं, त्यांत ‘ कागद ’ या रूपांतच हा शब्द वापरलेला आहे. तेथपर्यंत लोकांची समजूत अशी होती कीं, ‘ कागझ ’ या फारशी शब्दावरून ‘ कागद ’ हा मराठी शब्द आलेला असावा. पण वरील हस्तलिखितावरून हा शब्द ‘ कागद ’ ह्या रूपांतच ६००–७०० वर्षांपूर्वी वापरलेला असल्याचें आढळून येतें. त्या संबंधींचा उताराच मी केसरींत त्यावेळीं प्रसिद्ध केला होता. पाटणच्या माझ्या व्याख्यानालाहि हे जैनमुनि स्वतःच अध्यक्ष म्हणून आले. वस्तुतः हिंदु व जैन यांच्यांतील विरोधी भावनेमुळें असा प्रसंग क्वचितच येत असे. तो यावेळीं आल्यानें सर्वांनाच फार आनंद झाला.

यानंतर येथील सहविचारिणी सभा या वाङ्मयीन संस्थेला ५० वर्षें पुरीं झाल्यानें तिचा सुवर्ण उत्सव साजरा करण्याचें सभेनें ठरविलें होतें. व त्यासाठीं आम्ही श्री. तात्यासाहेब केळकर यांना आमंत्रिलें होतें. पण त्यांचें उत्तर आलें कीं, त्या दिवसाच्या सुमारासच त्यांना झालेल्या पणत्वाचें बारसें असल्यानें ते येऊं शकणार नाहींत. त्यांनीं मला पत्रानें कळविलें कीं, “ माझी कन्या (श्रीमती कमलाबाई देशपांडे) यांच्या चिरंजीवांना मुलगा झाला आहे व त्याचें बारसें असल्यानें तें सोडून मी जावें यास माझ्या घरची मंडळी अनुकूल नाहींत.” अशा अर्थाचें त्यांचें पत्र जरी आलें तरी मी पुन्हां एकवार त्यांना आग्रहानें येण्याचें आमंत्रण दिलें. तेव्हां त्याचा स्वीकार करून ते येथें मजकडे आले. त्यांनीं समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारलें व प्रसंग साजरा केला. त्याच सुमारास प्रो. सुरेंद्रनाथ सेन हे बडोदें सरकारच्या आमंत्रणावरून येथें व्याख्यान देण्यासाठीं आले होते; तसेंच श्री. गोविंदराव सरदेसाई हे पण इतर कांहीं कामांसाठीं आले होते. तिघेहि माझ्या घरीं एकत्र भोजनास आल्यानें बरीच ऐतिहासिक

चर्चा झाली व एकाऐवजीं तीन विद्वानांच्या सहवासाचा लाभ आम्हांस मिळाला.

तत्पूर्वीं त्या सालच्या मे महिन्यांत मीं लोणावळ्याजवळ मळवली या गांवीं माझे मित्र व मुंबईचे प्रसिद्ध साहित्यिक वकील कै. दत्तो आप्पाजी तुळजापुरकर यांच्या बोलावण्यावरून त्यांच्या बंगल्यांत राहावयास गेलों होतों. त्या गांवीं त्यांनीं सबंध डोंगरच खरेदी करून त्याच्या अर्ध्या उंचीवर हा बंगला बांधला आहे. डोंगराच्या माथ्यावरून येणारें पाणी एका टाकींत भरून बंगल्याला पाण्याचा पुरवठा केला आहे. तेथील हवा फारच आरोग्यकारक आहे. तेथें एक महिना मी काढला. तेथूनच पलिकडच्या स्टेशनाजवळ असलेल्या कामशेत या गांवीं माझे बडोद्याचे परिचित इतिहासकार रा. गोविंद सखाराम सरदेसाई यांच्याकडेहि थोडे दिवस राहून नंतर परतलों.

## .२८.

सन १९४१ च्या सप्टेंबर महिन्यांत मी व माझे बडोद्याचे एक मित्र रा. कृष्णराव मराठे यांनीं मिळून उत्तर हिंदुस्थानचा प्रवास करण्याचें ठरविलें. त्यासाठीं आम्ही बडोद्याहून निघून बयाना स्टेशनावरून फत्तेपूर शिक्री पाहून तेथून आग्रा येथें गेलों. तेथील सर्व स्थळें पाहिलीं व विशेषतः तेथें बांधिलें जात असलेलें राधास्वामी पंथाचें संगमरवरी मंदिरहि आम्ही पाहिलें. या मंदिरास अनेक कोटि रुपये खर्च येईल असें म्हणतात. तेथून ग्वाल्हेरास गेलों. तेथें माझे बडोद्याचे मित्र कै. जनरल नानासाहेब शिंदे यांचे कनिष्ठ बंधु कै. भाऊसाहेब शिंदे हे ब्रिगेडियर जनरल म्हणून निवृत्तींत राहत असत. त्यांच्याकडे आम्ही उतरलों. तेथें श्री. महाराणी लक्ष्मीबाई यांच्या वृंदावनाचें दर्शन घेतलें. तसेंच ग्वाल्हेरचा किल्ला व इतरहि सर्व प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. तेथें बडोद्याचे माजी दिवाण सर मनुभाई मेहता हे नायब दिवाण होते. त्यांनीं बोलाविल्यावरून त्यांच्याहि भेटीस मी गेलों. त्याचप्रमाणें तेथील व्हिक्टोरिया कॉलेजमध्यें एक व

जनकगंज येथें चालू असलेल्या व्याख्यानमालेंत एक अशीं दोन व्याख्यानें मीं दिलीं. ग्वाल्हेरचा प्रसिद्ध प्राचीन वस्तुसंग्रहहि आम्हांस श्री. गर्दे यांनीं दाखविला. यानंतर आम्ही मथुरेस जाऊन तेथील श्रीकृष्णाच्या मंदिरांत गेलों. तसेंच गोकुळ वृंदावन येथील मंदिरांचें व स्थानांचें दर्शन घेऊन नंतर आम्ही दिल्लीस जाऊन तेथील जुन्या महाराष्ट्रभवनामध्यें उतरलों. तेथें थोडे दिवस राहून आम्ही हरिद्वारास गेलों. त्यावेळीं निर्वासित लोकांचा प्रश्नच नसल्यानें तें गांव अत्यंत स्वच्छ होतें. मी पाहिलेल्या अनेक स्थलांमध्यें याच्याइतकें रम्य व शांतिदायक स्थळ मला आढळलें नाहीं. तेथून आम्ही कनखल, हृषीकेष, लक्ष्मणझुला व स्वर्गाश्रम हीं स्थळें पाहून दिल्लीस परतलों. त्यावेळीं श्री. माधवराव अणे हे व्हाइस-रॉयच्या कार्यकारी मंडळांत गृहमंत्री या हुद्यावर होते. त्यांनीं आम्हांस असेंब्लीचें सभागृह व इतर स्थळेंहि दाखविलीं. श्री. अणे यांचा व माझा स्नेह मी नागपुरास असल्यापासूनचा होता. व तेथें आम्ही अनेक सार्वजनिक कार्यांत सहकारानें भाग घेतला होता. त्यावेळीं असेंब्लीचें अधिवेशन चालूं असल्यानें तेंहि आम्ही पाहिलें. याप्रमाणें दिल्लीचा कार्यक्रम उरकून आम्ही जयपुरास गेलों. तेथील अंबर राजवाडा, प्रसिद्ध वस्तुसंग्रहालय वगैरे सर्व स्थानें पाहून आम्ही अजमेर येथें आलों. तेथून थोड्या अंतरावर असलेल्या पुष्कर सरोवरांत स्नान करून तेथील ब्रह्मदेवाच्या मंदिराचें दर्शन घेतलें. त्याचप्रमाणें तेथील तलावाच्या काठीं मोंगल बादशहा जहांगिरानें बांधलेलीं अनेक संगमरवरी विश्रांतिस्थानेंहि आम्हीं पाहिलीं. अशा रीतीनें हा दौरा पूर्ण करून आम्ही सुमारें दीड महिन्यानें बडोद्यास परतलों.

सन १९४२ सालीं माझे मोठे चिरंजीव यांना छोटा उदेपूर या संस्थानांत न्यायाधीशाची नोकरी मिळाल्यानें ते तेथें गेले होते. त्यांच्याकडे दसऱ्याच्या वेळीं मी गेलों होतों. त्या अवधींत, तेथून सह्याद्रीच्या गिरि-मालेंतील एका शिखरावर हाफेश्वर म्हणून एक अत्यंत रम्य स्थान आहे व तेथून दक्षिणेस डोंगरावरून खालीं उतरलें म्हणजे नर्मदा नदीचा प्रवाह असून त्याचा त्याच स्थानीं बाणगंगा नांवाच्या नदीशीं संगम झालेला आहे, तें स्थान पहावयास आम्ही गेलों. तें अत्यंत रम्य ठिकाण आहे.

सर्व सृष्टींतून दूर गेल्याचा भास त्या एकांत स्थळीं होऊन मन एकाग्र होऊन जातें. तेथें नर्मदा ओलांडली कीं, लगेच पश्चिम खानदेशाचा जिल्हा लागतो. या स्थानाच्या दर्शनानें मनाला फार आनंद झाला.

तेथून परत आल्यावर त्याच सालच्या ऑक्टोबर महिन्याच्या २७,२८ व २९ या तारखांना पुण्यास श्री. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांच्याच परिश्रमानें दुसरें ज्योतिषसंमेलन भरविलें गेलें. त्याबरोबरच त्यांनीं तेथें स्थापन केलेल्या ज्योतिष–शिक्षण–संस्थेचा रौप्य–महोत्सव करावयाचें ठरवून हा जोड समारंभ त्यांनीं योजिला. या संमेलनाचें वैशिष्ट्य असें होतें कीं, या संमेलनांत गणित व फलित या दोन्ही शाखांचा समावेश केला होता. संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. तात्यासाहेब करंदीकर होते. पहिल्या संमेलनाच्या वेळचें कै. चिंतामणराव वैद्य यांनीं उठविलेलें विरोधाचें वातावरण यावेळीं नसल्यानें हा समारंभ फारच थाटाचा झाला. ह्या दोन्ही सभांचें अध्यक्षस्थान मला देण्यांत आलें होतें. कै. तात्यासाहेब केळकर याहि संमेलनास तीनहि दिवस उपस्थित राहिले होते ही विशेष आनंदाची गोष्ट होय. या संमेलनांतच श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या हस्तें मला 'ज्योतिषाचार्य' ही पदवी दिल्याचें जाहीर करण्यांत येऊन त्या पदवीचें पत्रक बडोदें संस्थानचे दिवाण सर व्ही. टी. कृष्णमाचारी यांच्या हस्तें मला देण्यासाठीं तें त्यांच्याकडे पाठविण्यांत आलें. तदनुसार त्याच्या पुढल्या वर्षीं म्हणजे सन १९४३ च्या अखेरीस बडोदें येथें प्रो. माणिकराव यांच्या व्यायामशाळेंत एक खास सभा भरवून दिवाणांनीं तें मला समर्पण केलें. या समारंभासाठीं पं. रघुनाथशास्त्री व कै. श्री. रामचंद्र विनायक ऊर्फ बाबासाहेब पटवर्धन हे मुद्दाम बडोद्यास आले होते. पुण्याच्या संमेलनांत निरयन पक्षातर्फें पं. रघुनाथशास्त्री व सायन पक्षातर्फें मी अशा उभयतांच्या सहीनें एक पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें व त्यांत निरयन तारात्मक नक्षत्रें हीं समभाग नसल्यानें सायन समभाग नक्षत्रेंच ज्योतिष कार्यासाठीं घेतलीं पाहिजेत असा संकेत मान्य करण्यांत आला आहे. या संमेलनास पुण्यांतील अनेक विद्वान लोक उपस्थित होते व सर्वांच्या सहकार्यानें तो समारंभ फार यशस्वी रीतीनें पार पडला.

सन १९४३ सालीं कांहीं सरकारी कामासाठीं माझें कोल्हापुरास

जाणें झालें. तेथून सांगलीस येऊन तेथें तीनचार दिवस मी मुक्काम केला. तेथील कन्याशाळेचे चालक श्री. कानिटकर यांच्या सांगण्यावरून माझें त्या शाळेंत एक व्याख्यान झालें व दुसरें एक व्याख्यान तेथील वुइलिंग्डन कॉलेजांतहि झालें. परत येतांना वाटेंत पुण्यास दोन दिवस ज्योतिष-चर्चेचा कार्यक्रमहि योजिला होता. त्यांत भाग घेऊन नंतर मी परतलों.

सन १९४४ सालीं श्री शंकराचार्य जगन्नाथपुरी यांनीं बडोद्याजवळील नर्मदा किनारीं असलेलें क्षेत्रस्थान चांदोद कर्नाळी येथें चातुर्मास्य निमित्तें मुक्काम केला होता. त्यांच्या आमंत्रणावरून मी चांदोदला गेलों. तेथें त्यांनीं एक जाहीर सभा बोलावून तींत मला ' विद्यावाचस्पति ' ही पदवी व एक जरीची शाल प्रसाद म्हणून दिली. त्याचप्रमाणें त्या पदवीचें प्रशस्तिपत्रक त्यांनीं स्वहस्तानें लिहून मजला दिलें.

याच सालीं बडोद्यास श्री. बालगंधर्व यांच्या अध्यक्षतेखालीं एक संगीत परिषद भरविण्यांत आली. त्या प्रसंगीं त्यांच्या परिचयाचें भाषण मीं केलें होतें. त्या समारंभास हिंदुस्थानांतून अनेक ठिकाणाहून उत्तम गवय्ये व बजवय्ये आले होते व तीन दिवसपर्यंत गायनवादनाचा लाभ बडोदेकरांना अमूप लुटतां आला. ही परिषद डिसेंबर महिन्यांत भरली होती.

सन १९४५ सालीं मुंबई विद्यापीठानें एम्. ए. च्या परीक्षेस ज्योतिष विषयासाठीं मला परीक्षक नेमलें. त्यासाठीं मी मुंबईस गेलों होतों. तेव्हांपासून पुढें दरवर्षी याच जागेवर माझी नेमणूक होत आली आहे.

या सालच्या एप्रिल महिन्यांत बडोदें येथें हिंदु परिषदेची बैठक आर्यसमाज संस्थेतर्फे भरली होती. त्या सभेचें अध्यक्षस्थान नागपूरचे डॉ. मुंजे यांना देण्यांत आलें होतें. या समारंभास श्री. वि. दा. सावरकर व श्री. अण्णासाहेब भोपटकर हेहि आले होते. या सर्वांचीं परिषदे-बाहेरहि सार्वजनिक व्याख्यानें झालीं. त्यांस अलोट समुदाय जमत असे.

या वर्षींच्या उन्हाळ्यांत माझा मुक्काम पुण्यास असतांना तेथील वसंत व्याख्यान मालेचा समारोप त्या मालेच्या शेवटच्या दिवशीं माझ्या हस्तें करण्यांत आला.

या खेपेस एक विशेष प्रसंग घडला. त्याची आठवण विसरणें शक्य

नाहीं. मी दरवर्षी उन्हाळ्यांत पुण्यास जाई, त्यावेळीं कै. तात्यासाहेब केळकर यांना अनेक वेळां भेटत असेंच, पण या खेपेस मी त्यांच्याकडे एकदां गेलों असतां ते मला म्हणाले कीं, " तुम्ही दरवर्षी मला पुष्कळ वेळां भेटतां, पण इतर व्यवसायामुळें तुमचें व माझें मनमोकळें व भरपूर बोलणें होत नाहीं. यासाठीं तुम्ही मजकडेच रहाण्यास या, म्हणजे आपल्याला खूप बोलतां येईल." त्याप्रमाणें मी त्यांच्याकडे रहाण्यास गेलों. त्या अवधींत त्यांनीं इतर कोणतेंहि काम केलें नाहीं अथवा कोणाचीहि भेट घेतली नाहीं. दिवसा व रात्रीं आम्ही एकसारखे अनेक विषयांवर बोलत होतों. दुर्दैवानें ती त्यांची भेट अखेरचीच ठरली. कारण पुढील दोन वर्षें माझें पुण्यास जाणें झालें नाहीं व सन १९४७ च्या ऑक्टोबर महिन्यांत त्यांचें निधन झालें. त्यामुळें ही भेट म्हणजे माझ्या स्मरणांतील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणून मी तिचें जतन केलें आहे.

## .२९.

या पुढील सालीं माझे मोठे चिरंजीव मधुसूदन हे विलायतेस गेले. त्यापूर्वी त्यांनीं छोटाउदेपूरची सरकारी नोकरी सोडली होती व मुंबईच्या एका व्यापारी कंपनींत भागीदार म्हणून ते राहिले होते. त्या कंपनीनें युरोपांतील व्यापारी पेठांचें निरीक्षण करण्यासाठीं माझ्या चिरंजीवांना कंपनीच्या खर्चानें युरोपमध्यें पाठविलें. तेथें त्यांनी रशिया व जर्मनी या दोन देशांशिवाय इतर अनेक देशांचा प्रवास केला व हिंदुस्थानास सन १९४८ च्या सुरवातीस परत आल्यावर कंपनीला असें निवेदन केलें कीं, युद्धोत्तर मंदीमुळें तूर्त व्यापारास फारसा अवकाश नाहीं. याच कारणानें त्यांनीं पुढें ती कंपनी सोडली व त्यानंतर ते बडोद्याच्या साराभाई केमिकल्स या मोठ्या कारखान्यांत कारभारी शाखेंत घेतले गेले. तेव्हांपासून ते तेथेंच असून हल्लीं ते दिल्लीस मॅनेजरचें काम पहात आहेत. ते सन १९४६ सालीं विलायतेस गेले त्यावेळीं त्यांना निरोप देण्यास आम्ही सर्व कुटुंबाची मंडळी मुंबईस गेलों होतों.

मराठी ग्रंथ स... ठा.. स्थळप्रत
अनुक्रम ... वि. ...
क्रमांक ... नों: दि: ...

सन १९४७ साल माझ्या डोळ्यांत मोतीबिंदु आल्यामुळें त्याचें ऑपरेशन करण्यांत व त्यानंतरच्या विश्रांतींत गेलें. त्यामुळें त्या सालीं मी कोठेंहि जाऊं शकलों नाहीं. त्यापुढील सालच्या जानेवारी महिन्यांत डॉ. मुंजे बडोद्यास आले होते. यापूर्वी ते अनेक वेळां बडोद्यास आलेले होते व कांहीं वेळां ते मजकडेच उतरत व कांहीं वेळां सरकारी पाहुणे म्हणून जरी प्रथमतः सरकारी अतिथिगृहांत सामान ठेवीत तरी बाकीचा सर्व काळ ते मजकडेच काढीत. मी नागपुरास विद्यार्थी असल्यापासून सार्वजनिक कार्यांतील सहकारामुळें त्यांचा व माझा जो दृढ स्नेह जडला तो त्यांच्या मृत्यूपर्यंत वाढतच गेला. या खेपेस ते श्रीमंत प्रतापसिंहराव गायकवाड यांच्या आमंत्रणावरून भोंसले मिलिटरी स्कूलला मदत मिळविण्यासाठीं म्हणून आले होते. या वेळीं श्री. प्रतापसिंहराव यांनीं डॉ. मुंजे यांच्या शाळेला चांगली मदत केली. त्यानंतर अगदीं लौकरच गांधीवध झाल्यानें त्यांच्या येथें येण्यासंबंधानें अनेक प्रकारचे विरोधी तर्क करण्यांत आले व अफवा पसरविण्यांत आल्या. वस्तुतः ते वर उल्लेखिलेल्या कामासाठींच आले होते. दुर्दैवानें यानंतर ३–४ महिन्यांनींच त्यांचा अंत झाला. यामुळें त्यांच्या भेटीचा मला तो अखेर-चाच लाभ झाला.

याच सालीं ऑगस्ट महिन्यांत अहमदाबाद येथें गणेशोत्सवांत व्याख्यान देण्याचें आमंत्रण मिळाल्यावरून मी तेथें विमानानें गेलों. हा माझा पहिलाच व अजूनपर्यंत तरी एकच विमानानें प्रवास झाला. माझें ज्या दिवशीं व्याख्यान झालें त्याच दिवशीं व्याख्यानानंतर लगेच बॅ. जीना वारल्याची खबर मला तेथें मिळाली. यापूर्वी सन १९१८ सालीं मुंबईस कॉंग्रेसचें खास अधिवेशन बॅ. हसन इमाम यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें त्यावेळीं भाषण करतांना बॅ. जीना यांना मी प्रथम पाहिलें. पण मी त्यांना ओळखत नसल्यानें हे कोण असें मजजवळ बसलेल्या कै. तात्यासाहेब केळकर यांना विचारलें. तेव्हां त्यांनीं हे बॅ. जीना म्हणून मला सांगितलें. बॅ. जीना यांचें भाषण संपल्यावर ते श्री. केळकर यांच्या शेजारीं येऊन बसले, तेव्हां तात्यासाहेब यांनीं त्यांच्याशीं माझा थोडक्यांत परिचय करून दिला. त्यावेळीं बॅ. जीना यांचा जात्याभिमानाचा पारा शून्य अंशावर

असल्यामुळें ते शक्य तितके इतरांशीं मिळून मिसळून वागण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळें व त्यांच्या चौकस वृत्तीमुळें त्यांनीं मजजवळ बडोदें राज्या-संबंधाची बरीच हकीकत विचारून घेतली होती. त्यानंतरच्या काळांत त्यांचें तारू कसें व कोणीकडे झुकलें हें सर्वांनाच परिचित असल्यानें त्याचा निर्देश येथें करण्याचें कारण नाहीं.

सन १९४९ च्या जानेवारी महिन्यांत खंडाळा या हवा खाण्याच्या ठिकाणीं पुण्याचे श्री. झारापकर यांनीं एक महाराष्ट्र संमेलन भरविलें. त्याचें अध्यक्षस्थान मला देण्यासाठीं त्यांनीं आपले कारभारी यांना मुद्दाम बडोद्यास पाठविलें. त्या संमेलनास बॅ. जयकर, श्री. परांजपे—सीनियर रँग्लर, फलटणचे अधिपति नाईक निंबाळकर, श्री. पोतदार वगैरे मोठी मंडळी आली होती. या संमेलनांत महाराष्ट्राच्या अवनतीची मीमांसा व त्याच्या उन्नतीचें उपायचिंतन पुष्कळ करण्यांत आलें. अर्थात् अशा संमेलनांतून झालेल्या चर्चेचा टिकाऊ परिणाम फारसा नसतो हें जरी सर्वांना समजत असलें तरी अनेक लोकांचा परिचय व विचारविनिमय तेथें होऊं शकतो.

## .३०.

याच सालीं बडोदें राज्य कायमचें मुंबई इलाख्यांत विलीन झाल्याची घोषणा करण्यांत येऊन या राज्याचें आस्तित्व व कीर्तिप्रद स्मृति कायमची नष्ट झाली. येथें आल्यापासून मला वाङ्मयकार्य करण्याचा अमूप अवसर मिळाला होता व पुष्कळ वर्षेंपर्यंत माझ्या कृतींचें आस्वादनहि त्यावेळच्या सुविद्य राज्याधिपतींकडून होत असे. तें सर्व आतां नाहींसें झाल्यामुळें अर्थात्च मला फार वाईट वाटलें.

या वर्षीं अहमदाबाद येथें शिवजयंत्युत्सव फार मोठ्या प्रमाणावर करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. अहमदाबादचें उपनगर नरोडा म्हणून आहे. तेथें मिलमध्यें काम करणाऱ्या लोकांची फार मोठी वस्ती आहे. तेथेंच हा उत्सव करण्याचें ठरवून त्याचें अध्यक्षस्थान मला देण्यांत आलें

होतें. त्या समारंभाचे स्वागताध्यक्ष म्हणून तेथील सुप्रसिद्ध मिल व्यवस्थापक श्री. शंकरराव खेर यांची योजना झाली होती. या समारंभांत साताराचे रा. भाऊराव पाटील यांचें स्वागत करावयाचेंहि योजिलें होतें. त्याप्रमाणें हा उत्सव दोन दिवस साजरा करण्यांत आला. सभेस दहा हजाराहूनहि अधिक श्रोतृसमाज होता व त्या सर्वांनीं फार उत्साहानें या उत्सवांत भाग घेतला होता. याच वर्षीच्या गणेशोत्सवांत नडियाद येथेंहि व्याख्यानासाठीं मी जाऊन आलों.

या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यांत मी माझ्या नातीच्या लग्नासाठीं म्हणून जळगावांस गेलों असतां तेथून अमळनेरासहि जाऊन तेथील तत्त्वज्ञानमंदिर व प्रताप कॉलेज पाहून आलों.

बडोदें येथें ‘ साहित्यरत्न ’ परीक्षेसाठीं ‘ भाषाविज्ञान ’ हा विषय हिंदींतून शिकविला जातो. त्यासाठीं तो विषय शिकविण्यासाठीं मला सांगण्यांत आल्यावरून विद्यार्थ्यांना मी हिंदींतून या विषयावर दहा व्याख्यानें दिलीं.

सन १९५० च्या ऑगस्ट–सप्टेंबर महिन्यांत मी महाराणी श्रीमंत चिमणाबाईसाहेब गायकवाड यांच्या बोलावण्यावरून पुण्यास गेलों होतों. तेथें माझा सुमारें दीड महिना मुक्काम झाला. त्या अवधींत ज्योतिषाची चर्चा-सभा भरविण्यांत आली. तिला मी अध्यक्ष म्हणून उपस्थित होतों.

सन १९५१ च्या मार्च महिन्यांत मी अहमदाबाद पासून कांहीं दूर असलेल्या लख्तर या गांवीं गेलों होतों. पूर्वीं लख्तर हें संस्थान होतें. पण इतर सर्व संस्थानांप्रमाणेंच हिंदुस्थानाला स्वतंत्रता मिळाल्यानंतर तें विलीन करण्यांत आलें होतें. तेथील न्यायाधीश रा. आचार्य हे ज्योतिषाचे निपुण अभ्यासक असल्यामुळें त्यांचा व माझा परिचय झाला होता. म्हणून त्यांच्या आमंत्रणावरून मी तेथें एक आठवडा राहिलों होतों.

याच सालच्या जून महिन्याच्या १६ तारखेस माझे परममित्र जनरल नानासाहेब शिंदे यांचा मथुरा येथें मृत्यु झाला. त्यापूर्वीं एक महिना अगोदर ते काश्मीरच्या सफरीला गेले होते. तेथील थंड हवेंतून परत येतांना ते दिल्लीस आले असतां तेथील भयंकर उन्हाळ्यामुळें त्यांना तापाघात ( Sun Stroke ) झाला. तशाच स्थितींत ते मथुरेस गेले, पण

त्यांना उतार न पडतां तेथेंच त्यांचें अवसान झालें. अगदीं सामान्य स्थितींत बडोद्याच्या फौजेंत ते लेफ्टनंटच्या जागेवर रुजूं होऊन तेथून ते सेनापतीच्या उच्च हुद्यापर्यंत चढले. या जागेचा उपभोगहि त्यांनीं आपल्या पूर्वींच्या सर्व लोकांहून अधिक काळपर्यंत घेतला. त्यांना लेखन वाचनाची फार हौस असून त्यांनीं अनेक पुस्तकेंहि लिहिलीं आहेत. येथील सहविचारिणी सभा, मराठा समाज, वगैरे सार्वजनिक संस्थांचे ते अध्यक्षहि होते. त्यांचा स्वभाव फार सरळ, निष्कपटी, उदार व प्रेमळ असा होता. त्यांचा व माझा कित्येक वर्षांचा स्नेह असल्यानें त्यांच्या मृत्यूनें झालेली हानि मला फार जाणवली.

सन १९५२ च्या फेब्रुवारी महिन्यांत मुंबई विद्यापीठानें पीएच्. डी. साठीं मला परीक्षक नेमिलें.

यानंतरच्याच महिन्यांत म्हणजे मार्चमध्यें मी, माझे कल्याणचे मेहुणे रा. बापूसाहेब मेघःश्याम व त्यांची मंडळी या सर्वांनीं मिळून एक यात्रा काढली. आम्ही प्रथम प्रभासपाटण व सोरटी सोमनाथ या क्षेत्रांचीं दर्शनें घेऊन पुढें द्वारकेस गेलों. तेथील व बेट शंखोद्धार येथील सर्व मंदिरें पाहून परतल्यावर तेथील रोटरी क्लबांत माझें व्याख्यान झालें. तेथून आम्ही सिद्धपुरास मातृगया करून परत आलों.

पुढें ऑगस्ट महिन्यांत येथील जयसिंहराव वाचनालयाच्या मदतीसाठीं म्हणून माझ्या अध्यक्षतेनें एक उत्सव केला गेला. त्यांत व्याख्यान, रंजन कार्यक्रम वगैरेहि केले. या संस्थेला तिच्या स्थापनेपासून बडोदें सरकारकडून जी वार्षिक मदत मिळत असे ती हल्लीच्या सरकारनें अजिबात बंद केल्यानें संस्थेच्या बिघडलेल्या सांपत्तिक स्थितीला कांहीं मदत करण्यासाठीं म्हणून हा मार्ग आम्हाला अनुसरावा लागला. त्यांत आम्हाला जरी कांहीं द्रव्य मिळालें तरी यानंतर सुमारें दोन वर्षांनीं गायकवाड घराण्यांतील दोन प्रमुख व्यक्तींनीं मिळून वाचनालयाला प्रतिवर्षी रु. १२०० ची मदत दिली, यामुळेंच खरोखरी या संस्थेला संजीवन मिळालें. या संस्थेची धुरा मजवर अनेक वर्षे असल्यानें तिला अखेर आपल्या पायावर उभें करण्यांत मला यश मिळालें यामुळें अर्थातच मला फार आनंद झाला.

सन १९५३ च्या मे महिन्यांत हिंदुस्थान सरकारच्या प्राचीन वास्तुशाखेचे मुख्याधिकारी श्री. रामचंद्रन् यांचें बडोद्यास ‘ किरातार्जुनीय या काव्यात्मक प्रसंगाचें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या मंदिरांत कोरलेलें शिल्पकाम ’ ह्या विषयावर सदीप व्याख्यान झालें. त्याप्रसंगीं मी अध्यक्ष होतों. हें व्याख्यान फारच सुंदर व श्रवणीय झालें, तसेंच त्या प्रसंगांचें सदीप दर्शनहि फार सुंदर होतें. एका अगदीं अपरिचित अशा कृतीचा दर्शनलाभ श्रोत्यांना व प्रेक्षकांना श्री. रामचंद्रन् यांनी घडविला.

या वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांत प्रो. माणिकराव यांच्या व्यायाम मंदिरांत ‘ महाराष्ट्राचें कथानक ’ या विषयावर दररोज एक अशीं माझीं पांच व्याख्यानें झालीं. महाराष्ट्राची अगदीं आरंभकालापासूनची हकीकत या व्याख्यानांतून संगतवार रीतीनें मी कथन केली.

या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यांत अहमदाबाद येथें जें इतिहास संमेलन भरलें त्यासाठीं मुंबईचे प्रख्यात वकील डॉ. पांडुरंग वामन काणे व भारतीय विद्याभवनाचे डायरेक्टर प्रो. वेलणकर हे त्या संमेलनास गेले होते. तेथून परत जातांना ते दोघेहि माझ्या आमंत्रणावरून बडोद्यास उतरले. त्यावेळीं डॉ. काणे यांचें ‘ हिंदु कायदा विधेयक ’ या विषयावर व्याख्यान झालें. हा विषय प्रचलित असून सर्वांना आकर्षक असा असल्यानें त्यांच्या व्याख्यानाला फार गर्दी झाली होती. प्रा. वेलणकर यांचेंहि ऋग्वेद-विषयक एक व्याख्यान झालें. या दोन्हींहि व्याख्यानांस मी अध्यक्ष होतों.

सन १९५४ च्या एप्रिल महिन्यांत सुरवातीसच मला Thrombosis चा झटका आला. त्यामुळें डॉक्टरांच्या सल्ल्यावरून सहा महिनेपर्यंत मी कांहींहि करूं शकलों नाहीं. तरी त्यांचा सल्ला झुगारून त्यानंतर सुमारें दोन महिन्यांनी ता. २५–५–५४ ला माझे विशेष स्नेही व सहकारी प्रो. माणिकराव यांचा अंत झाला, त्यावेळीं त्यांच्या अंत्यदर्शनाला मी तसाच गेलों होतों. मी बडोद्यास आल्यापासून राजकीय संकटांमुळें आम्हां दोघांना जो त्रास भोगावा लागला त्यामुळें आमचा निरतिशय स्नेह झाला, तो अखेरपर्यंत कायम राहिला. या अवधींत आम्ही अनेक कामें सहकार्यानें केलीं व सर्व सुखदुःखांच्या प्रसंगीं एकत्र राहिलों होतों. त्यांच्या मृत्यूनें बडोद्याच्या सार्वजनिक जीवनाची जी हानी झाली आहे तिचें

वर्णनच करतां येणार नाहीं.

या सालच्या ऑक्टोबर महिन्यांत बडोद्याचे माजी दिवाण व हल्लींच्या प्लॅनिंग कमिशनचे उपाध्यक्ष सर व्ही. टी. कृष्णमाचारी हे येथील दिवाण-पदावरून सन १९४४ सालीं निवृत्त झाल्यावर १० वर्षांहून अधिक काळा-नंतर प्रथमच बडोद्यास सरकारी रीतीनें आले होते. त्यावेळीं त्यांच्या खास सूचनेवरून मी त्यांना येथील मोतीबाग राजवाड्यांत जाऊन भेटलों. अर्थात् त्या प्रसंगीं बडोद्याच्या घटनांची व स्थित्यंतराची चर्चा झाली.

सन १९५५ च्या मार्च महिन्यांत माझे कल्याणचे मेहुणे श्री. बापू-साहेब मेत्र:श्याम यांचा कॅन्सरच्या विकारानें मृत्यु झाला. मी त्यांच्याकडे पन्नास वर्षांहून अधिक काळपर्यंत सतत जात असें. ते मोठे इनामदार असून सर्व सार्वजनिक कार्यांना त्यांनीं अत्यंत उदार हातानें मदत केली होती. ते फार धार्मिक वृत्तीचे असून आपल्या मताप्रमाणें अखेरपर्यंत वागत असत. त्यांच्या मृत्यूमुळें माझें नेहमीं जाण्याचें एक विश्रांति-स्थान हरपलें.

सन १९५५ च्या मार्च महिन्याच्या अखेरीस मी इंदुरास गेलों. तेथें माझी मुलगी रा. नेवासकर वकील यांना दिलेली असल्यानें त्यांच्या आमंत्रणावरून त्या सर्व मंडळींना भेटण्यासाठीं म्हणून मी तेथें गेलों. माझ्या मुलीचे दीर श्री. तात्यासाहेब नेवासकर हे मध्यभारताच्या हाय-कोर्टांत जज्ज होते; व त्यानंतर संस्थानांच्या पुनर्रचनेमध्यें मध्यभारत हा भाग मध्यप्रदेशांत विलीन झाल्यानंतर मध्यप्रदेशाच्या हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून त्यांची नेमणूक आतां झाली आहे. इंदुरास माझे अनेक वर्षांचे स्नेही व सुप्रसिद्ध विद्वान श्रीमंत सरदार माधवरावसाहेब किबे हे असल्यानें त्यांची भेट घेण्याचें एक आकर्षणहि इंदुरास जाण्यांत मला होतेंच. त्याप्रमाणें मी इंदुरास गेल्यावर त्यांच्या अनेक वेळा भेटी–गाठी झाल्या. तेथें मराठी साहित्यसभा या नांवाची संस्था मराठी वाङ्मयाच्या उत्कर्षासाठीं स्थापन झालेली असून तिनें आपल्या मालकीची भव्य इमारतहि तेथें केली आहे. सदर संस्थेच्या आमंत्रणावरून या इमारतींत संस्थेतर्फें माझीं दोन व्याख्यानेंहि झालीं. याशिवाय तेथील कै. महाराज श्रीमंत शिवाजीराव होळकर यांच्या कन्या श्रीमती सावित्रीबाई यांच्या

बोलावण्यावरून चार पांच वेळां त्यांची व माझी भेटहि झाली. त्याप्रसंगीं आपल्या हातून मराठी व संस्कृत या भाषांच्या अभिवृद्धीसाठीं एक सुंदर इमारत व पुस्तक-संग्रहालय व्हावें अशी आपली इच्छा असल्याचें सांगून त्या संबंधाची एक योजना तयार करून देण्याचेंहि त्यांनीं मला सांगितलें. त्यावरून तशा प्रकारची एक तपशीलवार योजना मी तयार करून त्यांना दिली, पण तिचें पुढें कांहींहि झालें नाहीं. इंदुरास एक मोठें सात मजली हॉस्पिटल बांधण्यांत आलें असून हिंदुस्थानांतील तशा संस्थांत त्याचें स्थान फार वरचें आहे. त्यांत अद्ययावत् सर्व साधनें व उपकरणें सिद्ध असून त्यांतील डॉक्टरांची योजनाहि सुप्रसिद्ध आहे. याशिवाय तेथील होळकर कॉलेज हें महाविद्यालयहि फार प्रख्यात असें आहे.

इंदूर शहर हें मध्यभारतांतच केवळ नव्हे तर आजूबाजूच्या शेंकडों मैलांच्या परिसरांत प्रसिद्ध असलेलें व्यापारी केंद्र आहे. या शहराची हवाहि उत्कृष्ट असून तें समुद्रसपाटीपासून जवळजवळ दोन हजार फूट उंच असल्यानें तेथें उष्णताहि अगदीं कमी भासते. वस्ती वाढण्यालाहि शहराभोंवतीं पुष्कळच अवसर आहे. असें असूनहि तेथील राज्यकर्त्यांचें लक्ष या शहराची सुधारणा करण्याकडे चार पिढ्यांतहि गेलें नाहीं. त्यामुळें शहर अत्यंत अव्यवस्थित आहे. शहराला ड्रेनेज चांगलें नाही. रस्ते रुंद व समाकृति नाहींत. यामुळें शहराला रम्यता अशी मुळींच भासत नाहीं. त्या मानानें बडोदें शहरास प्राकृतिक अडचणी अनेक असूनहि तें सुधारण्याकडे कै. श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं अखंड लक्ष पुरविल्यामुळें तें इतकें सुंदर झालें आहे कीं, त्याच्या तोडीचीं फार थोडीं शहरें हिंदुस्थानांत आढळतील. इंदुरास लायब्ररींत गंभीर विषयांवरील पुस्तकें तर मुळींच नाहींत. यामुळें तशा विषयांच्या अभ्यासकांस कांहीहि मदत अथवा साधन मिळूं शकत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. शहरांतील अनेक विद्वान गृहस्थांशीं माझ्या भेटी झाल्या. त्या सर्वांकडूनहि हीच तक्रार करण्यांत आली. आतां या शहराचा समावेश मध्यप्रदेशांत झाल्यानें पूर्वींपेक्षां कांहीं अधिक सुधारणा होते कीं काय तें पहावें.

● ●

## .३१.

सन १९५६ सालीं भारतांत सर्व टिकाणीं लोकमान्य टिळक यांची जन्मशताब्दि फार मोठ्या समारंभानें साजरी करण्यांत आली. त्या प्रसंगीं लो. टिळक यांच्या संशोधनकार्यासंबंधानें एक व्याख्यानमाला नागपूरच्या विदर्भ साहित्यसंघातर्फे गुंफण्यासाठीं मला नागपूरहून आमंत्रण देण्यांत आलें. बहुश: ज्या हजारों ठिकाणीं हा समारंभ झाला त्यांत कै. लो. टिळक यांच्या राजकीय कार्याचाच गौरव करण्यांत आला होता. पण तें कार्य अत्यंत महत्त्वाचें असलें तरी माझ्या मतें तें प्रासंगिक स्वरूपाचेंच होतें. कालांतरानें आपण लोकशाहीमध्यें पुष्कळ वहिवाटल्यानंतर त्या राजकीय कार्याचें महत्त्व कमी होणार आहे. पण त्यांच्या वैदिक संशोधनकार्याची हकीकत याहून अगदीं भिन्न आहे. त्यांनीं वेदांचें आद्यस्थान उत्तर ध्रुवाजवळ असल्याचें ठरविणारा ग्रंथ ‘ Arctic Home of the Vedas ’ हा प्रसिद्ध केला त्यावेळीं, तसेंच वेदांचा काल इ. स. पू. ४५०० वर्षें असल्याचें प्रतिपादन त्यांनीं आपल्या ‘ Orion ’ या ग्रंथांत केलें त्यावेळीं व अखेर ‘ Vedang Chronology ’ हा निबंधात्मक ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या चिरंजीवांनीं प्रसिद्ध केला त्यावेळींहि, सदर मतांविरुद्ध टीकेचें नुसतें काहूर उठलें व हीं मतें निराधार, काल्पनिक व भरमसाट आहेत अशा आक्षेपांची पाश्चात्यांकडून व त्यांची री ओढणाऱ्या भारतीयांकडूनहि त्यांच्यावर झोड उठविण्यांत आली.

पण कालांतरानें जसजसें नवीन संशोधन झालें व शांत विचार होऊं लागला तसतसें त्यांच्या मतांचें सत्यत्व जगाला पटूं लागलें. अगदीं आरंभीं वेदांचा आद्यकाल इ. स. पू. १००० ते १२०० वर्षें असल्याचें प्रतिपादन मॅक्समुलर या पंडितानें केलें. तेथपासून पंडितांनीं तो काल मागें नेत नेत, आतां पार्जिटर या पंडितापर्यंत तो इ. स. पू. ३००० वर्षांपर्यंत आणून ठेविला गेला आहे. तसेंच वेदांचें आद्यस्थळ दक्षिण रशिया, हंगेरी अथवा पूर्व तुर्कीस्तान या प्रदेशांत असल्याचें प्रतिपादन करण्यापासून आतां त्या स्थानावरील येणाऱ्या आक्षेपांमुळें हीं सर्व मतें डळमळींत

झालीं असून लो. टिळकांच्या मताकडेच पंडितांचा अभिप्राय झुकत असल्याचें दिसून येतें. तसेंच इराकमध्यें सांपडलेल्या 'कील' लिपीवरून केवळ कांहीं शब्दांचे अर्थ व वेदांत असलेल्या थोड्याशा शब्दांशीं साम्य पाहून या दोन संस्कृतींचा दृढ संबंध असला पाहिजे असें अनुमान लो. टिळकांनी केलें; त्यांच्या मृत्यूनंतर उघडकीस आणिलेल्या सिंधुसंस्कृतीच्या वस्तुसंग्रहावरून त्यांचें हें मत निर्विवाद होऊं पहात आहे. या सर्व गोष्टींचा विचार करितां लो. टिळकांनी केलेल्या संशोधन कार्याचें तेज दिवसेंदिवस मंद न होतां अधिक उज्ज्वल स्वरूपांत तें प्रतीत होऊं लागल्यानें या कार्याचें महत्त्व त्यांच्या राजकीय कार्यापेक्षां फार मोठें व चिरंतन स्वरूपाचें आहे असें माझें मत आहे. हेंच मत विदर्भ साहित्य-संघाच्या चालकांचेंहि असल्यानें त्यांनीं मला वर लिहिल्याप्रमाणें आमंत्रण केलें.

या आमंत्रणाचा मी स्वीकार केला व ता. २५–७–५६ रोजीं मी नागपुरास पोचलों. तेथें माझे जुने मित्र कै. रा. गोपाळराव ओगले यांचे जामात पुरुषोत्तमराव ऊर्फ बाळासाहेब ढवळे हे विदर्भ साहित्यसंघाचे अध्यक्ष असल्यानें त्यांच्या घरीच माझा मुक्काम झाला. ता. २६, २७ व २८ जुलै या दिवशीं माझीं वरील विषयावर तीन व्याख्यानें झालीं.

नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजचे उपमुख्याध्यापक प्रो. पेंडसे यांच्या सांगण्यावरून त्या कॉलेजांत 'साहित्यानंदाची मीमांसा' या विषयावरहि मी एक व्याख्यान दिलें. त्यावेळीं कै. तात्यासाहेब केळकर यांच्या सविकल्प समाधीचा उल्लेख करून त्या उपपत्तींतील उणीव द्विविध मनाच्या जोड उपपत्तीनें मी कशी पुरी केली आहे त्याचेंहि विवेचन मीं केलें.

मुंबई राज्य एवढें मोठें पण तेथेंहि नसलेली एक अपूर्व संस्था नागपुरास आहे. ती म्हणजे तेथील स्त्रियांचें कॉलेज ही होय. सदर कॉलेजांत ४०० च्या वर विद्यार्थिनी असून त्या एम्. ए. पर्यंतचा अभ्यास करतात. सदर संस्था सरकारी नसून केवळ खासगी पायावर चालविलेली आहे व तिच्या शासनमंडळाचें अध्यक्षस्थान नागपूर हायकोर्टाचे निवृत्त चीफ जस्टिस व माझे मित्र श्री. शंकरराव नियोगी यांचेकडे आहे. त्यांच्याच बोलावण्यावरून मी त्या संस्थेंत एक लहानसें

भाषण केलें. याशिवाय तेथील सरकारी Polytechnic Institute अथवा कलाभवन या संस्थेचे प्रिन्सिपॉल श्री. टिल्लू यांच्या आमंत्रणावरून तेथें लो. टिळकांच्या तसबिरीचें अनावरणहि मी केलें. याशिवाय इतरहि कांहीं संस्थांतून माझीं भाषणें झालीं. अशा प्रकारें हा नागपूरचा कार्यक्रम पुरा करून मी जळगांवास आलों. तेथील कॉलेजांत माझें एक व्याख्यान झालें व तेथील साहित्यिक मंडळींनी माझा सत्कार समारंभ योजिला होता तेथेंहि माझें एक भाषण झालें.

वऱ्हाडमधील बुलढाणा या जिल्ह्याच्या गांवीं माझे एक फर्ग्युसन कॉलेजापासूनचे मित्र श्री. भाऊसाहेब कानिटकर हे वकिली करीत असत. हल्लीं ते त्या व्यवसायांतून निवृत्त झाले असून त्यांचे चिरंजीव तो धंदा पुढें चालवीत आहेत. रा. कानिटकरांना मी नागपुरास गेल्याची बातमी कळल्यामुळें मला बुलढाण्यास घेऊन जाण्यासाठीं ते जळगांवास आले. त्यांच्याबरोबर मी बुलढाण्यास गेलों. तेथेंहि माझीं चार व्याख्यानें झालीं. त्यांतील मध्यदिवस हा ता. १५ ऑगस्टचा असल्यानें या स्वातंत्र्य-दिनाच्या निमित्त तेथें झालेल्या समारंभांतहि माझ्या भाषणापैकींचीं कांहीं झालीं. अशा रीतीनें हा दौरा पुरा करून मी ता. २७-८-५६ रोजीं बडोद्यास परत आलों.

नागपुरास मी पूर्वीं एल्एल्. बी. च्या अभ्यासासाठी असल्याचें यापूर्वीं कथन केलें आहे. त्यावेळच्या व आजच्या शहराच्या स्थितीची तुलना या प्रवासांत साहजिक माझ्या मनांत आली. तिचा विचार करतां असें म्हणतां येईल कीं, जरी त्यावेळेपेक्षां आजची वस्ती पुष्कळच अधिक–दुपटीहूनहि अधिक–झाली आहे तरी हें शहर अत्यंत अव्यवस्थित रीतीनें वसलें आहे. तेथील म्युनिसिपालिटीनें कोणत्याहि प्रकारची रेखीव शहर-विस्ताराची योजना केली नसल्यानें मेद वाढलेल्या माणसाप्रमाणें शहराची वाढ वेडीवाकडी हवी तशी झाली आहे. जेथें ज्याला जागा मिळाली तेथें त्यानें इमारत बांधली आहे. त्यामुळें शहरांतील रस्ते अरुंद व अनियमित झाले आहेत. बऱ्याच भागांत ड्रेनेजची व्यवस्था नसल्यानें डांस, चिलटें वगैरेंचा उपद्रव अतिशय आहे. सुंदर व प्रेक्षणीय अशा नवीन इमारती क्वचितच पहाण्यांत येतात. शहराचा विस्तार पुष्कळ झालेला आहे तरी

तेथपर्यंत पोहोचण्याचे मार्ग सरळ अथवा व्यवस्थित नाहींत. वाहनांची—मोटार, बसेस, ट्रॅम्स वगैरेंची—कांहीं एक व्यवस्था नाहीं. फक्त सायकल-रिक्षा मात्र पुष्कळ आहेत. हीं वाहनें स्वस्त मिळतात, तथापि रिक्षा अरुंद असल्यानें त्यांत दोन माणसेंहि बसण्याला अडचणच होते. या सर्व प्रकारां-मुळें एकंदरीनें या शहराची छाप मनावर विकृत स्वरूपांतच पडते.

मी परत येत असतांना जळगांवच्या माझ्या मुलीचे दीर श्री. केशवराव पाटणकर, जे पूर्व खानदेशांतील अत्यंत प्रसिद्ध वकील व लो. टिळकांचे कट्टे अनुयायी होते, त्यांचा अत्यंत आकस्मिक रीतीनें हृदय बंद पडून मृत्यु झाला. त्यांच्या मृत्यूपूर्वीं अगदीं थोडेच दिवस अगोदर मी बुलढाण्याहून जळगांवास परत येत असतांना त्यांच्याकडे उतरलों होतों. व तेथून जळगांवास आल्यावर मी तीनचार दिवसच तेथें होतों. तेवढ्यांत भुसावळला रा. केशवराव पाटणकर वारल्याची बातमी मला कळली. दुपारचे ११ वाजेपर्यंत आलेल्या माणसाशीं गप्पा मारून घरांतून जेवणाच्या आमंत्रणाची वाट पहात ते खुर्चीवर बसून हातांत घेतलेलें वर्तमानपत्र वाचीत असतांच दोन मिनिटांत त्यांची हृदयक्रिया बंद पडून त्यांचा अंत झाला. ही अत्यंत खेदाची गोष्ट माझ्या प्रवासांत घडली.

## .३२.

# माझे मित्र

मनुष्याला स्वभावसाम्यामुळें आयुष्ययात्रेंत कांहीं मित्र होतातच. चांगला मित्र हा एक अमोलिक ठेवा आहे. त्याच्या योगानें मनाला विश्रांति मिळून आनंद होतो. ईश्वरकृपेनें मला असे अनेक मित्र मिळाले. त्यांतील विशेष निकटच्या मित्रांचा उल्लेख करणें येथें अवश्य आहे. कारण त्यांच्या सहवासानें झालेल्या समाधानांतून ऋणमुक्त होण्याचा तोच एक मार्ग आहे. मी बडोद्यांत अनेक वर्षें राहिलों असल्यानें तेथें जसे माझे अनेक मित्र झाले, तसेंच पुणें, मुंबई, नागपूर वगैरे अनेक ठिकाणींहि मला

मित्र लाभले व त्यांच्या मैत्रीचा लाभ त्यांच्यापैकीं कांहींच्या अवसानापर्यंत मिळाला, तर कांहींचा अजूनहि मिळत आहे ही मी देवाची मोठी कृपा समजतों.

मी बडोद्यांत आल्यावर ज्यांच्या स्नेहाचा लाभ मला झाला त्यापैकींचे पहिले गृहस्थ म्हणजे कै. श्रीमंत वाघोजीराव राजे शिर्के हे होत. हे बडोद्याचे अधिपति श्रीमंत मल्हारराव म्हणून होते त्यांचे नातू होत. हे मोठे सरदार असूनहि फार सज्जन होते. त्यांचा स्वभाव सरळ, उदार व प्रेमळ असा होता. ते स्वतः गायनवादनाचे फार शौकिन असून पेटी हें वाद्य ते स्वतः फार उत्तम वाजवीत. त्यांच्या मैत्रीमुळें त्यांचें घर मला स्वतःच्या घराप्रमाणेंच वाटत होतें. गंधर्व नाटकमंडळी ही ज्यावेळीं प्रथम जन्मली त्यावेळीं तिचें बारसें यांच्या घरींच झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं आपल्या घरचे अनेक मौल्यवान कपडे व वस्तु देऊन या मंडळीला उपकृत केलें होतें. ते सन १९१८ सालीं वारले. तेथपर्यंत त्यांच्या प्रेमळ सहवासाचा लाभ मला निरंतर झाला होता.

यानंतरचे माझे स्नेही कै. जनार्दन सखाराम कुडाळकर हे होत. ते दैवज्ञ जातींतील असून एम्. ए., एल्‌एल्.बी. ची परीक्षा पास झाले होते व त्यांची लायकी ओळखून कै. श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं येथें स्थापन केलेल्या सेंट्रल लायब्ररीचे व तिच्या शाखा वाचनालयाचे प्रमुख म्हणून त्यांना नेमण्याचें आधींपासूनच मनानें योजिलें होतें. सेंट्रल लायब्ररीच्या स्थापनेच्या वेळीं तिच्या मुख्याच्या जागीं महाराजांनीं मि. बोर्डेन या अमेरिकन गृहस्थांना तीन वर्षांसाठीं येथें आणलें होतें. त्यांच्या हाताखालीं रा. कुडाळकर यांना शिक्षण देऊन त्यांना अमेरिकेस पाठविलें. तेथून ते परत आल्यावर त्यांची बडोदें राज्यांतील वाचनालयसंस्थांच्या प्रमुख स्थानीं नेमणूक झाली. त्यांचें त्या विषयांतील प्रभुत्व पाहून मद्रास येथें भरलेल्या प्रथम अखिल भारतीय वाचनालय परिषदेच्या अध्यक्षस्थानीं त्यांची नेमणूक करण्यांत आली. त्या परिषदेचें उद्‌घाटन मद्रासचे त्यावेळचे गव्हर्नर लॉर्ड वुइलिंगडन यांनीं स्वतः करून रा. कुडाळकरांच्या विषयीं प्रशंसेचे उद्‌गार काढले होते. सन १९१६–१७–१८ या तीन सालीं ते व मी असे दोघे सहविचारिणी सभेचे सहचिटणीस होतों.

त्यानंतर सन १९२१ सालीं येथें भरणाऱ्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे सहचिटणीस म्हणून आम्हीच दोघे नेमिले गेलों. पण दुर्दैवानें, तें संमेलन होण्यापूर्वींच न्यूमोनियाच्या विकारानें ते निधन पावले. त्यावेळीं त्यांचें वय फक्त ३९ वर्षांचेंच होतें. जर ते अधिक वर्षें जगले असते तर त्यांनीं आपल्या क्षेत्रांत मोठें कार्य करून दाखविलें असतें.

यानंतरचा उल्लेख श्री. खाशेराव भगवंतराव जाधव यांचा केला पाहिजे. कलियुगांत परधन व परस्त्री ही विषासमान मानणाऱ्या फार थोड्या व्यक्तींत यांची गणना होते. ते अत्यंत स्वाभिमानी, अपूर्व देशभक्त व सत्यवचनी होते. बडोदें राज्याच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वापर्यंत ते नोकरींत चढले होते व श्रीमंत सयाजीराव यांना 'तुम्हीं येथें चुकत आहांत.' असें सांगण्याचें धैर्य त्यांच्यांतच केवळ होतें. दिल्ली दरबारच्या प्रकरणीं त्यांनीं मुंबईचे त्यावेळचे पोलिस कमिशनर मि. व्हिन्सेंट यांनाहि धमकी दिली होती व त्यांनीं त्यावेळीं केलेल्या अनेक स्वाभिमानाच्या कृत्यांमुळें त्यांना कष्ट सोसावे लागले होते. त्यांचें वय पुरें होतांच ते आग्रहानें निवृत्त झाले, तेव्हां श्रीमंत सयाजीराव यांनीं त्यांची नेमणूक श्रीमंत प्रतापसिंहराव यांच्या देखरेखीसाठीं त्यांचे कंपॅनियन म्हणून केली. त्या जागेवर असतानांच ते हृदयाच्या विकारानें वारले. मराठा शिक्षण परिषद वगैरे शिक्षणविषयक कार्यांत त्यांनीं पुष्कळ भाग घेतला होता. सरकारी नोकरींत असल्यानें जरी त्यांना प्रत्यक्ष राजकारणांत पडतां आलें नाहीं तथापि ते अस्सल देशाभिमानी होते यांत शंका नाहीं.

यानंतरचे माझे मित्र म्हणजे बडोदें हायकोर्टाचे सरकारी वकील व त्यानंतर सरन्यायाधीशाच्या हुद्यापर्यंत चढलेले श्री. रामचंद्र हरि गोखले हे होत. यांना व इतर अनेक माझ्याहून अधिक वयाच्या गृहस्थांना मी माझे स्नेही म्हटलें आहे त्याचा अर्थ आम्ही वयानें सारखे होतों असा बिलकुल नसून, आमचा निकट सहवास आल्यानें ज्यांच्या मनांत एकमेकां-विषयीं लोभ उत्पन्न झाला असे गृहस्थ होत. समान वयाच्या गृहस्थांनींहि अशा गृहस्थांच्याहून अधिक स्नेहाचें वर्तन केलें नसतें. त्यामुळें मी अशा गृहस्थांना माझे स्नेही म्हणून संबोधिलें, यामुळें मी मर्यादाभंग केला असे मानिलें जाणार नाहीं अशी मला आशा आहे. रा. गोखले हे सर्व नवीन

वकिलांचे आधारस्तंभ होते. त्यांनीं मजप्रमाणेंच अनेकांना वकिलीच्या धंद्यांत मदत देऊन ते न्यायाधीश झाल्यावर त्यांना उत्तेजन देऊन मार्गदर्शन केलें होतें. त्यांनीं चालविण्यास घेऊन नांवारूपास आणिलेल्या येथील महाराणी चिमणाबाई हायस्कूल या शिक्षणसंस्थेच्या कार्यकारी मंडळाचे चिटणीस म्हणून मला निवडून आणाविलें व तें काम प्रथम त्यांच्या हयातींत ६ वर्षे व त्यानंतर बराच कालखंड गेल्यावर पुन्हां ६ वर्षे मिळून १२ वर्षेपर्यंत मीं केलें. त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेंत भाग घेण्याची फार हौस असून अनेक वर्षेपर्यंत ते बडोद्याच्या महानगरपालिकेच्या उपाध्यक्षाच्या जागीं होते. ते निवृत्त झाल्यावर कांहीं वर्षांनीं निधन पावले.

यानंतरचे माझे स्नेही न्यायमूर्ति गोपाळ कृष्ण दांडेकर हे होत. लहानपणीं अत्यंत गरिबीच्या स्थितींत वाढल्यानें त्यांनीं आपला विद्याभ्यास स्वतःच्या हिंमतीवर शिष्यवृत्त्या मिळवून केला. ते कायद्यांत अत्यंत प्रवीण समजले जात व त्या विषयांत त्यांच्या जोडीचा कायदेपंडित फारच क्वचित् आढळेल. त्यांनीं आपल्या विद्यार्थीदशेंत केवळ विद्यार्जनाकडेच लक्ष दिल्यानें जगाच्या व्यवहारापासून ते अलिप्त रहात. पण पुढें सन १९२७ सालीं बडोद्यास आलेल्या महापुरामुळें त्यांनीं सार्वजनिक कार्यांत भाग घेण्यास सुरुवात केली. त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र आंखून घेतलें होतें व त्यांतच आपली सर्व मेहेनत केली. त्यांच्या प्रयत्नामुळेंच बडोद्यास 'ब्राह्मणसभा' स्थापन झाली व तिला राजेशाही इमारत प्राप्त झाली आहे. बडोद्याच्या सरन्यायाधीशांच्या जागेवरून पुढें त्यांची नेमणूक श्रीमंत सयाजीराव यांनीं नायब दिवाणाच्या हुद्यावर केली व तेथें असतांनाच ते निधन पावले. त्यांचा स्वभाव प्रथमदर्शनीं रुक्ष असा वाटे पण एकदां त्यांच्या अंतःकरणापर्यंत प्रवेश झाल्यावर ते फारच साधे, किंबहुना एखाद्या लहान मुलाइतके साधे, आहेत अशी खात्री होई.

यानंतरच्या माझ्या स्नेह्यांत कै. नंदनाथ केदारनाथ दीक्षित या गुजराथी नागरगृहस्थांची गणना होते. ही जात अत्यंत हुशार लोकांची असून तींतच श्री. नंदनाथ यांचा जन्म झाला. त्यांनीं प्रथम बडोद्याच्या विद्याखात्यांत जो प्रवेश केला तो शेवटीं ते सर्व राज्याचे विद्याधिकारी होईपर्यंत अबाधित राहिला. ते फार देशाभिमानी असल्यामुळें दिल्ली

दरबारच्या प्रकरणीं त्यांनाहि पदच्युति व द्रव्याचें नुकसान सोसावें लागलें होतें. तथापि ते पुन्हां पूर्वपदावर लवकरच आले. हे गुजरातींत व इंग्रजींत उत्कृष्ट वक्ते म्हणून समजले जात. निवृत्त झाल्यावर त्यांना पक्षघाताचा विकार झाला व त्यांतच ५–७ वर्षें काढल्यावर त्यांच्या मूळ गांवीं सुरत येथें त्यांचा अंत झाला.

या पुढील माझे मित्र व उल्लेखनीय गृहस्थ म्हणजे कै. भास्कर नारायण पाटकर वकील हे होत. हे सारस्वत ब्राह्मण असून फार बुद्धिमान व हुशार होते. यांचें शिक्षण केवळ मॅट्रिक होण्यापुरतें झालें असूनहि पुढें डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा देऊन बडोदें येथें वकिलीला त्यांनीं सुरुवात केली व त्यांत फार पैसा मिळविला. हे धर्मराजाप्रमाणें अजातशत्रू म्हणून समजले जात व सर्वांशीं प्रेमळपणानें वागून व सर्वांना मदत करून त्यांनीं सर्वांचें प्रेम संपादन केलें होतें. पुढें त्यांना क्षयाचा विकार होऊन ते हवा बदलण्या-साठीं म्हणून पांचगणीस गेले असतां तेथें त्यांचें अवसान झालें. त्यांचे कनिष्ठ बंधु हे बडोदा हायकोर्टाचे सरन्यायाधीश झाले होते व त्यांच्याहून लहान बंधु बडोदें राज्यांत सुभ्याच्या (कलेक्टरच्या) दर्जापर्यंत चढले होते.

यानंतर माझ्या स्नेह्यांत जनरल नानासाहेब शिंदे यांचा उल्लेख खास करावयाचा. यांच्या संबंधानें त्यांच्या मृत्यूच्या उल्लेखाच्या वेळीं मी कांहीं हकीकत दिलीच आहे. हे स्वभावानें सरळ असल्यानें भावनावश असत. त्यांच्या कारकीर्दीच्या पहिल्या भागांत ते कांहींसे जातिनिष्ठ असत. पण पुढें पुढें अनुभवानें त्यांचें मत बदलल्याचें ते स्वतः सांगत. अनेक ठिकाणीं त्यांनी व्याख्यानें दिलीं होतीं व शिपाई गड्याला साजेल अशा रीतीनें ते आपलें म्हणणें मांडीत असत. त्यांचें मजवर निःस्सीम प्रेम असे. ते वारले त्यावेळीं यापूर्वी उल्लेखिलेली माझी बरीचशी मित्रमंडळी गेल्यानंतर त्यांच्या लोभाची किंमत मला अधिकच वाटत असे.

यापुढें बडोद्यांतील मूर्तिमंत सेवावृत्तीचें प्रतीक असलेल्या प्रो. माणिक-रावांचा उल्लेख येतो. मी वर लिहिलेंच आहे कीं, मी बडोद्यास आल्यापासून ज्या कांहीं व्यक्ति इंग्रज सरकारच्या अवकृपेला तीव्रतेनें पात्र झाल्या त्यांत प्रो. माणिकराव व मी हे दोघेहि असल्यानें आमचा जो स्नेह आरंभींच बांधला गेला तो शेवटपर्यंत कायम होता. त्यांचें

माझ्याशीं मोठ्या बंधूप्रमाणें आचरण असे. व्यायामाव्यतिरिक्त गेल्या ४० वर्षांत बडोद्यांत अशी एकहि सार्वजनिक चळवळ झाली नाहीं कीं, जींत आम्ही उभयतांनीं सहकार्यानें काम केलें नाहीं. आतां बडोदें शहर त्यांच्यावाचून सार्वजनिक कार्यांच्या दृष्टीनें उघडें पडलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

बडोद्यांतील माझ्या खास स्नेह्यांतील यानंतरची व्यक्ति म्हणजे येथील प्राच्यविद्यामंदिराचे माजी चालक डॉ. विनयतोष भट्टाचार्य हे होत. श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं ज्यावेळीं प्राच्यविद्येच्या उत्कर्षासाठीं एक नवीन शाखा उघडली त्यावेळीं त्यांचीच नेमणूक या शाखेच्या प्रमुखस्थानीं केली. अखिल भारतीय कीर्तीचे डॉ. हरप्रसादशास्त्री यांचे ते चिरंजीव होत. वडिलांपासून त्यांनीं विद्वत्तेचा हा सर्व वारसा घेतला, एवढेंच नव्हे तर तो आपल्या स्वतःच्या ज्ञानानें अधिक वाढविला. बडोदें येथें सन १९३३ सालीं भरलेल्या प्राच्यविद्या परिषदेचे ते स्थानिक चिटणीस होते. ‘ गायकवाड ओरिएंटल सिरीज ’ या नांवाची पुस्तकमाला त्यांनींच प्रथम सुरू केली व त्यांच्याकडे त्या शाखेचीं सूत्रें असेपर्यंत त्या मालेंत शंभरावर पुस्तकें त्यांनीं प्रसिद्ध करविलीं. या पुस्तकांचा बोलबाला युरोप व अमेरिका वगैरे सर्व देशांत झाला आहे. त्यांच्यामुळें बडोद्यास असलेल्या सुमारें २०००० हस्तलिखितांची छापील यादी प्रसिद्ध करण्यांत आली असून त्या संग्रहांतील अप्रसिद्ध पण निवडक ग्रंथ ते त्या विषयांच्या तज्ञ लोकांकडून शुद्ध स्वरूपांत प्रसिद्ध करवीत. या दरेक ग्रंथाला संपादक जी विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहीत त्यामुळें प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा उत्तम आढावा घेतल्यासारखें झालें आहे. ते सुदैवानें अजून हयात आहेत व येथून निवृत्त झाल्यावर कलकत्त्याजवळील ‘नैहट्टी’ या आपल्या गांवीं राहतात.

येणेप्रमाणें माझ्या सांप्रत निधन पावलेल्या वा बडोद्यांतून गेलेल्या मित्रांची ही नोंद मी कृतज्ञतापूर्वक केली आहे. हल्लींच्या माझ्या विद्यमान स्नेह्यांत श्रीमंत आबासाहेब मुजुमदार ( व्यायामकोश व व्यायाम मासिक यांचे संपादक व प्रसिद्ध व्यायामपटु ), पूर्वीच्या बडोदें राज्याचे परराष्ट्रीय खात्याचे माजी अधिकारी रा. रामचंद्र केशव रणदिवे, इतिहासपटु रा. विनायकराव वाकसकर, ‘ बडोदावत्सल ’ वृत्तपत्राचे माजी संपादक रा.

कृष्णराव रामचंद्र मराठे व कलाभुवनचे माजी प्रिन्सिपॉल श्री. सी. एच्. व्होरा यांचा समावेश होतो.

यानंतर बडोद्याबाहेरच्या माझ्या स्नेह्यांचा उल्लेख मी थोडक्यांत करितों. त्यांत इंदूरचे श्रीमंत सरदार माधवरावसाहेब किबे हे होत. हे एम्. ए. असून मुंबईच्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. सुप्रसिद्ध बॅ. जयकर यांचा उल्लेख अवश्य आहे. श्री. विनायकराव सावरकर हे तर माझे कॉलेजपासूनचे स्नेही. त्यांच्या ' अभिनव–भारत ' या संस्थेचा मी एक कार्यकर्ता सभासद होतों. पुढें ते विलायतेस गेले व मीहि नागपूर, अलाहाबाद, बडोदें वगैरे ठिकाणीं गेलों, तेव्हांपासून जरी प्रत्यक्ष संबंध दुरावला तरी आमचा मनोमय लोभ कायमच राहिला. त्यांच्यावरील निर्बंध दूर झाल्यानंतर ते ४–५ वेळां बडोद्यास आले त्यावेळीं मजकडे उतरत अथवा दुसरीकडे उतरले तरी बहुतेक काळ मजकडे घालवीत.

श्रीयुत तात्यासाहेब केळकर, श्री. चिंतामणराव वैद्य, श्री. शिवराम महादेव परांजपे, श्री. वामन मल्हार जोशी व श्री. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर हे सर्व माझ्याहून वयानें, अनुभवानें व ज्ञानानें थोर होते तरी त्यांचा व माझा अखेरपर्यंत निकट संबंध राहिला.

श्री. विष्णु गोपाळ नवाथे हे तर माझे ज्योतिषगुरूच होते. तसेंच मुंबईचे सुप्रसिद्ध विद्वान वकील डॉ. पांडुरंग वामन काणे यांचा व माझा अत्यंत निकट संबंध असून अनेक बाबतीत आमचा पत्रव्यवहार चालू असतो. तोच प्रकार पाटणा विद्यापीठांतील अनंत सदाशिव आळतेकर यांचा होय. त्यांचे वडील सदाशिव खंडो आळतेकर हे तर बडोद्यास मजकडे दोन महिने येऊन राहिले होते.

मी नागपुरास असतांना तेथील डॉ. मुंजे व रा. अच्युतराव कोल्हटकर या प्रसिद्ध देशभक्तांशीं माझा फार संबंध असे. डॉ. मुंजे मी बडोद्यास आल्यावर अनेक वेळां येथें आले. कारण त्यांचा व श्रीमंत सयाजीराव महाराज यांचा संबंध पुष्कळच होता. त्यांच्याबद्दल उल्लेख यापूर्वी मी केलेलाच आहे.

श्री. अच्युतराव कोल्हटकर यांचे दुय्यम सहकारी म्हणून कै. गोपाळराव अनंत ओगले हे नागपुरास आले. श्री. अच्युतराव मुंबईस गेल्यावर

त्यांनीं महाराष्ट्र नांवाचें साप्ताहिक काढून त्याचा लौकिक इतका वाढविला होता कीं, तें त्या भागांतील 'केसरी' पत्राच्या बरोबरीचें समजलें जाई. त्यांचा व माझा अकृत्रिम स्नेह असून पुष्कळ वेळां त्यांच्या वृत्तपत्रांत मीहि लेखन केलें आहे.

मी विद्यार्थी असतांनाचे माझे दोन स्नेही पुढें फार मोठ्या योग्यतेला चढले. ते म्हणजे मुंबईचे माजी मुख्य प्रधान बाळासाहेब खेर व नागपूर हायकोर्टाचे माजी न्यायाधीश व कांहीं काळ सर न्यायाधीश असलेले श्री. भवानीशंकर ऊर्फ शंकरराव नियोगी हे होत. हे उभयतां प्रत्यक्ष सौजन्यमूर्ति असून पुढें मोठ्या पदावर चढले असतांनाहि त्यांनीं आपला पूर्वीचा स्नेह कायम ठेवला हें त्यांना फार भूषणावह आहे.

शेवटीं आणखी एका व्यक्तीचा उल्लेख हें प्रकरण संपविण्यापूर्वी केला पाहिजे. ते गृहस्थ म्हणजे पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन हे होत. यांना इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला नसूनहि त्यांनीं आपल्या बुद्धीनें, हिंमतीनें व संघटना चातुर्यानें ज्योतिषीवर्गांत स्पृहणीय असें स्थान मिळविलें आहे.

अशा प्रकारें ज्यांनी ज्यांनीं माझ्यावर स्नेहाची व कृपेची पाखर केली त्यांच्या ऋणांतून उतराई होणें मला शक्य नसलें तरी त्यांचा या माझ्या आत्मकथेंत गौरवपूर्वक उल्लेख करून मी समाधान मानतों.

• •

मराठी ग्रंथ सं. । म. ठा. स्थळप्रत.
अनुक्रम 25706 दि: ...
क्रमांक ...
नों: दि: 23...

वरील आत्मवृत्ताचा आराखडा माझे वडिलांनीं १९५५ चे सुमारास लिहिण्यास सुरुवात केली व त्यानंतर जसजसा वेळ मिळाला तसतसें लिहून तयार करत गेले. १९५६ चे सप्टेंबरमध्यें विदर्भसाहित्यसंघाच्या आमंत्रणा-वरून लोकमान्यशताब्दिनिमित्त ते नागपूर व विदर्भातील इतर शहरांतील निरनिराळ्या शिक्षण व साहित्यसंस्थांना भेटी देऊन आले व तेथें त्यांनीं व्याख्यानें वगैरे दिलीं. तेथपर्यंतची सर्व हकीकत त्यांनीं स्वतः लिहून ठेवलीच आहे. ते बडोद्यास परत आल्यानंतर दिवाळीपर्यंत येथें राहिले व त्याच सुमारास आमचे कुटुंबांतील बरीच मंडळी येथें आल्यानें तें एक लहानसें कौटुंबिक संमेलनच झालें होतें. त्यानंतर माझे मोठे बंधु जे दिल्लीला साराभाई केमिकल्सचे मॅनेजर म्हणून काम करीत होते, त्यांचें दिल्लीला येण्याचें आग्रहाचें आमंत्रण आलें व त्यावरून दिवाळी झाल्यानंतर वडील व माझी मोठी बहीण असे दोघे येथून दिल्लीस जाण्यास निघाले. १९५४ च्या एप्रिलमध्यें माझे वडिलांना एक लहानसा Thrombosis चा विकार थोड्या प्रमाणांत झाला होता. परंतु त्यांतून ते पूर्णपणें बरे झाले होते व नागपूरचे प्रवासापर्यंत व त्यानंतरहि त्यांची प्रकृति उत्तम होती व स्वतःची सर्व दैनंदिन कामें ते उत्तम प्रकारें स्वतः करीत असत. त्यामुळें त्यांची दिल्लीची सफर ही नेहमींप्रमाणेंच एक प्रवास आहे अशी आमची सर्वांची समजूत होती. परंतु दिल्लीला गेल्यावर जरी पहिले तीनचार दिवस त्यांची प्रकृति उत्तम होती व त्यांचे तेथील सर्व कार्यक्रम व्यवस्थित होत होते, तरी त्यानंतर एकदम थंडी व पोटदुखीचे विकारानें त्यांना अतिशय त्रास होऊं लागला व दिल्लींतील पुढील सर्व कार्यक्रम रद्द करावे लागले. डॉक्टरांचे सल्ल्यावरून त्यांनीं बडोद्यास परत यावयाचें ठरविलें व २८ नोव्हेंबरला ते येथें परत आले. आल्यानंतर लगेच येथील डॉक्टरांची उपाययोजना चालू करण्यांत आली व माझे चुलते (डॉ. आपटे)

हेहि सुरतेहून येथें येऊन त्या प्रयत्नीं लागले. पहिले ७-८ दिवस प्रकृति चिंताजनक होती तरी त्यानंतर सुधारणा होऊं लागली व डॉक्टरांचा अभिप्राय, आतां कोणत्याहि प्रकारचा धोका नाहीं, फक्त अशक्तता आहे ती हळूंहळूं कमी होईल असा होता. परंतु त्यानंतर एक दोन दिवसांतच एकदम आजार बळावून ता. १८ डिसेंबर रोजीं सायंकाळीं पांच वाजतां हृदयक्रिया बंद पडून त्यांचा अंत झाला. शेवटल्या आजारांतील गोष्टी इतक्या अनपेक्षित रीतीनें घडल्या कीं, त्या घटनेवर कितीतरी वेळ कोणाचाच विश्वास बसत नव्हता; परंतु विधिघटनेपुढें कोणाचेंच चालत नाहीं, या गोष्टीचा विचार करून आलेल्या दुःखद प्रसंगाला तोंड देण्याशिवाय इलाज नव्हता.

माझे वडिलांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांतील अपुरा भाग लिहिण्याची व पुरा करून हकीकतदृष्ट्या तें संपूर्ण करण्याची कामगिरी यथाशक्ति करण्याचा मी प्रयत्न केला आहे. साहित्यदृष्ट्या तो त्यांचे स्वतःचे मानानें अगदीं निकस ठरेल. परंतु शेवटपर्यंतच्या घटनांचा त्यांत उल्लेख करणें हें पूर्णतेच्या दृष्टीनें जरूर असल्यानें हा वृत्तांत जोडला आहे.

—मु. श्री. आपटे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २९७०८ दि:
क्रमांक नों. दि:
REFBK-0009493